संजय काळे

# धारपवाडीतील खून



# धारपवाडीतील खून

संजय काळे.

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकांचे नांव:   धारपवाडीतील खून

प्रकार          : रहस्यमय कादंबरी.

लेखक          : संजय काळे

फ्लॅट नं. 3, कल्याणी पुष्प

तुळजाभवानी हौसिंग सोसायटी

गारखेडा, औरंगाबाद. 431005

मोबाईल नं.   9686233218;  7773923082

ईमेल पत्ता: sanjaykale55@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :२६ डिसेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

माझी आई,

कै. सौ जनाबाई दिगंबर काळेस,

सप्रेम अर्पण.

या कथेतील सर्व नांवे, व्यक्ति आणि स्थळे काल्पनिक असून

त्यांचे कोणत्याही जिवंत अथवा मृत व्यक्तिबरोबर साम्य आढळून आल्यास

तो केवळ योगायोग समजावा.

रहस्यकथा हा वाचकांचा आवडीचा प्रकार आहे. इंग्रजीत आजही प्रचंड प्रमाणात रहस्यकथा लिहील्या जातात आणि वाचल्या जातात. एकेकाळी मराठीत रहस्यकथा फार लोकप्रिय होत्या. अलिकडे अशा प्रकारचा लेखनप्रकार मागे पडला. त्याला कारण वाचकांची कमतरता नसून अन्य आहेत. अनेक कारणांपैकी, प्रकाशनाचा खर्च आणि पुस्तकांची किंमत हे एक महत्वाचं कारण आहे. म्हणून ई साहित्याच्या उपक्रमाला मी धन्यवाद देतो. त्यांच्या सहकार्यामुळे माझं पहिल पुस्तक प्रकाशित करणे शक्य झालं.

संजय काळे.

झाडें जोडुनी पत्रयुग्म फुटलें मेघांप्रती याचती,

स्वछंदे जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती

सारी पालवती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते

एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

गोविंदाग्रज.

# प्रकरण १ ले.

‘काय चुकी झाली असंन त नाक घासून मापी मागतो. ’

दगडूनं दोन्ही पंजे टेकवून, जमिनीला नाक लावून मान हालवली. शेणानं सारवलेल्या जमिनीचा वास त्याच्या नाकात गेला, तरी तो तसाच तिच्या बोलण्याची वाट पहात मान हालवत राहीला.

हूं... हूं... हूं... !

सुमनच्या तोंडून रागानं हूंकार बाहेर पडू लागले तश्या उपस्थित बाया बापडया धास्तावल्या

शांत हो आई... . शांत हो... .

दगडूच्या बायकोने पुढे होऊन तिच्या कपाळावर कुंकवाचा मळवट भरला. समईच्या मंद पिवळ्या प्रकाशात सुमनच्या उग्र चेहऱ्याकडे पाहीलं. तिचे डोळे कवड्यांसारखे  पांढरेशुभ्र दिसत होते. सुमनकडे पहायची  तिला भीती वाटली. घाईने हात जोडून कपाळ अंगठयाला टेकवत तिने सुमनच्या चेहऱ्यावरील नजर हटवून घेतली.

‘मापी, आई, चुकीची मापी असावी. ’ कांपऱ्या आवाजात ती बोलली.

‘चुकी? हूं... हूं... अपराध घडला तुम्च्या हातून. हूं. . हूं. .  आता मापी मागून काय उपेग?

‘पर असं झालं तरी काय? नजरचुकीनं काही राहून गेलं असंन तर लेकराचे अपराध पोटात घाल माय. आमच्याकडून काही उणीव राहून गेली असंन त आम्हाला काय ती शिक्षा दे पर लेकरांस्नी नग तरास देऊ बघ. ’

‘आत्ता लेकरांची काळजी वाटून राहीली काय? तवा कसा इसरलास मला? जा तिकडंच. माह्या कडं येऊ नगा.’

‘तुह्या कडं नगं येऊ तर कुकडं जाऊ आई? तारलं काय आन मारलं काय, लेकरू त आईच्याच पदराकडं जाईल ना? ’

‘चुक्या करायच्या मंग हात जोडीत यायाचं! किती डाव माफ करायचं? आँ ’

‘पर चुकलं काय? तेव्हढं कळलं त... ... . ’

‘यव्हढा शाणा सुर्ता माणूस. तुला वागायची समज नाय? घराण्याची रितभात म्हायती नाय? आठीव आठीव काय चुकी झाली..... ’

‘असं गुरमळीत बोलनं कळना गेलं. आम्ही अजान लेकरं. जे काय हाय, ते सपस्ट सांगा. असं आडून आडून बोलणं काय कळना बघा आम्हाला. ’

‘सुभन्याचं लगीन ठरत नव्हतं. हात जोडीत येत व्हता. लगीन ठरलं आन इसरून गेला मस्नी. ’

‘तुला इसरून कसं हूईल माते. तुझं काय बी ठिवलं नाय... . ’

‘खोटं... . . ! ’

सुमन कडाडली तशी दगडूची बायको मागे सरकली. दगडू जागीच ताठरला.

सुमन नुसती घुमत राहीली. मग घोगऱ्या आवाजात तिने बोलायला सुरवात केली,

‘सुभन्याच्या लग्नात माझा निविद् आला व्हता का? मही वटी भरली व्हती? पयले मारे म्हण्ला साडीचोळी करतो. आमदाराची पोरगी घरात आली म्हून हुरळून गेला. वटी नाय निविद नाय. परस्पर पोरांना धाडून दिला... आँ... . राहीली का त्येंची आमदारकी? ’

जमलेल्या लोकांनी दगडूकडे आणि त्याच्या बायकोकडे पाहीले. त्यांची नजर खाली झुकली होती. चेहऱ्यावर अपराधी भाव होते.

‘चुकी झाली खरी... . माय, ’ दगडू कबुली देत म्हणाला, ‘पोरीच्या बापाने परस्पर तिकीटं बुक केली व्हती... टायमच नाय मिळाला. म्हटलं पोर परतल्यावर त्यांच्या हातून चोळी बांगडी करू. ’

‘तुला मह्या परीस तिकीटाच्या पैश्याची किंमत जास्त वाटली. हं हं हं... ... ’

‘शांत हो, माते शांत हो’.

‘शांत? माहा संताप पाहीला न्हाय तुम्ही. असे दिवस फिरतीन... काही उरणार नाही. आमदारकीचा माज दावतो म्हया फुडं ! ’

‘नाय नाय आई नाय अगं तू आमची माता हायेस. तुह्या म्होरं आमी काय माज दावनार?

‘आता तरी अक्कल ठीकाणी आली नव्हं? मी काय सांगते ते ऐेक. ‘

‘हुकुम कर माते. ’

‘साडी चोळी फायजे. खणा नारळाची ओटी भरायची. शुक्करवारी सवाष्ण-बामन जेऊ घाल. ’

‘व्हय. ’ दोघांनी डोकं टेकवून तिला नमस्कार केला.

‘जावा. सुखी ऱ्हावा. व्हतील नातवंड... . पतवंड... . पर मला इसरू नको. ’

त्यांच्या मनांत खुशीची लहर दौडली. सुमनला नमस्कार करून ते मागे सरकले.

जमलेल्या लोकांत शांतता पसरली. साकडं घालायला आलेली चंद्रा हातातला कुंकवाचा करंडा घेऊन पुढे सरसावली एव्हढयांत बाहेर कुणीतरी बोललं,

‘भाऊ आले. ’

सुमन कानोसा घेतल्यासारखी शांत झाली. तिच्या घश्याची हालचाल झाली.

चंद्राने वळून पाहीलं, दारात भाऊंची आकृती दिसली. दाटीवाटीने बसलेल्या माणसात ते आपल्यासाठी जागा शोधत होते. त्यांना बसयला जागा नाही हे लक्षांत येताच काही जण उठून बाहेर गेले, तसे भाऊ पुढे सरकले.

त्यांच्यामागे प्रताप उभा होता. त्याला पहातांच लोकांनी नजर वळवली.

तो जोराने बोलू लागला.

‘ए... थोडी जागा करा... . या रणजीतसाहेब... . ये तू बाहेर जा ना जरा... ए मंदे, सोबत बाईसाहेब आहेत, दिसत नाही का उठ जागा दे करून... . ’

‘कोन इध्न आणून राहीलं? ’ सुमन ओरडली.

गांवातल्या बायांनी यशोदाबाईंना आंत यायला आणि बसायला जागा करून दिली. त्यांच्या मागं दाराबाहेर उभा असलेल्या रणजीतला आंत येण्याचा प्रतापने लोचट इशारा केला.

त्याने हात उचलून’ मी इथंच  ठीक आहे’ अशी खुण केली.

चंद्राला प्रश्न विचारायचा होता. पण अरविंदाभाऊच्या घरचे लोक आले म्हणजे काही विचारायलाच आले असतील ना. त्यांच्या आधी कसं विचारायचं? असा सवाल पडून ती  भाऊंकडे पाहू लागली.

यशोदाबाईंनी जागीच चुळबूळ केली.  त्यांनी भाऊकडे पाहीलं. त्यांची अपेक्षा होती भाऊ पुढाकार घेतील. रणजीत तर तिऱ्हाईतासारखा दाराबाहेर थांबला  होता. प्रताप हुकुमाची वाट पहात उभा होता. तो पुढे होईल, पण हा घरघुती मामला आहे. प्रतापला प्रवेश नाही. पायातली वहाण... . .

‘वहीनीसाहेब, ‘त्यांची व्दिधावस्था पाहून चंद्रा म्हणाली, ‘तुमी इचारा की आदूगर. मंग म्या इचारील. ’

तिचं नांव घेतल्याने भाऊंनी सुटकेचा निःश्वास टाकला आणि तिला, इचारा... म्हणून डोळयांनी इशारा केला. तिनं पुढे येऊन सुमनच्या मळवट भरल्या कपाळावर कूंकवाचं बोट लावायला हात उचलला तशी सुमन मागे सरकली आणि ताडकन्  तोडून  बोललीः

‘दूर हो. मला शिवू नको. ’

सुमनचे डोळे तारवटले. तिच्या कठोर चेहऱ्यावर मोकळया केसांच्या बटा विखुरल्या. वहीनीसाहेब नकळत मागे सरकल्या.

भाऊ सुमनकडे तटस्थ नजरेनं पहात होते. त्यांचा या सगळ्या गोष्टींवर विश्वास नव्हता. सुमनच्या अंगात देवी येते, याच्यावर गावकऱ्यांनी विश्वास ठेवावा ह्यात त्यांना काही गैर वाटत नव्हतं. पण यशोदावहीनीनी  विश्वास ठेवावा याचं त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी  भाऊंकडे येऊन सोबत चला

म्हणून गळ घातली, तेव्हाच त्यांना वाटलं होतं सांगावं, “ सुमनकडे कशाला जाता? माझा अशा गोष्टींवर विश्वास नाही. ”

त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी पाहून ते काही बोलले नाही. अशा वेळी काही चांगलं सांगावं तरी त्याच्या विपरीत अर्थ काढला जाईल असं त्यांना वाटलं, म्हणून ते सोबत यायला तयार झाले.

‘तू कह्याला आली ते ठाव हाय मला. ’ सुमन बोलली.  फटीतून वारा घोंघावण्याचा आवाज यावा तसा तिचा आवाज होता. ओठ विलग करून दात दाखवत ती हसली, तेंव्हा तिचा चेहरा लांडग्यासारखा क्रुर वाटला.

यशोदाबाईंना वाटलं, आपण उगाच या भानगडीत पडलो. पण आता पुढे जाण्या खेरीज इलाज नव्हता. धीर करून त्यांनी विचारले,

‘तुला तर जगाची खबर आहे, हे माहीत आहे. मला विचारायचं होतं, ’ आपल्या आवाजात किंचीत् उपहास आला असे त्यांना वाटले.

‘ठाव हे... . नवरा घरला आला न्हायी... . दोन रोज झाले... . व्हय ना? ’

‘हो. हो. दोन दिवस झाले, दुपारी येतो म्हणून सांगून गेले पत्ता नाही. ’

नुसता घुमण्याचा आवाज.

‘ते येतील तेव्हा येऊ दे. यशोदाबाईंचा म्हणाल्या, ‘त्यांची खुशाली कळली तरी जीवाला चैन पडेल आमच्या. ’

‘तुहा नवरा... . . काय ढंगाचा हाय ते समद्यास्नी ठाव हाय. ’

तिच्या बोलण्याने यशोदाबाईंना शरमल्यागत झालं. लोकांची कुजबूज ऐकू आली. प्रतापने शूss! करून दटावले तशी  कुजबूज शांत झाली.

‘माय, ते सुखरूप तर आहेत ना?

‘न्हाय... ’

‘ न्हाय… . ! ’

त्यांच्या  हातून करंडा खाली पडला. शेणाने सारवलेल्या ओल्याजमीनीवर पसरलेलं कुंकू पाण्यात मिसळून सांकळलेल्या रक्तासारखं काळपट लाल दिसू लागलं.

‘त्यांना काही झालं तर नाही ना? ’

‘मस्नी त्यो झोपडीत पल्डेला दिसून ऱ्हायला. जवळ कुणी बी नाय. ’

‘झोपेल हाय का? ’

‘ऑं… नाय. . दगा… दगा होयल दिस्तो. ’

‘माय ! ’  असा टाहो फोडून यशोदाबाई  मागे सरकल्या. बायांनी तिला जवळ ओढले. गोंधळ ऐकून दाराबाहेर उभा राहीलेला रणजीत आंत आला.

‘पण आहे कुठं? काही ठाव ठिकाणा सांगणार की नाही? भाऊंना रहावले नाही.

‘झोपडी हाय… .  पुरवेला दरोजा दिसून राहीला… . ’

कुणाच्या काही लक्षांत आलं नाही. जो तो पुर्वेकडील दरवाजा असलेली झोपडी कुणाच्या मळ्यात आहे याचा विचार करू लागला.

‘दारोज्याशी पिंपळ सळसळतो… . . ’

‘आजून? कुणाचा मळा म्हणावा? ’

पण या प्रश्नाचं उत्तर आलं नाही. सुमन एकाएकी ताठरली आणि शक्तिपात झाल्यासारखी जमीनीवर पडून राहीली.

जमलेल्या बायकांनी तिला उठून बसवली. तिच्या चेहऱ्यावरील घाम पुसला.

‘पानी पिती का बाई सुमन? ’ कुणी तरी विचारले. तिने मान डोलावली. समोर केलेला पाण्याचा तांब्या तिने मान मागे करून तोंडात उपडा केला. अखंड धार चालू ठेऊन ती घटाघटा अर्धा तांब्या पाणी प्यायली.

देवी गेली.

आता थांबण्यासारखं काही नव्हतं. बाया, सुमनला कुंकू लाऊन गर्दीतून वाट काढत बाहेर पडू लागल्या. त्या बाहेर येताच अंधारात उभे असलेल्यांनी त्यांच्या भोवती गराडा घालून त्यांना प्रश्न विचारायला सुरवात केली.

आंत फक्त चौघेजणं उरले. यशोदाबाईच्या चिंताक्रांत, उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहून भाऊंना दया वाटली. आपल्या खर्जातल्या आवाजात सुमनला उद्देशून ते म्हणाले,

'सुमने, पंचाईत झाली. हा अरविंदा नक्की कुठं आहे म्हणायचा? '

'देवीनं काय सांगितलं? ' डोक्यावरील पदर नीट करीत नम्रतेने तिने विचारले.

'कुठं झोपडीत पडेलेत. पुर्वेकडे दार आहे. बाहेर पिंपळाचं झाड आहे. '

'कायकी बा, मला त काही आठवत न्हाई. '

तिने बैठक संपल्याचा इशारा दिला.

****

'काय करायचं गडयांनो? ' भाऊंनी खर्जातल्या आवाजात विचारलं.

यशोदाबाई गांवातल्या इतर बायकांबरोबर घरी निघून गेल्या. जातांना त्या मुसमुसत होत्या. तिला धीर देत भाऊ म्हणाले,

'घरला जा. रडू नका. आम्ही बघतो त्याला. शोधतो. बसला असल कुठे... ... . '

" दारू पीत" त्यांना म्हणायचं होतं. घरचेच लोक असते तर ते म्हणालेही असते. प्रताप आणि रणजीत भाऊंच्या सोबत मागे राहीले. रणजीतला आतापर्यंत कधी निर्णय घेण्याची वेळ आली नव्हती. अचानक आलेल्या प्रसंगाने तो गोंधळून गेला.

‘काय करायचं? ’ भाऊंनी पुन्हा सवाल केला.

कार्तिक महीन्याच्या थंडीत त्यांचा सवाल गोठून गेला, की भोवतालच्या अंधारात विरून गेला? त्यांना कुणी उत्तर दिले नाही.

सुमनच्या खोपीतून निघून ते शेताच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या नामदेवच्या, तिच्या भावाच्या, झोपडीसमोरच्या अंगणात बसले होते. अंगणात टाकलेल्या बाजेवर भाऊ आणि सावकार बसले होते. पाणी भरल्या उसातून येणाऱ्या वाऱ्याने अंगभर काटा उठत होता. उसात काजवे चमकत होते.

सुमनची वहीनी आंत भाकऱ्या थापत होती म्हणून त्यांनी कंदील उंबरठयावर ठेवला. त्या क्षीण प्रकाशात समोर बसलेल्या गावकऱ्यांकडे नजर फिरवत भाऊंनी दुसऱ्यांदा सवाल केला.

‘काय करायचं? बोला की धडाधडा. ’ समोरून उत्तर येणार नाही याची त्यांना खात्री होती. ‘काय सावकार? ’

शेजारी हाताची घडी करून बसलेल्या सावकाराला त्यांनी खालच्या आवाजात विचारले. अश्या अडचणीच्या वेळी सावकार आले याचंच भाऊंना आश्चर्य वाटत होतं. हा त्यांच्या मनाचा मोठेपणा म्हणायचा की, त्यांचा हात दगडाखाली अडकला म्हणून... ... ?

पन्नाशीचा सावकार सावळ्या रंगाचा, पावणेसहा फुट उंच, रुंद खांद्याचा. धिप्पाड बांध्याचा होता. सरळ तरतरीनाक, तलवारकट मिशी. मागे वळवलेले, कुरळे, काळेभोर रंगवलेले केस. तो आपल्या दिसण्याकडे कटाक्षाने लक्ष देत असे. घरी सावकारीचा पिढीजात धंदा. भाऊंच्या शेजारी बरोबरीने बसणाऱ्यांपैकी तो एक होता.

सावकाराने प्रकाशाच्या दिशेने मनगट फिरवून घड्याळात पहीलं. कंदीलाच्या प्रकाशात घड्याळाचा सोनेरी बेल्टरी बेल्ट चमकला.

‘आता पावणे आठ होत आहेत, ’ कर्ज मागायला येणाऱ्याला आपल्या अटी समजाऊन सांगाव्या तशा सुरात तो बोलू लागला, ‘आज शुक्रवार आहे. नऊ वाजता वीज येईल. ’

‘मग काय नऊ वाजेपर्यंत वाट पहायची म्हणता? ’ रणजीतने विचारले.

‘लोक घरी जातील, जेवण करतील, थंडीचं अंगात घालवं लागेल. ’ ते थंडी वाजत असल्यासारखे खांदे हालवत समजुतीच्या सुरात म्हणाले.

‘याच्यापेक्षा मी बरा. ’ भाऊच्या मनांत विचार आला ‘अजूनही वेळ पडली तर रात्री बेरात्री, लोडशेडींगप्रमाणे वीज आली की शेताला पाणी भरायला जातो. माझ्यापेक्षा दहा वर्षाने लहान असेल की, मुद्दाम चालढकल करतोय? बरोबर आहे. अरविंदाचं आणि त्याचं एव्हढं बिनसल्यावरही तो आला. दिखाव्या पुरता का होईना, आला हे काय कमी आहे. बिचाऱ्याची बायको अजूनही... ...

‘नऊपर्यंत म्हणजे... फार उशीर होईल. ’ रणजीतच्या आवाजाने त्यांची तंद्री भंगली.

सावकाराने कडक आवाजात विचारले, ‘कशाला? ’

या प्रश्नाला सगळयांच्या मनांत एक अशुभ उत्तर आले पण कुणाचं बोलायचं धाडस झाले नाही.

‘नाहीतर भाऊ, पोलिस स्टेशनांत जाऊ ना. ’

‘कोण? प्रताप का? ’ अंधार उजेडाच्या सीमारेषेवर बसलेल्या प्रतापकडे डोळे बारीक करून रोखुन पहात भाऊने विचारले.

‘मला आपलं एक वाटलं. ’ ओशाळलेल्या आवाजात तो म्हणाला.

‘ही तुझी अक्कल. ’ भाऊ शांतपणे म्हणाले.

म्हणूनच भाऊंशी स्वताः होऊन कुणी बोलत नाही. सगळयां समोर कुणाला काय बोलतील सांगता येत नाही. त्यांना उलट उत्तर द्यायची प्रतापची काय, गांवात कुणाला हिम्मत नाही. पुटपुटल्यासारखं तो म्हणाला,

‘सुमनबाईनं सांगितलं, अरविंदभाऊ संकटात आहे. त्यांना तात्काळ मदतीची गरज आहे. म्हणून म्हटलं. ज्यांना जेवायला जायचं त्यांना खुशाल जाऊ द्या. ’ शेवटचं वाक्य बोलताना त्याचा आवाज वाढला, नजर सावकाराकडे गेली.

‘ हूं... ’ सावकार सुस्कारा सोडत उठून म्हणाले. ‘‘तुमचं चालू द्या. मी येतो. काही मदत लागली तर सांगा. ’

‘थांबा हो सावकार... ’ त्यांचा हात धरून भाऊ म्हणाले.

‘जाऊ द्या हो भाऊ, आपण शोधु अरविंदा भाऊला. त्यांच्या वाचून काय अडलं? ’

‘ माझं पण अडलं नाही, ’ दुखावलेले सावकार फिस्कारले, ‘गांवचा मामला आहे, भाऊचा मान म्हणून आलो. तुझ्यासारख्या नमकहराम लोकांसाठी नाही. आपल्या पायरीनं रहा. भाऊंचं माझं बोलणं चाललं. हत्तीच्या भांडणात कोल्ह्याने पडू नये. ’

‘आपलं तरी काय भांडण आहे? ’ भाऊनं समजुतीच्या सुरात विचारलं.

‘ती एक बोलायची गोष्ट हो भाऊ. ’

रणजीत ताडकन उभा राहीला.

‘तुम्ही बसा भांडत. मी एकटा जातो. ’

‘रणजीत, जरा सबुरी घ्या. मी आहे ना इथं बसलेला. ’ भाऊ म्हणाले.

‘सुमनबाई म्हणाली... . . ’

‘ त्या गधडीला काय अक्कल आहे? तू खाली बैस रे प्रताप. ही का वेळ आहे कां रे भांडायची? कुणाशी कसं बोलावं तुला कळत नाही? ’ रणजीतशी बोलतानाचा समजुतीचा स्वर आता कठोर झाला.

प्रताप पटकन खाली बसला.

क्षीण प्रकाशातही भाऊंनी त्याला खाली मान घालून, आजूबाजूच्या माणसांकडे पाहून, खोडकर हसताना पाहीलं. त्यांनी आपल्या पांढऱ्या मिशीवर बोटं फिरवून राग मनांत जिरवला. घसा साफ करून नेहमीच्या खर्जातल्या सुरात त्यांनी शांतपणे बोलायला सुरवात केली.

‘मी काय म्हणतो, सुमननं दोन गोष्टी सांगितल्या, झोपडीचं दार पुर्वेला आहे, आणि झोपडीच्या दारात पिंपळ आहे. अश्या किती झोपडया आहेत गांवात? तेव्हढया पाहील्या म्हणजे झालं. काय गांवात राहता कां मजाक करता? ’

बरोबर आहे. गावकऱ्यांच्या डोळ्यासमोर झोपडया, पिंपळ येऊ लागले, पण त्यांची दार कुठल्या दिशेला आहे याचा त्यांच्या मनांत  गोंधळ उडाला.

'विठ्याची झोपडी... . '

'तिचं  तोंड का पुर्वेला हाय का? '

'मग कुनीकडं हाय? '

'इकडं हाय इकडं. ' हाताने दिशा दाखवली गेली.

'ही काय पुर्व आहे का? '

'मंग? '

'तिथ पिप्पळ कुठे? '

दिशा बरोबर सांगणारा गोंधळात पडला. दिशा सगळ्यांना ठाऊक होती, पण झोपडीचे दार डोळ्या समोर येत नव्हते. जमलेल्यात आपसांत बडबड सुरू झाली.

'गप्प बसा रे. ऐका, ' भाऊ ओरडले, 'सगळ्या झोपडया कुठं पालथ्या घालायच्या? रिकाम्या झोपडयांत डोकावून पाहावा. हातात काठया, बॅटऱ्या, कंदील राहू द्या. दोघं तिघं मिळून जा. एकटे दुकटे जाऊ नका. गांवातून अजून कुणी येतं का बघा. मी घरीच आहे. काही समजलं तर आधी मला सांगायला यावा. चला निघा. '

हो हो म्हणून सगळे उठले. एकमेकांशी बोलत  तेथुन निघाले.

भाऊने सांगितलं, रिकाम्या झोपडया धुंडाळा. रिकामी झोपडी काय माणसाला खाते? दगा त माणसंच करतात. सावकाराच्या मनांत विचार आला. अरविंदभाऊला कोन दगा करू शकत नाही? गावांत त्यांची काय एकाशी दुष्मनी थोडीच होती?

त्याला कुणीही दगा करू शकतं... . कुणीही... .

'ए नंदू... . . चल ना बे. तु येनार आमच्या संग की जानार घरला? बायकोला इचारायला?

मागे रेंगाळणाऱ्या नंदूला प्रतापने आवाज दिला.

आलो म्हणत नंदून  त्यांच्यामागे निघाला.

****

गांवातल्या तरूण आणि उत्साही लोकांना अरविंदाला शोधण्यासाठी पाठवून भाऊ सावकारा सोबत घराकडे निघाले. अंधारातून वाट काढतांना त्यांना क्वचितच टॉर्चची गरज पडत होती. दोघांचे आयुष्य तेथे गेलेलं. सगळं गाव पाया खालचं. गावकऱ्यांपासून दूर आल्यावर भाऊंनी, इतका वेळ मनांत घोळणारा, प्रश्न विचारला,

'तुम्ही अगदी  वेळेवर आलात सावकार? कुणी निरोप दिला कां? '

'नाही. '

तुटक उत्तर देऊन सावकार जरावेळ गप्प बसले.

' तुम्हाला भेटायला गेलो होतो घरी. वहीनीसाहेबांनी सांगितले तुम्ही सुमनकडे गेलात. ' जरा थांबून ते म्हणाले, 'शकुन पहायला? ' त्यांच्या आवाजात प्रश्न होता, आश्चर्य होते. भाऊंचा अशा गोष्टींवर विश्वास नाही याची त्यांना कल्पना होती.

'हां... '  भाऊ म्हणाले. सावकाराला आपल्याकडून स्पष्टीकरण हवं असल्याचं त्यांना वाटल्यानं ते म्हणाले, 'मी कसचा जातो, यशोदावहीनी आल्या होत्या. जावेला सोबत घेऊन जायला. पण आज तिचा भाचा येणार आहे मुंबईहून. ती घरी थांबते म्हणाली. मग माझी डयुटी लागली. आपला काही विश्वास नाही, पण शेवटी भाऊबंद पडले. नाही म्हणणं वाईट  दिसतं. कधी- कधी आपले विचार बाजूला ठेवावे लागतात. '

'बरोबर आहे. ' सावकर म्हणाले, ' तुम्ही सगळयांना सांभाळून आहात भाऊ. म्हणून तुम्हाला सगळे मानतात. एव्हढे अरविंदभाऊ, कुणाचं ऐकत नाही पण अजून तुमच्या शब्दाबाहेर नाहीत. '

‘हां एव्हढं मात्र खरं आहे. मी जास्त लक्ष देत नाही, पण कधी एखादा शब्द टाकला तर ऐकतो. कुरकुर करतो, पण ऐकतो. ’  त्यांच्या बोलण्यातलं समाधान सावकाराला जाणवलं.

‘सावकाश भाऊ, पुढे दगड आहे. ’  त्यांनी टॉर्चचा प्रकाश दगडावर फेकला. भाऊ जागीच थांबले. आणि दगड टाळून चालू लागले.

‘ घरी कशाला आला होता? सहज? ’    सोबत चालत भाऊंनी पुन्हा प्रश्न केला.

आपण घरी का गेलो याची त्यांना कल्पना आहे. त्यांच्या बोलण्यावरून सावकाराला वाटले. आपण त्यांना ‘त्या’ संदर्भात भेटायला जाऊ याचा त्यांना अंदाज असणार. सावकाराला आजवर कुणाची मनधरणी करण्याची वेळ आली नव्हती. त्यांना बोलणं अवघड वाटत होतं. मनाचा निर्धार करुन ते म्हणाले,

‘ अरविंदाने आमच्यामागे झेंगट लावलं, तुम्हाला माहीतच आहे. ’

‘अरविंदाने? की प्रतापने? ’

त्यांच्या प्रश्नाचा सावकराला राग आला. अरविंदानेच. सगळ्या गावाला माहीत आहे ते भाऊंना माहीत नाही काय ? उगाच आपलं वेड पांघरायचं. दुसरी वेळ असती तर त्यांनी आवाज चढवला असता पण... ...

‘प्रतापची काय हिम्मत आहे भाऊ माझ्या समोर उभं राहण्याची? त्याला कुणाचा पाठींबा असल्याशिवाय का तो माझ्याशी खेटेल? ’

‘दिवस बदलले सावकार आता. भटा- सावकाराचे दिवस राहीले नाहीत. वंचित समाजही जागा झाला. ’

ही भाऊंची पुढारी भाषा. दोघांचे पटत नव्हते ते तिथेच. भाऊ तरी त्याला काय करणार. स्वातंत्र्यानंतर कॉग्रेसची हीच भाषा होती. त्यांना जनतेचे राज्य आणायचं. त्यांच्या भूमिकेवर फडाफडा बोलून मनांतला राग ओकण्याची ही वेळ नाही याची हतबल जाणिव झाली. मनांतले विचार बाजूला सारून अजीजीच्या सुरात ते बोलले,

‘तुम्हाला तर माहीती आहे भाऊ, मी कधी जुलूम जबरदस्ती केली नाही. त्याच्यावर मी काही अन्याय केला की त्याची फसवणूक केली ?  त्याला किती अडचणीच्या वेळी मदत केली हे तुम्हालाही माहीत आहे. ’ पोटतिडकीनं ते बोलले.

‘हो बाबा, पण त्याची जमिन लिहून घेतलीस ना? ’

‘सगळयांचीच घेतो. रिवाजच आहे तो. सरकारी बँकेत गेले तरी सातबाऱ्यावर बोझा टाकतात का नाही? ’

‘ते बरोबर आहे तुमचं. पण त्या गधडयाला कोण सांगणार? सगळ्या गावाला त्याचे प्रताप माहीत आहे. ’

अचानक सावकार भाऊंना आडवे होऊन थांबले. भाऊ जागी उभं राहीले.

‘त्याच्याशी आपल्याला काही घेणं नाही, ’ सावकार म्हणाले,  ‘ तो अरविंदचा माणूस आहे. अरविंदभाऊंनी सांगितलं तर तो त्यांच्या शब्दाबाहेर जाणार नाही. तुम्ही त्यांना माझ्याकरता एक शब्द टाका. तुमचा शब्द ते काही ओलांडणार नाही. एव्हढया संकटातून सुटलो की सुटलो. मी औरंगाबादला घर पाहीलं. आम्ही कायमचं निघून जाऊ. सध्या पोलिसांच्या झंझटीमुळे गाव सोडता येत नाही. गाव सुटल्याशिवाय तुझ्या वहीनीला... ... ... ‘

त्यांचा स्वर रडवेला झाला. दुःखाचा उमाळा आल्याने त्यांना पुढे बोलता आले नाही.

‘अजून सावरल्या नाही कां रे त्या? ’ त्यांच्या पाठीवर हात फिरवून भाऊंने विचारले.

‘नाही रे. बघवत नाही तिच्याकडे. एखाद्या पुतळ्याप्रमाणे बसून रहाते. मानसोपचार हॉस्पिटलमध्ये आहे. तिच्याकडे पाहून वाटतं... . त्या प्रतापला अन् त्या अरविंदला... . . एकाच टायमाला भोसकून टाकावा. ’

सावकाराच्या आवाजात धगधगता खुनशीपणा ऐकून  पाठीवरून फिरणारा हात थबकला. तसे भानावर येऊन सावकाराने आपले वाक्य अर्धवट सोडले. भावनेच्या भरात आपल्या तोंडून काय निघून गेले ? भाऊंना राग आला तर गांवात आपलें काम करणारा दुसरा कुणी नाही याची त्यांना जाणिव होती. अपराधी सुरात ते म्हणाले,

‘म्हणजे भाऊ, तुम्ही मनावर घेऊ नका. मी आपला रागाच्या भरात बोलून गेलो.  माझ्या मनांत तसं काही नव्हतं. ’

‘जाऊ द्या हो सावकर. ’ भाऊ सहजता आणत भाऊ म्हणाले. एकेरीहून ते पुन्हा अहो जाहो वर आल्याचं सावकाराच्या लक्षांत आलं. त्यांनी पुन्हा चालायला सुरवात केली.

आपल्या उतावळ्या बोलण्याने काम बिघडून जाणार अशी सावकाराला भीती वाटली. खरं तर त्यांचा स्वभाव तुसडा नव्हता पण सुवर्णाची अवस्था पाहून त्यांचा राग धगधगत होता. ती घटना घडून महीना होत आला. अजून ती सावरली नाही. तीच का ते सुध्दा डोक्याला फटका बसावा तसे सुन्न झाले होते. ज्या गांवात वाडवडीलांपासून टेचात वावरलो. सन्मानाने, प्रतिष्ठेने  राहीलो. त्या गांवात म्हातारपणी, सगळा व्यवहार आवरता घेत असतांना... ...

त्याच वेळी भाऊं  विचार करीत होते, हा सहज बोलून गेला की, ह्यानेच अरविंदला दगफटका केला? सावकाराला आपण लहानपणापासून ओळखतो. सगळ्यांना माहीत आहे, कर्ज वसुलीसाठी त्याने दिमतीला चांगले आडदांड नोकर ठेवलेले आहे. त्याचे त्याच्या बायकोवर अतिशय प्रेम आहे. तिची केविलवाणी  अवस्था पाहून रागाच्या भरात यानेच तर अरविंदाला... . छे... छे. . ! सावकाराचा आणि त्यांचा पिढीजात घरोबा आहे. रागानेच बोलला असेल. तो इतक्या खालच्या थराला जाणार नाही. त्यांनी स्वताःची समजूत घातली.

‘तुम्ही अरविंदाला . भेटून घ्यायचं असतं एकदा. ’ भाऊ म्हणाले.

‘अं? ’ भाऊंचं बोलणं एकदम समजलं नाही. ‘भेटलो. पण राजशेखरवरून सध्या ते आमच्यावर नाराज आहे. आम्हाला काय दोघंही सारखेच. तुम्हीच सांगून बघा. ’

भाऊंने काही उत्तर दिले नाही. राजशेखरचा उल्लेख त्यांना आवडणार नाही हे सावकाराला माहीत होतं, पण त्याच्यामुळेच ते या संकटात अडकले, याची जाणिव भाऊंना करून द्यायलाच हवी होती.

दोघांचे रस्ते वेगळे झाले तसे ते थबकले.

‘चला मग. ’ सावकार म्हणाले, ‘अरविंदभाऊचे काही समजले तर कळवा मला. काही मदत लागली तर सांगा.’

‘हाऽऽऽ, बेफिकरीनं भाऊ म्हणाले, ‘ येईल. निष्कारण काळजी करतो आपण. तो बसला असेल कुठे... ... चला. ’

सावकाराशी हात मिळवत भाऊ म्हणाले.

‘हो. चला, ’ त्यांचा हात घट्ट धरून सावकार म्हणाले, ‘ माझ्या कामाचं विसरू नका. एव्हढं प्रकरण मिटलं की मी गाव सोडून जाईल. पुन्हा तुम्हाला त्रास द्यायला येणार नाही. ’

‘अरविंदा भेटल्यावर आधी तुमच्या विषयी बोलेल. ’

भाऊंची पाठ फिरल्यावर सावकाराच्या मनांत विचार आला,

अरविंदा भेटल्यावर की अरविंद भेटला तर!

# प्रकरण: २

काळोखात रस्त्यावरून जाणाऱ्या तीन माणसांत नंदूची पांढऱ्या कपडयातली आकृती, त्याच्या ओळखीच्या चालीमुळे, बँकेच्या पायऱ्यांवर बसलेल्या मनजीतने बरोबर ओळखली.

‘नंदू , इतक्या अंधाराचा कुठं चालला? ’

मनजीतने आवाज दिल्या बरोबर संवयीप्रमाणे तो त्याच्याकडे गेला. पाच वर्षांच्या मुक्कामात मनजीत मराठी बोलायला शिकला असला तरी गांवातले लोक त्याच्याशी सवयीने हिंदीतच बोलत.

‘रामराम! अंधारात काय करून राहीले? ’ मनजीतने अंधारात रोखून पाहीले.

‘कोण, रामेश्वर का? काय करता? तुमच्या गांवात येऊन फसलो. लोड शेडींगचं घरात एकटा बसून तरी काय करू? सोबत कोण आहे ? प्रताप!

त्याच्या चेहऱ्यावरील नाराजी दिसत नसली तरी त्याच्या बोलण्यातून स्पष्ट जाणवली.

प्रताप बँकेचा तापदायक खातेदार असल्याने तो कुणालाच आवडत नव्हता. वेळी अवेळी तो मॅनेजरच्या केबिनमध्ये जाऊन वाद घालत बसे. RTI अंतर्गत अनावश्यक माहीती मागणे त्याचा छंद होता. त्याच्या सोबत नंदूला हिंडताना पाहून मनजीत नाराज झाला.

‘कुठं चालला नंदू अंधारात? ’ मनजीतने विचारले.

‘अरे, गांवात एव्हढा गोंधळ चालला, तुम्हाला काहीच खबर नाही? ’ रामेश्वर

‘हां ? काय चाललं? कंदील घेऊन लोक टोळक्याने फिरताना दिसले. काय गोंधळ आहे? ’

‘सब लोगा अरविंदाभाऊला ढूंडून राहीलेत. ’ नंदू बोलला.

‘क्यो? कुठे पळून गेला तो? ’

‘इज्जतीने बोल. कुणाबद्दल बोलतो कळतं का? पळून जायला त्यांनी काय चोरी केली का? ’ प्रताप भडकला.

‘तुझ्याशी कोण बोलतं? फालतू बहस करू नको. ’

‘फालतू गोष्टी तू करू नको. जावं लागेल परत पंजाबला. ’

‘अरे जा रे. स्वताःच्या दमावर आलो इथपर्यंत. कुणाच्या पदरा आड लपत नाही. अरविंदभाऊकडे पाहून तुला सोडून देतात गाववाले. नाहीतर... . . ’

‘नाहीतर काय केलं असतं? ’ त्वेषाने पुढे होत प्रताप म्हणाला.

‘जाऊ दे ना यार मनजीत, ’ मध्यस्ती करीत नंदू बोलला. ‘प्रताप, आपण कोन्त्या कामाला चाल्लो, काय टेंशन आहे, समजतं की नाही तुला? ’

त्याचं बोलणं ऐकून दोघे ओशाळले.

‘अरविंदाभाऊंचं काय म्हणाला? कशाला शोधु लागले सगळे त्यांना? ’ मुळ मुद्द्यावर येत मनजीत बोलला.

‘ते दोन रोजापासून घरला येयल न्हाई. त्यांचे घरवाले सुमनबाईकडे गेल्ते. सवाल इचारायला.

‘काय बोलली... . मौसी? मनजीतच्या आवाजात टेंशन वाटलं.

‘बोल्ली की त्येन्ला दगा फटका झाला. पुर्वेकडे तोंड असलेल्या आणि दारासमोर पिंपळ असलेल्या झोपडीत ते हायेत. त्यांना दगा झाला आन् ताबडतोबीन मदत फायजे. संमदे टोळी टोळीनं धुंडायला निघाले. येणार का? ’ वेळ वाया जातो याची नंदूला जाणिव झाली.

मनजीत एकदम गप्प झाला.

‘यनार का? जल्दी सांग. आम्हाला टैम नाही. ’

‘अं ! ’ भानावर आल्यागत मनजीत बोलला. ’ मी येऊ का? ’

‘तुही मर्जी. गावचं काम आहे. आम्हाला तर जावं लागेल. ’ नंदू म्हणाला

‘कुठे शोधणार तुम्ही? काय सांगितले मौसीने... ... . . ? ’

‘पुर्वेकडे तोंड अन दारा समोर पिंपळ. ‘ रामेश्वरने उत्तर दिले.

‘हां. पिंपळ तर मौसीच्या झोपडीसमोर बी आहे. ’

अंधारात तिघांनी एकमेकांच्या तोंडाकडे पाहीलं. ही गोष्ट कुणाच्या लक्षात आली नव्हती.

‘हौ तिच्या मायला! ’ रामेश्वर उद्गारला.

‘आपन तिठूनच येतो ना. तिठं काय बी नव्हतं. ’ नंदू म्हणाला.

‘नंदू, तु येणार का? उगाच घोळ घालत बसू नको. ’ प्रताप निर्वाणीने म्हणाला.

‘थांबा, कपडे बदलून येतो. नंदू माझ्या सोबत चल. लई अंधार आहे. ’

‘जाऊन ये ना. अंधार काय खातो का तुला? ’

‘खायचं काय? रास्त्यात गड्डा राहतो. सोबत असलेला बरा. ’

‘जाऊन या ना लवकर नंदूभाऊ. काहून येळ काढून ऱ्हायले? ’

रामेश्वर बोलला तसा नंदू, मनजीत सोबत बॅंकेच्या मागच्या बाजूला असलेल्या मनजीतच्या खोलीकडे चिंचोळया पायवाटेने निघाले.

त्याच्या रिकाम्या झालेल्या जागेवर बसत रामेश्वरने खिशातून सिग्रेट काढली.

‘बस. ’ बाजूला हात आपटत तो म्हणाला. रामेश्वरने दिलेली सिग्रेट घेऊन प्रताप त्याच्या शेजारी बसला. रामेश्वरने स्वताःची सिग्रेट पेटवली. त्या उजेडात प्रतापला त्याचा चेहरा चिंताक्रांत वाटला. पुढे मान झुकवून त्याने आपली सिगारेट पेटवून घेतली.

‘प्रताप, काय भानगड होऊन बसली राव? ’

‘काय कळना गेलं बघ. मला तर भ्याव वाटून राहीलं. म्हणून तुला बलावून घेतलं. म्हटलं एकाला दोघ बरे. ’ प्रताप काळजीच्या सुरात म्हणाला.

‘दारू पिऊन पल्डं म्हणायचं काय कुठ? ’

‘यखांदा दिवस ठीक आहे, दोन रोज झाले. घरी पोरीला पहायला पाहूणे येणार आहे, म्हणं. ’

‘हौ? ’

‘हौ. आयला ते धडपनी घरी येतील ना रे. च्यायला काही झालं तर आपल्यावर बिलामत. ’

‘आपल्यावर? मह्या वर कशी ईल? त्यान्ला सोडून मी निघून गेल्तो ना? ’

‘म्हन्जे? मी नव्हतो गेलो? प्रतापला त्याच्या बोलण्याचा राग आला.

‘ते मला ठाव न्हाई. मी तरी गेल्तो. ’ रामेश्वरने जोरदार कश ओढला.

प्रतापच्या हातातली सिग्रेट थरथरते की तो पाय हालवतो ते रामेश्वरला नीट कळालं नाही.

‘मी पण गेल्तो. ’ आरोप फेटाळावा तसा प्रताप म्हणाला. ‘आपण सोबतच होतो ना? ’

‘ते फाटयालोक. मंग तू तुह्या रस्त्याला वळला, मी तगट मह्या घरी गेलो. ’

‘म्या बी. म्या कह्याला परत जाणार. हे बघ रामेश्वर, यात आपन दोघ बी हायती. जे सांगायचं ते दोघांनी यकच सांगायचं. जर उलट सुलट सांगीतल तर... ... ’

‘तर काय? ’

‘तर मंग आपल्याला साक्षी कोण आहे? मी गवाही दिली नाही तर तुझ्यावर कोन इश्वास ठिवीन?

रामेश्वरने दीर्घ झुरका घेऊन सावकाश धूर सोडला.

‘आपण उगीच भांडून राहीलो. अरविंदाभाऊ घरी आले असतीन. त्येंन्ला काय होणार आहे?

‘ते जे हुईल ते हुईल. आपण संगत सोडायची न्हाय. जे मी बोलंन तेच तू बोललं पाहीजे. सुमनचं खरं ठरो की खोटं. काय? ’ प्रतापने सांगितले.

‘व्हय. तो बामनाच्या मळयात नसला त सुटलो आपण. ’

‘म्हनून त मी कुनी बोलायच्या आधी म्हन्लो मी आन नंदू  बामनच्या मळ्यात जातो म्हून. मंग तुला फोन केला. आता हा मनजीत चिकटला. ’

‘यु दे ना. काय करून राहीला ते. जरा हुषारीनं ऱ्हा. चल, ह्यो आला बघ नंदूभाऊ. ’

हातातल्या सिग्रेटी फेकून ते मनजीतने आणलेल्या बॅटरीच्या प्रकाशात चालू लागले.

रस्ताभर एकमेकांशी न बोलता ते ठरलेल्या ठिकाणाकडे जावे तसे झपाटयाने चालत होते. बामनाचा मळा कधी आला ते  लक्षांतही आले नाही.

‘इथं त कुणी बी दिसत न्हाई. ’ सभोवर नजर फिरवून रामेश्वर म्हणाला.

‘मळ्यात कुणी ऱ्हात नै. तेंचा सरकती गांवात ऱ्हातो. ’ नंदूने उत्तर दिलं.

‘कोन हे रे त्याचा सरकती? इष्नूच ना? ’ रामेश्वरने विचारले.

‘चूक्’ तोंडातून आवाज काढून नंदूने होकार भरला मग तोंडातली तंबाकू थुंकून त्याने आवाज दिला,

‘इष्नू... . हाय का रे? ’ नंदूने आवाज दिला

‘इष्नु रहता नाही सांगितला ना आता. तरी त्याला आवाज देतो. ’ मनजीत हसला.

‘त्यो नाही त कुणी तरी ओ दील ना. ’

त्यांच्या हांकेला कुणी ओ दिली नाही की कुणाची चाहूल लागली नाही. त्यांची चाहूल लागून शेजारच्या वस्तीवरला कुत्रा भुंकू लागला. उसातून काहीतरी सरसरत गेलं. ते बंद झोपडीसमोर उभे राहीले. थंड वाऱ्याचा झोत अंगभर शहारा उठवून गेला.

मनजीतने फोकस टाकला, दरवाजा लोटलेला होता.

‘दरवाजा त खुला वाटतो. ’ स्वतःशी बोलल्याप्रमाणे तो म्हणाला. नंदूने पुढे होऊन दरवाजावर कडी वाजवली. कसलीही चाहूल लागली नाही. झोपडीच्या कुठल्या तरी खिडकीचे दार हवेच्या झोताने आपटले.

‘बामन कुठे राहतो? ’ मनजीतने विचारले.

‘मंबईला. शेती इष्नूच्या भरोश्यावर आहे. ’

‘गप्पा मारल्यापेक्षा दरवाजा उघडून पहा ना. ’ उताविळ आवाजात प्रताप म्हणाला.

रामेश्वरनी त्याचा हात दाबून गप्प राहण्याचा इशारा दिला. प्रतापच्या हाताचा कंप जाणवला.

नंदूने ढकललेला दरवाजा मागच्या भींतीवर धाड्कन आवाज करीत आदळला. दाराची कडी खळाळली. पुन्हा सगळं शांत झालं.

‘काय करायचं? ’ मनजीतने विचारले

‘आंत जाऊन पाहू. तेव्हढया करता तर आलो आपन इथं. ’ नंदू बोलला.

‘मी आंत येणार नाही. ’ मनजीत म्हणाला. ‘तुम्ही लोकलचे माणसं. तुम्ही जा. ’ त्याने टॉर्च नंदूच्या हातात दिला.

‘चला रे. ’ नंदूने त्या दोघांना आवाज दिला. पण कुणी जागचं हाललं नाही.

‘अरविंदभाऊ... ... ’ प्रतापने चिरकलेल्या आवाजात हांक मारली.

‘अरविंदभाऊ... . ’ रामेश्वरने कणखर साद घातली.

‘चला. ’ दोन्ही कवाडं सताड उघडून आंत पाऊल टाकून नंदू म्हणाला.

त्याच्यामागे दोघेही आले.

‘मायला या लोडशेडींगच्या... . . ’ नंदूने वैतागून म्हणाला.

तेव्हढयात वीज आली आणि झोपडीतला एकुलता एक चाळीस होल्टचा दिवा उजळला.

त्या पिवळ्या प्रकाशांत त्यांना ते भयंकर दृष्य दिसलं,

‘रामेश्वर! आता रे काय करायचं? ’ प्रताप ओरडला आणि दोन्ही हातात डोकं धरून मटकन् खाली बसला.

‘अरविंदभाऊ... . अरे बापरे! ’  रामेश्वर जोरात ओरडला.

त्याच वेळी नंदूने भीतीने आवाज दिला, ‘ मनजी... ... ... ... ’

मनजीत धांवत आला. दारातूनच त्याने पाहीलं.

अरविंदाभाऊ बाजेवर अस्ताव्यस्त पडले होते.

कुणीतरी त्यांच्या छातीत गवत कापण्याचा विळा खुपसला होता!

****

सुभद्राबाई डायनिंग टेबल जवळ बसून किचन ओटयाशी काम करणाऱ्या सुनेशी बोलत, हातातली भाजी निवडत होत्या. त्यांना बेचैन वाटत होतं. आपला निर्णय योग्य की अयोग्य त्यांना समजत नव्हतं.

‘चारूदत्तला बोलावून आपण चांगलं केलं, नाही का रमा? तुला काय वाटतं? त्याला पाहून वैशालीचं मत बदलेल? ’

तिने खांद्यावरून वळून पाहीले. त्यांच्या चेहऱ्यावर तणाव पाहून ती हसली.

‘तुम्ही कशाला टेन्सन घेता? नक्की आवडेल. दिसायला किती हँडसम आहे. पहाताच क्षणी कुणालाही आवडेल. त्याची नोकरीही बँकेच्या कारकुनापेक्षा चांगली आहे. तिने त्याला डोळे झांकून हो म्हणावं. ’’

‘तसं झालं तर बरं होईल बाई. मी उगीच मध्यस्थी करून बसले. ’

‘तश्या त्या चांगल्या आहे, शिकलेल्या आहे, विचारी आहे. योग्य निर्णय घ्यायला समर्थ आहे. आपण आहोत ना तिला समजाऊन सांगायला. ’

‘सगळ्यांनी हात टेकले बाई. आता चारूदत्ताला पाहून तिच्या मनांत काही फरक पडला तर चमत्कार म्हणायचा. ’

‘कमाल आहे ना पण, एव्हढया शिकलेल्या पोरीला इतकंही समजू नये? काय आपलं कुळ काय, आपलं घराणं काय? आपला संबंध राजघराण्याशीच व्हायला हवा. ह्या जर अशा ताळतंत्र सोडून वागायला लागल्या तर पुढच्यांची लग्न कशी व्हायची? ’

‘मी म्हणते, ही यशोदेची चूक आहे. पोरीला वळण लावायचं काम काय पुरुषांनी करायचं असतं? काय तरी रित बाई, चारूदत्त येणार हे काय भावजींना माहीत नाही? दोन दिवस झाले, कुठे जाऊन बसले कुणाला पत्ता नाही. निदान फोन तरी करायचा घरी एखादा. आता चारूदत्तला काय सांगणार? ’ काळजीच्या सुरात त्या बोलल्या.

‘घरच्यांनी तरी  त्यांना फोन करायचा नाही का? ’

‘केला म्हणे. फोन लागत नाही म्हणाली. ’ त्या पुढे बोलणार एव्हढयात त्यांना चारूदत्तच्या पावलांचा आवाज आला. दोघी गप्प बसल्या.

स्नान करून आलेल्या चारूदत्तच्या  टवटवीत चेहऱ्याकडे  सुभद्राबाई पहातच राहील्या. किती वर्ष झाले होते त्याला पाहून? पंधरा... कदाचित् सतरा. शेवटून आला होता तेव्हा पाचवीची परिक्षा देऊनच आला होता. किती लहानगा दिसायचा. नाजूक. मस्तीखोर, खोडकर. चपळ. सारखा चुळबुळत असायचा.

आणि आता... . . ?

एकदम समजूतदार, पंचविस-सव्वीसीतला तरूण. चांगलाच धिप्पाड आणि बलदंड दिसतो. रुंद कपाळ, काळेभोर मागे वळवलेले केस. नीट कोरलेली मिशी. हालचालीत चपळाई असली तरी घाई नाही.

सुभद्राबाईंनी अभिमानाने सुनेकडे पाहील. ती अनिमिष नजरेनं त्याच्याकडे पहात होती.

‘रमा, त्यांनी आवाज दिल्यावर ती भानावर आली. त्याला चहा दे. काही खाणार का?

रमाने डोक्यावरचा पदर सारखा केला.

‘नको. किती वर्षांनी येतो नाही धारपवाडीला ? टेबलासमोरील खुर्ची किंचित तिरपी करून बसत तो म्हणाला.

‘लहान असतांना आला होता. पंधरा वर्ष तरी झाले असतील. तुला कितीदा बोलावलं. तुझी आई एकटी येऊन जायची. तुला कधी वेळ झाला नाही. ’

सतरा मावशी. पाचवीची परिक्षा देऊन आलो होतो. अजून आठवणीत आहे माझ्या. किती मजा केली होती नाही आम्ही. दरवर्षी वाटत होतं एकदा यावंच रहायला. पण जमलं नाही बघ. तेव्हा तुम्ही वाडयावर रहात होता. नाही, काय म्हणायचे त्याला... ... गढी! हां गढी. तुम्ही आणि अरविंदकाका... . अरविंदकाका कसे आहेत ग मावशी?

‘रमा, चहा आणा. ’ त्यांनी सुनेला  सांगितले.

‘सतरा वर्ष झाली, नाही? सतरा वर्षांत तू किती बदलला. चांगला बाप्या दिसायला लागला. ’

‘बाकी सतरा वर्षात धारपवाडी काही बदलली नाही. रस्ते तर काय दिव्य आहेत. पंचविस किलोमिटर्सचं अंतर कापायला तास लागला. मुंबईपासून प्रवासाचा त्रास झाला नाही तो या शेवटच्या तासभरात झाला. मला वाटलं एखादं हाड तर नक्कीच निखळणार. ’

‘माझं लग्न झालं तेव्हापासून असाच रस्ता आहे. आणखी बिघडला. सुधारण्याचा कधी कुणी प्रयत्न केल्याचं आठवत नाही. ’

‘कोण करणार? राज्यकर्त्यांनी करावं अशी अपेक्षा असते. इथं तर तुम्हीच राज्यकर्ते आहात ना? आई सांगत होती मला. तुमची राजकीय वर्तुळात फार मोठया लोकांत उठ बस आहे. भाऊंना तर फार मानतात सगळे.  अजून आले नाहीत भाऊ. आठ वाजलेत. त्यांना माहीत आहे ना, मी येणार आहे? ’

टेबलावर चहा ठेऊन रमा न बोलता जाऊ लागली तसं त्या  म्हणाल्या,

‘बसा. चारूदत्त आपलाच आहे. तुम्ही ओळखलं नाही त्याला? ’ रमा डोक्यावरील पदर सावरत त्यांच्या शेजारच्या खुर्चीवर बसली. तिने ओळखलं म्हणून मान हालवली.

‘घरी भेटल्या वहीनी म्हणून ओळखलं मी. नाहीतर मीही ओळखलं नसतं. पहील्यांदाच पहातो ना. लग्नानंतर. ’

‘हे सांगत असतात तुमच्याबद्दल. तुम्ही फार हुषार होता अभ्यासात. नेहमी पहीला नंबर असायचा. मुंबईला पोलिस खात्यात मोठया हुद्द्यावर आहात. ’

चारूदत्त हसला.

‘माझा भाऊ आहे ना तो. माझी तारीफ करणारच. तो काही कमी थोडाच आहे. राजकारणात चांगल नाव कमावलं त्यानं. या वेळेस तिकीटासाठी प्रयत्न करतो म्हणून ऐकलं. ’

रमा काही बोलली नाही. सुभद्राबाईंनी तोंड वांकडं केलं.

‘कुणास ठाऊक? त्याचे प्रयत्न चालू आहेत. आले वाटतं हे. ’

दारावरील बेलचा आवाज ऐकून त्या उठल्या. रमा उठून आंत निघून गेली.

आंत येताच भाऊंचे लक्ष किचनच्या दरवाजात उभं असलेल्या चारूदत्तकडे गेले. त्यांचे डोळे आश्चर्याने मोठे झाले.

‘चारूदत्तच ना? कधी आलास? प्रवास चांगला झाला ना? ’

चारूदत्तने पुढे होऊन त्यांच्या पायाला हात लावला. त्यांनी, त्याला उठवून छातीला धरले. पाठीवरून हात फिरवला.

‘प्रवास चांगला झाला. ’ तो म्हणाला. भाऊ हसले.

‘विचारायचा म्हणून विचारला प्रश्न. धारपवाडीचा प्रवास काही सुखाचा नाही. ’ त्याच्या खांद्यावर हात ठेऊन ते म्हणाले, ‘बाकी चांगलाच उंच झालास तू. अं? मलाही मान उंचावून बोलावं लागतं. छान छान. ’

‘पाहूण्याचा चहा पाणी झालं का? ’ सोफ्यावर टेकत त्यांनी विचारले.

‘हो आत्ताच. तुमची वाट पाहीली. मावशी म्हणाली, त्यांना किती वेळ लागेल सांगता येत नाही. ’

‘ एका कामासाठी जावं लागलं. तुझी मावशीच जाणार होती पण म्हटलं सूनबाई तुला ओळखेल की नाही. बरं मला सांग, तुझी आई कशी आहे? बाबा काय म्हणतात? ‘

‘मजेत आहेत. ’

‘व्हा म्हणा रिटायर आता. किती दिवस काम करणार? ’

‘बाबा इतक्या लवकर कसचे रिटायर होतात? तुमच्यापेक्षा लहान आहेत ते. अजून तुम्ही रिटायर झाला नाही. ’

‘आम्ही काय नोकरी करणारे थोडेच आहोत. आमची रिटायरमेंट एकदाच. ’

त्यांचं बोलणं ऐकून सुभद्राबाईंनी तोंड वाकडे केले. त्यांना अरविंदाबद्दल उत्सुकता होती, पण चारूदत्त समोर बोलावं की नाही या संभ्रमात पडल्या. भाऊ स्वतः होऊन सांगतील असं त्यांना वाटलं, पण ते दुसरंच काही बोलत बसले. त्यांचं न बोलणं त्या समजू शकत होत्या. चारूदत्त ज्या कामासाठी आला होता... ...

‘चारूदत्त दोन दिवसाच्या सुटीवर आला. ’ त्या सुचक बोलल्या.

भाऊंनी एकदम उत्तर दिले नाही. चारूदत्त त्यांच्याकडेच पहात होता.

‘उद्या अरविंदा आल्यावर प्रोग्राम नक्की करता येईल. ’

‘ते कुठे बाहेरगावी गेले आहेत का? ’ चारूदत्तला आश्चर्य वाटले. आपल्याला बोलावून ते निघून कसे जातात?

‘अरविंदा... ... . . ’

दोघांनी एकदम बोलायला सुरवात केली. दुसरा बोलतो हे पाहून दोघेही गप्प झाले.

‘भाऊ... ... भाऊ... . अरविंदा भाऊ... . . ’ बाहेरच्या आवाजाने ते दचकले.

मनजीत आंत आला.

त्याचा श्वास फुलला होता. भीतीने त्याचा चेहरा पांढरा पडला होता. त्याला नीट बोलता येत नव्हतं. त्याचं सर्व अंग थरथरत होतं.

‘भाऊ... भाऊ बरं झालं घरीच आहात... ... . ’ तो कसा बसा बोलला.

‘शांत हो गधडया. खाली बस. नीट दम खा. मग बोल. कुठे आग लागली? ’

ते असं म्हणाले तरी मनजीतने काय बातमी आणली ती ऐकण्यासाठी ते उताविळ होते. काहीतरी अभद्र ऐकायला मिळणार याची त्यांना आशंका आली. सुभद्राबाई तोंडावर हात दाबून उभ्या होत्या. बातमी ऐकल्यावर तोंडातून आवाज येईल अशी त्यांना भीती वाटत होती. चारूदत्त गोंधळून उभा होता.

‘नंदू गेला पोलिसस्टेशनला... मी तसाच पळत आलो तुम्हाला सांगायला... . ’

त्याची अवस्था पाहून चारूदत्तला दया आली. मनजीतच्या खांद्यावर हात टाकून जवळ ओढले. त्याची पाठ थोपटली.

‘नंदू पोलिसस्टेशनला कशाला गेला? घाबरू नकोस नीट सांग. ’ भाऊ म्हणाले.

चारूदत्तच्या मिठीतून सुटण्याची धडपड करीत, थिजल्या आवाजात तो म्हणाला,

अरविंदाभाऊंचा कुणी तरी खुन केला!

सुभद्राबाईंच्या तोंडून किंकाळी बाहेर पडलीच. रमा धावत बाहेर आली. तिने सुभद्राबाईंना जवळ घेतले. भाऊ सुन्न होऊन पायातल त्राण गेल्यासारखे  सोफ्यावर बसले.

‘आपल्याला ताबडतोब तिकडे गेले पाहीजे. ’ मनजीत म्हणाला. तसे भाऊ कळसूत्री बाहुल्याप्रमाणे उभे राहीले. त्यांची अवस्था पाहून चारूदत्त म्हणाला,

‘थांबा. मीही येतो. आत्ता आलो कपडे बदलून. ’

‘मी बाहेर मोटरसायकल जवळ आहे. ’ चारूदत्त काही बोलायच्या आंत मनजीत बाहेर गेला.

त्यांच्या कौटूंबिक वातावरणात आपली अडचण होऊ नये असा त्याचा हेतू असावा.

जेव्हा ते जाण्यासाठी बाहेर पडले  तेव्हा मनजीत मोटरसायकल जवळ पाठमोरा उभा होता. चारुदत्त त्याच्या खांद्यावर हात ठेऊन म्हणाला,

‘चल.

‘कौना है जो? ’ मनजीतने  दचकून त्याचा हात खांद्यावरून झटकून टाकला. ‘ओह् तुम्ही आहात. चला बसा आपल्याला ट्रिपल सीट जावं लागेल.

मोटरसायकलवर बसतांना चारूदत्तला आश्चर्य वाटलं,

खांद्यावर हात ठेवला म्हणून हा एव्हढा कां दचकला?

# प्रकरण 3

ते मळयात पोहचले तेव्हा पोलिस आधीच तेथे आलेले होते. मोटरसायकल उभी करण्याआधीच भाऊंनी उतरण्याचा प्रयत्न केल्याने मनजीतची मोटरसायकल डगमगली. कसातरी तोल सावरून त्याने ती उभी केली. खाली उतरतांच भाऊंनी झोपडीकडे पळण्यास सुरवात केली.

त्याच वेळी झोपडीचं दार उघडलं गेलं. पिवळ्या प्रकाशाच्या चौकनी तुकडयात चारूदत्तला झोपडीच्या बाहेर उभे असलेले तिघेजणं भाऊच्या दिशेने पुढे झालेले दिसले. त्यांनी भाऊंशी बोलण्याचा प्रयत्न केला. तिकडे दुर्लक्ष करून भाऊ झोपडीच्या दिशेने निघाले. मोटरसायकलचा आवाज ऐकून झोपडीतून एक पोलिस अधिकारी बाहेर आला. घाईनं पुढं होऊन आंत जाणाऱ्या भाऊंना हाताला धरून थांबवलं.

‘आंत जाऊ नका भाऊ, तुम्हाला पाहवणार नाही. ’ ते म्हणाले.

‘काय करणार कदम, येईल त्याला समोर जायला हवं. ’ भावनांवर नियंत्रण ठेवणे त्यांना कठीण जात होतं. कदमांनी त्यांच्या खांद्यावर थोपटून धीर दिला. त्यांचे लक्ष अंधारातून येणाऱ्या दोघांवर गेले. मनजीतची आकृती त्यांनी ओळखली. त्याच्या सोबत कुणी तरी अनोळखी व्यक्ति दिसत होती.

‘कोण आहे? ’ पोलिसी आवाजात त्यांनी जवळ येणाऱ्या मनजीतला विचारले.

‘कुणी नाही. मी मनजीत आहे. हे… ’ त्याच्या लक्षांत आले आपल्याला पाहूण्याचे नाव माहीत नाही.

‘मी भाऊंचा भाचा, चारूदत्त. ’ खणखणीत स्पष्ट आवाज.

‘ठिक आहे. माझी तुम्हाला विनंती आहे, तुम्ही भाऊंना सांभाळा. आमची कारवाई चालली आहे, तोपर्यंत कुणाला आंत जाता येणार नाही. ’

‘किती वेळ लागेल? ’

‘हे बघा साहेब, इथं आमच्याकडे काही सोय नाही. आम्ही  जिल्ह्याला फोन करून मदत मागितली. त्यांना दोन-अडीच तास तरी लागतील. ’

‘इतके? ’ चारूदत्तला आश्चर्य वाटले.

‘रस्त्याची अवस्था तुम्हाला माहीत नाही. ’ कदम म्हणाले.

‘माहीत आहे. नुकताच मी त्या रस्त्यावरून आलो. ’ प्रवासाचा भयानक अनुभव आठवून तो शहारला.

‘भाऊ, मला माफ करा, तुम्हाला आंत जाता येणार नाही. तुम्ही सहकार्य करायला हवं. ’

‘एकदा बघु तर द्या मला. मी तुमच्या कामात अडथळा आणणार नाही. दूरून बघतो. ’  त्यांच्या सुर रडवेला झाला.  ‘काय वेळ आणली परमेश्वरा! ’

‘सांभाळा भाऊ. तुम्हीच मोठे  आहात. तुम्हीच धीर सोडला तर बाकीच्यांनी काय करावं? ’

‘निदान खिडकीतून तरी... ... ’

‘सॉरी भाऊ,  मी तुमच्या चांगल्यासाठीच सांगतो. पाहूणे, तुम्हीच समजाऊन सांगा त्यांना. आमची एक प्रोसिजर असते. पंचनामा झाल्याशिवाय आंत कुणाला प्रवेश देता येणार नाही. मी अँबुलन्स बोलावली आहे. शवविच्छेदनासाठी पाठविण्यात येईल. नंतर बॉडीचा ताबा मिळेल. ’

‘अरविंदाभाऊ’  या आदराने बोलावल्या जाणाऱ्या व्यक्तिचा उल्लेख ‘बॉडी’ म्हणून ऐकताना भाऊना रडू फुटले.

‘ठिक आहे, कदम. मी बाहेरच थांबतो. मात्र माझी एक विनंती आहे. ’

‘काय? ’

‘हे आमचे पाहूणे, चारूदत्तराव, मुंबईला पोलिसात आहे. ’

‘होय? ’ कदमने चारूदत्तला न्याहळले.

‘होय. चारूदत्त म्हणाला. मी सी आय डी इन्पेक्टर आहे. ‘

बाजूला उभा असलेला मनजीत झपकन् मागे सरकल्याचं ध्यानात येऊन तो हसला. त्याला हे काही नवीन नव्हतं. पोलिसांचं नाव ऐकताच माणसं दचकून मागे सरकतात. तो तर सी आय डी इन्पेक्टर आहे.

‘मी इन्पेक्टर कदम, साहेब. माझं नशिब चांगलं म्हणायचं. ’ उत्साहानं त्याच्याशी हात मिळवत कदम म्हणाले, ‘तुम्ही ऑनस्पॉट हजर आहात. तुम्ही एकवार गुन्ह्याचं स्थळ बघून घ्या. अजून कशालाही हात लावला नाही. तुमचा सल्ला मला बहूमोलाचा ठरेल. चला साहेब. ’ झोपडीच्या दिशेने वळून ते म्हणाले.

अंधारात उभ्या असलेल्या चौघांना भाऊं कडं लक्ष द्यायला सांगून चारूदत्त कदमांच्या मागून झोपडीकडे गेला.

प्रवेश करताच त्याची नजर बाजेवर पडलेल्या अरविंदाभाऊंच्या मृत शरीराकडे गेली. तें भयंकर दृष्य पाहून कदमनी भाऊंना आंत येऊ दिले नाही याचे त्याला समाधान वाटले.

त्यांच्या छातीत कुणीतरी गवत कापण्याच्या विळयाने वार केला होता. विळा अजून छातीत रुतलेला होता. जखमेतून वाहणाऱ्या रक्ताचं थारोळं गोठून गेलं होतं. त्याच्या भोवती किडे जमले होते. त्यांच्या मृत चेहऱ्यावर वेदना सांकळली होती.

‘भयंकर फारच भयंकर ! ’ त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

‘ झटापट झाल्याच्या खुणा दिसत नाही. ’ तो म्हणाला. ‘वार करणारी व्यक्ती त्यांच्या परिचयाची असली पाहीजे. त्याने बेसावध क्षणी अचानक त्यांच्यावर वार केला. पण खुनीच्या हातात विळा पाहून अरविंदा सावध का झाले नाही? ’

‘तसं नाही साहेब, विळा हे रोजच्या कामाचे अवजार आहे. विळे, कुऱ्हाडी शेतावर पडलेल्या असतात. हा विळा येथेच पडलेला असणार. तो आयताच खुनीच्या हातला लागला. ’ कदम म्हणाले.

‘हं. म्हणजे खुनी खून करण्याच्या उद्देशाने आलेला नव्हता असं म्हणता येईल. ’

कदमने मान हालवून संमती दिली.

‘हा मळा  ह्यांच्याच मालकीचा आहे? ’

‘नाही. ह्या मळ्याचा मालक मुंबईला राहतो. त्याने ही जमीन विष्णू नावच्या कुळाला कसायला दिली आहे. ‘

‘तो कुठे आहे? ’

‘गांवात राहतो. त्याला निरोप दिला. मला वाटतं पुढील चौकशी उद्यापासून सुरू करता येईल. ’

चारूदत्तचं त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. त्याची चौकस नजर सर्वत्र फिरत होती. बाजे शेजारी लाकडी पायांवर फळकुटया ठोकून ओबडधोबड तयार केलेल टेबल होतं. टेबलावर दारूची एक रिकामी व दुसरी अर्धी अधिक रिकामी बाटली होती. त्याच्या बाजूला तीन ग्लास होते. टेबलावर खाद्य पदार्थांचे अवशेष विखुरले होते.

‘यांचे खिसे तपासले? काही सापडलं? ’ अचानक त्याने कदमांना विचारले.

‘नाही. खिशात पाकीट सुध्दा नव्हतं. ’  त्यांच्या अपेक्षेपेक्षा वेगळा प्रश्न आला होता.

‘प्रेत पहिल्यांदा कुणी पाहीले? ’

‘गांवातली काही मंडळी त्यांना शोधत होती. ’

‘शोधत होती? ’

‘होय. दोन दिवसांपुर्वी ते घरातून बाहेर पडले, ते घरी  परतले नाही. त्यांची काळजी वाटून त्यांच्या घरचे लोक सुमनकडे गेले. सुमन म्हणजे गांवातली जाणती बाई, तिच्या अंगात देवी येते. प्रश्न विचारायला, शकून पहायला लोक तिच्याकडे जातात. तिने सांगितले, अरविंदाभाऊ एका झोपडीत पडलेले दिसतात. त्यांना दगा झाला. त्यांना मदतीची गरज आहे. ’

‘तिने ह्या झोपडीत आहे म्हणून सांगितले? ’

‘नाही. तिला झोपडीत दिसते, असं म्हणाली. झोपडीचे दार पुर्वेला असून दारा समोर पिंपळ आहे म्हणाली. प्रताप, रामेश्वर, नंदू आणि मनजीत यांच्या टोळीनं पहील्यांदा पाहीलं. प्रताप आणि रामेश्वर इथंच थांबले, नंदू पोलिस स्टेशनला आला आणि मनजीत ही बातमी द्यायला भाऊंच्या घरी गेला. ’

ते चौघे कुठे आहेत.

‘बाहेर. भाऊंच्या जवळ. तुमच्या सोबत आला तो मनजीत. ’

‘ठीक आहे. त्यांना  पोलिसस्टेशनला बोलावून जबानी  घ्या. ’

पुढे त्याला काही बोलायचे होते, तो थोडा घुटमळला, पण विचार बदलून तो दरवाजाकडे निघाला.

‘सर... . ’ कदमने आवाज दिला.

‘येस? ’  वळून पहात चारूदत्तने विचारले.

‘उद्याच्या जबानीच्या वेळी तुम्ही हजर राहू शकता? ’

‘खरं तर मीच तुम्हाला  विचारणार होतो. ’

‘थँक्यू सर. ’

चारूदत्त बाहेर, अंधारात निघून गेला.

*******

नदीचा कांठ.

खेडयात अजूनही  अंतिम संस्कारासाठी दुसरी जागा नाही.

अरविंदाभाऊंवर काल रात्री घाईने अंत्यसंस्कार करावे लागले असल्याने अनेक लोकांना उपस्थित रहाता आले नव्हते. सकाळी त्यांच्या मृत्युची बातमी कळतांच त्यांच्या कार्यकर्त्यांनी, सहकाऱ्यांनी

आणि गांवातल्या लोकांनी स्मशानात रक्षा सावडण्यासाठी गर्दी केली. रस्त्यावर जागा मिळेल तेथे वहाने ऊभी दिसत होती. रस्ताच नाही तर ते छोटंसं गाव माणसांनी फुलून गेलं होतं. टेबल्स जोडून तात्पुरते व्यासपिठ उभारण्यात आलं होतं. गळयात कॅमेरे अडकवून चार-सहा पत्रकार फिरत होते.

श्रध्दांजली वाहणाऱ्यांची, त्यांच्या वर स्तुति सुमने उधळणाची, चढाओढ लागली होती.

‘व्यासपिठावर बसलेले... ... ... .

व्यासपिठावर बसलेल्यांची लांबलचक यादी प्रत्येक वक्ता भाषणाच्या आरंभी पुन्हा पुन्हा सांगत होता.

-----आज धारपवाडीने अनमोल रत्न गमावलं आहे. अरविंदाभाऊनं गावासाठी जे काही केलं ते आपल्या समोर आहे. केवळ गावाच्या भल्यासाठी त्यांच्या वडीलांनी उघडलेली शाळा त्यांनी चालू ठेवली. त्यातून त्यांची शिक्षणाची कळकळ दिसून येते.

-----गावातील आया बहीणींच्या डोक्यावरील हंडा पाहून त्यांना अतिशय वाईट वाटत असे. शासनाचा पाठपुरावा करून त्यांनी गावासाठी नळ योजना मंजूर करून आणली. पाण्याच्या टाकीचं काम लवकर सुरू होणार होते. आम्ही तुमचं स्वप्न पुरं करू भाऊ.

---दुष्काळामुळे उसाची लागवड कमी असताना सुध्दा त्यांनी जिद्दीने कारखाना सुरू ठेवला. शेतकऱ्यांना वेळच्या वेळी पेमेंट मिळावं याकडे त्यांची करडी नजर असायची.

----लक्ष्मणासारखा भाऊ गेल्याचं भाऊंचं दुःख आम्ही जाणतो. पण भाऊ तुम्ही एकटे नाहीत आम्ही सगळे तुमच्या सोबत आहोत.

-----एकाने आपण सी आय डीकडून खुनाचा तपास व्हावा अशी आपण शासनाकडे मागणी करू म्हणून आश्वासन दिलं.

भाषणामागून भाषण चालूच होतं. टाळया वाजत होत्या. शोकसभेला टाळया वाजवण्याचं प्रयोजन चारूदत्तच्या लक्षांत आलं नाही. त्याचं रटाळभाषणावरून लक्ष उडालं. ऊनही वाढू लागलं. शोकसभा संपल्यानंतर भाऊ, रणजीत, राजशेखर त्यांचे भाऊबंद व अरविंदाभाऊच्या अनेक चाहते अस्थिविसर्जनासाठी जाणार होते. संध्याकाळी ते परत येईपर्यंत त्याची भेट होण्याची शक्यता नव्हती.

तो गढीवर जाण्यासाठी वळला, तेव्हा कदम आपल्याच दिशेने येत असल्याचं त्याला दिसले.

‘मी भेटणारच होतो, सभा संपल्यावर. तुम्ही निघालांत म्हणून आलो. कालचा तुमचा वादा लक्षात आहे ना? ’

‘हो. जबानी घेण्यासाठी तुम्ही त्यांना कधी बोलवणार आहात? ’

‘आज तर शक्य वाटत नाही. व्यासपिठाकडे नजर टाकून ते म्हणाले. उद्या त्यांना बोलवता येईल. तोपर्यंत पोस्टमार्टमचे, फोरेंनसिकचे रिपोर्टही आलेले असतील. आपल्याला तपासाची दिशा ठरविता येईल. ’

‘ठीक आहे. तुम्ही मला रिंग द्या. मी येईल. ’ त्यांनी हात मिळवले.

गर्दीतून जाताना व्यासपिठावरील वक्त्याचे शब्द त्याच्या कानवर पडले,

‘भाऊ अजातशत्रु होते. ’

आणि तरीही त्यांचा खुन झाला! त्याच्या मनांत विचार आला.

****

बाहेर स्वच्छ सुखद सूर्यप्रकाश पडलेला असला तरी गढीत पडलेली दुःखाची गडद छाया लहानशा दरवाजातून आंत शिरताच चारूदत्तला जाणवली. दगडी चौक ओलांडून तो आंत आला.

यशोदाबाईंभोवती गांवातल्या, नात्यातल्या स्त्रीया कोंडाळं करून बसल्या होत्या. चारूदत्तला पहाताच त्यांना पुन्हा दुःखाचा उमाळा आला. त्यांच्या सोबत इतर बायकांनीही डोळ्याला पदर लावला.

‘बघ चारू, तू कशा करता आलास अन् तुझ्या पुढे काय वाढून ठेवलं. ’

‘देवाची मर्जी म्हणायची. किती विचित्र गोष्ट आहे, इतक्या वर्षांनी मी आलो ते त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीच? ’

एक दिवस सगळ्यांचं जाणं आहे, पण त्यांच्या देहाचे असे हाल व्हायला नको होते. त्यांनी काय पाप केलं होतं? स्वभाव तोंडाळ होता, पण कधी कुणाचं वाईट केलं नाही. ’ तोंडाला पदर लाऊन त्या रडू लागल्या.

‘पुरे यशोदे, किती रडशील? आजारी पडशील अशानं... . . ’

‘पडू द्या. आता मला जगायचं तरी कशाला? देवा! त्या खुन्याला सांग माझ्याही छातीत विळा खुपसयला... ... ’

‘शांत हो बाई, मुलांकडे बघ. मुलीचं लग्न व्हायचं अजून. बाप तर गेला. आता तुलाच बघायचं सगळं... . ’

जमलेल्या बाया आपापल्यापरीनं त्यांची समजुत घालत होत्या. अशा वेळेस काय बोलावं, कस बोलावं ते न समजून चारूदत्त गोंधळून गप्प बसून राहीला. त्याची नजर वैशालीला शोधत होती. ती कुठं दिसली नाही. तिची चौकशी करण्याचा त्याला संकोच वाटला.

एक खेडूत तरूणी जीना उतरूनआली आणि बायकांच्या घोळक्या जवळ येऊन ताटकळून उभी राहीली.

‘काय आहे गं? ’ यशोदाबाईंनी विचारले.

‘ताईसाहेब म्हने, पाव्हण्यास्नी म्हनावं जायच्या आधी भेटून जावा. ’

‘अरे, वैशाली तुला माडीवर बोलावते. भेटून ये. ’ यशोदाबाई म्हणाल्या.

तो वर जाण्यासाठी निघाला.

‘चारूदत्त, ’ सुभद्राबाईंनी आवाज दिला, ‘तिची समजूत घाल. बाप गेल्यापासून अतिशय दुःखात आहे ती. ’

मान डोलावून त्याने जीना चढायला सुरवात केली.

बरं झालं त्यांनी काय बोलवं ते सुचविलं, नाहीतर अनावधानाने आपण काही विपरीत बोलून गेलो असतो. ती दुःखात आहे. तिच्याशी सांत्वनाशिवाय काही बोलायचं नाही.

वैशालीच्या खोलीचे दार उघडेच होते. तो आंत गेला तेव्हा ती पाठमोरी, खिडकीशी उभी होती. तिने काळा गाऊन घातलेला होता. कार्तिक महीन्याच्या स्वच्छ कोवळया उन्हात तिचे मोकळे केस चमकत होते. चौकटीवर एक हात ठेऊन ती एकाग्र होऊन शोकसभेतील भाषण ऐकत असावी. की ती रडत होती? चारूदत्तच्या आगमनची तिला चाहूल लागली नाही.

'वैशाली. ' चारूदत्तने तिला हलकेच आवाज दिला.

ती वळाली. खिडकीतून येणारे ऊन तिच्या चेहऱ्याच्या अर्ध्या भागावर पडले. तिचे केस विखुरले होते आणि हवेमुळे बटा तिच्या गोऱ्यापान चेहऱ्यावर मस्ती करत होत्या. खिडकीच्या चौकटीमुळे ती एखाद्या अभिजात चित्रासारखी दिसत होती. दुःखद प्रसंग नसता तर ह्या क्षणी त्याने... ...

वैशालीही अपलक नजरेनं त्याच्याकडे पहात होती. पंधरा वर्षापूर्वी पाहीलेला मुलगा, आता देखणा तरूण, तिच्या पुढयात उभा होता. त्याची उंचीपुरी धिप्पाड शरीरयष्टी आणि मृदू आकर्षक चेहरा पाहून तिच्या मनाला खुशी वाटली.

किती देखणा! बाई! आता हा का मला नजरेनं गिळून टाकणार आहे?

तिने मानेला झटका दिला आणि समोरचं चित्र पुसल्यासारखा तो भानावर आला. तिच्याशी बोलायला कशी सुरवात करावी त्याला समजलं नाही. पुढे होऊन, हात धरून तिचे सांत्वन करावे काय. लहानपणी त्यांनी एकमेकांशी मस्ती केली होती. पण आता तिच्यात बदल झाला होता. काय करावं ते न कळून तो तसाच पहात राहीला. त्याचा संभ्रम फार काळ टिकला नाही. तिनेच घाईनं पुढे होऊन त्याचा हात धरला, आणि बोलायला सुरवात केली.

'चारूदत्त... ! किती वर्षांनी भेटतोस? बरं झालं. तू योग्य वेळी आलास. '

'म्हणजे? ' गोंधळून त्याने विचारले.

‘अरे, बस ना. तू उभा का? ’ हाताला धरून तिने त्याला एका खुर्चीवर बसविले. वडीलांच्या नुकत्याच झालेल्या निधनामुळे तिचे मानसिक संतुलन तर बिघडले नाही ना? त्याला संशय आला. म्हणूनच खालून येताना मावशीने सुचना दिली असावी.

‘तू पण बस ना, वैशाली. ’ तिला अस्वस्थ फेऱ्या मारताना पाहून तो म्हणाला. ‘बसून शांतपणे बोलू या का? ’

‘शांत? शांतच आहे मी. घरातल्या लोकांनाच वाटतं... . ’ तिन बोलणं अर्धवट सोडलं. खिडकीतून ऐकू येणारे भाषणाचे शब्द कान देऊन ऐकले, आणि एकाएकी ती हसू लागली.

‘ऐकलंस काय म्हणतोय तो वक्ता? अरविंदाभाऊसारखा मनमिळावू माणूस पुन्हा होणार नाही. ’ विनोद ऐकल्याप्रमाणे तिचं हसणं त्याला भयानक वाटलं. ती शांत उभी राहून बाहेर पहात होती.

‘वैशाली. ’ त्याने जिव्हाळ्याने हांक मारली.

ती वळाली. तिच्या डोळ्यातून पाणी वहात होतं. तो तिच्या जवळ गेला. तिच्या खांद्यावर हात ठेऊन तो म्हणाला,

‘वैशाली. मनावर ताबा ठेवायला हवास. जे झालं ते वाईट झालं. पण त्याचं किती दुःख करायचं? माझं ऐकणार ना? ’

‘तू माझी समजूत घालू नको. ’ त्याच्यापासून दूर होत ती म्हणाली. ‘दोन दिवस गेल्यावर सारं पुर्वतवत होईल. ’ कोपऱ्यातल्या फ्रिज वरील बाटली घेऊन ती पाणी प्यायली.

‘तुला हवे? ’ त्याने मानेने नाही म्हणताच तिने बाटली ठेऊन दिली.

आता ती सावरली. चेहरा रूमालाने पुसून, ती त्याच्याकडे पाहून हसली.

‘वेडयासारखी वागले का रे मी? तुला ऑक्वर्ड झालं असेल नाही? ’

तुझं दुःख सहाजिक आहे गं. बस अशी. आल्यापासून तुला भेटायचं. ’

‘हो रे. असं झालं नसतं तर मीच आले असते तुला भेटायला. ’

‘बरीच आधुनिक दिसती तुझी खोली. वाटत नाही आपण खेडयातल्या घरात आहोत. ’

त्याची नजर कोपऱ्यातल्या कॉम्पुटर वर गेली. एका कोपऱ्यात कांचेच्या  कपाटात अनेक पुस्तकें दिसत होती. समोरचं बंद कपाट, तिचा वार्डरोब असावा.

‘बाबांचा आधुनिकतेकडे कटाक्ष होता. जगाच्या मागे रहावं असं त्यांना वाटत नसे. ते स्वतः शिकले नाही, पण त्यांनी मला चांगले शिकवले’.

‘आणि रणजीतदादा? ’ त्याची चौकशी करताना त्याला हसू आले. लहानपणी त्याला नुसते रणजीत म्हटले तर राग यायचा. आताही नकळत तो त्याला रणजीतदादा म्हणाला.

‘त्याच्यासाठी खुप प्रयत्न केले, पण तो फार काही शिकला नाही. त्याचे लक्ष इतर गोष्टींकडे असायचे. जाऊ दे त्याचं नशिब. ’

तिने विषय बदलला. ‘तू काय शिकलास? चांगली नोकरी आहे म्हणे तुला. ’

‘माझ शिक्षण काही खास नाही; आजच्या तुलनेत. मी एम. ए. सायकॉलॉजी केलं. पोलिसात नोकरी करतो. ’

‘पोलिसात ? काकू तर सांगत होती तू सी. आय. डी. इन्पेक्टर आहेस. ’

‘म्हणजे पोलिसच ना? ’

‘छे! छे! पोलिस म्हटलं की कसंतरी वाटतं. सी आय डी म्हटलं की कसं रूबाबदार वाटतं. ’

तिचे हावभाव पाहून त्याला हसू आलं.

‘म्हणूनच म्हटलं, तू अगदी योग्य वेळी आलास. ’तपकिरी डोळयांनी त्याच्याकडे रोखून पहात ती म्हणाली.

‘तुला काही सांगायचं का? ’

‘हो.  याची वाच्यता कुठे करणार नाहीस असं मला वचन दे. ’ तिने तळवा पुढे केला.

ती त्याची बालमैत्रीण होती हे खरं असलं तरी त्यांची गेल्या पंधरा वर्षात भेट नव्हती. ती मात्र कालच भेटल्यासारखी त्याच्याशी वागत होती. त्याने तिच्या गुलाबी नाजूक तळहातावर हलकेच हात ठेवला. त्याला वाटलं; तेव्हढया वजनानेही तिच्या हाताला दुखापत होईल. त्याच्या हाताचा स्पर्श होताच तिच्या चेहऱ्यावर समाधान झळकलं.

‘मला वाटलंच होतं, आपल्या मैत्रीची तू आब राखशील. ’ त्याचा हात सोडून ती दाराकडे गेली. बाहेर डोकावून कुणी नसल्याची खात्री करून घेतली. दरवाजा बंद करून ती त्याच्या शेजारच्या खुर्चीवर येऊन आपल्या हातांच्या बोटांची नेल पॉलीस पहात बसली. तिला जे सांगायचं त्याची मनांत मांडणी ती करीत होती. निश्चय झाल्यावर तिने त्याच्याकडे पाहीलं.

‘चारूदत्त, वडील म्हणून माझे बाबांवर अतिशय प्रेम होतं. त्यांच्याबद्दल मला आदरही आहे. पण मी जेव्हा माणूस म्हणून त्यांचा विचार करते तेव्हा त्यांचे अनेक दोष समोर येतात. त्याच्याकडे आपण दुर्लक्ष केलं तरी समाज का सहन करील? ’

‘तुला काय म्हणायचं? ’

‘त्यांचा खून झाला चारूदत्त. खून. ’

‘त्यांचा खून कुणी केला ? तुला कुणाचा संशय आहे? ’

‘त्यांच्या स्वभावामुळे त्यांना अनेक शत्रु होते. पण माझा संशय... . ’ पुढचे शब्द मनाचा हिय्या करून उच्चारले. ‘माझा राजशेखरवर संशय आहे’

‘काय! ’ चारूदत्त ताडकन उभा राहीला. ‘वडीलांच्या मृत्युने हीच्या डोक्यावर खरंच परिणाम झाला काय? ’ त्याच्या मनांत विचार आला. राजशेखर म्हणजे भाऊंचा मुलगा. चारूदत्तचा सख्खा मावसभाऊ. हिचा चुलत भाऊ. आपल्या भावाबद्दल ही तडक असं कसं बोलते?

‘खाली बस आणि मी काय सांगते ते लक्ष देऊन ऐक. माझं मन ह्यावर विश्वास ठेवायला तयार नाही. पण मी स्वतःच्या कानाने त्याला बाबांना धमकी देतांना ऐकलं. ’

‘कधी ? ‘

‘त्यांचे भांडण झाले होते तेव्हा. साधारण महीनाभरापुर्वीची गोष्ट आहे. बाबा ऑफिसात उशीरापर्यंत काम करीत बसले होते. ते काम करीत असताना त्यांना डिस्टर्ब केलेल आवडायचं नाही. पण मला त्यांच्याशी अगदी आवश्यक गोष्टींवर बोलायचं होतं. मी त्यांची लाडकी असल्यानं ते मला सहसा रागावत नसत म्हणून मी धीर करून त्यांना भेटायला गेले. आंत जाण्यापुर्वी दरवाजा ठोठावण्यासाठी मी हात उचलला तेव्हढयात मला बाबांचा रागानं बोलण्याचा आवाज आला. ते अतिशय तावातावनं बोलत होते. मी दबल्या पावलांनी तशीच परतणार तेव्हढयात मला त्यांच्या आवाजाच्या पट्टीत राजशेखरच्या ओरडण्याचा आवाज आला. म्हणजे त्या दोघांत वाद चालला होता तर... . .

‘मी हळूच दरवाजा किलकिला करून पाहील. ’ फक्त टेबललँप जळत होता. बाबांचा चेहरा अर्धा प्रकाशात तर अर्धा अंधारात होता. राजशेखर पाठमोरा असल्याने, मी त्याला पाहू शकले नाही. ’

‘ओरडू नका, काका, ’ तो म्हणाला, ‘आपण शांतपणे ह्या गोष्टींवर विचार करू शकतो. आजवर तुम्ही पक्षासाठी झिजलात. पण सत्ता मात्र तीसराच उपभोगतो. तुमच्या शब्दाला मान आहे तर तुम्ही आपल्या घरातील व्यक्तिचे नाव पुढे करायला हवे. ’

‘तुला सांगितले, या वेळी मी ते करणार आहे. ‘ बाबांचा आवाज आला

‘कुणाचं? रणजीतचं? ’

‘होय.का? तो आपल्या घरातला नाही ? तो आपलं नाव लावत नाही? ’

‘नाव लावल्याने काय होतं? एकवेळ तुम्ही वैशालीचं नाव पुढे केलं तर माझी हरकत नाही. पण माझ्या ऐवजी जर रणजीतचं नाव पुढे केलं तर... . . ’

‘तर काय करशील? ’ बाबांना कुणी आव्हान दिलेलं आवडत नव्हतं.

‘फार अन्याय केला काका तुम्ही आमच्यावर. आता मात्र हद्द झाली. जर तुम्ही तिकीटासाठी नाव डावललं तर लक्षांत ठेवा. ’

‘मला धमकी देतो? तुझा काका आहे मी. काय करायचं ते कर. निघ इथून. पुन्हा येऊ नको.

‘ठिक आहे. मला जे करायचं ते मी करीन. मी तुम्हाला समजावून सांगितलं. आता पुढच्या परिणामाला तुम्ही जबाबदार आहात. ’

‘हा... हा... पाहून घेईल. निघ आता येथून... ’ बाबा त्याच्यावर ओरडले.

‘काय पाहून घ्याल? पहायला राहीलात तर पहाल  ना? ’

‘निघ. ’ बाबा पुन्हा जोरात ओरडले.

त्याच्या येण्याची चाहूल लागताच मी आडोशाला लपले. तो रागात असल्यानं त्याला मी तिथं असल्याचं लक्षांत आलं नाही. बाहेर पडून त्यानं धाडकन् दरवाजा बंद केला.

तो जाताच मी दरवाजा उघडून आंत गेले. बाबा रागानं थरथर कापत होते. मला पहाताच त्यांच्या समजले की मला सगळं माहीत झालं.

‘सॉरी बाबा, ’ मी बोलले. ‘मी वेगळ्या कामासाठी आले होते. तुम्ही शांत व्हा. मी भाऊकाकांच्या कानावर घालते. ते समजावून सांगतील त्याला. ’

‘अजिबात नाही. त्याला ह्यातील एक अक्षर कळता कामा नये. तुला बजावून सांगतो. अगं ही घरातली भांडणं असतात. त्याला फार गंभीरपणे घ्यायचं नसतं. रागाच्या भरात बोलला तो. विसरून जाईल आणि येईल परत. पाण्यापेक्षा रक्त दाट असतं. तू भाऊकाकांना काही सांगायचं नाही. तुला माझी शपथ. ’

राजशेखर रागाने गेला, राग शांत झाल्यावर तो परत येईल असं त्यांना वाटत होतं, पण तसं झालं नाही. तो परतला नाही. त्याने स्वतंत्र निवडणूक लढवण्याचं ठरवलं. प्रश्न पैशाचा होता. असं कानावर आलं की सावकारानं त्याला मदतीचं आश्वासन दिलं. तेव्हा मात्र बाबा अस्वस्थ झाले.

सावकार आणि प्रतापमध्ये वाद झाला. प्रतापने पोलिसात त्यांची व त्यांच्या बायकोची तक्रार केली. ते प्रकरण इतकं वाढलं की शेवटी सावकारानं गाव सोडून जाण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्या गाव सोडून जाण्याच्या निर्णयाचा सगळयात मोठा फटका राजशेखरला बसला. त्या फ्रस्ट्रेशनमध्ये त्याच्या हातून हे कृत्य घडले असावे अशी मला भीती वाटते. ’

हकीकत संपवून ती चारूदत्तकडे पाहू लागली.

‘हा तुझा अंदाज  आहे. त्याला काही आधार नाही. शक्य आहे, हा खुन तीसऱ्या माणसाने केला असावा. ’

'शक्य आहे. म्हणून मी उघडपणे कुणाशी काही बोलले नाही. चारूदत्त, तू सी आय़ डी त काम करतोस. तू याचा शहानिशा करू शकशील. पोलिसांच्या आधी आपल्याला याची खात्री करून घ्यायला हवी. ’

‘काय आहे तुझ्या मनांत? जर तो खरंच खुनी असला, तर? ’

‘तर त्याला वांचवायला हवे. चारूदत्त, तुझ्या लक्षात येत ना? ’

‘पण खुन झाला ते तुझे वडील होते. ’

‘होते. चारू, होते. राजशेखरला शिक्षा झाल्यानं ते काही परत येणार नाही. राजशेखर माझा भाऊ आहे. सख्खा चुलत भाऊ. त्याच्या पाठीशी आपण नाहीतर कोण उभं राहणार? बाबा काय म्हणाले माहीत आहे ना? ’

पाण्यापेक्षा रक्त दाट असतं!

# प्रकरण ४

जेवताना कुणीच आपसात बोलत नव्हतं. फक्त भांडयाचे आवाज. हवं नको असा एखादा शब्द. डायनिंग टेबलवर पंधरा वर्षांनी आलेला पाहुणा असतांना कुणी असं शांतपणे जेवेल कां? चारूदत्तने भाऊंकडे पाहीले. ते नजर ताटावर ठेऊन जेवत होते. आपण काय खातो याची त्यांना जाणिव देखील नसावी. सुभद्राबाईंनी काही हवं का विचारल्या वर दचकून भानावर येत. आपण कुठे आहोत याची त्यांना जाणिव झाल्याप्रमाणे घाईने काहीतरी उत्तर देऊन ते पुन्हा मुकाटयाने जेऊ लागत.

त्यांच्या मनांत काय विचार चालला असावा? लहान भावाचा असा अकस्मात मृत्युचा त्यांना धक्का बसणं सहाजिक आहे. अरविंदाचा खुनी कोण याचा त्यांनाही वैशालीप्रमाणे संशय असावा? कुणाचा? राजशेखरचा?

राजशेखर तर कुणाकडे पहात नव्हता. काही हवं असल्यास तो रमाकडे पाहून हाताच्या इशाऱ्याने सांगे. चारूदत्तची त्याची एक दोनदा, नजरानजर झाल्या बरोबर त्याने घाईने नजर बदलली. कुणी काही विचारील अशी त्याला भीती वाटत असेल का? हा अरविंदाचा खुन करू शकतो का? त्याला वैशालीचं बोलणं आठवलं. तिच्या बोलण्यात तथ्य आहे का? दुःखद घटनेचा कुणावर तरी ठपका ठेवणे हा मानवी स्वभाव आहे. दुःखाच्या अतिरेकातून तिनं हा आरोप तर केला नाही? कदाचित् त्यांचं भांडण तिनं ऐकल असल्यानं, तो खुनी असावा अशी तिला शंका वाटते?

रमा शांतपणे जेवत होती. तिला चारूदत्त अनोळखी होता. तिने एक दोनदा बोलण्याचा प्रयत्न केला पण संभाषण पुढे सरकले नाही. शेवटी तिने प्रयत्न सोडून दिला. मात्र सर्वांच्या ताटाकडे तिचे लक्ष होते.

मावशीला मात्र मनातून वाईट वाटतं. ती बोलत नसली, तरी चारूदत्त समजू शकत होता. पंधरा वर्षांनी बहीणीचा मुलगा आला, तिनंच त्याला बोलवून घेतलं होतं. त्या निमित्तानं त्याची व वैशालीची भेट घडवून आणण्याचा त्यांचा मानस होता. त्यांच्या मनांत किती उत्साह, अपेक्षा

असणार. त्याच्यावर पाणी फिरलं. अपशकून झाला. आमरसाच्या पहील्या घासात केस निघावा तशी अवस्था झाली तिची. बिचारी. एकुलती एक लाडकी मावशी!

त्याने घशातून आवाज काढून सगळ्यांचे लक्ष वेघून घेतले. भाऊ मात्र आपल्या तंद्रीतच होते.

'काका... . . ' त्याने आवाज दिला. त्यांचा हात अर्ध्यावर थांबला.

' पंधरा दिवस आपण काही करू शकणार नाही. तेव्हा उद्या मुंबईला परतावं म्हणतो. '

'तुझं जेवण झालं का? ' त्यांनी विचारले.

'नाही. . '

'जेऊन घे आधी शांतपणे, मग पाहू. ' थांबलेला घास घेऊन त्यांनी पुन्हा जेवायला सुरवात केली. त्यानंतर जेवण होईपर्यंत कुणी बोलले नाही.

जेवणानंतर भाऊ आपल्या खोलीत निघून गेले. जाताना चारूदत्तला 'मला तुझ्याशी जरा बोलायचं आहे, तुझं आटोपल्यावर ये' असं त्रोटक बोलले. त्याने मावशीकडे प्रश्नार्थक पाहीले तेव्हा तिने ओठांना मुरड पाडून माहीत नसल्याचे सांगितले.

ती त्यांची काम करण्याची खोली होती. तेथे बसून ते हिशोब लिहीत. वाचन करीत, शेतीच्या पुढच्या योजना तयार करीत. तेथे काम करताना व्यत्यय आला तर त्याना राग येई, त्यांनी बोलावल्याशिवाय त्या खोलीत कुणी जात नसे. चारूदत्त गेला तेव्हा दरवाजा बंद होता. दरवाजा ठोठावून त्याने आंत प्रवेश केला.

खोलीत ते ओढत असलेल्या सिगारेटच्या धुराचा कडवट वास भरून राहीला होता.

ती छोटीशी खोली एखाद्या अभ्यासिकेसारखी होती. पुर्वेकडे सहा बाय चारची खिडकी. त्याच्या समोरच्या भिंतीला एक मोठे कांचेचे कपाट. त्यात शेतीविषयक आणि राजकारणासंबंधी अनेक पुस्तके नीटपणे मांडून ठेवली होती. मधल्या भिंतीच्या बरोबर सेंटरला सागवानाचं जुन्या, प्रशस्त टेबल. टेबलाच्या मागे उंच पाठीच्या खुर्चीवर भाऊ बसले होते. त्यांच्या उजव्या हाताला एक शो केस होती. त्यात पक्षाकडून त्यांना मिळालेली मानचिन्हं मांडून ठेवलेली होती. भिंतीवर पुढाऱ्यां सोबतचे अनेक छोटे-मोठे फोटो लावलेले होते. पंडीत जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधीचे फोटो आकाराने

मोठे होते. त्याचे निरिक्षण होईपर्यंत भाऊ शांतपणे बसून राहीले. त्याची प्रश्नार्थक नजर त्यांच्यावर खिळली. त्यांनी केसातून हात फिरवला.

'ये बस. ' समोरच्या खुर्चीकडे निर्देश केला. हातातली सिगारेट अँशस्ट्रेमध्ये झटकली. घसा हलकेच खाकरा काढून मोकळा केला आणि खर्जातल्या आवाजात बोलायला सुरवात केली.

'चारूदत्त, माझ्या मनांत काय आहे ते सांगण्याआधी तुला आमच्या घराण्याची पार्श्वभूमि सांगायला हवी म्हणजे तुला माझी मानसिकता कळेल.

बाबाजी धारपांचं नाव ह्या भागात मोठया आदरानं घेतलं जातं. ते सशस्त्र क्रांतिचे पुरस्कर्ते होते. त्यांनी अनेकांना शस्त्रास्त्राचं शिक्षण देऊन स्वातंत्र्याच्या लढयात सामिल करून घेतलं होतं. ब्रिटीश सरकारची झोप उडविली होती. स्वातंत्र लढयाच्या वेळी वडील सहसा घरी नसत. त्यांच्या माघारी फक्त मी, अरविंदा आणि आई रहात असू. अरविंदा माझ्यापेक्षा नऊ वर्षानं लहान होता. वडील जातांना मला घराकडे लक्ष द्यायला सांगत तर, अरविंदाला माझं ऐकायला सांगून जात. त्यांच्या माघारी मी स्वताःला कर्ता समजून वागत असे. तेव्हापासून अरविंदाला माझं ऐकण्याची सवंय लागली. ती त्याने शेवटपर्यंत पाळली. त्याला मनाप्रमाणे वागायचं असल्यास तो हट्टीपणा करायचा. त्याचं म्हणणं मान्य करेपर्यंत भुणभुण करीत रहायचा. शेवटी कंटाळून मी त्याला परवानगी देई. त्यामुळे त्याचा स्वभाव हट्टी झाला. कोणती गोष्ट मना विरूध्द झालेली त्याला खपत नसे, त्या उलट माझ्या स्वभावात समजुतदारपणा आला. कुठलीही गोष्ट करताना मी कुटूंबाचा विचार आधी करीत असे तर अरविंदा आधी स्वतःचा विचार करी.

एकोणीसशे सत्तेचाळीसनंतर जेव्हा निझामानं स्वतंत्र भारतात बिनशर्त सामिल होण्यास नकार दिला तेव्हा बाबाजी त्याच्या विरूध्द पण झगडले, रजाकारी अँक्शन होऊन निझाम स्टेट भारतात विलीन झालं. तोपर्यंत त्यांचं वय झालं होतं. स्वातंत्र्याच्या चळवळीत मुख्य धारा कॉन्ग्रेसची असल्याने ते सहाजिकच त्याच पक्षात काम करीत होते. परंतू त्यांनी कधीही स्वताःसाठी काही मागून घेतलं नाही. घेतली फक्त एक शाळा. तिच्या उन्नतीसाठी ते सतत झटत असत. ती शाळा होती म्हणून ते घरात टिकले, नाहीतर त्यांची गोव्याला जाण्याची फार इच्छा होती. ते सत्तेत नसले तरी त्यांचा या भागातला प्रभाव पाहून कॉन्ग्रेसचे नेते त्यांना मान देत. लोकसुध्दा ते सांगतील त्याला डोळे झाकून

मतदान करीत असत. तेव्हापासून ह्या भागात कुणाला तिकीट द्यायचे याची आमच्याशी पुर्वचर्चा करण्याची रित पडली, ती अजून चालू आहे.

मरतांना वडीलांनी मला जवळ बोलावून सांगितले, अरविंदा हट्टी आणि विक्षिप्त आहे. त्याला सांभाळून घे. त्याला अंतर देऊ नको. माझ्या माघारी तू घर सांभाळत होतास, माझा तुझ्या वर विश्वास आहे. अरविंदाला बोलावून त्याला सांगितले, भाऊला माझ्या जागी समजून त्याचं ऐकत जा.

पुढे राजकारण बदलंल. एका राष्ट्रीय नेत्यानं कॉंग्रेसमधून फुटून नवा पक्ष स्थापन केला. माझा विरोध डावलून अरविंदाने नव्या पक्षात प्रवेश केला. त्याच्या विरोधात राजकारण करण्याची मला वेळ आली नाही, कारण पुढे दोन्ही पक्षाची युती झाली. युतीमुळे आम्ही निःश्वास टाकला. राजकारणात एकमेकांच्या अंगावर शिंतोडे उडवावे लागतातच. आम्ही दोघे ते करू शकलो नसतो. निदान मी तरी. अरविंदाचं सांगता येत नाही. तो जिद्दीला पेटला की स्वताःचं खरं करण्याच्या नादात तो कुठल्याही थराला जाऊ शकत होता.

त्याच्या हट्टी स्वभावामुळे, आणि माझ्या मवाळ धोरणांनी माझी  सतत पिछेहाट होत गेली. वाटण्या झाल्या तेव्हा, खरंतर, गढीवर माझा अधिकार असायला पाहीजे होता. पण गढी मला पाहीजे म्हणून तो हट्ट धरून बसला. त्याची किती समजुत घातली, किती लोकांनी मध्यस्ती केली. गढी हवी म्हणून तो अडून बसला तो बसला. त्याच्यामुळे आमच्या घरात भांडण लागली. गढीवर पहीली सून म्हणून तुझी मावशी आली. तिनं गढीसाठी किती खस्ता खाल्या हे सगळयांना  माहीत आहे. गढी सोडताना होणारी तिची घालमेल मला पहावत नव्हती. छातीवर दगड ठेऊन आम्ही या नव्या वाडयात रहायला आलो.

राजकारणात वेगळी स्थिती नव्हती. वाटघाटीत ही जागा त्याच्या पक्षाकडे असल्याने सत्ता कायम त्याच्या घरात राहीली. धारपांचा मोठा मुलगा म्हणून मला मान मिळतो पण शेवटी सत्ता जिथं  राज्य करते तिथं  संपत्ती टॉ केलेल्या कारप्रमाणे ओढली जाते. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर त्याने गांवातली एक- एक सत्तापदं काबीज केले. शिक्षणसंस्थेवर मी आणि राजशेखर नावाला संचालक मंडळात आहे. त्याचे  बहूमत  असल्यानं तिथेही त्याचेच निर्णय चालतात.

महत्वाच्या पदांवर त्याचा एकटयाचा अधिकार चालतो. त्याला विरोध करण्याचा कुणी प्रयत्न केला तर तो त्याला चांगलाच धडा शिकवी. त्याच्या वागण्याने त्याने अनेक दुष्मन तयार केले. मी

त्याला वारंवार सावध करीत होतो. पण तो माझा उपहास करीत होता. उघडपणे तो मला भेकड म्हणत नसला तरी त्याच्या म्हणण्याचा अर्थ तोच असायचा. त्याने निर्माण केलेले दुष्मन त्याला एक दिवस संपविणार याचा मला अंदाज होता, पण तो राजकारणाच्या अर्थाने. राजकारणात एखाद्याला संपविणे म्हणजे त्याची राजकीय करिअर संपवणे असा होतो. मात्र त्याचे आयुष्य कुणी संपवेल असं  कधी स्वप्नातही वाटलं नाही.

त्याच्यामुळे मला आयुष्यभर खुप मनस्ताप झाला हे खरं आहे, तरीही तो माझा  लहान भाऊ होता. वडीलांनी जाताना त्याला माझ्या हवाली केलं होतं. मी वडीलांना दिलेलं वचन मोडलं असं मला वाटतं. माझ्या मनाला अपराधी वाटतं. '

ते पुन्हा समोरच्या खुर्चीवर बसले तेव्हा चारूदत्तकडे रोखुन पहात होते. दोन्ही हाताचे कोपर टेबलावर टेकवून, पुढे झुकून त्यानी चारूदत्तच्या डोळयात पाहीले. त्यांचा चेहरा एखाद्या हिंस्त्र पशूसारखा दिसू लागला.

'तो कसाही असला तरी माझा भाऊ होता. धारप घराण्यातला  होता. बाबाजीचा मुलगा होता. बाबाजी! ज्यांनी ब्रिटीशां विरूध्द आणि रजाकारी विरूध्द सशस्त्र क्रांति केली. त्यांचा मुलगा. माझा भाऊ. त्याचा खून करून कुणी मोकळा राहू शकत नाही. त्याला शिक्षा झालीच पाहीजे. '

'होईल. पोलिस तपास करीत आहे. ' चारूदत्त शांतपणे म्हणाला.

'पोलिस! ' टेबलावर हात आपटून ते मागे सरकले. त्यांच्या चेहऱ्यावर विफलता झळकली. 'त्यांच्याबद्दल बोलायला नको. तो कदम गधडा आहे आणि नारायण पैसे खाण्यात मश्गुल असतो. केस उभी कशी राहील? राहीलीच तर किती दिवस चालेल? तोपर्यंत मी राहील की नाही? नाही चारूदत्त, त्याच्या खुन्याला माझ्या डोळयां समोर शिक्षा झाली पाहीजे. '

'ते तर मलाही वाटतं. पण आपण काय करू शकतो? '

'तू सी. आय. डी. त काम करतोस ना? तू या केसचा तपास कर. खाजगीरित्या. रजा घे. अडचण असल्यास मला सांग. मी बोलेल कुणाशी बोलायचं असलं तर. माझ्या पार थेटपर्यंत ओळखी आहेत. '

चारूदत्त काही बोलला नाही. ते इतके उत्तेजीत झाले की, त्यानी चारूदत्तचा हात पकडून जोरात हालवला.

‘तू बोलत का नाहीस? ’

चारूदत्तने हलकेच आपला हात सोडवून घेतला.

‘खुनी सांपडून तुम्ही काय करणार? ’

‘ते तू माझ्यावर सोपव. बाबाजींनी  गद्दारांच्या न्याय केला. सरकारी दरबारी न्याय मागत बसले नाही. अजून माझ्याकडे... . ’

अचानक भानावर आल्यासारखे  ते गप्प झाले.

‘तुला काय? तू फक्त खुनी कोण याचा तपास करायचा. हां, पुरावा मात्र सबळ, संशयातित हवा. विनाकारण निष्पाप माणसाचा बळी जायला नको. मी तुला हवी ती रक्कम देईल. ’

त्यांचा बळी शब्द चारूदत्तला खटकला. पैशाची भाषाही त्याला आवडली नाही.

‘ कदमांनी मला पोलिसांना मदत कराण्याची विनंती केली आहे. त्यांच्या तपासाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न मी  करील. मला खात्री आहे, लवकरच खुन्याचा शोध लागेल.

‘पोलिसांच्या आधी आपण त्याचा शोध घ्यायला हवा. तो एकदा पोलिसांच्या तावडीत गेला की मग आपण काय करणार? ’

‘भाऊ, सत्य अकल्पित असतं. त्याला आपोआप उघड होऊ देण्यात शहाणपण आहे. आपण त्याला जाऊन धडकलो तर कपाळमोक्ष होण्याची भीती. ’

‘म्हणजे? ’

‘भाऊ, तुम्ही ज्या आत्मविश्वासानं खुनी शोधण्याचा आणि शिक्षा करण्याचा निश्चय करता त्यावरून खुनी कोण आहे याबद्दल तुम्हाला काही अंदाज असावा. जर खुनी तुमच्या जवळचा कुणी निघाला, तर ? ’

‘असं कसं होईल? तुला काय म्हणायचं? ’

‘एव्हढंच की सत्य स्वीकारण्याची तुमची तयारी आहे कां? तपासातून काहीही बाहेर येऊ शकतं. ’

‘हो माझी तयारी आहे. तू ह्या प्रकरणाचा छडा लावशील कां? ’

‘ह्या प्रश्नाचं उत्तर मी राजशेखरशी बोलून देईल. ’

त्यांची उजवी भुवई वर गेली.

‘तुम्ही घराचे मालक आहात हे खरं असलं तरी तो कारभारी आहे. त्याच्या घरात त्याच्या परवानगीशिवाय काही ठरवणं मला योग्य वाटत नाही. ’

‘तो विरोध करील असं तुला वाटतं? ’

‘कुणास ठाऊक? त्याच्याशी बोलल्याशिवाय कसं सांगता येईल? ’

‘ठीक आहे. ’ त्यांनी हात पसरून खांदे उडविले.

‘तुम्हाला काय वाटतं? कोण असेल खुनी? ’

‘सावकार! ’ ते ठाम सुरात म्हणाले.

‘सावकार? राजशेखरला पैसा पुरवणार होते, ते? ’

‘शाबास! एव्हढी माहीती मिळवलीस. हो तोच. ’

‘त्यांना अरविंदाचा खुन करायचं कारण काय? त्यांची काही दुष्मनी होती? ’

‘आधी नव्हती. पण त्याघटनेनंतर ...

‘कोणत्या? काय झाले होते? ’

‘ एका घटनेमुळे त्यांच्या बायकोच्या डोक्यावर परिणाम झाला. ती सुन्न अवस्थेत बसून असते. तिची मानसिक अवस्था पार बिघडून गेली. ती घराच्या बाहेर पडत नाही. त्याला अरविंदा जबाबदार आहे असं सावकाराला वाटतं. कंटाळून सावकाराने गाव सोडून जाण्याचा निर्णय घेतला. पण पोलिसकेस तशीच पेंडीग राहीली तर त्यांना वारंवार चकरा माराव्या लागतील, म्हणून जाण्या आधी केस मिटवून टाकावी अशी त्याची इच्छा आहे. त्यासाठी मी मध्यस्ती करावी म्हणून ते काल मला सांगत होते. ’

‘तसं असेल तर मग ते अरविंदाचा खून कशाला करतील? कारण त्यांची तक्रार तेच मागे घेऊ शकतात. त्यांचा मृत्यु झाला तर ती केस कुणी काढून घेऊ शकत नाही. ’

‘बरोबर आहे. पण तक्रार अरविंदाने नाही, प्रतापने केलेली आहे. ’

‘प्रतापने केलेली तक्रार... अरविंदाला मागे घ्यायला सांगायची... त्याची विनंती तुम्हाला. . ? ’

त्याचे कंफ्युजन पाहून भाऊला हसू आले.

‘याला आढी म्हणतात आमच्या ग्रामिण भाषेत. अशा खुप आढया पडलेल्या असतात. कोणत्याना कोणत्या आढीत माणूस सांपडतोच. जितका माणूस पॉवरफुल तितक्या आढया जास्त. या आढीबाजीमध्ये आमची इतकी  शक्ती खर्च होते की आमची प्रगतिच होत नाही. तुमच्या शहरी भाषेत त्याला नडणं म्हणतात. ’

‘भाऊ त्याचा या केसशी संबंध असला तर मला सगळं सुसंगत सांगा. ’

‘बैस. ’ त्यांनी नवी सिगारेट काढली. ‘जेवणानंतर एकच सिगारेट ओढायची मावशीने परवानगी दिली आहे. पण तू काही माझ्याशी आढी करणार नाही, म्हणून दुसरी ओढतो. ’ दमदार झुरका घेऊन धुर सोडल्या वर त्यांनी  बोलायला सुरवात केली.

‘निवडणूकीच्या तिकीटावरून राजशेखर व अरविंदात बरेच दिवसांपासून वाद सुरू असल्याचं माझ्या कानावर होतं. घरातला मामला आहे तोपर्यंत त्यात पडायचं कारण नाही म्हणून मी दुर्लक्ष केलं. जेव्हा मला कळालं की राजशेखर एका प्रादेशिक पक्षात सामिल होऊन तिकीटासाठी प्रयत्न करतो, तेव्हा मी त्याला तसं करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण त्यानं माझं ऐकलं नाही.

नव्या पक्षात जाण्यासाठी व तिकीटासाठी पक्षाला द्यावा लागणारा  निधी उभा करण्यासाठी राजशेखरने सावकाराकडे शब्द टाकला. सावकाराचा धंदाच आहे, शिवाय प्रादेशिक पक्षाचे प्रस्थ वाढल्याने त्याची निवडून येण्याची शक्यता जास्त होती. सावकार नेहमी सत्तेच्या बाजूने रहातो. ’

कुठलीतरी दुःखद आठवण त्यांच्या आवाजात तरळून गेली.

‘सावकार राजशेखरला मदत करतात याचा अरविंदला राग आला. सावकाराच्या घरी जाऊन तुझ्यामुळे आमच्या घरात फुट पडते, म्हणून  भांडू लागला. तू आमच्यामध्ये पडू नकोस नाहीतर वाईट

परिणाम होतील अशी धमकी देऊन निघून आला. सावकाराने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. त्याच्या बरोबर चार दिवसांनी प्रतापने सावकाराविरूध्द पोलिसस्टेशनला सावकारी कायद्याच्या आधारे तक्रार केली. अरविंदाचा हस्तक्षेप असल्याने पोलिसांनी त्यावर त्वरित अँक्शन घेतली. प्रतापच्या जमिनीची रजिस्ट्री सावकाराच्या बायकोच्या नावाने झालेली असल्याने तीही त्यात गोवली गेली.

त्यानंतर झालेला प्रकार अरविंदाच्या हीन मनोवृत्तीचं प्रदर्शन करणारा होता. त्याबद्दल गावकऱ्यांनी देखील त्याची छीःथू केली. सावकाराला आणि त्याच्या बायकोला घरापासून पोलिसस्टेशनपर्यंत हातात बेडया घालून नेण्यात आलं. ती शुक्रवारची संध्याकाळ होती. सोमवारशिवाय त्यांची जमानत होणार नव्हती. दोन दिवस त्यांना पोलिसस्टेशनच्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आलं. नवरा- बायको असून सुध्दा सामान्य गुन्हेगारासारखं, नियमाप्रमाणे स्त्री पुरूष समजून, वेगवेगळया कोठडीत ठेवण्यात आलं. गांवातल्या सभ्य लोकांनी पोलिसांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी आपण हतबल असल्याचे सांगितले. तुमचे राजकारण तुमच्यापाशी पोलिस म्हणाले. तुम्ही गावकरी एक व्हाल. माझ्या नोकरीचा सवाल आहे. मी नियम मोडले आणि तुमच्यापैकीच कुणीतरी पोलिसांनी नियम तोडले म्हणून तक्रार केली तर माझी चौकशी होईल. त्यापेक्षा तुम्ही फिर्यादीला तक्रार मागे घ्यायला सांगा. तो तुमच्या गावचा माणूस आहे.

काही शिष्ठ, प्रतिष्ठीत गावकरी अरविंदाला भेटायला गेले. पण त्यानं दाद दिली नाही. माझा काय संबंध? तक्रार प्रतापने केली. त्याची जमिन सावकारानं हडपली, दलिताला न्याय मागायचा अधिकार आहे की नाही? ’

सावकाराने आपण बिनशर्त जमिन परत करतो म्हणून सांगितले तरी प्रतापने ऐकले नाही.

सोमवारी त्यांची जमानत झाली. जमानतीच्या वेळी कोर्टाच्या आवारात खुप गर्दी झाली. लोक पोलिसांच्या आणि अरविंदाच्या विरोधात उघड बोलत होते. लोकांचं प्रेम पाहून सावकारला सावरण्यांस बळ मिळालं. मात्र त्यांची पत्नी ह्या धक्क्यातून सावरली नाही. इतके लोक आपला तमाशा पहायला आले, असं तिला वाटलं. ज्या गांवात सन्मानाने वावरलो त्या गांवात इतकी बेइज्जती झाल्यावर मी परतणार नाही असे तिने ठाम सांगितल्यावर सावकारने तिला परस्पर माहेरी नेऊन सोडले. तिच्या डोक्यावर परिणाम झाला. ती सुन्न डोळयाने बोलणाऱ्याकडे नुसती पहात राहते. कुणी भेटायला आलं तरी ती घाबरते. तिची ती अवस्था पाहून सावकार ढसढसा रडतो.

सावकाराला मुल ना बाळ. आयुष्यभर इतका पैसा जमवला की तो बसून खाऊ शकतो. आठ दिवसांनी तो गांवात परतला ते औरंगाबादला एक बंगला खरेदी करूनच. आल्यावर त्यानं घर-जमिन विक्रीला काढली. दिलेल्या कर्जाची येईल ती वसुली घेऊन दस्तावेज परत करायला सुरवात केली. तो गाव सोडून जाणार हे नक्की. अडचण फक्त पोलिस तक्रारीची आहे. ती जोपर्यंत मिटत नाही, तोपर्येत सावकाराला व त्याच्या बायकोला गांवात यावंच लागेल. बायकोला गांवात यावं लागू नये म्हणून प्रतापने तक्रार मागे घ्यावी असा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.'

'गाव सावकार मुक्त झाले म्हणायचे. ' चारूदत्त म्हणाला.

'साहित्यात, सिनेमात सावकारचे चित्रण पाहून सावकाराबद्दल आपल्या मनांत एक राग असतो पण सावकार ही गावाची गरज आहे. हे मान्य करायला हवं. ज्या गोष्टींची गरज नसते त्या आपोआप नष्ट होतात. मी सावकारीचं समर्थन करीत नाही, पण अडीअडचणीला कोण मदत करणार? गावचा सावकार नाहीतर परगावचा सावकार. गावच्या सावकाराला निदान गावाची भीड तरी असते. बाहेरच्या सावकाराला काय सोयरसुतक? सावकार गाव सोडतो. वाईट झालं. '

'म्हणून तो अरविंदकाकांचा खुन करील? '

'निश्चित करील. ह्या सगळयांचं मुळ अरविंदा आहे. प्रताप तर निव्वळ प्यादं. अरविंदाचा आश्रित. अरविंदाशिवाय त्याची काय ताकद? अरविंदा हयात नाही म्हटल्यावर प्रताप स्वताः होऊन तक्रार मागे घेईल. अरविंदाचा सूड उगविल्याचं समाधान. एका दगडात दोन पक्षी.

बोलणे संपल्यावर ते चारूदत्तच्या विचारमग्न चेहऱ्याकडे उत्तराच्या अपेक्षेने पहात राहीले.

'राजशेखरशी बोलल्यावर मी तुम्हाला सांगतो. ' त्यांच्या डोळयात पहात चारूदत्त म्हणाला, 'एकदा केस स्वीकारल्यावर मात्र मी माघार घेणार नाही. '

त्यांच्या नजरेत निर्णय ठाम झाला.

'उद्या भेटू या. गुड नाईट. ' चारूदत्त वळला.

# प्रकरण ५

राखुंडीने दात घासत, तोंड धुण्यासाठी सुमन बाहेर आली तेव्हा तिला बांधावरुन येणारा नारायण दिसला. तो ड्रेसवर नसला तरी त्याची अवजड चाल तिला दूरून ओळखू आली. त्याला पाहून तिच्या गालात हसू खेळले. त्याला उद्देशून ती स्वताःशी म्हणाली,

‘आला मेला सूडकरी, रामपाऱ्यात. ’

रांजणातून पाणी घेऊन तोंड धुवायला सुरवात केली तोवर तो आलाच. तिच्या ओलेत्या चेहऱ्याकडे पाहून बावळटासारखा हसला.

‘काय म्हन्ती सुमने ? ’

‘ त्याचं एकेरी बोलणं तिला आवडलं नाही, नाक वाकडं करून, जोरदार श्वास ओढला. चेहऱ्यावर हसू आणून ती म्हणाली,

‘या अंमलदार साहेब, आज सक्काळी  गरीबाकडं कसं येनं केल? ’

‘साहेब म्हटले, खुप दिवस झाले,  सुमनची काही खबरबात नाही, एकदा भेटून ये. ’

‘खबरबात म्हन्शान त  काही न्हाई  बघा. ’

‘नाही कशी? ’ बोलता- बोलता तो शेणानं सारवलेल्या ओटीवर  ऐसपैस बसला.

‘खाली काम्हून बसता? गोधडी घालते. ’

त्याच्या मनांत चावट व्दयअर्थी उत्तर आले. पण सुमनचा मुड बघून त्याने विचार बदलला, आणि म्हणाला,

‘राहू दे. चालतं. आपलचं घर आहे. ’

त्याने तिरप्या नजरेनं तिचा अंदाज घेतला.

‘चा घेनार का? ’ तो बसला म्हणजे लवकर उठणार नाही. नारायण येईल याची तिला अटकळ होती पण तो एव्हढया सकाळी येईल असं वाटलं नव्हतं.

त्यानं चहाला नको म्हटल्यावर तिला हायसं वाटलं. त्याने सिगारेट काढून पेटविली. कडवट धूर हवेत सोडून तो म्हणाला,

‘साहेबांनी काल रात्रीच सांगितलं, सुमनला भेटून ये. ’

‘म्हणून लगी सकाळीच आला. चान्सच पाहीजे असतो, ’ ती मनांत म्हणाली, ‘बरा, रातीचं न्हाई आला. ’

‘कह्याला? समदं आलबेल हाय नव्हं? ’

‘आलबेल? तुला काही ठावूक नाही?

‘न्हाय बा. गांवातल्या गोष्टी  आम्हाला मळयात कशा म्हाईत हुनार? ’

त्याने तिच्याकडे करडया नजरेनं पाहीलं. आता त्यो पोलिसावानी दिसतो. ती सावरून बसली.

‘काय झालं? ’

‘अरविंदभाऊबद्दल तुला कसं समजलं? ? ’

‘काय समजलं? ’

‘तो कुठं सांपडेल हे तुला कसं कळलं? ’

‘मला न्हाई बा म्हाईत. ’

‘काल तुझ्याकडे अरविंदभाऊच्या घरचे लोक आले होते ना? त्यांना  सांगितलं तू. ’

‘म्या? म्या काही नाही सांगितलं. अंगात आल्यावर देवी काय बोलते ते मला काय पन कळत न्हाय. माझ मला भान नसतं. ’

‘सुमन, ’ तो खवचट सुरात म्हणाला, ‘देवीच्या गोष्टी तू मला नको सांगू तुझ्या  अंगात कसली देवी येती? ’

‘काहून न्हाई येणार? ’ तिनं  ताडकन् विचारलं.

काही उत्तर न देता तो शांतपणे सिगारेट ओढत बसला. त्याच्या बोलण्याचा अर्थ तिच्या जिव्हारी लागला. उफाळून ती म्हणाली,

‘तुह्या घरात न्हाई का देव? तू काय लई धुतला तांदूळ हायेस का? आगावू बोलायला लाऊ नको. कामाचं बोल अन् चालायला लाग.

तिचा संताप पाहून तो  हसला. ती रागावली तरी छान दिसते. तिला डिवचायला त्याला आवडतं. तरी माहीत आहे, ती कशी आहे. खरं तर त्याला, मनांतून, ती अजूनही  हवीशी वाटते, पण नंतर तिने त्याला कधीच दाद दिली नाही. तो राग कधी असा बोलण्यातून डोकावतो.

शेवटचा जोरदार कश घेऊन त्याने टिचकीने थोटूक फेकुन दिलं.

‘माझ्या घरच्या गोष्टी राहू दे. अरविंदभाऊचं तुला कसं कळलं? ’

‘मला काय बी कळलं न्हाई. काल देवीनं कौल दिला, त्ये बोल्ले. काय झालं ते सपस्ट सांग. ’ “आणि निघ. ” असं म्हणाली नाही पण सुर तोच होता.

‘'तुला खरंच माहीत नाही? ’ त्याची नजर तिच्या चेहऱ्यावर रोखली. ते बामनाच्या मळयात होते म्हणून? ’

‘देवी बोलली; ते मी सांगलं. सापल्डाना. देवी पावली. तिठं काय करत होता दोन रोज? ’

‘सुमन! ’ कडक आवाजात तो म्हणाला, ‘जास्त नाटक करू नको . मामला खुनाचा आहे. तुला जे काही  माहीत असेल ते सगळं सांगून टाक. ’

‘काय म्हन्ला? खुनाचा मामला? कुणाचा खुन झाला? ’

‘अरविंदभाऊंचा. ’

‘कधी? ’

तिच्या चेहऱ्या वर नको तितके आश्चर्य दिसले. ती दाखवते तेव्हढा तिला धक्का बसला नव्हता. ती नाटक करते आहे. आवाजातली खुशी तिला लपवता आली नाही. तिला माहीत होतं, अरविंदाचा खून झाला?

‘नक्की नाही सांगता येत. परवा रात्री केव्हातरी. अंगा भोवती किडे जमून राहीले होते. अजून एखादा दिवस गेला तर वास सुटला असता. ’ तो म्हणाला.

सुमनची नजर जमिनीवर खिळली होती. नारायणचं बोलणं ऐकताना तिचा चेहरा विकृत झाला. दात आवळून, ओठ वाकडे करून ती हसत होती. तिचा आकर्षक चेहरा भयानक दिसत होता.

‘सुमन! ’ त्याने घाबरून आवाज दिला.

‘अं? ’ तिचा चेहरा पुर्ववत् झाला, ‘तो गेला म्हणता. त्याचा खून झाला? वाईट झालं.चा घेणार का? नको? घ्या ना जरासा. जो तो आपल्या कर्मानं जातो. त्येला आपन काय करनार? आपल्या का हातातल्या गोष्टी हाये? ’

‘सुमन, यात तुझा हात नाही ना? ’

त्याच्या बोलण्यावर, ती मोठा विनोद झाल्यासारखी हसली. तिच्या डोळ्यात पाणी आलं.

‘सुमन, अरविंदा किती हलकट होता ते सगळ जग जाणतं. तो गेला ह्याचं दुःख फक्त त्याच्या बायकापोरांना. त्याच्या खुनात तू अडकू नाही असं मला वाटतं. काय खरं असेल ते मला सांगून टाक. आपण त्यातून मार्ग काढू. ’

तो मनापासून बोलत होता. सुमनने त्याच्याकडे केविलवाण्या नजरेनं पाहीलं. हा मुर्ख माणूस अजून मला एव्हढा जीव लावतो?

‘खरं सांगू देवा, खाजगी आवाजात बोलू लागली, तुम्ही कुनाला बोलू नका. अहो, बोला फुलाला गाठ. लोकांनी इच्यारल्यावर काही नाही सांगितलं त लोकं इश्वास ठेवनार कसा? तव्हा जे सुचन ते बोलते. ते खरं ठरलं ही देवीची किरपा. ’

‘म्हणजे तुला काही माहीत नव्हतं म्हण की? ’

‘नाय बा. शप्पथ. ’

‘गांवात कुणी नवी माणसं दिसली का? बाहेरगावची? ’

तिने खालचा ओठ मुडपून मान हालवली.

‘काही आवई? कुजबुज? ’

‘ ऐकण्यात न्हाई बा. ’

तो निघाला.

‘येत जावा. ’

त्याला माहीत होतं, तिचं हे बोलणं तोंडदेखलं आहे. तिला आपण आलेलं आवडत नाही. तिचंही खरं आहे. इतकी पोळली बिचारी. तिच्या मनांतलं प्रेम होरपळून गेलं. ती आपला तिरस्कार करते का? करू दे. तरीही ती आपल्याला आवडते, तिला भेटून मनाला आनंद वाटतो. म्हणूनच तर ती संकटात सापडू नये ही आपली तळमळ.

पण ती संकटात सापडणारच !

नक्की सांपडणार. कारण ती खोटं बोलते. ती दाखवते त्यापेक्षा तिला जास्त माहीती आहे. अपमान गिळून, आपल्या लोचटपणाला लाथ मारावी तसा त्याने रागाने दंडा फिरवून एक दगड अलगद उडवला, आणि मागे वळून न पहाता निघून गेला.

तो दूर निघून जाईपर्यंत सुमन त्याच्याकडे पहात होती. मग गडबडीने वळून झोपडीत गेली.

******

धारपवाडीचे पोलिसस्टेशन बसस्टँडला लागून होते. बसथांबा म्हणजे, बस उभी करून वळवण्या पुरतीची  जागा. त्याच्यापेक्षा पोलिसस्टेशनचा परिसर मोठा होता. आवारात उंच, डेरेदार झाडी लावलेली होती. कदमचे टेबल दरवाजा समोर होतं. सडकेवरून जाणारा माणूस त्यांना दिसायचा. फाटकांतून येणाऱ्याला साहेब आहेत की नाही ते समजायचं. व्हरांडा ओलांडून आंत गेलं की दोन्ही बाजूला दोन छोटया अंधाऱ्या खोल्या. जमानत होईपर्यंत डांबून ठेवायला. मध्यल्या दरवाजातून गेलं की कदमांची खोली. भिंतीवर बाण काढून लाल रंगात डावीकडे पुरूष आणि उजवीकडे महीला लिहीलेलं होते. चारूदत्तने नकळत उजवीकडे पाहीले, त्याला न पाहीलेल्या सावकारच्या बायकोचा हुंदका ऐकू आला.

चारूदत्तने कदमच्या केबीनमध्ये प्रवेश केला तेव्हा भिंतीवरील घडयाळ अकरा वाजून वीस मिनीटे दाखवत होतं. चारूदत्त येताच उठून त्यांनी त्याचा हात हातात घेऊन हालवला. त्याला बसण्याचा इशारा करून ते म्हणाले,

‘सर, तुम्हाला पाहून मला मनापासून आनंद होतो. माझ्या विनंतीला मान देऊन आपण आलात. ’ त्याने टेबलावरील सिगारेटचे पाकिट चारूदत्त समोर धरले. चारूदत्तने हाताने नकार दिला. ‘ किती दिवस आहात तुम्ही? ’

‘मी तीन दिवसांसाठी आलो होतो. म्हणजे उद्या निघण्याचा बेत आहे. ’

त्यांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसली. पाकिटातून सिगारेट काढून त्यांनी  टेबलावर हलकेच ठोकून ओठांवर ठेवली.

‘तुम्ही देऊ शकाल तेव्हढा वेळ द्या. ’

‘तपास कसा सुरु आहे? काही दिशा मिळते काय? ’

‘विळ्याचे टोक हृदयापर्यंत आंत गेल्याने त्यांचा लगेच मृत्यु झाला. विळा मारणारा बराच शक्तिवान असला पाहीजे. त्यांच्या वर अचानक हल्ला झाल्याने त्यांना प्रतिकार करायला वेळ मिळाला नाही. कारण अंगावर इतर कुठल्याही जखमा नाहीत. कदाचित् खुनी त्यांच्या माहीतीतला, विश्वासातला असला पाहीजे. नाहीतर ते त्याला इतकं जवळ कशासाठी येऊ देतील? ’

‘विळयावर ठसे सापडले कां? ’

‘हो. विळयाच्या मुठीवर ठसे आहेत. पण त्यांचा रेकॉर्ड आपल्याकडे नाही. ’

‘पोस्टमार्टमचा रिपोर्ट आला? ’

‘ आला. अल्कोहल सापडले. रात्री बरीच घेतली असली पाहीजे. सोबत कोण होतं त्याची चौकशी चालू आहे. तशी झोपडीत एक अख्खी बाटली आणि तीन ग्लास सापडले. त्यांच्यावरही बोटांचे ठसे सांपडले. ’

‘दोन ग्लासांवरील ठशांशी विळयावरील ठसे जुळतात का? ’

चारूदत्त विचारात गढला. कदमनं त्याला डिस्टर्ब केलं नाही. सिगारेट ओढत त्याच्या बोलण्याची वाट पहात राहीले. त्याला पुरेसा वेळ देऊन कदम म्हणाले,

‘कदाचित् त्यांच्या सोबत दारू पिणाऱ्यांनीच त्यांच्यावर वार केला. खुनात ते दोघे सामिल होते की एकटयानेच हे कृत्य केल हे आत्ताच सांगता येणार नाही. ग्लासांवरील ठसे कुणाचे आहेत हे समजलं तर आपण खुनी माणसाला पकडण्यात यशस्वी होऊ. नाही का? ’

‘खुनाच्या केसमध्ये एकदम निर्णयाला येणं योग्य नाही. ज्याचे ठसे आहेत त्याचे म्हणणे ऐकुन शहानिशा करावा लागेल. अजून? ’

‘अरविंदाचा मोबाईल, त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने, गायब आहेत. खाजगीतली माहीती अशी आहे की काल ते पक्ष कार्यालयात गेले होते, तेव्हा त्यांना निवडणूक खर्चासाठी पैसे देण्यांत आले होते. पाच लक्ष रूपये. झडतीत तेही सांपडले नाही. ’

चारूदत्तने बोटांनी टेबलावर ठेका धरला.

‘मग तर मोटीव्ह पण साफ आहे. हा खुन चोरीच्या प्रयत्न्यात झाला असला पाहीजे. पण मोबाईलचं काय झालं? कुणी त्यांचा मोबाईल कशासाठी घेईल? मोबाईल ट्रेसआऊट करण्याचा प्रयत्न करा. बाय दे वे, ही सुमनबाई कोण आहे? ’

‘सुमन, ’ कदम हसले, ‘सुमनच्या अंगात देवी येते असा गांवातल्या लोकांचा समज आहे. मंगळवारी आणि शुक्रवारी तिच्या अंगात देवीचा संचार होतो. गावकरी आपल्या समस्या घेऊन तिच्याकडे जातात. ’

‘ते ठिक आहे, पण तिच्याबद्दल डिपार्टमेंटचं काय मत आहे? ’

‘एकटं राहणाऱ्या बाईबद्दल गांवात चांगलं बोललं जात नाही. तिच्या चारित्र्याचा संशय घेऊन नवऱ्याने तिला घराबाहेर काढलं. म्हणून ती भावाच्या आसऱ्याला आली. वहीनीने तिला आपल्या घरात ठेवण्यास नकार दिला. तेव्हा त्याने तिची शेतावर, आपल्या झोपडी समोर झोपडी बांधुन, रहाण्याची सोय करून दिली. शेतमजुरी करून ती गुजराण करते. देवीला सांकडं घालणारे काहीतरी देतात. मनजीत आणि तिच्याबद्दल बोलले जाते. ’

‘हा मनजीत कोण आहे? कुठला आहे? ’

‘बँकेत काम करतो. तो पंजाबचा राहणारा आहे. नोकरी निमित्तानं इथं आला. ’

‘इतक्या लांब? ’

‘नोकरी आहे. ’

‘नोकरी! पंजाबला बँका नाहीत? ’

‘त्याने महाराष्ट्रातून परिक्षा दिली होती , म्हणे. ’

‘मला वाटलं हा फक्त मेट्रो सिटी पुरताच प्रश्न आहे. असो, त्याचा या केसशी काय संबंध? ’

‘अरविंदाचे प्रेत शोधणाऱ्या टोळी बरोबर तो होता. बाकी त्याचा तसा काही संबंध असेल असं वाटत नाही. ’

‘अरविंदा कुठे आहे, ते सुमनला कसं कळले ? ’

‘त्याची चौकशी करण्यासाठी मी ठाणे अंमलदराला तिच्याकडे पाठविले आहे. ’

चारूदत्तची भुवई वर गेली. ते खालच्या सुरात म्हणाले, 'ती आपली खबरी म्हणून काम करते. आणि शिवाय... . ' बोलावे की नाही या विचाराने ते थांबले.

'शिवाय काय? '

'आमच्या हवालदाराला तिला भेटायला आवडते. ' डोळे मिचकावीत ते म्हणाले.

'ओह् आय सी. तिचा यात सहभाग असण्याची शक्यता ... ... ? '

'नाही. फक्त तिला अरविंदाबद्दल कसे समजले? तिला अजून काय माहीती आहे? ते विचारायला गेला. हा पहा आलाच. ' दारातून बाहेर पहात ते म्हणाले. चारूदत्तने वळून पाहीले. नारायण फाटकातून आंत येत होता.

'काय म्हणते सुमन? ' तो आंत येताच मिस्किलपणे कदमने विचारले. नारायणच्या चेहऱ्यावर लाजरी चमक येऊन गेली. लगेच तो गंभीर झाला.

'काही माहीत नाही म्हणते. ' तो गप्प बसला.

'पण तुम्हाला ते पटलं नाही. '

'नाही. तिच्या बोलण्यानं माझं समाधान झालं नाही, आणि तिचं वागणं आवडलं नाही. मला तिची काळजी वाटते साहेब, '

'का? '

'खुनाबद्दल तिला काहीतरी माहीती आहे. ती लपवते. लपवण्यामागे तिचा हेतू जर चांगला नसेल... . . '

'चांगला नसेल म्हणजे? '

'समजा तिचा खुनीला ब्लॅकमेल करण्याचा विचार असेल. '

'ती असं करू शकते? ' चारूदत्तने कदमकडे पहात विचारले.

'शक्यता नाकारता येत नाही. ' त्यांनी खांदे उडवून उत्तर दिले,

संभाषणाचा ओघ पुन्हा आपल्याकडे वळवित नारायण म्हणाला, ‘खुन्याला जर समजले की तिला आपले गुपीत कळाले तर? जीवाला धोका होऊ शकतो ना? ’

‘तिनं तो स्वीकारला म्हणजे तिला कॉन्फिडन्स असला पाहीजे. सध्या  तिच्यावर पाळत ठेवा. आपल्याला अजून त्या लोकांच्या जबानी घ्यायच्या आहेत. तुम्ही कधी वेळ देऊ शकता? सर... . . ’

‘अं? ’ चारूदत्त भानावर आला. ‘हो... ते जबानीचं म्हणता ना? येस. कदम माझी एक आयडीया आहे. सुमनला जर अरविंदाचे प्रेत कुठं आहे ते समजू शकतं, तर खुनी कोण आहे तेही माहीत असणार. ’

‘माहीत असतं तर तिने त्या दिवशीच सांगीतलं नसतं कां? ’

‘त्या दिवशी तिला कुणी तसं विचारलं नाही. ’ तिला विचारलं, अरविंदा कुठं आहे ? आज शुक्रवार आहे ना, आज आपण तिला विचारू. ’

‘काय? ’

‘अरविंदाचा खून कुणी केला? ’

*****

दोन्ही हातांनी कुऱ्हाड डोक्यावर उंच नेऊन तिने शक्तिनिशी वार केला, त्याच वेळी तिच्या तोंडून हं! असा जोरदार हूंकर  चारूदत्तला स्पष्ट ऐकू आला. पाया खाली दाबून धरलेल्या सुक्या लाकडाच्या ओंडक्यात कुऱ्हाडीचं पातं तीन इंच घुसलं. तिने झटक्यात कुऱ्हाड उपसली. दुसरा घाव घालण्यासाठी पुन्हा हात उंचावण्या आधी चारूदत्तने आवाज दिला,

‘सुमनबाई. ’ एका हातात कुऱ्हाड धरून ती वळली.

तिचा मुळचा गोरा रंग उन्हात काम करून ताम्रवर्णी झाला होता. कपाळावर भले मोठे कुंकू लावले होते. तिचा चेहरा आकर्षक होता. नाक उंच आणि सरळ होते. ओठ आवळलेले असल्याने नुसती रेष

दिसत होती. पदर खांद्यावरून खोचल्याने छातीचे उभार ठळक दिसत होते. हिरव्या नऊवारी पातळाचा ओच्या खोचलेला असल्याने गुडघ्यापर्यंत पाय उघडे होते . त्याला पाहून तिने उंचावलेल्या भुवया  आणि हाततल्या कुऱ्हाडीमुळे तिचा आवेश एखाद्या रणमर्दीनीसारखा दिसत होता.

‘मी चारूदत्त. भाऊंचा पाहूणा. ’

आवळलेले ओठ मोकळे झाले. डोळे अविश्वासाने मोठे झाले. हातातली कुऱ्हाड एका हाताने समोरच्या लाकडावर खोचून ठेवली. ओचा सोडून नऊवारी सरळ केली. पदर मोकळा करून आदबशीर डोक्यावरून घेतला. मर्दानी आवेशातली सुमन एकदम आदबशिर दिसू लागली.

‘या ना. कसं काय येनं केलं? ’

‘जरा बोलायचं होतं तुमच्याशी? ’

‘मह्याशी? ’ ती आश्चर्याने म्हणाली.

‘कदमसाहेबांना भेटून आलो. ते म्हणाले, सुमनबाई आपल्याला मदत करीत असतात. ’

ती त्याचं बोलणं न ऐकल्यासारखी  गप्प बसली.

‘अरविंदभाऊंचा खुनी शोधायला त्यांनी माझी मदत मागीतली, ’ तो  म्हणाला, ‘मी पण पोलिसांत काम करतो. मुंबईला. ’

‘है हाट... ’  लांबदोरीला बांधलेल्या ढेरपोटी बकरीला ती ओरडली. मग त्याच्याकडे पाहून हसून म्हणाली, ‘मला बोलीलं असतं तर आले असते. तुम्ही कह्या पायी इतलोक आला? ’

‘हुषार आहे. ’ तो मनांत म्हणाला. ‘चेहऱ्यावरील भाव सहजतेने लपविते. ’

‘नारायण म्हणाला, मी बोलावून आणतो. पण म्हटलं आपणच जाऊन येऊ. फिरणं होईल आणि मोकळ्या वातावरणात जरा मोकळं बोलता येईल. ’

‘बसा. ’ झोपडी समोरच्या ओटीवर गोधडी अंथरून बसण्याचा इशारा केला.

गोधडीवर बसून त्याने सभोवार नजर फिरवीली. समोरच्या पिंपळावर एक सुतारपक्षी टक टक करत होता. बाजूला कडब्यांची सुडी रचून ठेवली होती. झोपडी बांबूच्या वाश्यांवर सनकाडया आणि पाचट टाकून बनवलेली होती. ओटी वरील भागात, हाताने काढता येईल असा वाश्यात अडकवलेला एक हिरव्या रंगाचा डबा दिसला. कुतुहलाने त्याने विचारले,

‘तो कसला डबा आहे? ’

‘यन्ड्रीनचा. कापसावर फवारावं लागतं ना. ’

‘इथं का ठेवला? ’

‘ त्यो मह्या भावानं ठेवला. पोरसोराच्या हाती लागू नै म्हून. इशारी ऱ्हातना. काम पल्डं की इथून घ्युन जातो. पुन्ना आनून ठयूवतो. मह्या कडं कोन हात लावनार? ’

तिच्या आवाजातली सल त्याला जाणवली. विषय बदलत ती म्हणाली,

‘चा घेनार का? ’

‘चहा नको. तुम्ही पण बसा. मला तुमच्याशी महत्वाचं बोलायचं आहे. लाकडात खोलवर रूतलेल्या कुऱ्हाडीकडे त्याची नजर गेली.

‘ते, लाकडं संपली. महा भाऊ देतो फोडून पर आज जरा बझाराला जायेल हे. म्हून म्याच फोडीत होते जरासे दुपारच्या सयपाका पुरते. ’

‘नामदेवचा मळा ना हा? ’

‘हौ. महा भाऊच हाय ना त्यो. ’

‘मी लहानपणी आल्याचं आठवतं. इथे जांभळाचं झाड होतं का? ‘

‘व्हतं. तोल्डं. तवाच. ’

‘तुम्ही उभ्या का ? बसा. ’

ती ओटीच्याकडेला अवघडून बसली.

‘तुमच्या अंगात खरंच देवी येते का? ’

‘लोक म्हन्त्यात. तवा मला त काही कळत न्हाई. तुमच्या शहरी लोकांचा इस्वास नसंन.

‘तुमच्याअंगात देवी येते, तेव्हा तुम्ही कुठे जाता? ’

‘म्हंजी? म्या कुठ जानार? ’

‘देवी आणि तुम्ही एकाचवेळी देहात राहता का? ’ तिला प्रश्नच कळला नसावा. चारूदत्तने विचार करून पुन्हा प्रश्न केला.

‘समजा, कुणी प्रश्न विचारला तर तो तुम्ही देवीला सांगता, देवी तुम्हाला उत्तर देते, मग तुम्ही प्रश्न विचारणाऱ्याला उत्तर देता की प्रश्न देवीच ऐकते, उत्तर देवीच देते? ’

‘ते मस्नी न्हाय सांगता येनार. माह्या तोंडातून देवी बोलते. ’

‘अरविंदाचा खुनी कोण हे पण देवी सांगू शकेल? आज, शुक्रवारी, देवी येते ना? आजच्या दरबारात पोलिस खुनी सांपडावा म्हणून सांकड घालायला येणार आहे. ’

तिने जोरात श्वास घेऊन छातीवर हात ठेवला. काही वेळ ती तशीच मुर्तिवत स्थिरावली, हळुच तिच्या चेहऱ्यावर हसू पांगले.

‘ देवीच्या सांगन्यानं  काय हुतं? इस्वास पायजे. पोलिसांना त सबुत बी लागतो. ’

‘देवीला सवाल विचारला,  तर ती उत्तर देईल? ’

‘ते म्या कस सांगू ? पर देवीची परिक्षा घ्यु नै. ’

‘मला देवीची परिक्षा घ्यायची नाही अन् तुमची परिक्षा घ्यायची नाही. मला फक्त अरविंदाच्या खुन्याला जाळ्यात पकडायचं. त्यासाठी मला तुमची मदत हवी. ’

‘माही? ’ विनोद ऐकावा तशी ती हसली. एकाएकी तिचा चेहरा कठोर झाला.

‘त्याच्या खुन करणाऱ्यानं मह्यावर उपकार केले. त्याला पकडून देऊ म्हंता. ’

‘म्हणजे? त्याच्या खुनाने तुला आनंद झाला? ’ त्याने आश्चर्याने विचारले.

‘आनंद? लय जीवाला सुकुन पडला. महा आत्माच शांत झाला लगी. व्हय! व्हय! तुमी ह्या गावचं न्हाई म्हून तुमाला मह बोल्नं वाईट लागल, पर समद्या गावास्नी ठाव हाय त्यो मह्या संग कसा वैऱ्यावानी वागला. खंर तर म्याच त्याला जित्ता मारायला पाहीजे व्हता, पर हिम्मत झाली न्हाय. पर महा तळतळाट वाया गेला न्हाई बरं. किडे मुंग्या लागल्या त्याच्या मढयाला. ’

तिच्या शब्दाशब्दातून विखार, तिरस्कार बाहेर पडत होता.

‘सोयरीकीच्या कामाला आला व्हता ना? ’ त्याने मान डोलावली, ‘आलं की न्हाय इघ्न? त्येन महा संसार मोल्डा तसा त्याच्या लेकीचा मोडू ने. पर जीवाची कळकळ कधी वाया जात न्हाई. मेल्या कातडयाच्या धाय्- धायनं लोखंड पिघळत मग जीत्त्या जीवाची धाय लागनारच ना! मी न्हाय बोल्ले कधी तोंडानी पर महा जीव कळवळला आसनंच ना. त्याचं करम त्याच्या फुढं उभारलं. ’

‘एव्हढं  काय झालं  सुमनबाई? अरविंदाने केलं तरी काय? ’

‘काय केलं? मह्या जल्माचं वाटोळं केलं. तेच्या पायी महा संसार मोल्डा. महा बाप हाय खाऊन गेला. दादला असून असं भावाच्या दारात लाचारीनं वनवास्यासारखं ऱ्हावं लागतं. ईस वरसं उलटून गेली त्येला. पाच कोसावर दौलतवाडी मव्हं सासर हाय. घरी शेतीवाडी, जमिन जुमला, गांवात चौपासी वाडा. समदं बघून दिल्त मह्या बापानं. पर हा मेला माह्यामागेच पल्डा. मह्या बापाला धमकवलं. लगीन करतो म्हन्ला दुसरी बायको हो. आता दुसरेपनाची बाईल म्हंजी ठेवेल बाईच की. मला न्हाय आवल्ड. तेच्यात न मह्यात अंतर किती? इस वर्षाचं. तवा मी यशोदाबाईला भेटले. त्यांच्या हातापाय पडले. तू मला भैनी वानी. मला त्येच्या तावडीतून सोडीव. तिच्या हातापाया पल्डे. पर काय उपेग झाला न्हाई बगा. ती म्हन्ली, मी पल्डे बाई मानूस. मव्ह काय चाल्तं बाई, तू आन् तुह नशिब. ’

त्यो रस्ता बंद झालेला पाहून बापानी रातोरात मला गावातून हालवलं. एखाद्या अनाथ पोरीवानी परक्या गावी देवळात लगीन झालं.

पर त्येन सुखान नांदू दिलं न्हाई. मह्या घरी यून काही बाही सांगत ऱ्हाई. सासू सासऱ्याचं कान भरलं. नवऱ्याच्या मनांत संशय भरला. एकदीस सासरच्या लोकांनी भर दुपारला उपासी तापासी

नेसत्या कपडयावर घराच्या बाहेर काढलं. दोन दिस मी तेंच्या घराबाहेर भिकाऱ्या वानी बसून होते. ना पोटात अन्नाचा कण ना पान्याचा घोट. कुनी तरी बापाला सांगावा दिला. त्यो तसाच धावत आला. मही हालत पाहून मला मिठी मारून ढसाढसा रडला.

रागाने सासऱ्याच्या दारात जाऊन थुकला आन् म्हन्ला, ' माह्या सीते वानी पोरीला बोल लावला. तुमच्या वाडयाचा उकीरडा हुईल. आता दाती गवत धरून आला तरी लेकी पाठवनार नाही. वाघावानी डरकाळी फोडून बा मला परत घेऊन आला, पर त्याने हाय खाल्ली. त्यो गेलाच. त्याच्या जान्यानं गांवातल्या लोकास्नी त लई जोर चढला. राती बेराती खोपीबाहेर पोरं सोरं यायची. अभ्रा-गभ्रा बोलायची... . रस्त्यातून चालले त अरविंदाच्या नावानं हाक मारायची. जीवाची परवड... परवड, दैना झाली. जीव नकोसा झाला लगी. अरविंदा यायचा. कवा त्येचा निरोप घेऊन कुनी- बीनी येयचा. मी बी वाघावानी हाटले न्हाय. कमरला इळा खुपसून फिरायचे.

मह्या भावानं लई साथ दिली पर त्याचं घरवाली पुढं चालना. ती म्हायरी गेली. म्हन्ली सुमन ऱ्हाईल  न्हाईतर म्या ऱ्हाईल. तेचा संसार मोडायची येळ आली तवा म्या म्हन्ल मला इथंच शेतात खोपी बांधुन दे. तुह्या नदर समोर ऱ्हाईल, मोलमजुरी करून खाईल. तुला वझं देनार न्हाई. तवापासून झोपडी बांधुन इथं ऱ्हाते. कंटाळून अरविंदानं  नाद सोडून दिला. पर मह संसार मोल्डा तो मोल्डा. लई हौस व्हती पघा संसाराची, पोराबाळाची. '

'तुझा नवरा कधी आला नाही तुला विचारायला? '

'आल्ता. चुकल म्हन्ला. मापी कर म्हन्ला. समद इसरून परत ये म्हन्ला. '

'मग? '

'बापाचा सबुद मोडून परत जाते व्हय म्या. हाट! ' तोंड बाजूला करून ती थुंकली.

'त्यांच्याशी सोयर संबंध जुळवायला आल्ते ना तुम्ही? ' आरोप करावा तसं तिने  विचारले. त्याने फक्त मान हालवली. 'करू नका. यखादी गरीबाची पोर बघा. तुमचा संसार धडाचा व्हुईल. बाप मही बदनामी करायचा पर देवानी त्याच्या समोर तेच वाढून ठेवलं. आपन कह्याला बोला, गावभर पोरीची छीःथू होऊन राहीली. '

‘का? काय केलं तिनं? ’

त्याचा प्रश्न ऐकून आपण काय बोललो याची तिला जाणिव झाली. दोन्ही गालवर हात आपटून ती म्हणाली,

‘मह्या तोंडून नको पाप बाप्पा. लई भोगलं. ज्याचं तो भोगीन, बोलून आपल तोंड का वंगाळ करा? तुमी खुनाच्या चौकशीला आल्ते नव्हं? तिने गाडी मुळ विषयावर आणली. ’

‘खुनाचं काय बोलायचं तुम्ही काहीच मदत करायला तयार नाही. खुनी पकडायला नाही आणि वैशालीबद्दल काही सांगत नाही. ’

‘खुनी पकडायला काय करनं पडन? ’

‘आज संध्याकाळी पोलिस तुम्हाला विचारायला येतील, अरविंदाचा खुनी कोण? तुम्ही सांगा, खुनी गांवातच आहे. स्वताः होऊन पुढं ये नाहीतर मंगळवारी त्याचं नाव जाहीर करील. ’

‘खुनी हाय त्यो. यव्हढया बोलन्यानं म्होरं यील? ’

‘कुणास ठाऊक. तो तुम्हाला भेटून अंदाज घेण्याचा प्रयत्न करील. तुम्हाला बोलू नको म्हणून धमकावयाला येईल. ’

‘म्या बोलू न्हाय म्हून गळाबी दाबन महा. ’

‘तुम्ही घाबरू नका. तुझ्या आजुबाजूला एखादा पोलिस राहील. काही गडबड वाटली तर लगेच त्याला आवाज द्या. कराल? जमेल तुम्हाला? बघा. जबरदस्ती नाही. तुम्हाला काही होणार नाही याची हमी मी देतो. ’

ती पायाच्या अंगठयाने माती उकरू लागली. अचानक तिच्या मनांत खोडकर विचार आला आणि तिच्या विचारमग्न चेहऱ्यावर स्मीतरेषा उमटली.

‘ बरं. तुमी म्हनशान ते करीन. ’

‘धन्यवाद. मी तुमच्या निगराणीला एका शिपायाची व्यवस्था करतो. ’

‘काय जरूर नाय. मही मी समर्थ हाय. गांवात कुनाची हिम्मत नाय माझ्या वाटेला जायाची. एका टोल्यात पानी पाजीन. ’ हाताचा बोटांची उघडझाप करीत ती म्हणाली. ‘पर म्या अरविंदाचा खुन केला नाही. ’ त्याच्या मनांतले विचार ओळखल्यागत ती म्हणाली.

‘मी तसं म्हणत नाही. पण सुमनबाई, मला वाटतं कुणी खुन केला हे तुम्हाला माहीती आहे, निदान तुम्हाला तसा संशय तरी आहे पण तुम्ही तो बोलून दाखवत नाही. असं करू नका. जर खुनीला समजलं तुम्हाला त्याचा संशय आला तर तुमच्या जीवाला धोका आहे. ’

तिने उजव्या हाताची बोटं झटकली.

तिच्या दणकट मनगटाकडे पाहून त्याच्या मनांत विचार आला, ही सहजगत्या विळयाचा घाव घालू शकते. अगदी विळयाचं टोक ह्यदयाला भिडेल इतक्या खोलवर. तेव्हढी तिच्यात शक्ति आहे आणि अरविंदा विषयीचा व्देषही आहे. हीनेच तर त्याचा खुन केला नसेल? म्हणून तर तिला खुनी माणसाची भीती  वाटत नाही. त्यानं तिच्याकडे पाहीलं,

ती लाकडात खुपसलेल्या कुऱ्हाडीकडे पहात होती. तिच्या चेहऱ्यावर गूढ स्मित होतं.

# प्रकरण ६

‘द्राक्षांचं सांगतो तुला, अतिशय सेंन्सेटीव्ह पीक आहे. ’

द्राक्षाच्या वेलीचा एक घड हातात घेऊन निरिक्षण करीत राजशेखर बाजूला उभा असलेल्या चारूदत्तला म्हणाला.

चारूदत्तने होकार भरला. त्याचा द्राक्षाशी खाण्या पुरता संबंध होता. शेतातले द्राक्ष तो प्रथमच पहात होता. बांबू आणि तारांनी उभारलेल्या मांडवावर पसरलेल्या वेलीतून  हिंडतांना त्याला गंमत वाटत होती. आपल्याला मुंबईत जी द्राक्षं मिळतात ती इथून येतात, तर.

‘ बघ, इथं प्रॉब्लेम आहे. जरा इकडे तिकडे झालं की वर्षभराची मेहनत आणि पैसा वाया गेलाच म्हणून समज. भुरी, केवडा, किरपा आणि आळी यांच्याकडे लक्ष द्यावं लागतं. हे पहा, असे दोन शेंडे फुटले ना वेलीला, ’ त्याने एका वेलीचे टोक हातात धरून त्याच्या पुढे धरले.  ते पान इंग्रजी वाय अक्षराप्रमाणे वाढले होते. ‘याचा एकच शेंडा खुडायचा,  दुसरा, दोरीला बांधुन मंडपावर चढवायचा. ’

बोलतांना तो कृति पण करीत होता.

‘याला खुप पाणी लागते काय रे? ’

‘हो. आणि वीजेची कायम बोंब. रात्री- बेरात्री वीजेच्या शेडयुलप्रमाणे थंडी वाऱ्याचं पाणी भरायला यावं लागतं. ’

‘गडीमाणसं नाहीत? ’

‘गडीमाणसं? त्यांना बैलासारखं  हाकलावं लागतं. आपण उठवायला आलो नाही तर खुशाल झोपून जातात. विचारलं तर सांगतात, काय करू भाऊ लगी जागंच आली नाही. त्यांना  धाक उरला नाही. नुकसान आपलंच होतं. घरी झोपायचं ते इथ मळ्यात येऊन पडावं. ’

‘तू येतोस? ’ चारूदत्तने कौतुकाने विचारले.

‘येतो कधी कधी. भाऊच जास्त वेळा येतात. मी निघालो की म्हणतात, तुम्ही घरी रहा. तुम्हाला काय कळणार शेतात, काही झालं तर मला विचारायला येणार, ‘ भाऊ काय करू ? ’ मीच जातो. आणि कमी- अधिक झालं की आईकडे ओरडणार गधडयाचं लक्ष नाही. शेतावर जायचं तर घरी झोपा काढत बसता. अश्यानं का शेती होणार आहे? मी काय मक्ता घेतला का? ’

भाऊंची नक्कल करीत तो हंसला.

‘खरं आहे रे. त्यांना या वयात थंडी वाऱ्यात... ’

चारूदत्त सिरियली बोलत होता पण राजशेखरच्या हसण्याने तो थांबला.

‘त्यांना सवय आहे. रात्री मी शेतावर निघालो, की कपडे चढवून निघेपर्यंत काही बोलत नाही. दरवाजाशी गेलो की विचारतील, ‘कुठे? शेतावर तुम्ही कशाला जायला हवं? तुम्हाला पोरगा होईल, तो तरूण होईल, तेव्हा जात जा. राहू द्या तुम्ही तुम्हाला काय कळतं? मीच जातो. ’

दोघंही एका सुरात हसले.

‘ राजशेखर, काल भाऊ मला म्हणत होते, अरविंदाकाकांच्या खुना तपास तू कर. ’ त्याच्या चेहऱ्यावर नजर रोखुन चारूदत्त म्हणाला.

त्याच्या भुवया उंचावल्या, ओठ वाकडे झाले,

‘भाऊ म्हणाले? तुला? कमाल आहे. ’

‘का? कमाल कसली? अरविंदाकाका त्यांचे सख्खे भाऊ. त्यांना वाटणारच ना. ’

‘त्यांना आयुष्यभर त्यांचच वाटत आलं. ते गेले, वाईट झालं, गेलेल्या माणसाबद्दल वाईट बोलू नये. काकांनी आम्हाला जीव लागला, पण स्वार्थ आला, तेव्हा प्रत्येक वेळी आमचा हक्क डावलून स्वताःच्या पोळीवर तुप ओतून घेतले. मला असे अनेक प्रसंग आठवतात. तुला सांगायला हरकत नाही, अरविंदाकाकांचं वागणं काही चांगलं नव्हतं. त्यांच्या वागण्याचा गांवातल्या लोकांना त्रास व्हायचा. भाऊंकडे पाहून ते गप्प बसत नाहीतर केव्हाच त्यांना लोकांनी घरी बसवलं असतं.

‘वागणं चांगलं नव्हतं म्हणजे? ’

‘अहंकार. प्रत्येक गोष्टीत अहंकार. आपली सत्ता आणि संपत्तीचं प्रदर्शन करून समोरच्याला प्रभावित करण्याची हौस. त्यांना कुणी विरोध केला तर ते त्याच्यामागे हात धुवून लागत. त्यांचा खून झाला याचे मला काही आश्चर्य वाटत नाही. ’

‘तुमचा हक्क डावलला म्हणजे? ’

‘तुला कसं सांगू? मला सांग, बाबाजीचा मोठा मुलगा भाऊ. वारसाप्रमाणे त्यांना मोठेपण मिळायला हवं होतं की नाही? काकांनी प्रत्येक वेळी हट्टानं त्यांना हवं ते मिळवलं. आमचे भाऊ म्हणजे... . त्यांना लहानभावाबद्दल इतकी माया की कधी त्यांनी माझाही इतका विचार केला नाही. अरविंदा म्हटले की, ते  विरघळून जात. तितकेच काका व्यवहारी. त्यांनी गढी मागीतली ह्यांनी दिली, त्यांनी वाटणीत चांगले मळे मागितले, ह्यांनी दिले, शाळा, कारखाना सोसायटी एव्हढंच नव्हेतर सरपंच सुध्दा त्यांच्या पॅनलचा आहे.  वाऱ्याचा रोख लक्षांत घेऊन काकांनी नव्या पक्षात प्रवेश केला. भाऊ आपले बसले,  निष्ठा सांभाळत. शिक्षण संस्था बाबाजींनी उभी केली. आज तिच्यावर काकांचा अधिकार चालतो. डायरेक्टर बोर्डावर त्यांचं वर्चस्व आहे. शिक्षणक्षेत्रातले सगळे शुभसंकेत त्यांनी खुर्चीखाली पालथे घातले. शिक्षक भरतीचं आमिष दाखवून तर इतक्या लोकांकडून पैसे घेऊन ठेवले, की शिक्षकांच्या पाच पिढया संपल्या तरी भरती संपणार नाही. त्यांच्यातल्या कुणीतरी... ... ’

तो गप्प झाला. त्याने  वेलीचं पान कटकन् तोडून भिरकावलं.

‘तुझा कुणावर संशय? ’ तो शांत झाल्यावर चारूदत्तने विचारले.

राजशेखरने डोळे बारीक करून चारूदत्तकडे पाहीले. तो एकटक त्याच्याकडे पाहत होता.

‘चारूदत्त, तू पाहूणा आहेस. गांवातलं राजकारण तुला समजणार नाही. भाऊंचं बोलणं विसरून जा. तुला हवं तेव्हढे दिवस रहा. ह्या भानगडीत पडू नको. ’

‘तुला नाही वाटत त्यांचा खुन्याला शिक्षा व्हावी? ’

‘खरं तर तसं वाटायला हवं. पण नाही वाटत. एका अर्थाने खुनीने आमच्यावर उपकार केला. त्यांनी एव्हढी प्रकरणं करून ठेवली, एव्हढा पैसा जमवला की, त्यांची सत्ता गेल्यावर जर विरोधकांनी

वेठीस धरले तर त्यांना तुरूंगात जावे लागले असते. त्या नामुष्कीपेक्षा हे बरे. शोकसभेला पाहीलंसना लोक किती तारिफ करीत होते. दिवस पालटले असते तर ह्याच लोकांनी त्यांची अवहेलना केली असती. वेलीची हेल्दी वाढ होण्यासाठी अनावश्यक, ताण कठोरपणे छाटावे लागतात. त्याच्यावर दया केली तर निरोगी झाडाचा विनाश होतो. पिकाचं नुकसान होते. '

'मी नाही तपास केला, तरी पोलीस खुन्याला शोधुन काढतीलच ना? '

' खुनीचं नशिब. त्याला आपण काय करणार? '

'वैशालीला तसं वाटत नाही. '

त्याची भुवई वर गेली. 'वैशालीचा काय संबंध? '

'तिने सुध्दा मला खुनाचा तपास लावण्याची विनंती केली. ' राजशेखरचे भाव न्याहळत चारूदत्त म्हणाला. 'तिला भीती वाटते की त्यांचा खुन आपल्यापैकी, म्हणजे तुमच्या घरातल्यापैकी, कुणीतरी केला. पोलिसांच्या आधी जर ते आपल्याला कळाले तर त्याला वांचविण्याचा प्रयत्न करता येईल, असं तिचं म्हणणं आहे. '

'लहानपणापासून ती भावंडाबद्दल हळवी आहे. लहाणपणी आमच्यावर ओरडा खायचा किंवा मार खाण्याचा प्रसंग आला तर ती आम्हाला वांचविण्या करीता खोटंही बोलायची. ती कधी बोलली तुला? '

'तुम्ही सगळे शोकसभेत अडकला होता, तेंव्हा मी गढीवर गेलो होतो. राजशेखर, मला तू खरं सांग. तुझा त्यांच्या खुनाशी काही संबंध तर नाही ना? '

'माझा! ' त्याने चकीत होऊन विचारले, 'चारूदत्तच्या बोलण्याचा अर्थ त्याला उमगल्यावर तो खो खो हसू लागला. 'ओह् माय गॉड. असं आहे तर. तिला वाटते काकांच्या खुनात माझा हात आहे. वेडीच आहे. मला वाटले ती रणजीतबद्दल बोलते. '

'रणजीत? छे! तो तर त्यांचा मुलगा आहे ना? '

'नुसता घरात वाढवला म्हणजे कुणी मुलगा होत नसतो. '

‘म्हणजे? रणजीत काकांचा मुलगा नाही? ’

‘नाही. काकांना खुप दिवस मुलबाळ होत नव्हतं म्हणून त्यांनी रणजीतला दत्तक घेतलं. नंतर वैशालीचा जन्म झाला. त्याच्या आगमनानंतर काकूला मुल झाल्याने तो दोघांचा लाडका झाला. आपण दत्तकपुत्र आहोत हे त्यालाही माहीत आहे. तिला त्याचा नाही संशय आला? ’ त्याचा सुर दुखरा होता.

‘तुमच्या दोघांचे, भांडण तिच्या कानावर गेले होते. तू काकांना धमकी दिली होतीस म्हणून तिला वाटलं. ’

‘तिच तर खरी मेख आहे. तिकीटासाठी रणजीतही त्यांच्यामागे लागला होता. पण काका त्याचं नाव पुढे करणार नव्हते. एव्हढयांत त्याने राजकारणात येऊ नये असं त्यांचं मत होतं. तो त्यांना उघड विरोध करत नव्हता. कुणीतरी त्याच्या मनांत भरून दिलं की राजकारणांत असे अनेक उदाहरणं आहेत की, वडीलांच्या मृत्युनंतर जनतेत सहानुभूतिची लाट येते. त्याचा फायदा घेण्यासाठी पक्ष त्यांच्या मुलाला हमखास तिकीट देतं आणि ते निवडूनही येतात. ’

‘असं कुणी भरवून दिलं? ’

‘असतात गावांत कल्पनेचे पतंग उडविणारे. तुमच्या मनांत भलत्या गोष्टी भरवून देणारे. पण त्यांना किती बळी पडायचं ते आपण ठरवायला हवं. ’

‘ते तुला कसं कळलं? ’

तो छद्मी हसला. ’ राजकारणात तुम्ही स्वताःशी काय बोलला ते सुध्दा विरोधकांना माहीत होतं. म्हणून बोलतांना खुप काळजी घ्यावी लागते. त्याने घेतली नाही. ’

‘पण तो खून करू शकेल? ’

‘कुणास ठाऊक? सत्ता आणि संपत्ती माणसाचा अधःपात करते. ’

‘मला पटत नाही. कदाचित दुसरं कुणी. ’

‘दुसरं कोण? ’

‘तू म्हणालास ना आत्ता, त्यांचा कुणीही खुन करू शकतो. कदाचित सावकार... ... ? ’

‘सावकार? नाही. ’ मान हालवून विचार करीत तो म्हणाला, ‘सावकारात ती हिम्मत नाही. शिवाय इथली इस्टेट विकून ते कामयचे निघून जाण्याच्या तयारीत आहेत. एका प्रकरणातून सुटका करून घेण्याची त्यांची धडपड चालली. खुनाच्या प्रकणात ते कशाला पडतील? ’

‘सूड. बायकोची अवस्था पाहून त्यांना संताप येणं सहाजिक आहे. त्यांनी स्वताः केला नसेल पण कुणाकडून करविला असेल. ’

‘नाही. चारूदत्त, ज्याच्याकडे जे असतं त्याचा त्याला अभिमान असतो. ओढवलेल्या प्रसंगातून सुटण्यासाठी तो त्याचा सहारा घेतो. त्यांच्याकडे भरपूर पैसा आहे. बायकोने गांवात परतायला नकार दिल्या बरोबर त्यांनी शहरात बंगला खरेदी केला. तिच्या वर उत्तम इलाज करून ते तिला बरं करतील. नाही. सावकाराचा यात हात असेल असं मला वाटत नाही. ’

‘मग? ’

‘मी कसं सांगणार? ’ तो हसत म्हणाला. वैशालीची भीती निराधार आहे. चारूदत्त तिच्या आणि भाऊंच्या समाधानासाठी तू या खुनाची चौकशी कर. ’

त्याने मान हालवली.

‘मला सांग, तू त्या दिवशी काय करत होतास, पर्टीक्युलरली, रात्री आठ ते बाराच्या दरम्यान. ’

‘त्या दिवशी मी तालुक्याला गेलो होतो. तिकीटासाठी प्रयत्न करायला. कुणाला न सांगता. मला रात्री यायला उशीर झाला. ’

‘पण भाऊ तर... . ’

‘भाऊंना माहीत नाही. पार्टी झाली की मी मागच्या दाराने आंत जातो. फक्त रमाला माहीत आहे. ’

‘मी तुझ्यावर विश्वास ठेऊन तपास सुरू करतो. ’

‘बिनधास्त कर. ’ त्याने खांदे उडविले.

दोन्ही हात आकाशाकडे उंचावून नाटकीपणे  तो म्हणाला,

'देव तिला सत्य पचविण्याची शक्ति देवो! '

*******

'चारूभाऊss'

विचारांच्या तंद्रीत चालणाऱ्या चारूदत्तच्या कानांवर आवाज आला. त्याने वळून पाहीले, एक काळया रंगाचा, बुटकासा, स्थुल माणूस त्याच्यामागे धांवत येत होता. त्याच्या डोक्यावरचे केस विरळ झाले होते. जवळ येईपर्यंत त्याला दम लागला होता. त्याच्या मोठ्या डोळयात पिवळसर रंगाची छटा होती. जवळ येताच तो पांढरेशुभ्र दांत दाखवून हसला.

'कवाचा आवाज द्युन राहीलो. वळखीलं न्हाई का? ' त्याचा श्वास जोरात चालू होता. नंदू... आपन सोबत खेळाचो?

स्मरणशक्तिला जोर दिल्यावर आठवलं, एक काळसर मुलगा त्यांच्या सोबत खेळायला येत होता. दांडगा आणि चपळ. कोणत्याच खेळांत त्याच्यावर राज्य येत नसे. तो ज्या टिमकडून खेळे तिचा विजय निश्चित होता. चारूदत्त त्याच्याशी कुस्तीही खेळला होता. .

'हां... . अरे... नंदू... ! किती बदललास? ' त्याला जवळ ओढत तो म्हणाला, 'मी ओळखच नाही एकदम. मिश्या  एकदम झकास वाढविल्यास. तू तर एकदम मोठा माणूस दिसू लागलास आतापासून. काय करतोस? लग्न वगैरे झालं की नाही? '

'तू पोलिसांना मदत करून ऱ्हायला  म्हने? ' चारूदत्तच्या कोणत्याही प्रश्नाला उत्तर न देता एकादमात त्याने विचारले.

' कदमसाहेबांनी मला विचारलं खरं. 'नंदूने आधार सांपडल्यगत त्याचा हात  धरला.

'बरं झालं तू हैस. उद्या त्यांनी मला जबानी द्यायला बलावलं. मला त पोलिसांचं भ्या वाटतं. '

‘पहील्यांदा प्रेत सांपडले त्या चौघांत तू होतास काय? अरे मग त्यात एव्हढं काय घाबरायचं? पोलिस काय तुला खाणार आहे? साधी जबानी असते. तुला जे माहीत आहे, जे घडलं ते सांगायचं. बस्स. ’ सहजपणे म्हणाला.

‘बस्स? तुला बस्स वाटत रे. तुला ठाव न्हाय, ते नारायन लई चाप्टर हे. कशातून बी पैसं काढतं. हा त खुनाचा मामला है. ’

‘तू काही केलं नाहीस ना? ’ आरोप करीत असल्या प्रमाणं आवाजात जरब आणून चारूदत्तनं विचारलं.

‘छा! छा! म्या कह्याला काय करू भो. म्या आपला गावचा मामला म्हून ढुंडायला निघालो. मायला, त्यो नेमका आमास्नीच गावला. ’

‘तुम्ही कोण कोण होता? ’

‘म्या, मंजीत, प्रताप आन् रामेशर’

‘मला सांग, नीट विचार करून सांग, त्यांना शोधायला त्या मळयात जातो असं तुमच्यापैकी कोण म्हणालं की वाटणीत हा भाग तुमच्याकडे आला? ’

तो विचारात पडला.

‘प्रताप. प्रताप मला म्हन्ला का आपन बामनाच्या मळयात जाऊ. वाटेत त्याने रामेशरला बलावून घेतले. ’

‘रामेश्वर तुमच्या सोबत नव्हता? ’

‘न्हाय. तेला प्रतापनं फोन करुन बलील. ’

‘पुढे? ’

‘लाईन नव्हती. मंग आमी बॅट्र्या घ्युन निघलो. बँकेवरून जात व्हतो, मंजीत बँकेच्या पायऱ्यावर बसेल व्हता. त्यानं आवाज दिला. मंग त्यो बी संग आला.

'तो स्वताः होऊन आला की तुम्ही त्याला आग्रह केला? '

'आग्रह नाही केला. आधी त्यो येत न्हाई बोलला. पर मंग त्येलाच काय वाटलं कुनास ठाव, पर त्यो  तयार झाला.

'पुढे? '

'आमी मळ्यात गेलो तवा खोपीत अंधार व्हता. आमी इष्नूला आवाज दिला. इष्नू मंजी त्याचा सरकती. सरकती मंजे पार्टनर. कुणी ओ दिली न्हाई. मनजीतने दरोजावर बॅट्री टाकली. दरोजा उघडा वाटला. ढकलून पाहीला तर उघडला. मी म्हन्लो आपुन आंत जाऊन पाहू. मंजीत येत न्हाई म्हन्ला. त्येनं मह्या हातात बॅट्री दिली. मी, प्रताप आणि रामेशर आंत गेलो. आंत गेलो आन इज आली. आमाला बाजेवर पल्डेंले अरविंदाभाऊ दिसले. '

ते दृष्य त्याच्या डोळ्या समोर आलं असावं.

'नंदू, ते पाहील्यावर कुणी  काय केलं? नीट आठवून सांग. तू काय केलं? तुमची प्रतिक्रिया काय होती? म्हणजे तुम्ही काय केलं ते नाही विचारत, तुम्हाला काय वाटलं? '

'रामेश्वर वरडला -अरविंदाभाऊ...

प्रताप म्हन्ला, 'रामेशर, आता काय करायचं रे? '

'आणि तू? '

'मी? 'त्याने गोंधळून चारूदत्तकडे पाहीले. आपण काय केले त्याला आठवेना.

'काय की भौ. कसंतरी आमी भायेर गेलो. मंग रामेशर आन प्रताप तिठंच थांबले म्या आन मंजीत गांवात आलो. म्या स्टेशनात गेलो, मंजीत भाऊंना सांगाया गेला. तिठं तू बीन व्हतास. '

नंदू त्याच्याकडे काळजीच्या नजरेनं पहात होता. त्याच्या चेहऱ्यावरील टेंशन पाहून चारूदत्त त्याच्या पाठीवर थाप मारत जोरात हंसला.

‘इतकी कसली काळजी करतोस? तू काय खुन केलास कां. नाहीना? बस, मला सांगितले तशीच जबानी द्यायची. पण, ’ त्याचा आवाज अचानक कठोर झाला, ‘जर तू काही लपलंस तर मात्र, लक्षांत ठेव. ’

त्याचा बदलेला आवाज ऐकुन नंदू चरकला. पोलिसवाले ते पोलिसवाले. तो म्हणाला.

‘देवा शप्पत, एक शबुद बी खोटा न्हाय. ’ त्याने कंठाला हात लावला.

‘अच्छा नंदू, मला अजून एक सांग, ’ त्याच्या पाठीवर हात ठेऊन तो खाजगी आवाजात म्हणाला,

‘मित्र म्हणून तू माझ्याकडे इतकी चौकशी केली. आता मी तुला मित्र म्हणून विचारतो. वैशाली कशी आहे? ’

‘कशी हे मंजी? ’ गोंधळून त्याने विचारले. ‘ काम्हून इचारून ऱ्हायला? ’

‘खुप दिवसांनी भेटलो आम्ही दोघं. तिला पाहून मनांत आलं, सोयरसंबंध जुळला तर? म्हटलं मावशीकडे शब्द टाकायच्या आधी तुझा सल्ला घ्यावा. तू गावचा माणूस आहे. तुला आंतली माहीती असेल. ’

नंदूचा खुललेला चेहरा निस्तेज झाला. तो गोंधळात पडल्यासारखा उभा राहीला.

‘सांग ना. मावशीला बोलू की नको? ’

‘मायला! मोठा वांध्याचा सवाल इचारला. गावचा मामला पडतो. हाव म्हणावं त अडचन न्हाई म्हणावं तरी बी अडचन. ’

‘अडचण कसली? हे बघ, हे फक्त आपल्या दोघांत. तीसऱ्याला समजणार नाही. ’

नंदूची गोंधळलेली अवस्था पाहून तो म्हणाला, ‘देवा शप्पत. ’

त्याने कंठाला हात लावला. तसा नंदू हसला.

‘तुला म्हून सांगतो. पर माहं नाव घ्यु नको. गावाचा मामला हे. रोज तोंडावर तोंड पडतं. तिला मंजीतशी लगीन करायचं हाय. आदूगर बँकेत कामाच्या निमित्तानं ती त्याला भेटायला यायची. जव्हा

तिच्या घरी माहीत पडलं तव्हा पास्नं बँकेत येनं बंद झालं. पर त्यांच्या भेटी गाठी चालूच आहे. त्यांच्या घरात रोज झगडे होऊन ऱ्हायले. ती कुनाचं बी ऐकत न्हाई. लगीन करीन त मंजीतशीच म्हन्ते. तू नीट इचार करून ठरव. तुम्चा आपसातला मामला हाय. '

दोन्ही हाताचे पंजे छातीशी उभे धरून त्याने आपण ह्यातून अलिप्त असल्याचं सुचवलं.

चारूदत्तला वाटले, आपल्या तोंडावर कुणीतरी जबरदस्त ठोसा लगावला. छातीत कळ फिरली. मोठया प्रयत्न्यानं त्यानं चेहरा कोरा ठेवला. कसंनूसं हसत तो म्हणाला,

'तिच्या घरून कां विरोध आहे? मंजीत चांगला मुलगा नाही? '

'त्यो गंज चांगला है. पन त्येंचा न्हाई ना. त्यो पल्डा पंजाबी कसं जमल? ते दोघं काय बी म्हन्ले तरी बी त्येंचं लगीन काय हुनार नाय. तुह्या मनांत भरली असन तर बघ. पर काय मजा असं लगीन लावन्यात? '

विषय संपल्याप्रमाणे ते काही न बोलता उभे राहीले. पुढे बोलण्यासारखे काही नव्हत.

'चलतो. उद्या पोलिसस्टेशनला ये. काही काळजी करू नको मी आहे. '

'चारूदत्त, इत्त्या रोजानं भेटून राहीला. हे इचारायला तुला मीच भेटलो कां? '

'जाऊ दे यार! आपलं कुठं काय ठरलं थोडंच आहे. मनांत विचार आला म्हणून विचारलं. फार मनाला लावून घेऊ नकोस. '

तो नंदूला म्हणाला की स्वताःला ?

# प्रकरण ७

स्टिरींगला हलकासा झटका देऊन रणजीतनं इनोव्हा रस्त्याच्या कडेला घेवून झाडा खाली उभी केली. शेजारी बसलेल्या चारूदत्तकडे पाहून तो म्हणाला,

‘ही जागा मला आवडते. ’ तो खाली उतरला.

चारूदत्तला थंडीचं खाली उतरायला जीवावर आलं, पण तोही उतरला.

चारूदत्त बिछान्यातून उठलाही नव्हता तर त्याला खाली रणजीतचा आवाज ऐकू आला. तो सरळ बेडरूममध्ये आला. अंगावरचं पांघरून ओढून म्हणाला,

‘झोपलास काय? चल तुला सकाळचे सौंदर्य दाखवून आणतो. ’

त्याचं काहीएक न ऐकता, जेमतेम चहा पिऊन, त्यानं त्याला इनोव्हात बसवलं आणि गाडी गावाबाहेरील माळरानाच्या एका झाडाखाली उभी केली. चारूदत्त गाडीला पाठ टेकवून उगवत्या सूर्याकडे पहात होता. इतक्या सकाळी त्याला इथे घेऊन येण्यामागे रणजीतचा  काय हेतू असावा?

सकाळचे सात वाजले होते. सूर्याचे कोवळी किरणं गवतावरील दंवबिंदूवर पडून ते मोत्याप्रमाणे चमकत होते. सर्वत्र हिरवा उत्सव उसळला होता. रंग हिरवाच, पण किती विविध छटा. शेतांतल्या पिकांतून येणारा पाखरांचा आवाज आणि त्यांना हांकलण्यासाठी दिलेली  हाळी कानाला गोड वाटत होती.

सडकेवर दूरपर्यंत कोणतंही वहान दिसत नव्हतं.

किती नैसर्गिक, अनाघ्रात, शुध्द.

‘किती शांत न् प्रसन्न वाटतं नाही? रस्ते धड असते तर छान पिकनीक स्पॉट झाला असता. ’

‘इथले रस्ते खराब आहेत ते चांगलं आहे. शहरातल्या प्रदूषणापासून आम्ही अलिप्त आहोत. हसलांस का? ’

‘आजकाल प्रदुषणापासून कुणी वाचलेलं नाही. नदीची अवस्था बघितली? पुर्वी रस्त्याच्याकडेला कुणी बसलेलं दिसायचं? शिवाय व्हायरल, व्हर्च्युअल पोल्युशन कोण थांबवणार? इलेक्ट्रॉनिक मिडीयामुळे शहरात जे दिसतं ते तुमच्यापर्यंत आलेलं असतं. ’

‘तू म्हणतोस ते खरंय. पण सामाजिक विषयावर बोलण्यासाठी थंडीचं तुला इथं आणलं नाही. मला तुझ्याशी काही  खाजगी बोलायचं आहे. ’ रणजीत म्हणाला.

चारूदत्तनं त्याच्याकडे आश्चर्यानं पाहीलं.

‘मला जे बोलायचं ते आपण घरी बोलू शकत नाही. ’ तो म्हणाला, ‘घरांत कुणाचं निधन झालं तर किमान चौदा दिवस तरी शुभ कार्याबद्दल बोलता येत नाही. ’

‘जनरली आपण पाळतो. ’

‘खेडयात तरी पाळतो. शहराचं आयुष्यच वेगळं झालं. कुणाला एव्हढा वेळ नाही. खेडयांत लोक नाव ठेवतात. म्हणून म्हटलं गावाच्या बाहेर येऊन बोलावं. तू काही पंधरा दिवस रहाणार नाहीस. तेव्हा म्हटलं, परतायच्या आधी तुझ्याशी बोलून घ्यावं. ’

चारूदत्त गोंधळला. त्याला गम्मत  वाटली, भाऊंनी सावकाराचा, वैशालीने राजशेखरचा, राजशेखरने रणजीतचा आता हा खुनी म्हणून कुणाचा संशय घेणार आहे?

‘सांगना. ’ उघड तो म्हणाला,

‘चारू, तू वैशालीला पाहण्यासाठी आला होतास. मध्येच हा प्रकार झाला नसता तर, मला खात्री आहे, तू तिला पसंत केलं असतं. असतं की नाही? ’  त्याने विचारले.

त्याच्या सरळ प्रश्नाने चारूदत्त गोंधळला. त्याच्या गालावर लालीमा पाहून रणजीत हंसला.

‘जाऊदे, नको सांगुस. समजा तू तिला पसंत केलंस तर माझी विनंती आहे, की हे एव्हढे चौदा पंधरा दिवस उलटले की आपण पुन्हा हा कार्यक्रम ठेवू. तुला सुटी मिळणार नसेल तर मी तिला घेऊन मुंबईला येईल. चारू, मी तुला शब्द देतो, बाबांच्या माघारी मी तिच्या लग्नात त्यांची उणिव भासू देणार नाही. केवळ तेव्हढया करीता तू नाही म्हणू नको. तुझ्या सगळया अपेक्षा मी पूर्ण करील. ’

बाबांच्या आठवणीने त्याचा चेहरा रडवेला झाला.

चारूदत्तला त्याची दया आली, पण नंदूने सांगितलेलं त्याला आठवलं. वैशालीला मनजीतशी लग्न करायचं आहे. त्याच्या मनांत कडवट भावना भरून आली. त्याला काय बोलावे ते सुचेना.

‘बोल ना. ’ त्याने खांद्यावर हात ठेऊन हालवलं, तसा चारूदत्त भानावर आला.

‘पाहू ना नंतर... . . वेळ येईल तेव्हा. ’ त्याने गुळमुळीत उत्तर देऊन टाळण्याचा प्रयत्न केला.

‘तू तिच्याशी लग्न कर अशी बळजबरी नाही. मला काय म्हणायचं, केवळ बाबा नाही म्हणून तुझ्या निर्णयात बदल होऊ देऊ नकोस. ’

‘रणजीत, तू मला बोलतोस तसं तिचं मन जाणून घेतलंस का कधी? ’

‘अं? ’ चारूदत्तच्या प्रश्नाने तो दचकला. ’बाबांनी तिला विचारूनच तुला बोलावलं असणार ना? ’

‘हा तुझा अंदाज आहे. तुला नक्की माहीत नाही. तू तिला कधी विचारलं नाहीस? ’

‘तिच्या मर्जी विरूध्द तर लग्न होणार नाही तिचं. ती ज्याला होकर देईल त्याच्याशीच लग्न लाऊन देऊ. ’

‘पण तुम्ही निवडलेल्या मुलांपैकीच एकाला पसंत करावं, अशी  तुमची अट आहे ना? ’

चारूदत्तच्या प्रश्नार्थक चेहऱ्या वर रोखलेली नजर कठोर झाली.

‘हल्ली लग्नाची तेव्हढी एकच रीत शिल्लक आहे. ’  तो शांतपणे म्हणाला.

‘आणखी एक प्रकार प्रचलित आहे, लव्हमॅरेज. शहरात जास्त प्रमाणात असेल, पण खेडयातही त्याची लागण नाही असं म्हणता येणार नाही. थांब, आपली वैशाली तशी नाही असं म्हणू नको. मला माहीत आहे, तिला कुणाशी लग्न करायचं? ’

‘कुणी सांगितलं तुला? खोटं आहे सारं. गांवातले लोक काहीही बोलतात. तू त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊ नकोस. वैशाली चांगली आहे. ’ एका दमात तो बोलला.

‘त्याबद्दल शंका नाही. कुणाच्या प्रेमात पडल्यानं माणसाला बाट लागत नाही. फक्त तिच्या मनाविरूध्द काही करू नकोस एव्हढंच मला सुचवायचं आहे. ’

रणजीतने  खाली मान घातली. बहीणीचं कुणाशी प्रेम प्रकरण आहे यात भावाला मान खाली घालण्यासारखं काय आहे? चारूदत्तच्या मनांत विचार आला. अजूनही आपण किती खोटया भ्रमात अडकून पडलेलो आहोत.

रणजीतने त्याच्याकडे निर्धारानं पाहीलं.

‘त्याला माझा इलाज नाही. आमच्या घराण्यात आजपर्यंत राजघराण्याशीच सोयरसंबंध झाले. त्यासाठीच बाबांचा  तिला विरोध होता. तिला वाटत असेल की बाबांच्या माघारी ती काय वाटेल ते करील तर ते मी चालू देणार नाही. अरे, उद्या लोक म्हणतील, बापाच्या माघारी भावानं काही लक्ष दिलं नाही. ‘

त्याने  सिगारेट काढून चारूदत्तला ऑफर न करता पेटविली.

‘बाबांचा तिच्या लग्नाला विरोध होता. तो माणूस ना जातीचा ना पातीचा. आपल्याला त्याच्याबद्दल काहीही माहीती नाही. कोण कुठला? उद्या त्याने माझ्या बहीणीला नाही नांदवली? त्रास दिला. मग? माझ्या हयातीत हे होणार नाही. नाही , चारू, तुला तिच्याशी लग्न करायचे नसेल तर करू नको.  पण तिचं लग्न मी कुण्या ऐऱ्यागैऱ्याशी होऊ देणार नाही. बाबांची तशीच इच्छा होती. ’  ठाम आवाजात तो म्हणाला.

चारूदत्त मनांत म्हणाला, हा बोलतो ते मनांपासून  का? तो स्वताः दत्तकपुत्र आहे. घराण्याची निष्ठा रक्तात असते की अन्नात? ह्याचं अरविंदावर जन्मदात्या वडीलां एव्हढे प्रेम असेल? राजशेखरनं बोलून दाखवलेल्या संशयाचं काय? तिकीटासाठी हा अरविंदाचा खून करू शकेल? तो तर त्यांच्याकडून हट्टानं तिकीट मिळवू शकत होता. त्याला त्यांचा खून करायचं काय कारण?

‘माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीस तू? ’ रणजीतच्या प्रश्नानं तो भानावर आला. ’ तुला नकार द्यायला अवघड वाटत असेल तर राहू दे. आपण बालमित्र आहोत. तेव्हढयानं काही आपली मैत्री तुटणार  नाही. ’

'नक्कीच नाही. '  चारूदत्तने त्याला दुजोरा दिला. गाडीच्या हूड वर पडलेल्या सिगारेटच्या पाकिटातून सिगारेट काढली.

'कुठं तरी बसू या. ' सभोवार नजर फिरवत तो म्हणाला.

'गाडीतच बसू या. '  वदाडानं गवत ओलं झालं.

'कशाने? '

'दंवबिंदूने. आमच्याकडे त्याला वदाड म्हणतात. गाडीचा दरवाजा ऊघडून आंत बसला.

'रणजीत, ' गंभीर आवाजात चारूदत्त बोलला, 'वैशाली कुणालाही आवडण्यासारखी आहे. तिच्या मर्जी विरूध्द लग्न करणं योग्य नाही. मनांचा मोठेपणा दाखवून तू … … … … … '

'अर्र् र्' दोन्ही हात झटकत तो म्हणाला. 'ते होणार नाही. एकवेळ मी जात-पात धर्म विसरून जाईल, पण तो बाहेरख्याली माणूस आहे. त्याचे  सुमनबाई बरोबर अनैतिक संबंध आहे. '

'चल रे, काहीतरीच काय? त्याचं वय काय तिचं वय काय? गांवातले लोक काहीही बोलतात. तुला प्रत्यक्ष माहीत आहे का? '

'प्रतापने डोळयांनी त्यांना मिठीत पाहीलं. '

'प्रतापने ! हा प्रताप कसा माणूस आहे? '

'तो नंबर एकचा मक्कार माणूस आहे. पण आमच्याशी प्रामाणिक आहे. '

'त्यानं सावकारावर खोटी फिर्याद केली म्हणून ऐकलं मी, खरं आहे? '

'कुणास ठाऊक? पोलिसस्टेशनला लेखी तक्रार केली म्हणजे खरी असली पाहीजे. त्यानं सावकाराकडून पलटी रजिस्ट्री करून कर्ज घेतलं होतं खरं. '

'आणि त्याच्या बायकोने? तिने काय केलं होतं तिला गोवायला? '

'पलट रजिस्ट्री तिच्या नावची होती. '

‘पलट रजिस्ट्री म्हणजे काय? ’

‘रक्कम देताना  कर्जाऊ दाखवायची नाही. जमिन खरेदीचा व्यवहार होतो. रजिस्ट्री केली जाते. जमिनीचा ताबा कर्जदाराकडे असतो. कर्ज फिटल्यावर पुन्हा त्याच्या नावावर रजिस्ट्री करून दिली जाते. ’

‘खरंच केली जाते का? ’

रणजीत हसला.

‘कर्ज फिटलं तर केली जाते. ’

‘प्रतापने कर्ज फेडूनही त्याची जमिन परत मिळत नव्हती का? ’

‘प्रतापने कधी कुणाचे कर्ज फेडले? ’

‘मग? ’

‘जाऊ दे ना, ते आमचं लोकल राजकारण आहे. तू वैशालीचं प्रपोजल डोक्यातून काढू नको. ’

‘ती स्वखुशीने तयार झाली तर. ’  चारूदत्तने बजावले.

रणजीत खुशीने खिदळला.  चारूदत्त अजून रिलॅक्स बसत म्हणाला,

‘रणजीत, आता तुला तिकीट मिळेल ना ? ’

‘शक्यता आहे. ’

‘तू निवडून पण येशील. ’ त्याने चारूदत्तकडे पाहीले, ‘ सहानुभूतिची लाट तयार केली जाईल. ’

‘हा. आपल्या राजकारणात तसे दाखले आहेत खरे. ’

‘म्हणजे त्यांच्या मृत्युने तुझा फायदाच झाला म्हणायचा. ’

रणजीतन त्याच्याकडे रोखुन पाहीलं. त्याच्या नजरेत आश्चर्य आलं, मग त्याला हसू फुटलं.

‘आयला, तू काय जादूगार आहेस का? मीच एकदा म्हटले होते. दारूच्या नशेत. त्याची बोंब पण झाली होती. पार बाबांच्या कानावर गोष्टी गेल्या होत्या. केव्हढे रागावले होते माझ्यावर. महीनाभर बोलत नव्हते. त्यांची समजुत काढता काढता नाकात दम आला. ’

‘नशेच्या तारेत नकळत बोललेल्या गोष्टींचा तू कधी सिरीयसली विचार केलास का? ’

‘म्हणजे? तुला म्हणायचे माझ्या मनांत त्यांच्या मृत्युचा विचार आला का? छे! काहीतरीच काय?’

‘ आपल्या मनांत घोळणारे विचार कधी जीभेवर येत नाही. मात्र दारून जीभ सैल झाल्यावर पोटातली गोष्ट ओठात येते. ’

त्याच्या बोलण्याचा अर्थ ध्यानात येताच रणजीत रागानं लाल झाला. त्यानं त्वेषानं सिगारेटचं थोटूक भिरकावलं.

‘तू केवळ पाहूणा आहेस म्हणून तुला सोडतो. पुन्हा माझ्याशी असं बोलू नको. तुला समजायला हवं ते माझे वडील होते. ’

‘पण जन्मदाते नव्हते, नाही का? ’

‘म्हणून काय झालं? त्यांनी माझं संगोपन केलं हे काय कमी ऊपकार नव्हेत. तुझ्या डोक्यात कुणीतरी भरून दिलेलं दिसतं. तुला खरं सांगू का? मला तिकीट मिळणार नाही याची मला कल्पना होती. ’

‘कसं काय? ’

‘ सत्ता नुसती घरात राहून चालणार नाही, ती त्यांच्या कुळातच राहीली पाहीजे असा त्यांचा कटाक्ष होता. राजशेखरला तिकीट मिळावे असा त्यांचा प्रयत्न चालला होता. ’

‘कुणी सांगितले तुला? ’

‘प्रतापने. तो नेहमी बाबांच्या सोबत रहायचा. मी तिकीटाची आशा सोडली होती. राजशेखर माझा भाऊच आहे. ’

‘ते राजशेखरला  तिकीट देणार नव्हते. त्यावरून त्या दोघात भांडणं झाले होते. हे माहीत आहे का तुला? ’

‘नाही. तुला कुणी सांगितले? ’

‘ ते राहू दे. मला सांग, त्यांचा खुन झाला त्या रात्री, संध्याकाळपासून ते रात्री बारा वाजेपर्यंत कुठ होतास, काय करीत होतास ते सांगू शकशील?

त्याचा चेहरा काळवंडला.

‘ते मी सांगू शकणार नाही. ’

‘कां? ही खुनासारखी गंभीर बाब आहे. पोलिसांनी चौकशी सुरू केली तर ते सत्य शोधुन काढतील. तेव्हा हे सगळं भारी पडेल. ’

त्याने ओठ दाबून धरले. त्याचा निश्चय पाहून चारूदत्तन  विषयांतर केलं.

‘सावकाराबद्दल तुझे काय मत आहे? त्यांचा ह्या खुनात हात असू शकेल? ’

जरा वेळ त्याने नखांच निरक्षण केलं. स्वताःशी बोलल्याप्रमाणे तो म्हणाला,

‘त्या सगळया प्रकाराला सावकारच जबाबदार आहे. आमच्या घरघुती भांडणात त्यांना पडण्याची गरजच नव्हती. आमच्यात फुट पाडण्यासाठी त्यांनी राजशेखरला पैसा पुरविण्याचा वादा केला. सावकाराचं अन् बाबांचं कधी पटलं नाही. जो सावकाराच्या नादाला लागला त्यांच्या जमिनी गेल्या समजा. म्हणून बाबांना  राजशेखरचा राग आला होता. त्या रागाच्या भरात ते सावकाराच्या घरी जाऊन भांडले. सावकाराला उगाच वाटत होतं की, प्रतापनं पोलिस तक्रार केली ती बाबांच्या सांगण्यावरून. ’

‘प्रतापने तक्रार केली, त्यात बाबांचा काहीच हात नव्हता? ’

रणजीतने खालचा ओठ बाहेर काढला,

‘सांगता येणार नाही. बाबांच राजकारण बाबांना माहीत. ’

# प्रकरण ८

कँन्टॉनमेंटच्या वळणावरुन ड्रायव्हरने मोठ्या कौशल्याने, वाळूजकडून औरंगाबादकडे जाणाऱ्या ट्राफिकमधून, कार नासिकरोडकडे वळवली, मागच्या सीटवर बसलेल्या सावकाराने सुटकेचा श्वास सोडला. सेंट्रल बसस्टँड पासून लागलेला जाम कमी झाला तरी माळीवाडा जाईपर्यंत गाडीला वेग येणार नाही याची त्यांना कल्पना होती. कारच्या बंद कांचांमधून  बाहेरील हॉर्नचे आवाज ऐकू येत होते. गाडी पेट्रोल आणि हॉर्नवर चालते असा आजकाल समज असावा. त्यांनी कारच्या गुबगुबीत सीटवर मान टेकवून डोळे बंद केले.

त्यांच्या मिटल्या डोळ्यांसमोर सुवर्णाचा चेहरा उभा राहीला.

सुवर्णा!

धारपवाडीत तिचा प्रवेश मोठया सन्मानाने वाजत गाजत झाला होता.

लग्न झालं तेव्हा ती एकोणीस, वीस वर्षाची होती. सावकाराच्या एकुलत्या एक मुलाचं लग्न म्हणजे केव्हढा थाट! बाबांनी प्रत्येक गोष्टीत जातीने लक्ष घालून लग्नाचा बार उडवून दिला. त्यांच्या उत्साही हालचाली आजही त्याला आठवतात. एव्हढया वर्षांनी त्यांच्या वाडयात कार्य होतं. मातब्बर लोकांना लग्नाची आमंत्रण गेली होती. सोयऱ्याकडे मर्यादित लोकांना नेता आलं म्हणून वऱ्हाड परतल्यावर पंचक्रोशीतील बहूजन समाजातल्या लोकांना जेवण दिलं. देवीचा गोंधळ, सत्यनारायण काय न् काय आठ दिवस वाड्यावर सोहळा चालू होता.

वरातीत शेजारी बसलेल्या सुवर्णाचा चोरटा स्पर्श झाला तेव्हढाच. वाड्यावर आल्यानंतर तिचं दूरून दर्शन होई. सतत माणसांची वर्दळ. वाडा भरून पाहुणे. वयस्कर बायका रात्री उशिरापर्यंत स्वयंपाक घरात खुडबूड करीत असायच्या आणि तरूण पोरी, माहेरवाशीणी, हलक्या आवाजांत एकमेकींशी गप्पा मारत खुसू खुसू हसायच्या. त्यानं एक- दोनदा सुवर्णाच्या खोलीत जाण्याचा प्रयत्न केला पण प्रत्येक वेळी कुणाचं तरी त्याच्याकडे लक्ष जायचं. त्याची फजिती झाली की सगळे खो खो

करून हसायचे. दुसरे दिवशी सकाळी सुवर्णा समोर आली तेव्हा ती सुध्दा त्याच्याकडे पाहून मिस्किल हसली, तेंव्हा त्याला विनाकारण तिचा राग आला.

वर्ष उलटत गेली. काळाच्या ओघात जुनं मोडून गेलं पण नविन काही घडलं नाही. सुरवातीला त्यांनी अनेक डॉक्टर वैद्य करून पाहीले. पण काही फरक पडला नाही. हळू-हळू त्यांचा ओढा देवा-धर्माकडे लागला. पोथी पुराण, तिर्थक्षेत्र, नारायण नागबळी. अनेक. सुरवातीला कुणीही आमिष दाखवायचं. मोठया आशेनं कार्य पार पाडल जायचं. कालांतरानं त्यातला फोलपणा लक्षांत आल्यावर लोक बोलायचे, नशिबांतच नाही त्याला परमेश्वर काय करणार?

नशिब आणि परमेश्वर!

नशिबांत असेल तर परमेश्वर अडवू शकत नाही.

नशिब मोठं की परमेश्वर? पण नशिब तर परमेश्वरच लिहीतो ना? की एकदा लिहीलेलं  नशिब बदलण्याचा त्याला अधिकार नाही? दोघांचं नशिब सारखं म्हणून आम्ही एकत्र आलो का? समजा आम्ही एकत्र नसतो आलो तर आम्हाला मुल झालं असतं का?

किती प्रश्न उत्तर मात्र कशाचं नाही. मिळालेली उत्तरं समाधानकारक नाही.

त्यांचं एक ठीक होत, पण तिच्या मनाची कुचंबणा व्हायची. कुठं गेली कि तिच्याबद्दल सहानुभूतीचे उद्गार कानावर पडायचे. काही कार्यक्रमांचं तिला आमंत्रण नसायचं. नंतर तिला न बोलावण्याची खोटी कारणं सांगण्यात यायची. मुकाटपणे ती सहन करायची. नवऱ्यानं सांगेल त्या धार्मिक विधीत उंची शालू नेसून, त्याच्या शेजारच्या पाटावर बसून, त्याच्या हाताला हात लावायची. तिच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पाहताना त्यांच्या पोटात कालवायचं.

एकदा तीच त्यांना म्हणाली, आता  हे वांझोटेपणाचं प्रदर्शन पुरे. माझ्याकडून तुमच्या अपेक्षा काही पुर्ण होतील असं वाटत नाही. मला माफ करा. तुमच्या जीवनात मी रिती आले, रितीच राहीले. मला आता ही परवड सहन होत नाही. वारसासाठी हवं तर दुसरं लग्न करा. माझी परवानगी आहे.

त्याच्या गुढघ्याला मिठी मारून ती मुसमुसून रडू लागली. तिची  अवस्था पाहून त्यांना गहीवरून आलं. त्यांनी दोन्ही हाताला धरून तिला उठवलं. छातीशी धरून तिच्या पाठीवरून हात फिरवत म्हणाले,

‘रडू नको सुवर्णा, मी  एव्हढे प्रयत्न तुझ्यासाठीच करीत होतो. मला मुल नको असं नाही पण मुलांचा सोसही नाही. तुझ्या मनाची कुचंबना, समाजात होणारी अवहेलना  पहावत नव्हती म्हणून मी एव्हढा आटापिटा चालवला होता. माझं नशिब तुझ्या नशिबालाच बांधलं गेलं. जे समोर आलं ते दोघं मिळून स्वीकारू. तुला एकटीला सोडून  मी माझी खुशी शोधणार नाही. तू माझ्या लग्नाचा विचारही करू नको. आजपासून आपल्या घरात मुलाचा विषय बंद. जग गेलं खड्ड्यात. आपण आनंदी, मस्त रहायचं. आयुष्य एन्जॉय करायचं. हस पाहू एकदा. असं... ... !

त्या दिवसानंतर त्यांच्या घरात कधी दुःखाचा वारा फिरकला नाही. दोघं मजेत रहात होते. हिंडत होते, फिरत होते. देवधर्म व्रतवैकल्य चालू होते पण आता त्यात याचना नव्हती. निखळ आनंद होता.

गालबोट लागावं तसं आयुष्याच्या उतारणीला, प्रताप नावाच्या सापाच्या विषारी फुत्काराने त्यांच्या जीवनातला आनंद जळून खाक झाला.

प्रताप!

कृतघ्न माणूस. गांवातलाच. त्याला ओळखत नव्हते का ते? त्याच्याशी संबंध ठेवण्याचं कारण नव्हतं. पण परिस्थिती माणसाला भुल पाडते. सुह्यदय माणसाला पाझर फुटतो. त्या दिवशी प्रताप आला तेव्हा तो रडत होता.

त्यांच्या पायावर लोटांगण घालून तो रडू लागला.

‘काय झाले, उठ. नीट सांग. ’

‘सावकार, आता मला तुमचाच आधार. तुम्ही जर मदत केली नाही तर जहर घेऊन मरण्याशिवाय दुसरा रस्ता नाही. ’

‘अरे मरायला काय झालं? ’

‘बहीणीचं लगीन ठरवलं. महीन्यावर मुहूर्त येऊन ठेपलं आन् त्यांचा सांगावा आला, मोटारसायकल आन पन्नास हजार रुपये पायजे.

‘त्यांना लाखभर हुंडा कबुल केलासच ना? ’

‘त्याच्यावर मागतात सावकार. जमाना काही चांगला राहीला नाही. दिल्या शब्दाला कुणी जागत नाही. ’

‘त्यांच्या एकेक मागण्या वाढत चालल्या. पंधरा दिवसांआधी त्यांनी तीन तोळयाच्या बांगडया वाढवल्या म्हणे. ’

‘व्हय. हो ना करता कबुल केलं त्यांचं म्हन्न. आता ही नवी मागणी. मी गरीब माणूस आहे. कुठून आनू?

‘माझं ऐकशील, तर अशा माणसांच्या नादी न लागलेलं बरं. त्यांच्या मागण्या पुर्ण करीत गेला तर त्या वाढतच जातील. त्यापेक्षा त्यांना आजच ठणकावून सांग, देत नाही. ’

‘ भैनीचं लगीन मोडल वो. किती नाचक्की हुईल. एकदा लगीन मोडलं, बाट लागला, मग तिला कोण पत्करणार? काही करा सावकार, पण यव्हढी नड काढा. ’ पाय धरून त्याने पुन्हा रडायला सुरवात केली.

मुनिमजीने स्पष्ट सल्ला दिला, ‘‘माणूस चंद्रा आहे. त्याच्या नादाला लागाल तर नुकसान होईल. तुम्ही काय ओळखत नाही? चार लोकांकडे चौकशी केली तर पन्नास गोष्टी बाहेर येतील. अरविंदाच्या बैठकीतला माणूस आहे ना. तो का नाही देत त्याला पैसे? अहो देणारच नाही ते. परतीची खात्री हवी ना. ’

तर म्हणाला, ‘अरविंदाभाऊंची काही सावकारी नाही. जमिन तारण घेऊन कर्ज द्या. ’

प्रताप हीकमती डोक्याचा. त्याला माहीत होतं, सावकारा पुढे आपली दाळ शिजणार नाही. त्यानं आशाला, बायकोला, सुवर्णाकडे पाठविलं. तिनं डोळयाला पदर लाऊन सुवर्णाला गाऱ्हाणं घातलं. सुवर्णानं सावकाराला शब्द टाकला. शेवटी सावकाराने कर्ज देण्याची तयारी दाखविली. पण त्याच्या

नियमाप्रमाणे जमिनीची पलट रजिस्ट्री करून घेतली. चुकी एकच झाली, पलट रजिस्ट्री सुवर्णाच्या नांवे केली. चुकी तरी कशी म्हणावी. तिच्या नावावर ही काय पहीली रजिस्ट्री नव्हती.

अनमान करीत त्याने कर्ज दिलं. त्याला पाच सात वर्ष उलटून गेले. व्याजाची सुध्दा वसूली झाली नाही. मुद्दलाची तर गोष्ट दूरच राहीली.

त्यांच्याकडे अशा कितीतरी जमिनी  पडलेल्या होत्या. सावकाराला कर्जाची परतफेड नकोच असते. त्यांना व्याज वेळच्या वेळी मिळायला हवं.

राजशेखर त्याच्याकडे निवडणूकीसाठी मदत मागायला आला नव्हता तोपर्यंत सगळं चांगलं चाललं होतं. खरं तर त्यांच्या आपसातल्या भांडणात पडण्याची सावकाराला इच्छा नव्हती. त्यांना आपल्या सावकारीशी मतलब. त्यांना भाऊबंदकी किंवा राजकारणात रस घेण्याचं काही कारण नव्हतं. राजशेखरला त्यांनी तसं बोलून दाखवलं. पण भाऊंकडे पाहून त्याला परखड नकारही देता येत नव्हता. म्हणून राजशेखरला पैसा पुरवायला होकार दिला.

त्याला होकार दिला त्याचे आणखी एक कारण होते. सत्तेच्या जोरावर अरविंदाचा मनमानी कारभार दिवसें-दिवस जाचक होत चालला होता. जर उदयोन्मुख पक्षाच्या हवेमुळे राजशेखर निवडून आला तर सावकराला हवेच होते. नाहीतरी अरविंदाची भूक आता वाढली होती. उगवत्या सूर्याला सगळेच नमस्कार करतात. राजशेखर उगवता सूर्य होता.

त्या छोटया गोष्टीचा अरविंदानं केव्हढा बाऊ केला. त्यांच्या कानावर राजशेखर आणि सावकाराचे संबंध पडताच तो तावातावानं त्यांच्याशी भांडायला आला. सुरवातीला सावकाराने त्याला गोडीने समजावण्याचा प्रयत्न केला. तो ऐकायलाच तयार नव्हता. शब्दानं शब्द वाढला. वैतागून  सावकाराने, ‘जा. तुला काय करायचं ते कर’ म्हणून तोडून टाकले.

अरविंदा रागानं फणफणत परत गेला. तो गेल्यावर सावकाराला आपली चुक कळून आली. आपण नागाच्या शेपटीवर पाय दिला. आता तो डुख धरणार. दंश करणार हे नक्की. सत्ताधारी पक्षात असल्यानं त्याचा अधिकार जास्त होता. त्याच्यापासून वाचायचं असेल तर भाऊंच्या आड लपायला हवं. तो त्यांच ऐकतो. भाऊ नक्की मदत करतील. शेवटी त्यांच्या मुलासाठी त्यांनी अरविंदाशी वैर घेतले होते.

भाऊंने मात्र हो म्हणून दुर्लक्ष केलं. सावकाराला पाठीशी घालून त्यांना काका पुतण्यात फुट पाडायची नसेल, राजशेखरनं नव्या पक्षात सामिल होऊ नये असं त्यांना वाटत असेल. काय असेल ते पण त्यांनी त्याला आवरलं नाही हे नक्की. आपण त्याला आवर घालू शकत नाही हे त्यांनी स्पष्ट सांगितलं असतं तर सावकार सावध राहीले असते. त्यांनी दुसरा  मार्ग शोधला असता पण ते भाऊंच्या भरोश्यावर बिनधास्त राहीले, आणि त्यांचा घात झाला.

शुक्रवारी संध्याकाळी दरवाजा वाजला तेव्हा ते चारचा चहा घेऊन, बाहेर जाण्याची तयारी करीत होते. सुवर्णा रात्रीच्या स्वयंपाकाचा बेत करत होती. दरवाजा वाजला तसा त्यांनी पुढे होऊन दरवाजा उघडला तर दारात गंभीर चेहऱ्याने इन्पे. कदम त्यांच्यामागे, जीप जवळ,  दोन पोलिस अवघडून  उभे होते. पोलिसांची जीप पाहून जाणारी-येणारी माणसं थांबली  होती.

‘कदम, ताफ्या सहीत? काय बात आहे? या ना आंत या बाहेरच कां उभे राहीलात? ’

कदमने अस्वस्थ हालचाल केली. त्यांनी मागे उभे असलेल्या शिपायांकडे नजर टाकली. ते हुकुमाची वाट पहात उभे होते. प्रमुख म्हणून हे अप्रिय काम आपल्यालाच करावे लागणार याची त्यांना जाणिव होऊन खुप एकटं वाटलं. घरात जाऊन त्यांना सांगावं, पण बाहेर उभें असलेल्या लोकांत अरविंदाची माणसं आहेत.  पत्रकार आहेत. ते त्यांच्या वर नजर ठेऊन आहेत. कुठे प्रोसिजरमध्ये चूक होती, कुठे सावकाराला सुट मिळते आणि कुठे कदमला गोत्यात आणता येईल याच्यावर त्यांची नजर आहे.

‘माफ करा सावकार, तुमच्या विरूध्द आमच्याकडे तक्रार आली. चौकशीसाठी तुम्हाला ताब्यात घ्यावे लागेल. ’

‘ताब्यात’ शब्द वापरताना त्यांना दुःख झाले.

‘काय? ’ सावकाराला गंमत वाटली. ‘मला ताब्यात घ्यावे लागेल? माझी काय तक्रार आली बुवा अशी? चोरी केली की डाका घातला? ’

‘सावकारी कायद्या खाली गुन्हा दाखल करण्यात आला. तुम्ही जास्त दराने व्याज लावले. पैसे परत करूनही जमिनीचा फेर करून देत नाही. तुम्ही कर्ज देताना जबरदस्ती शेताची रजिस्ट्री करून घेतली. धक्काबुक्की करून शिवीगाळ केली. जातीवाचक शब्द वापरले. ’

‘कुणी? मी ? ’ त्यांनी आश्चर्याने विचारले.

‘होय. तशी कंप्लेन्ट आहे आमच्याकडे. ’

आता सावकार गंभीर झाले. वाढत्या गर्दीने अस्वस्थ झाले.

‘ आंत येऊन बोला, साहेब. ’

‘तसं करता येणार नाही. मी मजबुर आहे. तुम्ही सहकार्य करावं अशी माझी विनंती आहे. ’

संताप आणि अपमानाने सावकाराच्या तोंडून शब्द फुटेना.

‘कुणी... . कुणी केली तक्रार? ’

‘प्रतापनं. ’

‘प्रतापनं? ’

सावकाराला आठवले, त्यांची बाचाबाची झाली होती. तोच मग्रूरीनं अंगावर आला होता. भर रस्त्यातच भांडण झालं होतं. चारलोकांनी ऐकलं होतं. त्यात अरविंदाचे लोक असणारच. त्यांना साक्षीदार उभे करणे काही कठीण नव्हतं.

‘तो अरविंदाचा माणूस आहे. माझ्यावर खोटा आळ घेतो. ’

‘त्याचा निर्णय कोर्टात होईल. तुम्हाला माझ्या सोबत यावं लागेल. ’

‘आत्ता मला तुम्ही कोर्टात घेऊन जाणार का? आपण जाईपर्यंत कोर्ट बंद होणार. ’

‘सोमवारी तुम्हाला जमानतीसाठी कोर्टात सादर करण्यात येईल. ’

‘परवा सकाळीच ना? ठीक आहे. परवा मी पोलिस स्टेशनला येतो. आपण सोबतच जाऊ. ’

‘नाही. तुम्हाला आत्ताच आमच्या सोबत यावं लागेल. प्लीज. ’

सावकारांनी कदमकडे पाहीलं. त्यांच्या डोळ्यात याचना होती. त्यांना कदमची हतबलता समजली. आता एकच उपाय होता, भाऊ. पण भाऊ तर कालच सहकुटूंब आठ दिवसांसाठी

बाहेरगावी  गेले. नेमके याच वेळी. हा सुध्दा योजनेचा भाग आहे? त्यांना ह्या प्रकाराची कल्पना असली पाहीजे.

जास्त तमाशा नको म्हणून ते म्हणाले, ‘ठिक आहे. चला. ’

‘तुमच्च्या दोघांच्या नावाची तक्रार आहे. ’ कदम जमिनीकडे नजर रोखून म्हणाले. त्यांना भीती वाटली. सावकाराकडे पाहील तर आपल्या डोळ्यात पाणी येईल.

सावकाराच्या तळपायाची आग मस्तकात गेली.

‘तुम्ही मुद्दाम सभ्य नागरीकांना त्रास देता, कदम. मी तुम्हाला पाहून घेईल. ’

‘पाहून घ्या. पण आता तुम्हाला आमच्या सोबत यावं लागेल. ’

कदमने नजर उचलून सावकाराकडे पाहीले तेव्हा त्यांना कदमांच्या डोळ्यात पाणी चमकल्याचा भास झाला.

वरात!

सुवर्णा सोबत जीपमध्ये बसल्यावर त्यांच्या मनांत शब्द घुमला. ह्याच मार्गावरून आपली डौलात वरात निघाली होती.

सुवर्णा, एखाद्या बाण घुसलेल्या पांखरासारखी  आकांत करीत होती. तडफड करीत होती. दोन दिवस. त्यांना एका कस्टडीत ठेवण्याची विनंती कदमांनी मान्य केली नाही. नियमा प्रमाणं स्त्री पुरूषांना एकाच कोठडीत ठेवता येत नाही. ते नियम पाळतात की नाही इकडे अरविंदाच्या  हस्तकांची बारीक नजर होती. कदमांचा जीव तडफडत होता पण त्यांना काही करता येत नव्हतं.

सुवर्णाला दुसऱ्या कोठडीत बंद केल्यानंतर तिने सावकाराला ‘‘तुम्ही कुणाकडे भीक मागू नका’’ म्हणून सांगितलं आणि  हुंदके देत जी अंधारल्या कोपऱ्यात जाऊन बसली ती दोन दिवस समोर आली नाही. सावकारांनी किती आवाज दिले. ती कोठडीच्या दारापर्यंतही आली नाही. त्यांना मधूनच तिच्या हुंदक्यांचा आवाज ऐकू येत होता. द्युतात हरलेल्या पांडवाप्रमाणं दोन दिवस ते आपल्या पत्नीचा विलाप ऐकत होते.

सोमवारी कोर्टात हजर करण्यासाठी तिला बाहेर आणले तेव्हा तिचे अश्रू आटले होते. नजर सुन्न होती. जीपमध्ये बसल्यावर त्यांनी तिच्या मांडीवर आश्वासक हात ठेवला तेव्हा तिने नजर उचलूनही त्यांच्याकडे पाहीलं नाही.

कोर्टबाहेर ही गर्दी जमा झाली. धारपवाडीचेच नाहीतर पंचक्रोशीतले लोक जमले. सावकारांच्या विरूध्द, त्यांच्या बाजूने पोलिसांचा धिक्कार करणाऱ्या घोषणाही दिल्या गेल्या.

पोलिसांनी कस्टडी मागीतली नाही. सावकाराला जामिन मिळाला.

आपल्या कारमध्ये बसल्यावर तिनं त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. याचनेच्या सुरात म्हणाली,

‘मला धारपवाडीला कधीच जायचं नाही. ’

तिला मिठीत घेत त्यांनी ड्रायव्हरला गाडी औरंगाबादला, सासूरवाडीला घेण्यास सांगितली.

तिथेही तिला चैन पडलं नाही. नातेवाईक, ओळखीचे, मित्र परिवार गांवातले कुणी न कुणी सतत भेटायला येत होते. तोच विषय त्याच आठवणी पुनःपुन्हा निघत होत्या. तिची प्रकृती ढांसळत होती. शेवटी डॉक्टरांनी सल्ला दिला, तिला काही दिवस हॉस्पिटलमध्ये भरती करा.

त्या काही मनोरूग्ण नाही. त्यांच्या डोक्यावर परिणाम झालेल्या नाही. पण सतत त्याच विषयात आणि वातावरणात राहून त्यांच्या डोक्यावर परिणाम होऊ शकतो. त्यांच्यावर जो नुकताच आघात झाला त्यातून सावरायला त्यांना वेळ लागेल. त्यांना हॉस्पिटलला दाखल करा. कुणालाही भेटायला देऊ नका. फक्त तिचे आई बाबा, भाऊ, आणि तुम्ही.

तिला रुग्णालयात हालविण्यात आलं.

आपण तिच्यासाठी बंगला घेतला असून आपण कधीच धारपवाडीला जाणार नाही. त्यांनी तिला कौतुकाने सांगितलं पण तिने काही रेस्पॉन्स दिला नाही. त्यांचं बोलणं तिच्यापर्यंत पोहचलं की नाही देव जाणे!

ते धारपवाडीला परतले तेव्हा त्यांनी औरंगाबादला बंगला खरेदी केला होता. तिथला कारभार आवरण्यासाठी ते परतले होते. कसेही करून कोर्टकेस मिटविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. नेमके दोन दिवस अरविंदा गांवात नव्हता. भाऊ परतले होते, त्यांच्याशी बोलायला घरी गेले तेव्हा कळाले,

भाऊ,  यशोदावहीनीं सोबत सुमनकडे देवीचा कौल घ्यायला गेले. त्याच रात्री अरविंदाच मढं सापडलं. दोन दिवसांपूर्वीच तो मेला होता. त्याच्या भोवती किडे जमले होते. मढं, मेला हे शब्द जरी असंकृत असले तरी तेच त्यांच्या डोक्यात येत होते. ते मनांत उच्चारताना त्यांना समाधान वाटत होतं. ही बातमी सुवर्णाला सांगायला हवी.

" सुवर्णा तुझ्या वरील अन्यायाचा सूड घेतला. अरविंदा आता तुला कधीच त्रास देणार नाही. त्याचा कायमचा बंदोबस्त झाला. "

हे ऐकून तिच्या  चेहऱ्यावर  स्मितरेषा चमकेल. ती त्याच्या मिठीत येईल. औरंगाबादच्या नव्या बंगल्यात पुन्हा नवं आयुष्य सुरू होईल. काही कमी नाही आपल्याला. सावकारी बंद. सुवर्णा आणि मी. मी आणि... ...

एकाएकी त्यांना जाणवलं, सुवर्णाशिवाय आपल्याला या जगात दुसरं कुणी नाही! तिच्याशिवाय आयुष्य किती एकटं आहे.

रात्री अरविंदाच्या खुनाची बातमी कळल्यावर, केव्हा एकदा हॉस्पिटलला जाऊन सुवर्णाला ही बातमी सांगतो असं त्यांना झालं. सकाळी ऊठताच त्यांनी ड्रायव्हरला बोलावून गाडी काढायला सांगितली. गांवात अरविंदाला श्रध्दांजली वाहण्यासाठी शोकसभेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यांना त्याची फिकीर करण्याचं काय कारण? त्या घरानी उघड दुष्मनीच पत्करली होती. आत्म्याला शांती मिळो म्हणून थोडीच शांती मिळते? त्याचा आत्मा रौरवात जाईल.

डोळे बंद असूनही त्यांना समजले, गाडी उजवीकडे, दौलताबादकडे , वळते आहे. येथून दोन किलोमिटरवर दवाखान्याची इमारत दिसत होती. त्यांनी बेचैन हालचाल केली. बसलेली पोजिझन बदलली. काढून ठेवलेले शूज चढविले. झोकदार वळण घेऊन गाडी हॉस्पिटलच्या आवारात शिरताच उतावळया सुरात म्हणाले,

'मला उतरून दे इथं. '

ते गाडीतून उतरत असताना  त्यांचा मोबाईल वाजला. त्यांच्या मेव्हण्याचा कॉल होता.

'आलो. हॉस्पिटलच्या गेटमध्ये आहे. ' त्यांनी समोर पाहीले. तो व्हरांडयात उभा होता.

‘पद्माकर. ’ हात उचलून त्यांना मेव्हण्याचे लक्ष वेधुन घेतले.

त्यांना पहाताच  तो धावत त्यांच्याकडे आला. काही समजायच्या आंत त्यांना मिठी मारून  त्याने ओक्शाबोक्शी रडायला सुरवात केली.

‘काय झालं? ’ त्यांना शंका आली.

‘भावजी... आक्का गेली हो... तिनं गळफास लाऊन आत्महत्या केली!

त्यांना वाटले, एकादी भली मोठी शिळा डोक्यावर आदळून डोक्याचे छिन्न विछिन्न तुकडे झाले.

# प्रकरण ९

चारूदत्तने एकवार सब. इन्पे कदमने केलेल्या रचनेकडे पाहीलं. त्यांनी  टेबल खिडकीशी घेऊन खिडकीतून येणारा प्रकाश टेबला समोर बसलेल्या व्यक्तिच्या तोंडावर पडेल अशी व्यवस्था केली होती. त्यांच्या दोघांना बसण्यासाठी टेबलाच्या एका बाजूला दोन खुर्च्या मांडल्या होत्या. त्याच्या बाजूला एक टेबल ठेऊन नारायणची बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. लांबलचक पोलिसी ओव्हरकोट घातलेला नारायण हातातले कागद नीट लावण्यात गुंतला होता.

चारूदत्तने समाधानाने कदमकडे पाहीले. ते  सिगारेट पेटविण्यात गुंतले होते. थंडीने त्यांच्या नाकाचा शेंडा लालसर झाला होता.

‘मला वाटते पुन्हा एकदा चहा घ्यायला हरकत नसावी. ’ समोरच्या घडयाळाकडे नजर टाकून ते म्हणाले. सकाळचे साडेनऊ वाजले होते. बाहेरचं ऊन उबदार, हवसं वाटत होतं.

‘चालेल. तुम्ही त्यांना किती वाजता बोलावलंय? ’

‘त्यांना मी दहाची वेळ दिली, पण  सवयीप्रमाणे ते साडेदहापर्यंत येतील. नंदू आणि मनजीत वेळेवर यावेत. ते नोकरी करणारे आहेत. ’

‘एक गोष्ट माझ्या लक्षांत येत नाही, अरविंदाच्या छातीत विळा घुसला तेव्हा ते जीवाच्या आकांतने ओरडले असणार. त्यांचा आवाज आजुबाजूला कुणीच कसा ऐकला नाही? ’

‘त्यात आश्चर्याचं काही कारण नाही. तुम्ही रात्री आठ वाजेपर्यंत थांबा. मग तुम्हाला आपोआप कळेल. ’

चारूदत्तने प्रश्नार्थक नजरेन पाहीलं. कदम हसून म्हणाले,

‘बाजूला टुरींग टॉकीज आहे. रात्री आठ वाजता सिनेमाचा एक खेळ असतो. लोकांना सिनेमा सुरू झाल्याचे समजावे म्हणून सुरवातीला सिनेमाचा आवाज भोंग्याला जोडलेला असतो. साडे आठ-

नऊला भोंग्याचे कनेक्शन तोडतो. बरेचदा विसरून जातो. त्याचा आवाज एव्हढा मोठा असतो की, रात्री दहानंतर आम्हाला तक्रारीचे फोन येतात. नारायणलाच दम मारायला जावं लागतं. त्या दिवशी असाच मोठा आवाज असणार. तुम्हाला तर अलिकडचे सिनेमे माहीत आहेत. डायलॉगपेक्षा आणि गाण्यापेक्षा गोळीबार, किंकाळ्या जास्त. आमच्या वेळेस काय सिनेमे बनायचे! जीव टाकून पहावे असे. '

चहा आल्याने ते वर्तमानात आले.

'त्यांच्या बोटाचे ठसे घेण्याची व्यवस्था केली का? 'चहाचा घोट घेताना चारूदत्तने विचारले.

' मिळवू. ' त्यांनी त्रोटक उत्तर दिले. 'आज सुमनकडे जाण्याबद्दल तुम्ही ठाम आहात का? '

'मी? ' चारूदत्त म्हणाला, 'माझा काय संबंध? पोलिस जाणार आहेत. मी उत्सुकता म्हणून हजर राहील. मुंबईत आम्हाला असं काही बघायला मिळत नाही. '

'सगळ्यात आधी पत्रकार हजर राहील. ' नारायण बोलला.

'रफिक! ' कदम उद्गारले.

'कोण आहे हा? '

'पत्रकार म्हणवतो स्वताःला. स्थानिक वर्तमानपत्राचा वार्ताहर आहे. त्याचे अरविंदाशी चांगले संबंध होते. त्यांच्या वाढदिवसाला वर्तमानपत्रातून जाहीरात देतो. कोणतीही बातमी त्यांना विचारल्याशिवाय देत नाही. बातमी देण्यापेक्षा न देण्यातच त्याची खरी कमाई. '

'म्हणजे? '

'ब्लॅकमेल. धमकी देऊन पैसे वसुल करतो. एकदा चुकून कुणाकडून झेंडा उलटा लागला. ह्याने लगेच फोटो काढून घेतले. असं म्हणतात, पाच-दहा हजारांचा खर्च आला ते मिटविण्यासाठी. काय नारायण? बरोबर ना? ' कदमच्या विचारण्यात काही अर्थ असल्याचा चारूदत्तला भास झाला.

'अं... हो... हो... ' गडबडीने नारायण म्हणाला, 'फार जुनी गोष्ट आहे. माझी इथं पोस्टिंग होण्याआधीची. ' त्याने हातातल्या कागदाकडे नजर वळवली.

‘आंत येऊ का साहेब? ’ दारातून नंदूचे मफलरने गुंडाळलेले तोंड डोकावले.

‘या या नंदूभाऊ. ’ नारायणने त्याला बोलावले. तसा तो दबकत  आला. चारूदत्त दिसताच त्याच्या चेहऱ्यावर स्मित आलं.

‘नमस्कार साहेब. ’ त्याने कदमला नमस्कार केला.

‘नारायणभाऊ नमस्कार. ’

चारूदत्तकडे पाहून हंसला.

‘बसा. ’खुर्चीकडे निर्देश करून कदम आपल्या खुर्चीवर बसले. क्षणभर तो रेंगाळला पण चारूदत्तने डोळयांनी खुण केल्यावर अंग चोरून बसला.

‘अरे, यांना चहा आण. ’ दाराशी जाणाऱ्या पोऱ्याला आवाज देऊन ते म्हणाले.

‘नको. ’ संकोचून नंदू म्हणाला, ‘लगी आत्ता घ्युन आलो. ’

‘काय होतं मग. थंडी किती आहे. ’ कदम म्हणाले आपल्या हातातला कप त्याच्या पुढे ठेवला आणि नवा कप स्वताः घेतला. नंदू समोर ग्लास ठेवण्यापुर्वी त्यांनी रूमालाने साफ केल्याचे चारूदत्तने पाहले. नंदून आज्ञाधारकपणे समोरचा कप उचलून तोंडाला लावला.

‘मला वाटते काम सुरू करावे? ’ त्यांनी चारूदत्तकडे पहात विचारले. नजरेनं त्याचा होकार घेत त्यांनी नारायणकडे पाहीलं. त्याने मान डोलावून आपण तयार असल्याचं दाखविलं. नंदूने घाईने चहा संपवला आणि  सावरून बसला.

‘नंदू, न घाबरता काय घडले ते सांगा. अरविंदाचा खुन झाला ते तुम्हाला माहीत आहे. त्यांच्या खुन्याला पकडण्यासाठी पोलिसांना तुमच्या मदतीची गरज आहे. ’

‘पर मला काय जास्त माहीत न्हाई. ’

‘हरकत नाही. तुम्ही फक्त विचारलेल्या प्रश्नांची खरी उत्तरं द्या. ’

नंदूने मान डोलावली. त्याने चारूदत्तकडे पाहीले. त्याला दिलासा वाटेल अशी कुठलीही प्रतिक्रिया दिसली नाही. मनातून तो  घाबरला.

‘परवा रात्री, मंगळवारी, सुमनबाईच्या झोपडीकडे गेला होता का? ’

‘ व्हय. ’

‘कशाला? ’

‘कुनी तरी म्हंल, अरविंदाभाऊ दोन रोजापासून घरी येल न्हाई. त्यांच्या घरचे सुमनबाईला इचारायला जानार हायेत म्हून मी बीन गेलो. ’

‘तुमचं स्वताःचं काही काम नव्हतं? ’

‘न्हाई. आपलं काय कधी काम पल्ड नै. गावचा मामला. येळपरसंगी मदत लागली तर ऱ्हाव म्हून गेल्तो. आन आलीच ना येळ. ’

‘सुमन नक्की काय म्हणाली? ’

‘ते म्हाईत न्हाई. म्या आपलं आंत गर्दी कह्याला म्हून भाईरच उभ व्हतो. भाऊनं भाईर युन ती काय म्हन्ली ते सांगितलः त्यो पडलेला दिसतो. त्याला धोका झाला. ताबडतोब मदतीला जा. पुर्वेकडे दार असलेल्या झोपडीत पडेल हे. दाराशी पिंपळ सळसळतो. ’

तो प्रसंग त्याच्या डोळया समोर ऊभा राहीला. अचानक त्याला काही आठवलं. त्याला आश्चर्य वाटलं. पण त्याने बोलण्याचं टाळले. पुढे तो म्हणाला,

‘मंग भाऊने सांगितलं गट करून, बॅटऱ्या घेऊन धुंडायला जा. लोडशेडींग व्हत ना. आमी दोघा तिघाचे गट केले आन धुंडाया निघालो. ’ कदमची प्रतिक्रिया घेण्यासाठी तो थांबला. त्यांनी मान हालवून पुढे बोलायला सांगितलं, तेव्हढयात चारूदत्तनं विचारलं,

‘भाऊंन बाहेर येऊन सुमनचं म्हणणं सांगितल्यावर तुला आश्चर्य वाटलं का? ’

‘नाय बा? तेंच्या बोलन्याच कै वाटल नाई. ’

‘तुला आश्चर्य वाटलं. नीट आठवून सांग. कुणी काही बोललं? काही प्रतिक्रिया? आत्ता सांगताना तुला आठवलं पण महत्वाचं वाटलं नाही म्हणून गप्प बसला. हा खुनाचा मामला आहे. यात लहानसहान गोष्टी महत्वाच्या असतात. काहीही न वगळता सांग. तुला काय आठवलं? ’

‘कै नै, भाऊने सांगितल्या वर प्रतापला आश्चर्य वाटलं. ’

‘अंधारात तुला कसं कळलं? ’

‘अरे बापरे! त्यो म्हन्ला. मी त्याच्या कडं वळून पाहील. तसा तो गप झाला. तवा मला कै वाटल नाई. पर आता वाट्टं त्येला आदूगरपासून म्हाईत असलं पाहीजे, अरविंदा कुठं हायेत. काहून का भाऊंनी टोळीनं शोध घ्यायला सांगितलं तवा माझा हात धरून कुनी बोलायच्च्या आधी म्हन्ला, मी आन नंदू खाल्ल्या येशीला जातो. मी त मह्या मळ्याकडं जानार हुतो. पर प्रतापन मला त्याच्या सोबत धरला.

‘रामेश्वर तुमच्या सोबतच होता का? ’

‘पयले नव्हता. पर गांवात आल्यावर प्रतापने तेला फोन करून बलावून घेतला’

‘तो फोन वर त्याच्याशी काय बोलला? ’

‘त्यो म्हन्ला... . वांदा झाला रे रामेशर, अरविंदाभाऊ अजून घरी आले न्हाई. आमी त्येंना हुडकायला चाल्लो. तू बीन येना. यकाला दोग बरे. मंग आमी तमाखू मळत न्हाई त रामेशर गाडी घेऊन आला. त्यो म्हन्ला ट्रिपलसीट जाऊ पर मी म्हन्लो धुंडाळत जान है. पायी गेलेलं पुरतं. तेन इस्टानावर गाडी लावली आन आमी पायीच निघालो.’

‘मनजीत तुम्हाला कुठे भेटला? ’ कदम

‘मंजीत? लाईन नव्हती म्हून त्यो बसला व्हता बँकेच्या वटयावर. तेनं मला आवाज दिला. ’

‘तो स्वताः सोबत यायला तयार झाला की तुम्ही त्याला विचारले. ’

‘आमी इचारलं आन आढेवेढे घ्युन त्यो तयार झाला. अंधारात घरी बसून तरी काय करनार व्हता? आमी तपास घेत बामनाच्या मळ्यात गेलो. तिथं कुनी ऱ्हात न्हाई. तरी बीन आल्या सरसी बघून

घ्यावं म्हून शेतात गेलो. आवाज द्युन पाहीला. कुनी बी नव्हतं. दरोजाल्या कडी नव्हती. दरोजा लोटेल व्हता. म्या म्हन्ल, इथं कुनी बी न्हाई. चला पुढं जाऊ. त रामेशर बोल्ला आल्या सरसी पाहून घ्या. दरोजा उघडाच हाय. पर मंजीत बोल्ला, म्या काही आंत येनार न्हाई. म्या भाहेरचा मानूस हाय इनाकारनच्या लफडयात पडणार न्हाई. तेनं बॅट्री मह्या हाता दिली त्यो दूर जावून उभा ऱ्हायला. आमी तिघं आंत गेलो. '

'आधी कोण आंत गेलं? '

'अं? यकामागे यक गेलो. '

'पण पुढे कोण होतं? '

आठवून तो म्हणाला. 'मह्या माग दोघ हूती. आमी आंत गेलो आन लैट आली. लैट आली आन आमाला बाजेवर पल्डेले अरविंदाभाऊ दिस्ले. '

'पुढे? '

'पुढं काय? ' त्याला वाटले इतकेच सांगायचे. 'पुढे मंग मी पळतच पोलिसाठाण्यात आलो सांगाया. '

'बाकीचे? '

'दोघ तिठंच थांबले, प्रताप आन रामेशर. म्या आन मंजीत गांवात आलो सांगाया. '

'पोलिसस्टेशनाला तुम्ही एकटेच आला होता. ' कदम म्हणाले.

'मंजीत भाऊंच्या कानावर घालायला गेला. '

'नंदू नीट आठवून सांग, प्रेत पाहील्यावर तुम्हाला काय वाटले? '

'मंजी मला? '

'तुमची प्रतिक्रिया काय होती? '

मी जोरात ओरडलो, मनजी… …

‘ मनजीत? त्याला आवाज दिला?

‘त्यो तर भायर व्हता. बँकेतली सवंय होऊन जायेल है ना. ’

‘तो आंत आला नाही? ’

‘न्हाई. आमीच भायेर गेलो. आरडत वरडत. ’

‘त्याला सांगितल्यावर तो काय म्हणाला. ’

‘की कहीना! काय सांगतो? ही गोष्ट पोलिसांना सांगावी लागणार. ’

‘बस एव्हढंच? त्याने आंत जाऊन पाहीलं नाही? ’

‘न्हाई. आम्ही दोघं तगट गांवात यायला निघालो. ’

‘प्रताप अन रामेश्वर? ’

‘ते तिठंच थांबले. अरविंदाभाऊजवळ कुनीतरी पायजे म्हणाले. ’

‘थँक्यू नंदूजी. सध्या एव्हढेच. पुन्हा गरज पडली तर तुम्हाला बोलावू. ’

‘तुम्हाला काय वाटतं? ’ तो गेल्यावर कदमनं विचारलं.

‘त्याची एकटयाची बाजू ऐकली. खरं खोटं सांगता येणार नाही. तसा तो निष्पाप वाटतो. प्रश्न असा आहे, दोन दिवस एकटे पडलेल्या अरविंदाच्या सोबत थांबून ते दोघं काय करणार होते? ’

**********

एकदा मार देऊन हांकललेल्या घरात लोचट कुत्रा अंगचोरून अंदाज घेत येतो तसं दारातून येणाऱ्या प्रतापकडे पाहून कदमला वाटले. ते करडया नजरेनं त्याच्याकडे पहात राहीले.

आपल्याशी कुणी काहीतरी बोलेल या अपेक्षेनं त्यानं नजर फिरवली. त्याच्याशी कुणीच बोललं नाही. नारायणच्या टेबला जवळून जाताना त्याने हात उचलून त्याला अभिवादन केले. नारायणने

काही प्रतिसाद दिला नाही, तसा त्याच्या चेहऱ्यावरील तणाव वाढला. कदमच्या टेबला समोर नजर झुकवून उभा राहीला.

पुर्वी हा आला तेव्हा न विचारता समोरच्या खुर्चीवर बसला. आखुड बोटांच्या मुठी टेबलावर आपटून उध्दटपणे मला जाब विचारत होता. ते आठवून कदमच्या डोळ्यात रागाची लकेर चमकून गेली.

'बसा मिस्टर प्रताप. ' कोरड्या आवाजात कदम बोलले. पायातले त्राण गेल्याप्रमाणे तो खुर्चीवर बसला.

त्याच्या समोर एक कोरा कागद ठेऊन त्यांनी शाईपॅड पुढे केले.

'तुमच्या बोटांचे ठसे द्या मिस्टर प्रताप ह्या कागदावर. '

'महे? ' त्याने दचकून विचारले. 'म्या काय बी केल न्हाई साहेब. '

'मी कधी म्हणालो, तुम्ही काही केले म्हणून? इन्व्हीस्टीगेशनचं प्रोसिजर आहे, त्याप्रमाणे करावं लागतं. सगळं कायद्याप्रमाणे झालं पाहीजे. एक जागरूक नागरिक म्हणून तुमचा पण असाच आग्रह असतो ना मिस्टर प्रताप? '

'साहेब, झाल्या गोष्टी ध्यानात ठयुन तुम्ही मला तरास देऊ नका. ' त्याने दोन्ही हात जोडले.

'छे. छे. मी फक्त कायद्याचं पालन करणार. उगीच तुम्हाला तक्रार करायला जागा नको. '

'म्या हात जोडतो साहेब. सावकारावर केस करून मह्याकडनं चुक झाली. अरविंदाभाऊच्या सांगण्यावरून म्या तक्रार केली होती. '

'मिस्टर प्रताप, तुम्हाला अरविंदाच्या अनैसर्गिक मृत्युच्या चौकशीसाठी बोलावण्यांत आले आहे. आपण त्या केस संबंधी बोलू. सावकाराच्या केसचा ह्याचाशी काही संबंध नाही. समजलं? वाटल्यास तुम्ही तुमच्या वकीलाचा सल्ला घेऊ शकता. '

कदमचा आवाज वाढला नव्हता तरी त्यांच्या आवाजाची धार प्रतापचं काळीज कापत गेली. हेच कदम, आपण सावकाराची तक्रार करायला आलो, तेव्हा कळकळीने बोलत होते, आणि आपण

उद्दामपणे त्यांना कायद्याचे काटेकोर पालन करावे म्हणून धमकावत होतो. प्रतापला त्याचं वाईट वाटत नव्हतं, त्याला काळजी होती, ती गोष्ट लक्षांत ठेऊन कदम आपल्याला त्रास देतील. सध्या तरी त्याला शरणागतीचा एकच मार्ग दिसत होता.

‘साहेब, आम्हाला त्यातलं काय कळतं ? तुम्ही म्हणाल ते करायला तयार आहे. ’

भेदरलेला उंदीर. चारूदत्तच्या मनांत विचार आला.

‘कृपया  या कागदावर  बोटांचे ठसे द्या. सर्व बोटांचे द्या. ’

‘साहेब, मी अरविंदाभाऊ सोबत होतो. माहे ठसे तुम्हाला सापडनारच. तेव्हढयावरून तुम्ही मला ह्या प्रकरनात गोवण्याचा डाव टाकू नका. ’

‘मिस्टर प्रताप, तुम्ही बऱ्या बोलाने सहकार्य केलं नाही तर पोलिसांच्या चौकशीत अडथळा आणला म्हणून आरोप लावेल. पोलिसांचा काय  अधिकार आहे, याची  तुम्हाला कल्पना आलेलीच आहे. मुकाटयाने ठसे द्या. ’

त्याने मदतीच्या अपेक्षेनं नारायणकडे पाहीलं.

‘ठसे तर द्यावेच लागतील. ’ नारायण त्याला समजावत म्हणाला. ‘तुझ्यावर कुठला आरोप लावला नाही. मिळालेले ठसे ताडून पहावे लागतात. त्यासाठी हवे. देऊन टाक. ’

प्रतापनं कोऱ्या कागदावर बोटं उमटवून कागद कदमकडे सरकवला. त्यांनी तो काळजीपुर्वक टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेऊन दिला.

‘नंदूचे पण ठसे घेतले का? ’ प्रतापने विचारलं.

‘त्याच्याशी तुम्हाला काही कर्तव्य नाही. कदमने खडसावलं. हा आमच्या अखत्यारीतला मामला आहे. तुम्ही विचारलेल्या प्रश्नांची खरी उत्तरं द्या. ’

जरा थांबून त्यांनी प्रश्न केला,

‘आपलं नाव? ’  त्यांचा सुर ऑफिशीयल होता.

प्रताप त्यांच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. नारायणने कागद पुढे ओढून वाचला,

‘नाव प्रताप साधु बारती. वय वर्ष ४१. राहणारः धारपवाडी. धंदाःशेती. शपथ पुर्वक लिहून देतो की,

‘ही माहीती बरोबर आहे? ’ नारायणचं वाचुन झाल्यावर कदमने त्याला विचारले. त्याने मान डोलावल्यावर ते म्हणाले,

‘काय घडलं ते सविस्तर सांगा. ’

‘काही नाही. दोन रोज भाऊ घरला आले न्हाई म्हून आमी सुमनकडं प्रश्न इचारायसा गेल्तो. ’

‘पहील्यापासून सांगा. ’कदमने दरडावले.

‘म्हंजी कवापासून? ’

‘शेवटून तुम्ही त्यांना कधी पाहीलं? ’

‘परवा, राती. ’

‘किती वाजता? ’

‘हेच आपलं, राती नऊ वाजता. ’

‘कुठं? ’

‘बामनाच्या मळ्यात. ’

‘तुम्ही तिथं कशाला गेला होता? तुम्हाला माहीत होतं अरविंदा तेथे आहेत? ’

‘म्हंजे आमी संगच होतो. ’

‘कधीपासून? ’

‘ सकाळपासूनच. म्या त्यांच्या संग तालुक्याला गेल्तो.

‘तिथुन सांगा. दिवसभर त्यांचा मुड कसा होता? काही वेगळेपण जाणवलं का? ’

‘येगळं? न्हाई. हमेशासारखाच व्हता. ’

‘दिवसभरात काही बऱ्या वाईट घटना घडल्या नाही? ’

‘न्हाई. साहेब, उल्टं त्यांना एक फोन आला. तो कुणाचा होता ते माहीत नाही. त्यांनी बाजूला जाऊन घेतला. ते खुप वेळ ऐकत होते. शेवटी ते फक्त ‘अस्सं काय? ’ एव्हढंच म्हणाले आन ठिक म्हणून त्यांनी फोन बंद केला. ते परत आले तेव्हा त्यांच्या तोंडावर हसू होतं.

‘चला एक काम झालं. ’ जवळ येताच त्यांनी माझ्या पाठीवर थाप मारली. खुशीत असले की ते तसं करायचे. पर काय काम झालं ते मात्र त्यांनी सांगितलं नाही. नंतर मात्र त्यांना खुपदा स्वताःशीच हसताना पाहीलं.

‘तुम्ही धारपवाडीला कधी परतला? ’

‘सांजच्याला. पाच साडेपाचच्या सुमाराला आमची गाडी आली तव्हा रामेशर बसस्टॅंडवर वाट पहात उभा व्हता. त्यांचा कार्यक्रम आधीच ठरला होता. रामेशरनं दोन मोटर सायकलीचा बंदोबस्त केला व्हता. अरविंदभाऊंनी ड्रायव्हर बरोबर निरोप देऊन कार घरी पाठवून दिली. ’

‘आपण कुठं जातोय हे त्यांनी घरी कळवलं नव्हतं का? ’

‘ते कुणाला काही सांगत नव्हते. त्यांच्या मर्जीचा कारभार व्हता. काम नसलं की संध्याकाळी ते भाहेर कुठेतरी बसत. आजचा बंदोबस्त रामेशरनं मळयात केल्ता. बसस्टॅंडवरून आमी सरळ मळयात गेलो. ’ लवकर आटोपून तुम्ही नऊच्या आधी निघून जा. ’ त्यांनी आम्हाला सुचना दिली. त्यांना भेटायला कुणीतरी येणार व्हतं. ’

‘कोण? ’

‘यव्हढं त्यांनी काही सांगितलं न्हाई. त्यांना उलट कोन ईचारनार? समदं आटोपून नऊला आमी दोघं, मी आन रामेशर तिठून निघून गेलो. ’

‘पार्टी कशी झाली? हसत खेळत? ’

प्रतापने लगेच उत्तर दिले नाही. विचार करून त्याने सावकाश उत्तर दिले,

‘मव्ह नाव घ्यु नका साहेब, पार्टीत रामेशर आन भाऊंची बाचाबाची झाल्ती. ’

‘कशावरून? ’

‘पान्याच्या टाकीच्या ठेक्यावरून. त्यो ठेका मिळावा म्हून तर त्येनं भाऊला पार्टी दिल्ती. ’

‘तुम्ही त्यांना सोडलं तेव्हा ते कसे होते? ’

‘फुल्ल. त्यांना जास्त झाली होती. खरं तर त्यांना सोडून जायला मन तयार नव्हतं. पर त्यांनी सांगितल्यावर ऐकावंच लागलं. ’

‘तुम्हीही त्यांच्या सोबत घेतली होती का? ’

‘व्हय साहेब. जराशी. त्यांच्या मान राखायला. ’

‘त्यांना भेटायला कोण येणार होत. याची तुम्हाला काही कल्पना नाही? ’

‘न्हाई साहेब. ’

‘त्यांच्याकडे एक ब्रीफकेस होती ? ’

‘व्हय साहेब. ’

‘काय होते त्यांत?

‘माहीत नाही साहेब. पैसे असतील. किती व्हते ते काय सांगता येनार न्हाई. ’

‘पाच लक्ष रुपये होते त्यात. ’ कदम म्हणाले. ‘ती बॅग गायब आहे. त्यांच्या अंगावर सोनं होत, तेही दिसलं नाही. त्यांच्या मोबाईलचा पत्ता नाही. तुम्ही त्याबद्दल काही सांगू शकाल? ’

त्याने शाई लागलेल्या बोटांकडे पाहीले, कदमकडे न पहाताच तो म्हणाला,

‘काही सांगता येनार न्हाई साहेब. आम्ही निघालो तव्हा बॅग टेबलावर ठीवलेली व्हती.

‘ब्रीफकेस कशी होती सांगू शकाल?

‘काळ्या कलरची होती. लई जुनी होती. यक खटका काम करत नव्हता. यक कुलुप उघड ऱ्हायचं आन यक बंद व्हायचं. मह्याच कडं होती दिसभर. ’

‘ब्रीफकेसमध्ये अजून काय होतं? ’

‘म्हायत न्हाई साहेब. म्या  नुस्ती सांभाळत व्हतो. उघडायची येळ आली न्हाई. ’

‘मिस्टर प्रताप, तुम्ही त्यांच्याकडे नोकरीला होता काय? ’

‘न्हाई साहेब. ’ त्याला नोकरी करतो म्हणाल्याचा अपमान वाटला. गर्वाने तो म्हणाला,

‘आपन  शेती करतो. ’

‘शेती? ’त्याच्या हातातल्या सोनेरीपट्टयाच्या घड्याळाकडे पहात कदमने विचारले. तुमच्याकडे मोटरसायकल पण आहे. ’

‘मंग? शेतकऱ्याने घ्येऊ  नाही का? ’ त्याने उलट प्रश्न केला.

‘माझी काही हरकत नाही, पण ज्या भागात एकीकडे शेतकरी आत्महत्या करतात, त्या भागात शेतीवर… ? ’

त्यांनी मुद्दाम वाक्य अर्धवट सोडले.

‘माही बायको नोकरी करते.  शिक्षण संस्थेत कारकुन आहे. ’

‘अरविंदाच्या शिक्षण संस्थेत ना? ’

त्याने मान हालवली.

‘त्यांचे संबंध कसे होते? ’

त्याच्या नजरेतून राग डोकावला. स्वताःवर संयम ठेवत त्यानं विचारलं,

‘त्येचा ह्येच्याशी काय संबंध?

‘आमच्या प्रश्नाचं उत्तर द्या मिस्टर प्रताप. त्यांचे संबंध कसे होते? ही खुनाची केस आहे. कशाचा संबंध कशाशी जुळेल हे काही सांगता येत नाही. ’

‘तुम्ही मुद्दाम मला हरॅश करून ऱ्हाईले. ’ त्याचा सुर किंचित् वाढला. ‘सावकाराच्या केसचा बदला घेणं चालला. ’

‘कायद्याच्या बाहेर एक गोष्ट केली तर तुम्ही माझी कंप्लेन करू शकता. तुम्हाला तर  तुमच्या अधिकाराची जाणिव आहे. ’ तो काही बोलणार त्या आधी कदमने दरडावून सांगितले,

‘आधी आमच्या प्रश्नांची उत्तरं द्यायची. नाहीतर तुमच्या मिसेसला बोलावून त्यांना हे प्रश्न विचारू. काय करता? ’

त्यांनी एकमेकांकडे रोखून पाहीलं.

‘त्यांचे संबंध कसे व्हते म्हंजी काय? चांगले व्हते. ’

‘चांगले म्हणजे कसे? ’

‘मालक आणि नोकरासारखे . तिचं काम चांगलं हाय. त्यांची बी काही तक्रार न्हाई. तिला पगार टायमावर भेटतो. तिचा काही तक्रार न्हाई. या परिस किती चांगले पायजे? ’

‘आम्हाला माहीत आहे, तुम्ही सांगता त्यापेक्षा खुप चांगले होते.  त्यांच्या संबंधाबद्दल तुमच्या मनांत संशय होता की नाही? नाकारण्यात अर्थ नाही. तुमची भांडणं जगजाहीर आहेत. ’

‘माझा गैरसमज व्हता. त्यो दूर झाला. त्यांचे संबंध चांगले व्हते. ’

‘मिस्टर प्रताप, तुमचा गैरसमज झाला असतानाही त्यांनी नोकरी सोडली नाही. उलट तुम्ही अरविंदा बरोबर रहायचे, फिरायचे हे कसे काय? ’

‘सांगितलना, त्यांच्याबद्दल गैरसमज झाला होता. नंतर दूर झाला. ’

‘त्यांच्याबद्दल गैरसमज झाला होता, हे तुम्हाला मान्य आहे? ’ प्रथमच संभाषणात भाग घेत चारूदत्तने प्रश्न विचारला.

प्रतापने मान हालवली

‘कशामुळे? ’ प्रताप काही बोलला नाही.

‘कशामुळे? ’ चारूदत्तने पुन्हा विचारले.

‘जुन्या गोष्टी हैत साहेब. तवा अरविंदाभाऊ जवान होते. त्येंनी  सुमनबाईचा नाद सोडला व्हता. ते माह्या बायकोला लईयेळ थांबून घ्यायचे. आपलं  खेड गाव पडलं. लोक बीन काही बाही बोलायचे. मंग मला बीन राग यायचा. पन त्ये काय खरं नव्हतं. ’

‘तुमचा गैरसमज कसा दूर झाला? ’

‘त्येंच्या सहवासात आलो आन त्येंच्या स्वभावाची ओळख पटली. ’

‘म्हणजे तुम्ही त्यांच्या सहवासात आला ते, तुमचा गैरसमज झाल्यावर ?

‘व्हय साहेब. आधी फार काही जवळीक नव्हती. ’

चारूदत्तने पुढे काही विचारले नाही. त्याने हातानेच कदमला त्याचे सवाल जबाब चालू ठेवाण्याचा इशारा केला.

कदम पुढे काही विचारणार एव्हढयांत एक हवालदारने आंत येऊन रामेश्वर आल्याची सुचना दिली. कदमने त्याला जरावेळ बाहेरच बसवून ठेवण्याची सुचना केली. तो गेल्यावर त्यांनी पुन्हा प्रतापशी बोलायला सुरवात केली. हवालदाराशी बोलताना मवाळ झालेला त्यांचा आवाज पुन्हा कडक झाला.

‘तुम्ही रात्री साधारण नऊच्या सुमारास त्यांना सोडलं. त्यानंतर तुमची त्यांची भेट नाही?

‘हौ’

‘ ते दोन दिवसांपासून गायब झाल्याचं कळाल्यावर तुम्ही मळयात जाऊन  पाहीलं नाही? ’

‘नाही साहेब, दुसऱ्या दिवशी मी आणि रामेशर एका पाहूण्याकडे लग्नाला गेल्तो. दोन दिसांनी परत आलो. गांवात आल्यावर बातमी कळली.

‘नऊनंतर तुम्ही त्यांना भेटले नाही? ’

चारूदत्तला त्याच्या मिचमिच्या डोळयांत किंचित् चलबिचल दिसली.

‘व्हय. नंतर काय मी त्येंना पाहीलं न्हाई. ’

‘त्यांचं प्रेत सांपडल्यावर पोलिसांना रिपोर्ट करण्या ऐवजी तुम्ही दोघे मागे कां थांबला?

‘त्येंच्या जवळ कुनी  पाहीजे नको का? त्येंना यकटं कसं सोडायचं? ’

‘दोन दिवस तर ते एकटेच होते ना? ’ त्यांनी आवाजात जरब आणून विचारलं, ‘एव्हढंच की अजून काही? ’

‘अजून काय असनार साहेब? ’

‘पुरावा नष्ट करायला वेळ मिळावा म्हणून. ’

‘न्हाई साहेब, आमी कशाला हात लावला नाही. ’

‘ठीक आहे. तुम्ही बाहेर थांबा. दोघं सोबत होता ना? तुमची पुन्हा गरज पडेल. ’

‘व्हय साहेब. ’ विझलेल्या सुरात तो म्हणाला.

‘तुम्हाला माहीत असलेलं सगळं पोलिसांना सांगितलंना? नंतर जर काही उघड झालं. . ’

मुद्दाम वाक्य गर्भीत सोडून त्यांनी प्रतापला बाहेर जाण्याचा इशारा केला.

*****

‘झाली का तुही जबानी? ’ बाहेर पडलेल्या प्रतापला रामेश्वरने एव्हढया जोरात विचारले की त्याचा आवाज आंत बसलेल्या तिघांनी ऐकला. चारूदत्त कदमकडे पाहून हंसला. ‘त्याच्यावर अजिबात प्रेशर आलेलं दिसत नाही. ’

‘निष्पाप माणसावर प्रेशर येत नाही. ’

‘किंवा निर्ढावलेल्या. ’

चारूदत्तच्या बोलण्याला मान झुकवून होकार देत त्यांनी विचारले,

‘ प्रतापबद्दल तुमचे काय मत आहे?

‘त्याला अजून काहीतरी सांगायचे आहे, पण त्याच्या मनाची तयारी होत नाही. त्याला अजून दाबायला हवं होतं. ’

‘त्यासाठी त्याला बाहेर बसवला. रामेश्वरशी बोलताना त्याच्या जबानीतली विसंगती सापडू दे, त्याला पुन्हा बोलावू आंत. ’ त्यांनी दातांवर दांत दाबले.

‘ओ. के. रामेश्वरला बोलावून घ्या. ’ नारायण उठून बाहेर गेला.

रामेश्वर भसडया आवाजात बोलतच आंत आला. चालताना, नाल बसवलेल्या बुटांचा फरशीवर आपटून आवाज येत होता.

‘सकाळीच यायचं होतं. म्हन्ल आच्चं काम ठेप्याला लावून मंग यावं म्हून उशीर झाला. रामराम साहेब, अरे! पाव्हणं तुमी बीन हैत का? राम राम. ’

‘बसा रामेश्वरजी. हवालदारानं चहा पाणी विचारलं की तसंच बसवून ठेवलं? काय हो हवालदार’ त्यांनी बाहेरच्या हवालदाराला विचारले.

‘स्पेशल चहा पाजला. साहेब. ’ आंत डोकावून त्यानं उत्तर दिलं.

रामेश्वरनं चारूदत्तकडे पहात पांढरी टोपी सारखी केली.

त्याने स्वच्छ पांढरी ट्रावझर आणि पांढरा सदरा घातला होता. त्याच्या सदऱ्याच्या डाव्या खिशातून छोटीशी डायरी आणि एक चीप बॉलपेन डोकावत होता. त्याने कपाळाला आणि कानांच्या पाळयांना चंदनाचे गंध लावले होते. गळयात तुळशीची माळ होती. त्याच्या डोळयात पिवळसर झाक होती. हसताना हिरड्यावरील तंबाखूचे डाग स्पष्ट दिसत होते.

‘लई वंगाळ झालं साहेब, अरविंदाभाऊचं. माणूस कसा का आसंना, अशी मौत यायला नको होती. ज्यानं पन हे केलं असल त्याला लगी फाशी झाली पाहीजे . ’

‘त्यासाठी तुमच्या सहकार्याची गरज आहे. आपण जबानी घ्यायला सुरवात करायची कां? ’

‘हौ साहेब. आटोपून टाका. सकाळचा टैम त गेला. दुपारून तरी काम झालं पाहीजे. ’ खुर्चीवर मांडी घालून बसत तो म्हणाला.

‘तुमचं पुर्ण नाव... ... ’ कदमने गंभीरपणे प्रश्न विचारला तसं ऑफिशीयल वातावरण तयार झाले.

‘रामेशर संताजी बारती. ’

‘बारती म्हणजे तुम्ही आणि प्रताप कोण? ’

‘एका समाजाचे आहोत साहेब. तसं डायरेक नातं काही नाही. ’

‘ते म्हणत होते, तुम्ही लग्नाला गेला होता. ’

‘व्हय साहेब, आमचा समाज तरी किती मोठा? कुठून तरी नातं निघतंच. ’

‘अरविंदाच्या खुनाबद्दल तुम्हाला जी काही माहीती आहे ती सांगा. ’

‘ आपल्याला काय म्हैत असनार? ’

‘म्हणजे खुनाच्या दिवशी तुम्ही अरविंदाला कधी भेटलात? काय झालं? ते सगळं पहील्यापासून सविस्तर सांगा. छोटयातली छोटी गोष्ट, तुम्हाला विषेश वाटली नाही तरी सांगा.

‘पैल्यापासून सांगायचं झालं त तिसऱ्या पहारला  मी पंचायतीच्या हापिसातून निन्घलो. तिठंच मला समजलं का गावच्या पान्याच्या टाकीला मंजुरी मिळाली, आन टेंडर निंघनार हे. ’

‘तुम्हाला कुणी सांगितलं? ’

‘पंचायत मधी जाऊन बसलो की कानवर येतंच. एव्हढंस गाव. घरात पादलं त गावाला वास जातो. मंग हे त पंचायतीच हापिस हे. कुनी न कुनी बोलतंच साहेब. ’

‘पुढे? ’

‘टाकीच्या मंजुरीची लई दिसाची वाट पहात व्हतो. म्या आदूगरच भाऊला सांगून ठेवेल व्हतं की कायबी करा पर  गावच्या टाकीचं कंत्राट मला मिळायला पायजे. काय? फंड मंजुर झाला म्हंजी टेंडर निघनार. त्येच्या आदी भाऊंच्या कानावर आपलं नाव घालून ठेवावं म्हून मी त्येंना फोन केला. आम्च फोन वरच बोलनं झालं. ’

‘कुठय भाऊ? ’ म्या म्हन्ल

त म्हन्ले, ‘तालुक्याला. का रे? ’

‘ कवा येऊन ऱ्हायले ? ’ म्या इचारलं

त म्हन्ले, ‘कशाला चौकश्या करतो रे? ’

‘ नाही म्हटलं, रात्रीची काही प्रोग्राम हाय का? ’म्या इचारलं

त म्हन्ले, ‘नाही. काही नाही. ’

‘येऊन ऱ्हायले का मंग? ’ म्या इचारलं

त म्हन्ले, ‘कोण कोण आहे?

‘म्या यकलाच है. ’ मी म्हन्ल

त म्हन्ले, ‘कर मग बंदोबस्त. आम्ही निघालो आता. प्रताप हाय सोबत. काय? बाटलीची सोय करून ठेव.  कुठं बसायचं? ’

त्यांच्या प्रश्नाचं उत्तर दिल्याप्रमाणे मला इष्नू दिसला. मी म्हन्ल ‘बामनाच्या मळयात. ’

कार्यक्रम ठरला. मला हुरूप आला. म्या इष्नूला पन बोलावलं पर त्येला काम असल्यानं त्यो नको बोलला. म्या  झोपडीची चावी घेतली आन पुल्ढया बंदोबस्ताला लागलो. ’

‘बामनाच्या मळयातच का? ’

'कुठतरी बसायचं. घरी त बसता येत न्हाई कुनाच्या. बामन ऱ्हातो मुंबईला. मळा इष्नूच्या ताब्यात. आमाला गरज पडंन तवा देतो बसायला दोस्तान्यात. आधी बी बसलो व्हतो ना. या टैमाला असं व्हुईल कुनाला म्हाईत? '

'तुमचा पार्टी देण्यामागे हेतू पाण्याच्या टाकीचा कॉन्ट्रॅक्ट मिळविण्याचा होता. '

'हा मंग? थोडीफार सेवा केल्या बिगर मेवा मिळनार व्हय? सेवा त करनंच पडती. '

'पुढे काय झाल? '

'म्या इष्नूची गाडी ठयुन घेतली. का? की जायच्या टायमाला तीघं बी जातीन पर यायच्या टायमाला वांधा नको. कोन कसं कोन कसं. किती बीन मोठी पार्टी ऱ्हावू दे. आपन कंधी औट व्हत न्हाई. पार्सल घरी सोडायचं काम आपल्यालाच करावं लागतं. म्हून म्हटलं दोन गाड्या असल्या की मंग प्रताप होताच संगट. त्योच भाऊंना बी सोडून दील. '

भाऊनं आधीच सांगितलं का की, त्येंन्ला भेटाया कुणीतरी येनार हाय तवा संमदा कार्यक्रम नवाच्या आंत उरकून सटकायचं. तसं आमी आपलं टायमाच्या आंत तिथुन निन्घलो.

'तुम्ही भेटलात तेव्हा भाऊंचा मुड कसा होता? '

'खुशीत व्हता. येतानाच लाऊन आले व्हते. प्रतापनं सांगितलं वाटेत गाडीत पन कार्यक्रम चालू व्हता. गाडीवर बसल्यावरच कळलं, त्यांना चढली. पर ते खुशीत व्हते. '

' तुमचं टाकीच्या कॉन्ट्रॅक्टबद्दल बोलणं झालं की नाही. '

'हा. झालं. पर भाऊंनी काही समाधान केलं नाही. यव्हढा मोठा कंत्राट झेपनार न्हाय बोल्ले. '

'मग तुम्ही काय केलं? '

'म्या काय करनार? भाऊंच्या पुढ आपली काय हिम्मत हाय बोलाची. न्हाई त ऱ्हायलं. पर भुनभुन चालू ठिवली. गरीबाला रडत राहनं पडतं. दया युन काम व्हतं. '

'गरीबासारखं नाही. तुम्ही भांडलात त्यांच्याशी. '

‘कोन म्हंतो? ’ त्याने जोरात विचारले. कराकरा मनगट खाजवलं. ‘त्यो हरामखोर बोल्लेला दिसतो. मायला, तरी सांगितलं हुत भांडनाचं बोलायचं न्हाय म्हून. का रे प्रताप... ... ’

‘त्यांना मधे घेऊ नका. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं द्या. तुमचं भांडण झालं होतं की नाही? ’

‘झालंना. आता मला सांगा, टाकीचा ठराव पास झाला तसा मी भाऊंच्या मागे होतो. कंधी बी इषय काल्ढा की पाहू म्हणायचे. ’

‘त्येंचा काय कट असंन तो द्यायची तयारी व्हती ना आपली. पर मला सांगा, किती रोज मी असा सब कॉन्ट्रॅक्टर म्हनून काम करू? आपलं काही हाय का न्हाही? आपल्या गावची टाकी आन भायेरच्या कंत्राटदाराला कंत्राट मिळाला त कसं वाटनं? त्येनी न्हाई बोलून तोडूनच टाकलं. म्हून राग आला. ’

‘म्हणून तुम्ही त्यांचा खुन केला? ’

‘कोन म्हंतो? फौजदार झाला म्हणून काही बी  बोलू नका, साहेब. म्या कह्याला त्यांना मारील? यक काम न्हाई झालं त काय बाभुळ बुडाली? चालत ऱ्हातं. आज न्हाई म्हन्ले तरीबी आपली कोशीश चालू ठेवाची. सब कंत्रटदार त सब कंत्रटदार. पर त्येंच्या मुळं त कामं मिळत व्हती. त्येच्या मुळं त घर चालत व्हतं मह. त्येंना मी कसा मारील साहेब? ’

‘काय झालं न मारायला दारूच्या नशेत माणूस काहीही करू शकतो. तू तर करू शकतो. ’

‘कसं काय? ’ तो अंगावर धाऊन आल्यासारखा खुर्चीवर पुढे झुकला.

‘शांत बसा. ’  कदमने दम मारला तसा तो मागे सरकला. ‘वाळूसाठी तलाठयाच्या अंगावर ट्रॅक्टर घातलं होत की नाही? पोलिसस्टेशनला तक्रार आली होती तुमची. मी नव्हतो म्हणून वाचलांत. ’

‘ट्रॅक्टर अंगावर घातलं म्हंजे ? घालनंच पडतं. मी काय त्याला मारून थोडच टाकनार व्हतो. उगी आपली हूल दिली, झालं. ’

‘घायाळ झाला होता तो. नशिबान वांचला. ’

‘यव्हढं कै नै हां साहेब. त्यो बावळयावानी जागीच गुरमळला. उग जरा खरचटलं. कांगावा करायची सवय आहे तलाठयास्नी. मला सांगा, तुमाला नियमा प्रमानं काम करायचं ना, त म लोकांकडून पैसे कशाला घेयाचे मी म्हंतो? तुमी पैसं बी घ्याल न टांग बी अडवाल त म कसं चाललं. लोक मारनार न्हाई ? ’

‘तुम्ही त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. त्याच्या अंगावर ट्रॅक्टर घातलं. अरविंदाने मध्यस्ती केली म्हणून त्याने तक्रार मागे घेतली. ’

‘हौ. तक्रार बीन त्येंनीच कराया लावली व्हती. ट्रॅक्टर बी त्येंनी चालवायला सांगितलं व्हतं. ’

‘म्हणजे? ’

‘ते समदं जाऊ द्या साहेब, त्या गांवातल्या आढया हैतं. तुमच्च्या ध्येंनात येनार नाही. त्येचा न् ह्येचा काय संबंध नाय बघा. आमचा वाद बीन झाला तरी  काय आपुन मनांत ठेवेल नै. ’

‘तुम्ही त्यांना सोडलं तेव्हा त्यांचा मुड कसा होता? ’

‘रागात होता. एक त त्येंना चढेल व्हती, त्यांच्यात माझ्याशी वादावादी झाली. लई गरम झाल्ते भाऊ. चाल्ता हो म्हन्ले. मायला म्हन्लो, पार्टी दिली. पैसा खर्च झाला. काम बी झालं न्हाई आन् उगी भाऊचा रोष पदरात पडला.  प्रताप आन् मी आपापल्या रस्त्याला वळलो. म्या गाडी उभी करुन इचार केला, झालं ते काय चांगलं झालं नाय. भाऊच्या मनांत गोष्ट राहीली त आपली वाट लावतील. त्येंची दुष्मनी कशी ती पाहेल हाय. तसाच परत फिरलो. नको त्यो टाकीचा ठेका. भाऊचा हात पाहीजे डोक्यावर. उद्या त्येंची मर्जी फिरली त उपासी राह्यची येळ यील. यव्हढा इचार केला,  गाडी तशीच पलटीली, आन  पुन्हा मळयात गेलो. ’

‘तुम्ही पुन्हा मळयात गेला होता? ’

‘व्हय. ’

‘किती वाजता? तेव्हा अरविंदाभाऊ कसे होते?  तुमचं बोलणं झालं का? ’

कदम उत्तेजित झाले.

‘न्हाय. मला काय आंत जाता आलं नाय. म्या गेल्तो तव्हा झोपडीचं दार उघडं व्हत. तेव्हढया उजेडात मला प्रताप दिसला. तो मोटरसायकल स्टार्ट करीत होता. तो पुन्हा कह्याला आला? म्या पुढ होऊन त्याला इचारनार व्हतो. पन म्हन्ल, जाऊ द्या आपल्याला काय करनं. त्येला भेटलं त आपलं बोलन् ऱ्हाऊन जैल. म्या आडोशाला लपलो. त्येन मोटरसायकलचा लैट  पन लावेल नव्हता. मला नवल वाटलं हा परत कह्याला आला असनं? ’

‘तो गेल्यावर तुम्ही आंत गेलात काय ? ’

‘न्हाऽऽई. म्या आंत गेलोच न्हाई. प्रताप गेला तिकडं पहात उभारलो. त्यो परत कह्याला आला? प्रताप म्हंजे महा बेरकी बेन है. माज्या कामात टांग आडवायला त आला नव्हता? त्याला काय, कंत्राट मिळून देतो म्हून दहा लोकाकडून पैसं खाऊन बसंन. ’

‘प्रताप? ’ चारूदत्तने विचारले . कदमने मान डोलावली.

‘त् ‘ रामेश्वर म्हणाला. ‘साहेबांना इचारा, नावा साऱ्हका प्रतापी हाय. ’

‘तुम्ही आंत गेला का नाही? ’

‘म्या जाणारच हुतो त मला कुनाची तरी यायची चाहूल लागली. म्या पुन्हा दडलो. भाऊंना भेटाया नऊ वाजता कुनी येनार व्हतं ते आलेलं दिसतं. म्या मनांत म्हन्ल. आडोशाला उभं ऱ्हाऊन पाहल, त त्यो मंजीत व्हता. ’

‘मंजीत! ’

कदमने आश्चर्याने विचारले. चारूदत्त सावारून बसला. रात्री नवू वाजता. मळ्यातल्या एकांतातल्या झोपडीत त्यांना भेटायचे काय कारण असावे?

‘रामेश्वर, नीट विचार करून सांग. तुला अंधारात नीट दिसलं नसेल. तो मनजीतच होता? ’ नारायण पहील्यांदा बोलला.

‘अंधार व्हता. पर मंजीत काय वळखू येत न्हाय व्हय? त्याचा बुचडा अंधारात पन वळखू यतो. ’

नारायणने त्याच्याकडे रोखून पाहीलं. तो आपलं विधान बदलेल अशी त्याला अपेक्षा होती. तो बोलत नाही असं पाहून त्याने कदमला विचारले,

‘हे लिहू का? ’

‘त्यांचे म्हणणे जशाच्या तसे लिहून घ्या. त्याचा शहानिशा आपण करूच. ’ नारायण कागदाकडे वळला. कदम म्हणाले, ‘रामेश्वर, विचार करून सांगा. तुमच्या गावकीच्या आढया पोलिसात नको. चुकीचं बोलला तर माझ्याशी गाठ आहे. ’

‘साहेब, त्यो मंजीतच व्हता. त्येच्या बीगर कोन जानार त्येंना भेटाया इत्त्या राती? ’

‘मनजीत कशाला जाईल? ’

‘त्येंची ती ताननानी चाल्ली व्हतीना. वैशालीताई सोबतची. त्याच्या काही निकाल लावायला बोलावला असंन. ’

‘कसली ताणाताणी? ’ चारूदत्तने न रहावून विचारले. तशी ऑकवर्ड शांतता पसरली. आपल्या तोंडून भलतंच निघून गेल्याची  रामेश्वरला जाणिव झाली. कदमला काय बोलावे ते सुचेना. नारायण हातातल्या कागदात नजर गाडून बसला.

‘ते मला माहीत आहे. मी तुम्हाला नंतर सांगेल. ‘कदम हलक्या आवाजात बोलले. मग रामेश्वरला विचारले,

‘प्रताप तुम्हाला बाहेर येताना दिसला, तेव्हा त्याच्या हातात काळया रंगाची बॅग होती का? ’

त्याने टोपी काढून गुडघ्यावर ठेवली. डाव्या हाताने डोके खाजवले. टोपी पुन्हा डोक्यावर ठेऊन मागे ओढली. मग तो बोलला,

‘न्हाई. मी गेल्तो तवा तो मोटरसायकल जवळ उबा होता. आता त्येनं ती आधीच बांधुन ठीवली आसंन त काय म्हाईत न्हाय. पर हातात त काय दिसली न्हाई. दोन मिन्टा त गेला लगे त्यो. ’

‘हूं. ’ ते विचारात गढले.  ‘ठीक आहे. तुम्ही आता जाऊ शकता. तुम्हाला काहीही आठवले तर आम्हाला कळवा. ’ तो लगेच जागेवरून  उठला. त्याला हाताने आडवत कदमने चारूदत्तला

विचारले, ‘तुम्हाला काही विचारायचे काय? ’ त्याने मान हालवली. तेव्हा ते म्हणाले, ‘जाताना प्रतापला पाठवून द्या’

‘जा तुला साहेब आंत बलावू लागले. ’रामेश्वरन बाकावर बसलेल्या प्रतापला खूनसी आनंदाने दारातून सांगितलं.

‘ मला? कशाला? ’ तो घाबरून उभा राहीला.

‘मला काय माहीत? ’ तो मोठयाने म्हणाला. प्रताप जवळ येताच खालच्या आवाजात बोलला, ’तुला जास्त बोलायला कुणी सांगीतलं होतं? आता नीट विचार करून उत्तर दे. मी भायेरच बसेल हे. ’

या वेळी कदम प्रतापला बस सुध्दा म्हणाले नाही. तो खुर्चीची पाठ धरून उभा राहीला.

‘काय प्रताप? तुम्हाला सांगितलं होतं ना, खोटं बोलायचं नाही. ’

‘काय खोटं बोल्लो साहेब? ’

‘तुच सांग? ’

‘न्हाइ साहेब. म्या एक शबुद बी खोटा सांगेल नाय’

‘रामेश्वर सोबत निघून गेल्यावर तुम्ही परत कशाला गेला होता? ’

‘कोन म्हन्लं साहेब? ’

‘रामेश्वर. ’

‘खोट बोल्तो तो. मायला. ’

‘बोलावू का त्याला आंत? ’

त्याच्या चेहऱ्यावरील रंग उडाला. ओठ थरथरले.

‘पुन्ना गेल्तो साहेब, न्हाई म्हनत नै. अरविंदाभाऊला कोन भेटायला येनार ते बगाया गेल्तो. ’

‘खोटं बोलता तुम्ही. तुम्हाला माहीत होतं, त्यांना दारू चढलेली आहे. त्यांच्या त्या अवस्थेचा फायदा घेऊन चोरी करण्यासाठी तुम्ही तिथं गेला. ऐनवेळी त्यांना जाग आली, त्यांनी तुम्हाला पकडले. तुमच्यात झटापट झाली आणि तुम्ही त्यांचा खून केला. असंच झालं की नाही? कबुल करा. ’

‘तुमच्या लगी पाया पडतो साहेब. मला कशात अडकवू नका. म्या कसा बी मानूस आसंन, पर चोरी करनार न्हाई. खुनाचं त डोस्क्यात बी  येनार न्हाय कंधी. ’

त्याचा चेहरा केविलवाणा दिसू लागला.

‘त्या बॅगेत पाच लाखाची कॅश होती. अंगावर सोन्याचे दागिने होते,  गळ्यातली चेन, चार बोटात अंगठया, मनगटात पौची आणि हो घडयाळ होत, लाखभराच तरी असेल. किती किंमत होईल अंदाजे, नारायण? ’

‘बारा- पंधरा तोळे तरी असेल. आजच्या बाजारभावाने चार पाच लाख होतात. ’

‘साहेब, मी देवाची शप्पत घ्युन सांगतो, मी फक्त त्येंना भेटाया कोन येनार ते बघायला गेल्तो. लोकांच्या भानगडीत पडण्याची सवंय नडली.  मी तिथं गेल्तो, पर भाऊला मही चाहूल लागली. त्येंनी आवाज द्युन इचारलं कोन हाय प्रताप का? म्या हौ म्हटलं. त्येंनी मला जवळ बलील. म्या जवळ गेल्यावर त्येंनी मला कशाला आला म्हून बी इचारलं न्हाई. खाड्कन  मह्या थोबाडीत ठेऊन दिली. म्हन्ले, भडव्या, मह्यावर नजर ठीवुन ऱ्हायला. ताबडतोब निघून जा. पुन्हा थोबाड दाखवू नको. खाली मान घालून मी तिठून निघून गेलो. तुमीच सांगा साहेब, आपल्या थोबाडीत मारल्याचं कुनी सांगन का? म्हून आधी म्या काही बोल्लो न्हाइ. देवाची शप्पत साहेब. मह्यावर इश्वास ठिवा. ’

‘तुझ्यावर विश्वास? ’ कदम उपरोधाने हसले. ‘आज आमच्या हातात पुरावा नाही. म्हणून तुला जाऊ देतो. पुरावा मिळाला तर मात्र तू मेलास समज. रिमांड घेऊन ठोकून काढील. अजून वेळ गेलेली नाही. खरं काय ते सांगून टाक. ’

‘समदं खरं सांगितलं साहेब. यक शबुद बी खोटा निंघाला त तुम्ही जे करायचं ते करा. ’

‘ठीक आहे. या तुम्ही आता. ’

पिंजऱ्यातून सुटलेल्या उंदरासारखा तुरूतुरू धावत निघाला.

‘प्रताप. ’ कदमचा आवाज कानावर येताच तो गारठून उभा राहीला.

‘दुसऱ्यांदा परत गेलास तेव्हा तुला मंजीत दिसला? ’

‘मंजीत? ’ तो गर्कन वळाला. त्याचे डोळे चमकले. ‘मंजीत यनार व्हता भाऊंना भेटाया? ’

‘तुला विचारलं तेव्हढया प्रश्नाचं उत्तर दे. ’ कदम कडाडले तसा तो भेदरला. त्याने मान डावी उजवी हालवली.

‘नक्की? ’ त्यांच्या आवाजात जरब होती. त्याने मानेने होकार दिला. त्यांनी हाताने त्याला जायला सांगितले.

‘काय वाटतं तुम्हाला? ’ तो गेल्यावर कदमन चारूदत्तला विचारलं.

‘त्याला खून करायला संधी होती. हेतू आहे. आठ दहा लाखाचा ऐवज असेल. एव्हढया रकमे करीता कुणीही खून करील. ’

‘तशी संधी रामेश्वरलाही होती. प्रताप निघून गेल्यावर मागे तो एकटाच होता. रामेश्वरच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांना शेवटून जिवंत पहाणारा मनजीत ठरतो. ’

‘तो मनजीतच निघावा. ’ चारूदत्तला तिव्रतेनं वाटलं. आपोआपच मार्गातला काटा दूर होईल. लगेच त्याला आपल्या विचारातल्या दुष्टपणाची लाज वाटली. तपास करताना आपण बायसमाईंड असता कामा नये. मनजीतशी वागताना त्याच्याबद्दलचा आकस तपासकामात येणार नाही याची दक्षता बाळगावी लागणार.

उघडपणे तो म्हणाला,

‘जर ह्या दोघांपैकी कुणी खुन केला असता, तर मनजीतला त्यांचे प्रेत सांपडले असते. लगेचआरडा ओरडा झाला असता. ज्याअर्थी तसे झाले नाही त्याअर्थी अरविंदा तेव्हा जीवंत असले पाहीजे. म्हणजे मनजीतचा संशय घ्यायला जागा आहे. पण लग्नाला विरोध करतो म्हणून कुणी भावी

सासऱ्याचा खुन करणार नाही. सासऱ्याचा खुन केला तर प्रेयसी मिळण्याची शक्यताच संपली, एव्हढी साधी गोष्ट कुणाच्याही लक्षांत येईल. ’

‘ म्हणजे, मनजीत गेल्यावर त्यांचा खुन झाला? ’ कदम म्हणाले,

अचानक नारायण बोलला,

‘मनजीत आलाच नाही. मनजीत आला होता कशावरून? रामेश्वर खोटं बोलत असला पाहीजे. ’

दोघांनी  त्याच्याकडे चमकून पाहीलं.

# प्रकरण १०

संध्याकाळने धुक्यां बरोबर धारपवाडीला उत्सुकतेनं आणि कुतुहलाने लपेटून घेतलं.

दिवसभर गांवात एकच चर्चा चालू होती, आज शुक्रवार. पोलिस खरंच अरविंदाच्या खुन्याचं नाव विचारायला सुमनच्या घरी जाणार का? सुमन त्यांना नाव सांगेल का? का नाही सांगणार? सुमन थोडीच सांगते? तिच्या तोंडून देवीच बोलते. आपला भरोसा पाहीजे. तिनंच नाही का अरविंदा कुठं सांपडणार ते सांगितलं? '

सुमनच्या झोपडी जवळ संध्याकाळपासून गर्दी वाढली. झोपडीत माणसं दाटीवाटीनं उभे होते. बाहेर विडया ओढत, तंबाखू मळत, हलक्या आवाजात बोलत उभे होते. हुडहुडी भरविणाऱ्या थंडीची कुणाला फिकीर नव्हती.

अजून पोलिसांचा पत्ता नव्हता. सुमन नेहमीसारखी आंधोळ करून आल्या बरोबर लोकांनी देवीचा गजर केला. भक्तांनी आरती पेटवून खड्या सुरात आरती म्हणायला सुरवात केली. पहीली, दुसरी, तीसरी मग देवीची आरती सुरू झाली.

'दुर्गे दुर्गट भारी'

त्यावेळी नामदेवच्या अंगणात मोटरसायकल उभी करून दोन ड्रेस मधले पोलिस सुमनच्या झोपडीकडे येऊ लागले.

आरती दुसऱ्या कडव्यापर्यंत आली तसा सुमनचा नूर बदलू लागला. हाताचे पंजे एकमेकात घट्ट गुंफले. तिची मान फिरू लागली. नजर ताठरली. फिरणाऱ्या मानेमुळे अंबाडा सुटून केस अस्ताव्यस्त झाले. तिच्या घशातून हूं हूं असा आवाज येऊ लागला.

पोलिसांना पहाताच लोक त्यांना वाट करून देऊ लागले. ते पुढे जाताच मागे गर्दी करू लागले. पोलिस आंत आले तेव्हा सुमन घुडघ्यावर बसून दोन्ही हात गुंफून शरीराला आळोखे पिळोखे देत

होती. गर्दीच्या गर्मीनं आणि शरीराच्या हालचालीनं तिच्या कपाळावर कुंकवाचे लाल धर्मबिंदू चमकू लागले. पोलिसांकडे न पहाता वाकडे ओठ करून हसत ती बोलली,

‘पोलिस कह्याला आले... ?

‘ प्रश्न विचारायला. अरविंदा भाऊचा खुनी कोण आहे? कुणी मारलं त्यांना? ’

त्यांचा प्रश्न आणि तिचा हूंकार सोबत चालला होता. पोलिसांनी विचारल्यावर चेहरा विकृत करून ती खदाखदा हसली.

‘जावा. शोधा की मंग. तुम्ची हूशारी काय कामाची? हे... हे. . नाऱ्या... लई हुषारी दावतो. सांगा त्येला... . ’

‘आई, तुझ्या कृपेशिवाय काय होत नाही बघ. तुला अरविंदाभाऊचं प्रेत दिसलं तसा त्याचा खुनी पण दिसेल. ’

जरावेळ नुसता घुमन्याचा आवाज आला. ती हालचाल न करता जमिनीवर डोकं टेकून पडून राहीली. लोकांना वाटलं, देवी निघून गेली. त्यांची निराशा झाली. देवी गेली तर खुन्याचं नाव कोण सांगणार? दिवसभराची उत्सुकता निराशेत बदलली.

‘माता गेली. चला, ’ कुणीतरी म्हणाले.

सगळयांनी देवीच्या नावाचा जयजयकार केला. तेव्हढयात सुमनच्या तोंडून आवाज आला.

‘थांब. ’ पुन्हा दरडावून म्हणाली, ‘थांब. पळू नको. मागं वळून बघ. तोंड लपवू नकोस. तू हाय व्हय ! ’

‘कोण ? कोण आहे? सांग ... . सांग... . ’

एकच गलका झाला.

‘लई गयावया करून ऱ्हायला. किती रोज लपून ऱ्हाशील? सौताहून म्होरं ये. मंग सोडून दील. ’

कोण आहे ? नाव सांग... . माते. . त्याला आम्ही आत्ता अटक करतो. ’

‘गप ऱ्हावा. तुमचा पोलिसी खाक्या इथं चालायचा न्हाई. त्यो यील... आपल्या पायानं चालत यिल... . आपल्या तोंडानं गुन्हा कबुल करील. धीर पकडा. जावा तुमी. यील त्यो... . जावा... ’

‘कशावरून येईल? ’

‘त्येन शबूद दिला. शबूद मोल्डा त त्याला भोगनं पडन. मंग त यील... . ’

‘आणि नाहीच आला तर? ’

‘कसा येत न्हाई? ह्यो नारायन पकडीनं त्येला... . न्हाई आला त मंगळवारच्या फेरीत त्याच नाव सांगीन... जावा आता... ’

ती पुन्हा जमिनीवर निपचित पडून राहीली. लोकांनी देवीच्या नावाचा गजर केला.

पोलिस काही न बोलता निघून गेले.

ती भानावर आली. कुणीतरी तिच्या समोर पाण्याचा तांब्या धरला. सवंयीप्रमाणे तोंड उंचावून तिने घटा घटा पाणी प्यायला सुरवात केली.

# प्रकरण ११

‘सावकार पळाला. तुला माहीत आहे? ’

दुपारची झोप आटोपून चारूदत्त माडीवरून खाली आला तेव्हा घड्याळात चारचे ठोके पडत होते. भाऊ किचनमध्ये डायनिंग टेबलवर चहासाठी त्याची वाट पहात होते. पोलिसस्टेशनमधून निघायला त्याला दोन वाजून गेले. रामेश्वरची जबानी संपल्यावर कदमनं मनजीतला फोन लावला. (तुम्ही फोन केल्यावर येईल. माझे बँकेत असणे गरजेचे आहे. त्याची विनंती कदमने मान्य केली. )तेव्हा मनजीत म्हणाला, ‘सध्या बँकेत गर्दी जास्त आहे. मी दुपारनंतर साधारण चार-साडेचारच्या सुमारास येतो. ’ त्यावर कदमने, ’आज संध्याकाळी आम्ही सुमनबाईकडे जाणार आहोत तुम्ही उद्या सकाळी आलात तरी चालेल म्हणून सांगीतले. ’ आज आपण येथेच थांबू. कदम चारूदत्तला म्हणाले. आणि त्या दिवशीचे कामकाज तेथेच थांबले.

घरीः राजशेखर कामासाठी बाहेर गेला होता. तो दुपारी जेवायला येणार नव्हता. भाऊ, त्यांच्या वेळेवर  जेवण आटोपून शेतावर निघून गेले होते. मावशीच्या देखरेखी खाली जेवण करुन तो सरळ माडीवर झोपायला निघून गेला. डोक्यात अरविंदाच्या खुनाचे विचार घोळत असताना, जेवणाची सुस्ती आणि हवेतील गारव्याने त्याला झोप लागली.

‘राजशेखर आला नाही का अजून? ’ भाऊं समोर खुर्चीत बसत त्याने विचारले.

‘नाही. ते हातातला पेपर बाजूला ठेवत म्हणाले. इकडे बैस, तिथे डोळयांवर ऊन येते. ’

‘सावकार पळून गेला तुला माहीत आहे? त्यांच्या बाजूला बसल्यावर ते बोलले, ‘नाही ना? मी म्हणालो नव्हतो? काल सकाळी सूर्योदया आधी गाडी काढून निघून गेला. पोलिसांना खबर नाही. आज दिवसभर पोलिस काय करीत होते? ’

‘नंदू, रामेश्वर आणि प्रतापच्या जबान्या झाल्या. ’

‘मग? ’

‘मग काय? प्राथमिक चौकशी आहे. अजून पोस्टमार्टमचा रिपोर्ट यायचा आहे. ठश्याचे रिपोर्ट येतील. ’

‘उगाच वेळ घालवता तुम्ही लोक. त्या सावकाराला अटक करा आणि कस्टडीत घ्या. आत्ता सगळं बोलायला लागतो पोपटासारखा. ’

‘ पुरावा असल्या खेरीज त्याला कशी अटक करता येईल? ’ चारूदत्त हसून म्हणाला.

‘श्रध्दांजलीच्या कार्यक्रमाला देखील नव्हता. मला तर वाटतं तो पळूनच गेला असला पाहीजे. ’ भाऊ त्याच्याकडे सुचक पहात म्हणाले.

‘मी पोलिस स्टेशनाला जाण्या आधी त्यांच्या घरी गेलो होतो. ते गांवात नाही, ऑलराईट. म्हणून त्यांना पळून गेला म्हणता येणार नाही. श्रध्दांजलीला हजर रहावं की नाही हा त्याच्या प्रश्न आहे. तुम्ही काळजी करू नका. माझं लक्ष आहे. ’

त्यांचं आपसात बोलणं चालू असताना रमानं चहा आणला. त्यांच्या पुढयात कप ठेऊन ती सासूच्या शेजारच्या खुर्चीवर बसली. तिच्याकडे पाहून चारूदत्त म्हणाला,

‘वहीनी, तुला एखादी बहिण नाही काय गं? ’ तिने त्याच्याकडे भुवई उंचावून पाहीले. ‘नाही, तुला पाहील्यावर वाटते, तुझ्यासारखीच बायको मिळावी, म्हणून. ’

‘हो आहे ना. माझ्या काकांची आहे पण. चालेल? ’

‘हो चालेल. ’

‘मग थांब दहा एक वर्ष. या वर्षी ती सातवीत जाईल. ’ खोडकरपणे तिने उत्तर दिले.

टेबलावर बसलेले सगळे जण हसू लागले. हसताना भाऊं आणि मावशीने एकमेकांकडे पाहीले. त्यांच्या नजरेत प्रश्न होता. मावशीने खुणेनेच माहीत नाही म्हणून सांगितले.

‘कुठे आहेस ग रमा? काका आहात का घरी? ’ बाहेरून वैशालीचा आवाज आला.

‘हो ये किचनमध्ये आहे. ’ रमा बसल्या जागेवरून म्हणाली.

‘भाऊंनी मावशीकडे पाहीले, मावशीच्या ओठावर सुचक स्मीत तरळले. भाऊंना त्याचा अर्थ कळला. ते सुखावले.

‘चहा चालला वाटतं? ’ ती आंत येऊन रमाच्या बाजूला बसली. ‘काय म्हणतोस चारूदत्त? ’ तिने चारूदत्तकडे डोळे किलकिले करून पाहीले. डोळयावर ऊन आलं म्हणून तिने डोळया समोर पंजा आडवा धरला. उन्हामुळे तिचे बोट लालभडक चमकू लागले.

‘उन्हाचा त्रास होतो का थांब मी खिडकीवर पडदा ओढते. ’ मावशी उठू लागली तशी वैशाली म्हणाली ,

‘राहू दे गं. मी सरकून बसते. ’ तिने जरासे उठून खुर्चीचा कोन किंचित् बदलला. हिवाळी संध्याकाळचा कोवळा  सूर्यप्रकाश तिच्या गोऱ्या चेहऱ्यावर पडला. चारूदत्तच्या ह्मदयात कळ उमटली.

‘मजेत आहे. ’ मावशीकडे नजर टाकून त्याने उत्तर दिले.

‘मी जरा फिरून येऊ का? ’ बोलायला सुचेना तेव्हा तो मावशीला म्हणाला.

‘त्यासाठीच आले मी. मला माहीत आहे, शेखरदादा घरी नाही. हा बोअर झाला असणार. जरा बाहेर जाऊ या.’ मावशीकडे पाहून ती म्हणाली, ‘दोघं. ’

‘जाऊन या ना. ’ मावशी भाऊंकडे पहात म्हणाली.

‘कुठे जाणार? ’ भाऊंनी विचारले.

‘कुठेही. मंदीरात वगैरे. ’

‘मंदीरात अशावेळी जाता येत नाही. त्यापेक्षा तुम्ही गाडी घेऊन कुठेतरी जवळपास जाऊन या. तुला चालवता येईला ना गाडी? आमचे रस्ते धड नाहीत. ’ त्यांनी चारूदत्तला विचारले.

‘गाडी मी चालवणार आहे, काका. फोर व्हीलर चालवायला फार दिवस झाले. ’ ती उठत म्हणाली.

‘अग हो. इतकी घाई? चहा तर घेशील की नाही? ’ रमा तिच्याकडे मिश्किल पहात म्हणाली, ’तो वर चारूदत्त चेंज करून येईल. ’ चारूदत्त न बोलता उठून गेला. त्याच्या चालण्यात उत्साह नव्हता.

कारमध्ये बसण्या आधी चारूदत्तने विचारले,

‘त्यापेक्षा आपण  चालत नदी वर जाऊ. ’

‘नदी! तिच्या नाकाला चुण्या पडल्या. ’ अं हं तिने मान हालवली.

‘मग ते झाड... . . जिथे आपण वनभोजनाला गेलो होतो... ... . ’

‘ते झाड पाडलं. ’

कारमध्ये बसून तिने त्याच्यासाठी दरवाजा उघडला. तो मुकाट्यानं आंत बसला. कार गावाबाहेर निघाल्यावर स्वताः स्पष्टीकरण द्यावे तशी ती म्हणाली,

‘नदी पहील्यासारखी राहीली नाही. गांवातलं सांडपाणी नदीत जातं. घाण वास येतो. जागोजागी वाळू उपसा करणाऱ्यांनी खड्डे खोदून ठेवले. नदीचं पात्र नाल्यापेक्षा लहान झालं. एखाद्या गटारासारखी वाहते. पाहीलं की वाईट वाटतं. ’

चारूदत्तला स्वच्छ पाण्याने झुळझुळ वाहणारी नदी आठवली. डोहात डुंबल्यावर उन्हानं तापलेल्या वाळूत पडायचं. अंगाला चटका बसला की पुन्हा डोहात उडी मारायची. तो आठवणीत गुंतला त्याला डिस्टर्ब न करता ती ड्राईव्ह करीत होती.

रस्त्यावर जागोजागी खड्डे होते. ते चुकविण्याचा ती जराही प्रयत्न करीत नव्हती, मात्र मोठे खड्डे सफाईदारपणे टाळत होती.

‘फार बिकट वाट आहे, नाही? ’

‘हं. खेड्याकडे कुणाचं लक्ष नाही. ’ खड्डा टाळण्यासाठी गाडी रस्त्याच्या खाली उतरली पुन्हा रस्त्यावर आली.

‘कोण लक्ष देणार? ’त्याने विचारले. त्याच्या बोलण्याचा रोख लक्षात येऊन ती हसली.

‘मी राजकारणापासून दूर रहायचं ठरवलं. रस्त्याचं काम कुणीच करू शकणार नाही. कागदोपत्री हा रस्ता खुपदा दुरूस्त झाला. ’

विषय संपल्यासारखे दोघे गाडी टेकडीच्या पायथ्याशी येऊन उभी राहीपर्यंत गप्प राहीले. गाडीतून खाली उतरल्यावर त्यानं टेकडीकडे नजर टाकली. संध्याकाळच्या उन्हात टेकडी हिरवीगार चमकत होती. लहानपणी तो मित्रां सोबत टेकडी वर गेला होता. हिरव्या टेकडीचा कोरलेला खडकाळ भाग कोड फुटल्यासारखा दिसत होता.

‘टेकडीवर जाऊ या का? ’

ओठ बाहेर करून तोंड वाकडं करीत तिने नकार दिला.

‘टेकडी पहील्यासारखी राहीली नाही. जागोजागी खोदून ठेवली. बघ ना अर्धी राहीली नाही. पुढच्या वेळी तू येशील तेव्हा टेकडीच राहणार नाही. ’

‘पहील्यासारखं काय राहीलं वैशाली? ’तिच्याकडे रोखून पहात तो म्हणाला, ‘वनभोजनाचं झाड तुटलं, नदी पहिल्यासारखी राहीली नाही, टेकडी कोरून ठेवली. ’

पुढचे शब्द त्यानं प्रयासानं परतवले. तिच्याबद्दल बोलण्याचा त्याला काही अधिकार नव्हता. मावशीने आपल्याला कां बोलवावं? त्याला मावशीचा राग आला. त्याने दगडाला ठोकर मारली.

त्याचं काहीतरी बिनसलं याची जाणिव वैशालीला घरीच झाली होती. ती म्हणाली,

‘जीवन परिवर्तनशिल आहे. जीवनातील बदल तुम्ही आनंदाने स्वीकारा किंवा दुःखाने जीवनाला त्याची काही पर्वा नाही. तू तरी पहील्यासारखा कुठ राहीला. लहान मुलगा होता, आता बघ कसा हँडसम तरूण झालास. मी तुला इथं का घेऊन आले माहीत आहे?

‘मला इथं का बोलावलं तेच मला समजलं नाही. ’

‘बोलावलं? कुणी? मला वाटलं तू सहज काकूंना भेटायला आला असशील? ’

‘म्हणजे, तुला काहीच माहीत नाही? ’

तिच्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहून त्याला खात्री पटली, तिला त्याबद्दल खरंच काही माहीत नसावं. '

'सांग ना. ' ती आग्रही सुरात म्हणाली.

'अग, आमचं बोलणं झालं नाही. मावशी म्हणाली, महत्वाचं काम आहे, येऊन जा. इथं आल्यावर सांगते. मी येऊन बॅग टेकवली नाही की तो बँकेतला दाढीवाला सरदारजीनं येऊन अरविंदाकाकाची बातमी सांगितली. '

तो अशा रितीने बोलला जणू सरदारजीची सगळी चुकी होती.

'मनजीत. मनजीत होता तो. ' ती म्हणाली. त्याचं नाव उच्चारतांना तिच्या चेहऱ्यावरील मृदूभाव पाहून त्याला खात्री पटली, ती मनजीतच्या प्रेमात पडली आहे. त्याच्या ह्मदयात हलकी कळ उमटली.

'कोण आहे हा? कुठला आहे? असूया लपवत त्याने विचारले.

'जयपुरीयाचा. पंजाबमधील छोटं गाव आहे आपल्या धारपवाडीसारखं. तिथं त्याची शेतीवाडी आहे.

'इतक्या लांब कशाला आला? ' त्यांच्याकडे बँका नाही का? तिरसट सुरात तो बोलला.

'कशाला म्हणजे? नोकरीसाठी. तशी त्याला गरज नाही नोकरीची. घरी गडगंज संपत्ती आहे त्याच्या. वडीलांशी भांडून बाहेर पडला. स्वताःच्या पायावर उभं राहण्यासाठी. बँकेतली नोकरी काय तात्पुरती आहे. एकुलता एक मुलगा आहे. वडील थकल्यावर घरचा कारभार सांभाळायला त्याला परत जावं लागणार. ' ती उत्साहाने बोलत होती.

'तुला बरीच माहीती आहे त्याच्याबद्दल. '

त्याच्या आवाजातला उपहास तिच्या लक्षांत आला नाही. त्याचा दंड पकडून आपल्याकडे वळवीत ती उत्साहाने बोलू लागली,

'चारूदत्त, तुला सांगतेच. आपण बालमित्र आहोत. तुला कुणाकडून तरी कळेलच. '

‘काय? ’ त्याचा जीव अधर झाला.

‘मी... आम्ही... म्हणजे मी आणि मनजीतनं लग्न करायचं ठरवलं. ’ त्याची प्रतिक्रिया आजमवण्यासाठी ती थांबली. ‘तुला आश्चर्य वाटलं नाही? ’

‘नाही. मला हे बाहेरून कळालं होतं. माझा विश्वास बसला नव्हता. तुमच्याकडे, घरी हे मान्य आहे? ’

‘वेडा आहेस का? आमच्या अख्ख्या खानदानात परप्रांतातल्याशी, परधर्मियाशी तर सोड, परजातीत... परजातीतच काय पण आपल्या जातीत सुध्दा राजघराण्याशी संबंध तपासून लग्न झालेत. बाबांचा कडाडून विरोध होता. मी जिवंत असेपर्यंत हे होऊ देणार नाही. असं त्यांनी ठणकावून सांगितलं होतं. ’

‘मग ? ‘

‘मग काय? मी त्यांचीच मुलगी आहे. मीही बजावून सांगितलं, ठिक आहे, तुम्ही जिवंत असेपर्यंत मी लग्न करणार नाही. केलंच तर त्याच्याशीच! तुला काय वाटतं? सांग ना? हा माझ्या जीवनाचा प्रश्न आहे. माझ्या मर्जी विरूध्द कुणाशीही लग्न करून मी सुखी होईल का? ’

‘तू एकटयाच्या सुखाचा विचार करतेस असं नाही वाटत? घरच्यांच्या दृष्टीने विचार कर. तू परप्रांतियाशी लग्न करून जाशील. त्यांना मात्र बदनामीला तोंड देत इथंच... ह्या गांवात... ह्या समाजात रहायचं आहे. ’

तिने दीर्घ श्वास सोडला.

‘मला वाटलं तू मुंबईचा आहेस तर प्रगत विचारांचा असशील. ’

तिच्या आवाजातला उत्साह मावळला.

‘मला सांग, त्यांच्या राजकारणातच अश्या किती व्यक्ति आहेत, ज्यांची बदनामी झाली, जे भ्रष्ट आहेत, ज्यांची प्रकरणं चर्चेत आली तरीही ते उजळ माथ्याने समाजात वावरतात. मतदार संघात जातात. मत मागतात. निवडून येतात. हा प्रवाह आहे. वहात जाणार. दोन दिवस खळखळ होईल.

पाणी पुला खालून वाहून जाईल. पुढच्या वर्षी नवं पाणी येईल. प्रेमविवाह काही नवीन गोष्ट नाही. लोकांना नवा विषय मिळाला की जुना विस्मणात जातो.

‘मुलीला इतक्या लांब द्यायला त्यांचं मन धजावत नसणार. तुलाही तिथं दोन दिवस बरं वाटेल, माहेर सुटल्यावर समजेल. ’

‘तोही प्रश्न नाही. चारूदत्त, त्याने माझ्या करीता इथंच राहण्याचा निर्णय घेतला. तो धारपवाडीतच सेटल व्हायचं म्हणत होता. ’

‘हरे राम! उरावर दुःख बाळगण्यासारखं आहे. ’

‘हेच म्हणाले बाबा. म्हणून आम्ही ठरवलं, जवळच दुसऱ्या जिल्ह्यात सेटल व्हायचं. त्याचे आई-बाबाआहेत तोपर्यंत तिकडची इस्टेट ठेवायची. नंतर ती विकून इकडेच प्रॉपर्टी करायची. ’

‘बराच दूरचा विचार करून ठेवला. तुम्ही लग्न करायचंच ठरविल्यावर माझं मत सांगण्याला अर्थ नाही. मला वाटलं होतं, काकांच्या मृत्युनंतर तरी त्यांच्या इच्छेला मान देऊन तुझं मत बदलेल. ’

त्याने तिच्याकडे अपेक्षेनं पाहीलं. ती लालभडक सूर्याकडे, खालचा ओठ दातांनी चावत एकटक पहात होती. तिनं आपलं बोलणं ऐकलं की नाही याची चारूदत्तला शंका आली. पण तिचा विचार निष्कर्षापर्यंत आल्यासारखी ती भानावर आली.

‘आपल्याकडे ना चारूदत्त, जिवंत माणसांपेक्षा मेलेल्या माणसांची जास्त किंमत केली जाते. जिवंतपणी त्याच्या बोलण्याकडे कुणी लक्ष देणार नाही, पण मरतांना दिलेला शब्द पाळण्यासाठी जीव देतील. नाही? तो धोका माझ्या आधीच कळला. मी ठरवलं, इमोशनल ब्लॅकमेलला बळी पडायचं नाही. ’

‘रणजीतला मान्य होईल का हे? ’

‘रणजीत! मला आडविण्याचा त्याला काय नैतिक अधिकार? ’

चारूदत्तने दचकून तिच्याकडे पाहीलं. प्रेमासाठी ती बेदरकार होईल असे त्याला वाटलं नव्हतं. या अशा भयंकर विचारांच्या मुलीला पहाण्यासाठी मावशीनं आपल्याला बोलवावं याचा त्याला विस्मय वाटला. परवा हीच मुलगी राजशेखरबद्दल बोलताना हळवी झाली होती.

‘त्याला तुझ्याबद्दल सख्या बहीणीसारखं प्रेम वाटतं, ’ चारूदत्त म्हणाला.

‘त्याबद्दल मला शंका नाही. माझ्या मनांतही त्याच्याबद्दल मोठ्या भावा इतकाच आदर आहे. पण या बाबतीत तो माझे मत परिवर्तन करू शकणार नाही. त्याचं स्वताःचं एका पर जातीतल्या मुलीवर प्रेम आहे. तिच्याबद्दल बाबांशी कसं बोलावं ते त्याला कळत नव्हतं. ज्यांनी आपला मुलासारखं संगोपन केलं त्यांच्या मर्जी विरूध्द वागणं कृतघ्नपणाचं ठरेल असं त्याला वाटतं होतं. आता त्याचाही मार्ग मोकळा झाला. ’

‘ते मला माहीत नाही. तो मला म्हणाला, तो तुला त्याच्याशी लग्न करू देणार नाही. ’

‘कसा करू देणार नाही? त्याला एक नियम आणि मला वेगळा नियम? हे मी चालू देणार नाही. का विरोध करणार म्हणाला मला? काही सांगितलं का तुला. ’

‘हो. ’ चारूदत्त घुटमळला.

‘सांग. मोकळेपणाने सांग. ’ ती उताविळपणे म्हणाली.

‘कारण की तो बदफैली माणूस आहे. असं रणजीत म्हणाला, अशा चरित्रहीन माणसाला माझी बहीण देणार नाही. ’

‘बदफैली? चरित्रहीन? तो आपल्या धर्माचा नाही म्हणून त्याच्यावर कसलेही आरोप बिनदिक्कत करता येतील असं वाटलं काय त्याला? कशावरून? ’

तिच्याशी नजर न भिडवता तो बोलला.

‘तुला कदाचित माहीत नसेल, त्याचे सुमनबाईशी संबंध आहेत. प्रतापने आपल्या डोळयांनी त्यांना मिठीत पाहीलं. ’

तिची प्रतिक्रिया पहाण्यासाठी त्याने तिच्याकडे पाहीले. तिच्या चेहऱ्यावर कसलाही परिणाम झालेला दिसला नाही. त्याच्याकडे वळून शांतपणे ती म्हणाली,

‘ते मला माहीत आहे ! ’

‘? ’

डोक्यावरुन एक टिटवी कर्कश्य आवाज करीत उडत गेली.

घरटयाकडे परतणाऱ्या पक्षांच्या थव्याचा कलरव ऐकू येत होता. दूर शेतात काम करणारी धनीण आपल्या धन्याला हाळी घालत होती. गुरांच्या हंबरण्याचा आवाज येत होता. ते दोघे मात्र काहीच ऐकू येत नसल्यासारखे  स्तब्ध उभे होते.

आपण सांगितलेलं ऐकुन तिची इतकी थंड प्रतिक्रिया येईल याची चारूदत्तला कल्पना नव्हती. तिने नीट ऐकलं नाही की आपल्याला तिचे बोलणं समजलं नाही? त्याला संभ्रम पडला.

‘त्याचे सुमनबाईशी... ... ’  त्याने पुन्हा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण तिने पुन्हा तितक्याच शांतपणे उत्तर दिले,

‘मला माहीत आहे. ’ त्याला तोडत ती म्हणाली. ‘माझ्या कानांवर आले. जी गोष्ट गावभर झाली ती मला समजली नसेल असं तुला वाटतं कां?

‘तरीही तू... . ’

‘हो. तरीही मला त्याच्याशी लग्न करायचं आहे. गांवातल्या सांगोवांगी गोष्टी माझ्या कानावर आल्या. मी प्रत्यक्ष त्याच्याशीच बोलले. त्याची बाजू मला पटली. त्याच्याबद्दल गांवात गैरसमज आहे. परक्या माणसाबद्दल  सहज  दुषीत मत होतं.  त्याची बाजू मांडायला कुणी नाही. त्याच्या वर विश्वास ठेवणार कुणी नाही. फार एकटा आहे रे तो. ’

थव्यापासून हरवलेला, वाट शोधणारा पक्षी डोक्यावरून आक्रंदत गेला. तिच्या आवाजातली व्याकुळता त्याच्या ह्यदयाला बोचली.

त्या क्षणी तो समजून चुकला, ही आपली नाही. त्या जाणिवे सरसी त्याच्या ह्यदयात सुरी फिरावी तशा वेदना झाल्या.

‘तुझी... ’ त्याने आवंढा गिळला, ‘तुमची एव्हढी तयारी असेल तर मग... . ’ त्याने वाक्य  अर्धवट सोडून हात उडवले.

जरावेळाने तो रुक्ष आवाजात बोलू लागला.

‘तुमच्या मनांतली राजशेखरबद्दलची शंका व्यर्थ आहे. मी बोललो त्याच्याशी. तो म्हणाला मी खुन्याचा शोध घ्यायला हरकत नाही. पुढे तो असंही म्हणाला, ‘देव तिला सत्य पचविण्याची शक्ति देवो. ’

‘असं म्हणाला? का? ’

‘त्याचा रणजीतवर संशय आहे. ’ दुधाळ प्रकाशांत तिच्या चेहऱ्यावरील भाव निरखत होता.

‘रणजीत! वेडा आहे शेखरदादा. रणजीत असं करू शकत नाही. ’ ती ठामपणे म्हणाली. ‘कशावरून त्याला असं वाटलं? ’

‘तिकीटा करीता. त्याला निवडणूकीला उभं रहायचं होतं ना. ’

‘छा! ’ त्याची कल्पना तिने हाताने उडवून लावली. ‘काहीतरीच. तू त्याच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नको. रणजीत कधीच असं करणार नाही. मला शेखरदादाची काळजी आहे. तो यात नसला म्हणजे मिळवली. तू बोललास का दोघांशी? ’

‘होय. ’

‘काय म्हणाले ते? ’

‘त्यांनी आरोप नाकारले. पण खुन झाला त्या रात्री आपण कुठे होतो, याचे उत्तर दोघेही देऊ शकले नाही. म्हणजे, ते अजून संशयाच्या चौकटीतून बाहेर पडले नाही. ’

ती हसली.

‘शेखरदादाचं माहीत नाही. पण रणजीत त्याच्या फियान्सीला चोरून भेटायला गेला होता. बाबा गेल्यावर ती भेटायला आली तेव्हा तिनं मला सांगितलं. ’

‘म्हणजे तुला वाटते… . ,

‘मला वाटते अंधार वाढतोय आपण घरी गेलेलं बरं. ’

***

वैशालीला सोडून परत येतांना अंधार पडला होता.

तिने त्याला घरात येण्याचा आग्रह केला, पण कार बंद सुध्दा न करता तिला नकार देऊन तो परतला.

अंधारलेल्या चिंचोळया रस्त्यातून माणसांना आणि जनावरांना चुकवत तो काळजीपुर्वक कार चालवत होता. मुख्य रस्त्याला येईपर्यंत त्याला आजूबाजूला पहायला जमलं नाही. मात्र बसस्टँडला येताच रस्ता मोकळा झाला. संध्याकाळची मुक्कामी बस उभी करून कंडक्टर, ड्रायव्हर कुठेतरी गेले होते. बसस्टँड वरील एकुलत्या एक हॉटेल समोर गर्दी होती. वीज अजून आली नव्हती. हॉटेल मधल्या इमरजन्सी दिव्याच्या पांढुरक्या प्रकाशात हालणारे लोक, पडद्यावर हालणाऱ्या सांवल्यांसारखे दिसत होते. त्या सांवल्यातही पगडी घातलेली एक सांवली वेगळेपणाने उठून दिसत होती.

मनजीत!

चारूदत्तला सुध्दा तो ह्या अंधारात नेमका ओळखायला आला तर मग रोज पहाणाऱ्या रामेश्वरच्या नजरेला धोका होण्याची शक्यता नव्हती. तेव्हा वीज आलेली होती. रामेश्वरच्या जबानीप्रमाणे अरविंदाला शेवटून जिवंत पहाणारा मनजीत होता. मनजीत जाण्या झोपडीत आधी त्यांचा खून झाला असता तर मनजीतने तात्काळ पोलिसांना खबर द्यायला हवी होती. ती त्याने कां दिली नाही?

काहीतरी सनसनाटी गोष्ट घडली असली पाहीजे. लोक उत्तेजीत होऊन एकमेकांशी बोलत होते. बस शेजारी कार उभी करून तो खाली उतरला. अंधारात त्याच्याकडे कुणाचे लक्ष नव्हते.

नंदू भोवती माणसे गोळा झाली होती. तो हातवारे करून मोठया आवाजात काहीतरी सांगत होता,

‘मायला, सुमनबाईचं आजवर खोटं ठरलं न्हाई. ती बोल्ली त बोल्ली. दोन रोजातच कळन कुनी खुन केला. आँ ! मंजी काय? मी तिठंच व्हतोना. खोटं वाटत आसंन त इचार मनजीतला. ’

गर्दीतून वाट काढून चारूदत्तने मनजीतच्या खांद्यावर हात ठेवला.

‘कौना है जो? ’ तो दचकून पंजाबीत ओरडला.

हातातला चहा त्याच्या अंगावर सांडला. समोर माणसांचे कोंडाळे नसते तर तो पळला असता. त्याच्या त्या कृतीनं नंदूच बोलणं अर्धवट सुटलं. जमलेले लोक त्याचा उडालेला गोंधळ पाहून हसू लागले.

‘सॉरी, मनजीत. तुला घाबरविण्याचा हेतू नव्हता. ’ चारूदत्तने दिलगीरी व्यक्त केली.

चारूदत्तला पाहून भोवतीचे लोक बाजूला सरकले. आपल्या येण्यानं त्यांची रंगात आलेली महफिल तुटल्याचं चारूदत्तच्या लक्षांत आलं.

‘चाय पीणी? ’ मनजीतने विचारले. आता ते तिघेच राहीले होते.

‘नाही. घरी निघालो होतो. तुम्हाला पाहून थांबलो. काही सनसनाटी घडलेलं दिसतं. ’

‘हौ. चारूदत्त, तू कुठ गेल्ता? मला वाटलं तू सुमनबाई कडं येशीन. ’

‘तू गेला होतास का? ’

‘आम्ही समदे व्हतो. मंजीत, रामेशर, रणजीतभाऊ, शेखरभाऊ, प्रताप. ’

रणजीत आणि राजशेखरने का जावं ? चारूदत्तला प्रश्न पडला. उघड त्याने विचारले,

‘काय म्हणाली सुमनबाई? कुणाचं नाव सांगितले? ’

‘नाव न्हाई घेतलं कुणाच. म्हन्ली, खुनी गांवातलाच है. दोन रोजात आपल्या पायानं चालत ईन. न्हाई आला त मंगळवारी त्याचं नाव समद्या समोर सांगीन. ’

नंदू बोलत असतांना मनजीतची चुळबुळ चारूदत्तच्या नजरेतून सुटली नाही. त्याला तेथून जाण्याची घाई झालेली दिसत होती.

‘तुम्ही पण होता का तिथे? ’ चारूदत्तने अचानक मनजीतला विचारले.

‘जी? ’ एकदम विचारलेला प्रश्न त्याला कळला नाही. ‘जी. ’ त्याने त्रोटक उत्तर दिले. आपली बाजू मांडावी तसा मनजीत पुढे बोलला, ‘मी हमेशा जात असतो सुमनमौसीकडे. ’

त्याच्या आवाजात कंप होता का? जरा उजेड असता तर त्याच्या चेहऱ्यावरील भाव दिसले असते. यानंच तर अरविंदाचा खून केला नसेल ना? हा खुनी असेल तर वैशाली काही ह्याच्याशी लग्न करणार नाही. आपले विचार बायस होताहेत. खुना सारख्या गोष्टीत आपल्या वैयक्तिक भावना येऊ नये. उद्या तो पोलिसस्टेशनला जबानी द्यायला आला तर आपण तटस्थपणे त्याची जबानी ऐकली पाहीजे. त्याने स्वतःला बजावले.

‘मला काम आहे. मी निघु का? ’ चारूदत्त काही बोलत नाही असं पाहून मनजीतने विचारलं.

‘अं हो. ’ भानावर येत चारूदत्त म्हणाला, ‘उद्या पोलिसस्टेशनला भेटूत. ’ आपला आवाज विनाकारण पोलिसी झाला, असं त्याला वाटलं.

तो गडबडीनं निघून गेला. चारूदत्त त्याच्या पाठमोऱ्या आकृतिकडे पहात राहीला. जातांना त्याने दोन-तीनदा मान वळवून मागं पाहीलं. जणू कुणीतरी आपल्यामागे येईल अशी त्याला भीती वाटत होती.

‘हा मनजीत कसा आहे, नंदू? ’

‘घाबरट आहे. पहिल्यांदा घर सोडून इतक्या दूर आला. आता त काही नाही, नवीन व्हता तव्हा इतका घाबरट व्हता, मान खाली घालून काम करत असन, आन त्येच्या समोर कुणी उभं राहीलं तर घाबरून वर पहायचा. अजूनबी मागून आवाज दिला, न्हायतर अवचित खांद्यावर हात ठेवला त इतका दचकतो... . पाहीलं ना तू आत्ता? ’

चारूदत्तने विषय बदलला. ‘तर मग नंदू, मंगळवारी खुनी सांपडणार? ’

‘ कानू मायला, सुमनबाई बोल्लीत खरं. ’

‘तिला खरंच भविष्य कळतं का? ’

‘कानू बा. लोक म्हणत्यात त खरं. आपल्याला काय कधी जायाचं काम पल्ड नाही. ’

नंदू सारख्या निष्पाप आणि समाधानी माणसाला सुमनबाईकडे जाण्याची गरजच काय ? त्याला नंदूचा हेवा वाटला.

‘चल नंदू, ’ मी पण निघतो. त्याच्या खांद्यावर थोपटून तो कारकडे निघाला.

मनजीत एव्हढा का घाबरतो? त्यानेच अरविंदाचा खून केला म्हणून? त्याने जर खुन केला असेल तर... ... .

विशफुल थिंकींग!  मनजीत इथं आल्यापासून तसाच आहे. नंदूनं सांगितले नाही का?

परक्यावर संशय घेण सोपं असतं. उद्या तटस्थपणे त्याची जबानी ऐकायची.

स्वताःला बजावत त्याने कार सुरू केली.

# प्रकरण १२

मध्यरात्र उलटून गेली. साडे-बारा, एकही वाजला असेल. सिनेमा सुटूनही बराच वेळ झाला. सर्वत्र सामसूम पसरली होती. थंडीच्या कडक्यामुळे दूरवर एखाद्या कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला तरी त्याला दुसरं कुत्र प्रतिसाद देत नव्हतं.

वैशालीला झोप येत नव्हती. कशी येणार? डोक्यातला विचारांच्या आवर्तनामुळे झोप येत नव्हती. झोप येण्यासाठी तिने पुस्तकात मन रमविण्याचा प्रयत्न केला, पण मन पुनःपुन्हा त्याच विचारां भोवती फिरत होतं.

चारूदत्तने तिला घरी सोडले आणि आंत येण्यास नकार देऊन कार वळवून निघून गेला. तेव्हा तिच्या मनाची  बेचैन अवस्था झाली. तो आंत येण्यास का नकार देतो याची तिला कल्पना आली. त्याच्या सुरातून, त्याच्या वागण्यातून स्पष्ट जाणवत होतं की तो तिला टाळत होता.

कारण तो माझ्या प्रेमात पडला आहे!

ही भावनाच तिच्या मनाला हेलावून गेली. तो आपल्या प्रेमात पडेल असा पुसटसा विचारही कधी तिच्या मनांत आला नव्हता. ती त्याच्याकडे आपला बालमित्र, सवंगडी म्हणून पहात होती. पंधरा वर्षांनी जेव्हा काल ते माडीवर तिच्या खोलीत भेटले, तेव्हा त्याची अवस्था भारावल्यासारखी झाली होती. तेव्हा तिच्या लक्षांत आले नव्हते. आज संध्याकाळच्या भेटीत त्याच्या हालचालींवरून त्याच्या मनाची कल्पना आली. ती मनजीतशीच विवाह करणार असल्याचं ठामपणे सांगत होती, तेव्हा त्याचा चेहरा मलूल झाल्याचं तिच्या नजरेतून सुटलं नाही.

हा कधीपासून आपल्या प्रेमात आहे? पंधरा वर्षानंतर काल पहील्यांदा पहीलं एकमेकांना. पहील्या नजरेतच तो माझ्या प्रेमात पडला? त्याला असं वाटलंच कसं? आपण तरी कश्या बावळट, त्याला पहील्यासारखा सवंगडी समजून मनातली गोष्ट त्याला बिनदिक्कत सांगितली. धांवत जाऊन त्याचा हात पकडला. त्यामुळे त्याचा गैरसमज झाला का?

तो नेमका इतक्या वर्षांनी कसा आला? सहज की मुद्दाम? की त्याला कुणी बोलावलं? त्याला कोण बोलावणार? अर्थात काकू. आम्हीच्या भेटीतून परस्पर आकर्षण निर्माण होईल, आमचं लग्न जमेल या विचाराने तिनं त्याला बोलावलं असलं पाहीजे. म्हणून त्याच्या मनांत माझ्या विषयी प्रेमभाव निर्माण झाला.

‘ते काही असलं तरी मी त्याच्या विचार करणार नाही. ’

तिने पुन्हा कुस बदलून जणू त्याच्या विचारांकडे पाठ फिरवली. ‘नाही. मी मनजीतशिवाय कुणाचा विचार मनांत येऊच देणार नाही. ’ मनजीत तिच्या हृदयात एव्हढा ठसला, की त्याची प्रतिमा पुसून टाकणे केवळ अशक्य होतं.

मनजीत!

मनजीतचा देखणा चेहरा तिच्या डोळ्या समोर उभा राहीला. नाही, ती मनजीतशिवाय कुणाचा विचार करणं शक्य नाही. तिने त्याला तसं वचन दिलं आहे. अनेकदा. वारंवार आणि पुन्हा-पुन्हा देत राहील. मनजीत कुणी कितीही प्रयत्न करू दे. मी शिळेसारखी अचल राहील. तिला त्याच्या विचारापासून प्रवृत्त करण्यासाठी थोडे का प्रयत्न केले?

मनजीत... . . त्याच्या आठवणींनी तिच्या मनाला पिळ पडला. कां रे तू भेटलास? कोण कुठला दूर प्रांतातला... . धारपवाडी सारख्या छोटया गांवात येतो आणि आपल्या आयुष्याचा ताबा घेतो. ही ईश्वरी योजनाच म्हणावी लागेल. त्याशिवाय का आमची भेट झाली?

पहीली भेट झाली तेंव्हाच तिला त्याच्याबद्दल दया वाटली. दया! या शब्दावर तिचे विचार अडखळले. होय दयाच. त्याची नजर किती भेदरलेली होती. घरटयापासून दूरावलेल्या पांखरासारखी, कळप सुटलेल्या पाडसासारखी त्याची अवस्था होती. त्यांची पहीली भेट बँकेत झाली. पैसे काढण्यासाठी ती बँकेत गेली होती. तिला पहाताच नंदूने आदबीने पुढे येऊन विचारले,

‘खुप दिसांनी ताई. पैसे भरायचे का काढनं व्हते? ’

‘भरायला कुठे पैसे आहेत? खर्चायला पैसे नाहीत. ’ तिचे लक्ष काऊंटरवर बसलेल्या मनजीतकडे गेले. तो खालीमान घालून काम करीत होता. ती त्याच्या समोर जाऊन उभी राहीली. त्याने दचकून वर पाहीले. तिला नवल वाटलं, तरूण मुलीला पाहून इतकं दचकण्याचं काय कारण?

‘कुठून आलात? ’ तिने हिंदीतून विचारले.

‘पंजाबसे. ’ त्याने हळू आवाजात उत्तर दिले.

‘इतक्या दूरू कशाला आलात? ’

‘पेट भरने के लिए आये हैंजी. ’

‘पंजाबात बँका नाहीत का? ’ तिने तुसड्या आवाजात विचारलं.

‘नंदूने गालात हसत पेमेंट स्लिप मनजीतकडे दिली. मनजीतनं काही न बोलता इंकपॅड तिच्या समोर धरलं. त्याचा आशय लक्षांत येताच नंदूच्या हातून पेन घेऊन तिनं झोकदार सही केली. आणि आढयतेनं विड्रॉल स्लिप त्याच्या समोर धरली.

‘आप तो पढी-लिखी  हैं जी, फिरभी ऐसी बातें करती हो? ’

तिने चमकून त्याच्याकडे पाहीलं. तो तिच्याकडे रोखून पहात होता. आपल्या कोत्या शेरेबाजीची तिला शरम वाटली.

‘अशी गोष्ट नाही. बाहेरचे लोक येतात, मग आमच्या लोकांनी कुठं जायचं? पंजाबला? ’

‘तकदीर कहॉं ले जायेगी कौन बता सकता हैं? हम खुशीसे थोडेही न आये. मॅडम कॉम्पिटेशन में आये हैं. कॉम्पिटेशन करने से हमने किसीको रोका नही था. वे पिछे रह गये इसमें हमारी क्या गलती? हम तो किस्मत के मारे अपनोंको छोड़कर आये. आप भी हमें ठूकरायेंगे तो हम कहॉं जाये? ’

त्याच्या सुरातलं एकाकीपणाचं दुःख तिच्या मनाला स्पर्शुन गेलं. आपण कठोर बोलायला नको होतं. बिचाऱ्याला इतक्या दूरवर पाठवून बँकेनं आधीच अन्याय केला. पुन्हा आपल्यासारखी लोकं त्याला टोचून बोलणार.

‘सॉरी. तुम्हाला दुखविण्याचा हेतू नव्हता. ’तिने मोकळया मनाने दिलगीरी व्यक्त केली.

‘अलग खलिस्थान चाहिए बोले तो सारे देशमें आग लग गयी थी. पंजाब चाहीए तो पंजाबी को अपनाना पडेगा. ’

ती त्यांची पहीली भेट.

तो खुप एकटा आहे. परप्रांतिय म्हणून त्याची हेटाळणी केली जाते. गांवातल्या तरूण मुलांमध्ये, त्याचा नोकरीमुळे आणि त्याच्या शहरी राहणीमानामुळे, त्याच्याबद्दल आकस आहे. ते त्याच्याबद्दल तुच्छतेने बोलतात.

एक-एक भावना झिरपत जाऊन तिला त्याच्याबद्दल आपुलकी वाटू लागली. त्या आपुलकीतून ती त्याच्याशी बोलू लागली. तोही  तिच्याशी मोकळेपणाने बोलू लागला. त्यांच्यात भेटीची ओढ कधी निर्माण झाली ते कळलं नाही. तिलामधूनच त्याची आठवण येई, त्याच्या ओढीने ती बँकेत जाई.

छोटया गांवात अशा गोष्टींची चर्चा व्हायला वेळ लागत नाही. ही गोष्ट घरच्या लोकांच्या कानावर गेली तेव्हा त्यांनी तिचे बँकेत जाणं बंद केलं. भेटीवर बंधन आलं तेव्हा साक्षात्कार झाल्यासारखं तिला कळालं, त्याला भेटल्याशिवाय आपण राहू शकत नाही!

‘ह्यालाच प्रेम म्हणतात. वेडे, तू त्याच्या प्रेमात पडली! ’

सुरवातीला तिने आपल्या विचारांचा विरोध केला. मनांतून तो विचार काढून टाकण्याचा प्रयत्न केला. झोपेतून उठल्यावर मनांत  पहीला विचार, पहीलं नाव मनजीतचं येऊ लागलं. एकदा त्याला भेटावं अशी इच्छा उफाळून वर येऊ लागली. त्याला भेटायचा काही मार्ग दिसत नव्हता.

अचानक तिला मार्ग सांपडला आणि तिची कळी खुलली. रवीवारी तो बुलडाण्याला वेळ घालवायला जातो. त्याला तिथं भेटाता येईल. नंदू मार्फत भेट ठरवून ती त्याला भेटायला गेली. त्याभेटीत दोघांना साक्षात्कार झाला, की ते प्रेमात पडलेत. संकोच न बाळगता त्यांनी प्रेमाची कबुली दिली आणि त्यांच्या जीवनात एक वादळवळण आलं.

जेव्हा तिने घरात प्रेमाचा स्फोट केला. आम्ही दोघं लग्न करणार आहोत म्हणून जाहीर केलं तेव्हापासून घरात युध्द सुरू झालं. बाबांच तिच्यावर अतिशय प्रेम होतं, तरी तिला त्यांनी जोरदार विरोध केला, मनजीतला धमकी दिली पण त्याने त्याला दाद दिली नाही. बाबा साम, दाम, दंड, भेद

नीति वापरणार हे तिला पुरतं ठाऊक होतं. म्हणून जेव्हा तिला मनजीत आणि सुमनबाईच्या संबंधाची बातमी घरच्या मोलकरणीने सांगितली तेव्हा तिने अजिबात विश्वास ठेवला नाही. तिला मनजीतकडून त्याचं स्पष्टीकरण हवं होतं. त्यांची भेट झाल्यावर तिने पहीला प्रश्न विचारला,

'मन, रागावू नकोस, माझा तुझ्यावर विश्वास आहे म्हणून तुला सरळ विचारते. तुझ्या आणि सुमनबाईबद्दल गांवात बोललं जातं ते कितपत खरं आहे? '

'वैशाली, मी तुझ्याशी खोट बोलणार नाही. गांवात जे बोलल जातं; त्याला कारण मीच आहे. मला माफी दे. '

'म्हणजे तुमचे... ? '

'माझ्याकडून चुकी झाली हे मी मान्य करतो. तू मला क्षमा करशील ना? '

'काय चुकी झाली? मला नीट सांग. '  तिच्या आवाज कठोर झाला.

'आधी सांग, तू मला क्षमा करशील. मला सोडून जाणार नाही. '

'ते मी ऐकल्यावर ठरवेल. तू सांग. ' ती कोरडेपणाने म्हणाली.

'तेणू तो पता है... '

'हिन्दीत सांग. '

'तुला माहीत आहे, माझा जेवणाचा  डबा सुमनमौसीच्या घरून येतो. ही तिच्या भावाच्या डोक्यातून निघालेली कल्पना. माझ्या जेवणाचा प्रश्न मिटेल, तिलाही दोन पैसे मिळतील असं त्याला वाटलं. ती स्वताः करता जे जेवण बनविल तेच मला देते. तसा तर ती डबा पाठवते, पण कधी मला भूक लागली किंवा शनिवारचा दिवस असला तर मी दुपारी बँक बंद झाल्यावर तिच्याकडे जातो.

ती शनिवारची टळटळीत दुपार होती.

आता तो समोर बसलेल्या वैशालीला विसरून गेला. त्याची नजर शुन्यात गेली. ती दुपार  त्याला स्पष्ट दिसत होती. पश्चाताप होऊन पापाची कबुली देणाऱ्या अपराधी माणसासारखा तो बोलू लागला.

‘बैशाख महीन्याचा सूर्य आग ओकत होता. उष्म झळयाने सृष्टी स्तब्ध झाली होती. गोठ्यातील जनावरंच  काय पण झाडावरील  पांखरं सुध्दा आवाज करीत नव्हती. वारा पडला होता. मला भूक लागल्याने मी सुमनबाईच्या झोपडीकडे निघालो, नाहीतर एव्हढया उन्हात गाढव सुध्दा बाहेर पडलं नसतं.

रानांत नुसता शुकशुकाट पसरला होता.  शेतकरी, शेतमजुर काम थांबवून सांवलीला विसावली होती. मी सुमनबाईच्या झोपडी जवळ गेलो. तिच्या झोपडीचा दरवाजा अर्धवट बंद होता. खरंतर मी दरवाजा वाजवून आंत जायला पाहीजे होतं, पण आमची इतकी जवळीक झाली होती की सरळ दार उघडून आंत जाण्यात मला काही गैर वाटले नाही. दार उघडून मी आंत गेलो आणि खिळून जागीच उभा राहीलो.

सुमनबाई उताणी झोपली होती. गर्मीमुळे तिने चोळीची गाठ सोडून अंगावर पातळाचा पदर घेतला होता. गाढ झोप लागल्याने तिला ढळलेल्या पदराची जाणिव नव्हती. मी अनिमिष नजरेन श्वासा बरोबर हलणाऱ्या छातीकडे बघत होतो. माझ्या अंगातून बिजली गेल्याचा भास झाला. अंगाला कंप सुटला. घशाला कोरड पडली. मनावरचा ताबा सुटला. मी काय करतो आहे याचे भान राहीले नाही. तिच्या वरील नजर न हटवता मी झोपडीचा दरवाजा लोटून घेतला. एखाद्या कळसूत्राने ओढावं तसं चालत तिच्या जवळ जाऊन गुढग्यावर बसलो. बेखबर  सुमनबाई शांतपणे झोपली होती.

मी हलकेच तिच्या छातीला कुरवाळले.

माझ्या स्पर्शानी ती जागी झाली. तिने डोळे उघडून माझ्याकडे पाहीलं. अचानक झोपेतून जाग आल्यानं वास्तवात काय घडतं याचं तिला भान आलं नाही. जेव्हा तिला परिस्थितीची जाणिव झाली तेव्हा तिने दोन्ही हातांनी मला दूर ढकललं आणि ती जोरात ओरडली,

‘काय करून ऱ्हायला रे मेल्या? तुला शरम वाटत नाही? ’  तिनं खाड्कन मुस्काटात मारली. शरमेनं, ओशाळवाणा मी गालावर हात ठेऊन एका बाजूला कलांडलो. जागेवरून हालण्याचं त्राण नव्हतं. संतापाने तिचा चेहरा लालबुंद झाला होता. तिच्या नाकपुड्या थरथरत होत्या. भुवया वांकड्या झाल्या. झालेल्या अपमानानं तिच्या डोळयातून पाणी ओघळत होतं.

‘मेल्या, तुला पोरासारखी समजून जवळ केलं आन् तुह्या मनांत असं पाप कसं आलं? तुला काय म्या अशी तशी बाई वाटली कां? ह्येच्यासाठी यत व्हता का इत्त्या रोजापासून मह्याकडे? ऑ? उठ आन् व्हय घराच्या भाईर. पुन्ना उंबरठा वलंडायचा न्हाई माहा. उठ... . उठ म्हंतेना... . . नींघ... . कालतोंडया. . ’

‘सुमनबाई... . . ’ कसंबसं बोलण्याचा प्रयत्न करीत मी म्हणालो. ‘सुमन मौसी. . ’

‘बोलू नग मह्याशी. म्हन्ल, यकटं लेकरू हाय. जीव लावावा. आपल्याला झालं असतं त यव्हढंच असतं. मायच्या मायेनं जवळ केलं त त्याच्या मनांत असलं अभद्रपाप मेल्याच्या! शेवटी रगताच ते रगताच, परकं ते परकंच! महीच चूक झाली. ’

‘नाही सुमनमौसी माझी चूक झाली. मी पुढे होऊन तिच्या पायांना मिठी मारली. माझी चूक झाली सुमनमौसी पुन्हा अशी चुक होणार नाही. एकवेळ माफी कर. मी तुझा पोरगा समजून ... . ’

‘पोरगा? पोरगा अस वागतो का मायशी? बोलाया शरम वाटते का तुला? ’ ती रडत होती. पाय सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत होती.

‘तू माफी करीत नाही तोवर मी पाय सोडणार नाही. ’ पायांवरील पकड घट्ट करीत मी म्हणालो, मी चुकलो. गांवात तुझ्याबद्दल लोक बोलतात म्हणून माझ्या मनांत पाप आलं. मला क्षमा कर. आजपासून मी तुला माय- मावशी समजेल. मौसी, घर दार सोडून मी इतक्या दूर आलो. तुझ्याशिवाय मला कोण आहे? मला तुझा मुलगाच समज. ’

मी अनावर होऊन रडत होतो. माझे रडणं पाहून तिच्या ह्यदयाला पाझर फुटला. तिने दोन्ही हातांनी धरून मला जवळ घेतलं. तिच्या खांद्यावर डोक ठेऊन मी रडत होतो. तिचा हात माझ्या पाठीवरून फिरत होता. खरं सांगतो, तिच्या खांद्यावर डोकं ठेऊन रडताना बरं वाटत होतं.

जबसे घर छुटा पहीलीबार किसीका प्यार पाया. त्या मायेच्या साक्षात्कारानं अन् त्या प्रेमाचं मी काय करणार होतो? याची जाणिव होऊन भडभडून येत होतं.

मला पुनःपुन्हा भरून येत होतं. वाटल होतं, काळ पुढे सरकूच नाही. तसंच बसून रहावं.

एव्हढयात झोपडीचा दरवाजा उघडला.

दारात प्रताप उभा होता !

मौसी पाठमोरी होती. तिची पाठ अजूनही उघडीच होती. मी तिच्या खांद्यावर डोक ठेऊन बसलो होतो. दूरून पहाणाऱ्याचा गैरसमज होणं सहाजिक होतं. त्याच्या चेहऱ्यावरील कुत्सित हास्य मला इतक्या दुरूनही स्पष्ट दिसलं. काही बोलायच्या आंत त्याने दार  लोटून घेतलं.

मी बाहेर येऊन पाहीपर्यंत  तो दूर निघून गेला होता.

झालं ते असं झालं. चूक माझीच होती. त्याबद्दल सुमनमौसीने मला माफी दिली. वैशाली, तू मला हवी ती शिक्षा दे. मी भोगायला तयार आहे. पण मला सोडून जाऊ नकोस. मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही.

दोन्ही हात जोडून तो तिच्या समोर गुढघ्यावर बसला.

त्याचे हात हातात घेऊन ती तेव्हा जे बोलली होती, तेच वाक्य आपसूक तिच्या तोंडून बाहेर पडलं.

‘नाही मनजीत, काहीही झालं तरी मी तुला सोडणार नाही. ’

तिने पुन्हा कुस बदलली.

******

आरती झाल्यावर लोक निघून गेले. सुमन रिकाम्या मनानं खांबाला टेकून बसली. तिला वाटलं, मनजीतला थांबवलं असतं घटकाभर तर बरं झालं असतं. आज मन काही थाऱ्यावर नाही. जीवाला नुस्ती हूरहूर लागून राहीली. लई यकटं वाटून राहीलं. हातपाय जडशीर झाले. इतका थकवा तिला पहिल्यांदा जाणवत होता.

आजची गर्दी पाहून तिला मनातून आनंद झाला. गर्दी मंजे उत्पन्न. गर्दी मंजे लोकांचा इश्वास. गर्दी मंजे  किरत. असंच जर लोकं येत ऱ्हायले तर मोल मंजुरी कराया नको. गांवात धाक जमला त वाड्यात लोकांचा तरास बी कमी हुईल.

भविष्याची स्वप्न पहातांना तिला गुंगी लागली. मान खांबाला टेकविली. काहीतरी गडबड आहे याची तिला जाणिव झाली, पोटत आग पडल्यागत वाटू लागलं. हातपाय इतके जड झाले की हलवत नव्हतं. जीभ कोरड पडली. डोळे न उघडता तांब्या ठेवलेल्या दिशेला हाताने चांचपडले. तिच्या हाताला काही लागल नाही.

तिन डोळे ताणून पाहीलं. कंदीलाच्या पडछायेत तिला तांब्याची आकृति दिसली. तिनं पुढं झुकून हात लांबविला. तिचा हात हवेत फिरला. असं कसं झालं? तिचा अंदाज कसा चुकला? डोळ्यांवर आलेलं धुकं मान झटकून दूर केलं. इतका थकवा... . पोटातली आग वाढतेच आहे. काय चुकल माते?

तिसऱ्या प्रयत्न्यात तांब्या हातात आल्यावर तिला बरें वाटलं. सवंयीप्रमाणे तांब्या उंचावून तोंडात धार न सोडता ओठांना लागला.

पहीला घोट घेतल्यावर पाण्याची चव बदलल्याचं तिला समजलं. आधी प्यायली तेव्हा गर्दीमुळे, लोकांच्या जयजयकाराच्या आवाजानं, श्वास फुलल्यामुळे तिच्या लक्षांत आलं नव्हतं. आता तिला जाणवलं, पाण्याची चव वेगळी लागते. अस्पष्ट प्रकाशांत तिनं हातातला तांब्या निरखुन पाहीला.

हा तिनं भरून ठेवलेला पाण्याचा तांब्या नव्हता.

आरतीच्या आधी भरून ठेवलेला तांब्या देवीच्या फोटो समोर तसाच दिसत होता.

झटक्यात उभी राहून तिनं खांबाला लटकवलेला कंदील काढून तांब्यात डोकावून पाहीलं. आंत, उरलेलं अर्धेअधिक पाणी डुचमळत होतं. तिनं नाका जवळ नेऊन वास घेतला. कसलीसी आशंका येऊन ती तशाच झोकांड्या खात बाहेर आली. कंदील उचलून तिने खोपीच्या वाश्याला अडकवलेला एन्ड्रीनचा डबा पाहीला. तो जागेवर होता. तो उपसून काढतांना तिला आपला तोल सावरता येत नव्हता.

डबा हातात घेऊन तिने हालवला. आंतून काही डूचमळल्याचा आवाज आला नाही. अविश्वासानं, पुन्हा हालवला. थरथरत्या हातानं झाकण खोलून तिनं डबा उपडा केला.

तो रिकामा होता !

काय झालं ते लक्षांत येताच तिनं जीवाच्या आकांतानं  भावाला हाळी घातली.

‘नामदेव... ... . ’

टूरिंग टॉकिजच्या भोंग्यातून सिनेमाचा कर्कश्य आवाज येत होता. तिचा आवाज त्याच्यापर्यंत पोहचला नाही.

तिने चालत जायचं ठरवलं. जाण्यासाठी वळली तशी तिला जोरदार चक्कर आली. भिंतीचा आधार घेतला नसता तर जमीनीवर पडली असती हातातला डबा निसटून पोकळ खडखडाट झाला. कंदील हींदकळून तिची सावली भिंतवर नाचली.

निराश मनानं तिनं भावाच्या बंद दरवाजाकडे पाहीलं. हे अंतर पार होणार नाही याची अगतिक जाणिव झाली. काय करू? पोटातली आग वाढत चालली. हातापायांना कंप सुटून आकडी येंऊ लागली. काय करू ? तिने पुन्हा जीवाच्या आकांतानं भावाला आवाज दिला.

आता  तर आवाजही निघत नाही. काय करू?

थरथरत्या हातानं तिनं कंदीलाच झाकण उघडलं. झोपडीला लावलेल्या सनकाड्या ओढून त्याच्यावर रॉकेल ओतले. कंदीलाच्या वातीवर पेटवून बाजूला रचून ठेवलेल्या कडब्याच्या  गंजीवर फेकल्या. क्षीण हातांनी फेकलेल्या वजनरहीत जळत्या कांडया तिथपर्यंत पोहचल्या नाही. घुक्यानं ओलं झालेल्या  गवतावर पडलेल्या कांडया जागीच जळून विझून गेल्या. आता मदत मिळण्याची शक्यता संपली. सकाळपर्यंत कुणी फिरकणार नाही. तिनं निराशेनं जमिनवर माथा टेकला.

जमिनीवर माथा टेकल्यावर तिला आईच्या कुशीत शिरल्याचं समाधान वाटले.

‘कह्याला करायचा जगण्याचा आटापिटा? कोन्त सुखी जीवन मिळालं? संपल तर बरं. तिनं मातीला कुरवाळलं. ‘ही बीन मायच हाय मही. ’

माय!

ये माय सुमन, मह्या मांडीवर. लई थकलीस.

माय! तिला माय दिसली. सुमन डोकं मांडीवर घेऊन  बसली होती.

सीते वानी माही पोरगी... .  बाबांचा आवाज.

तुला माझी बनविनच... . . अरविंदा ! राक्षसा, तुझ्या मुळं वाटोळं झालं रे मह.

समदं इसरून घरला ये सुमन... . . नवऱ्याचा आर्जवी आवाज.

‘सुमनमौसी माझी चूक झाली. ’

मनजीत... . मनजीत... तुहं चुकलं नाय रे पोरा... . मलाच बाळाची लई हौस व्हती. आपलं नाही त लोकाचं का हुईना जीव लावला... .

भ्रमिष्ट झालेल्या मनाला कसलं तरी आकलन झालं. ती  दुःखाने विव्हळली... मनजीत!

जगण्याच्या जिद्दीने फेकलेल्या क्षीण सनकाड्या विझून गेल्या.

चिरशांतीला अंधाराने घेरले.

# प्रकरण १३

कडाक्याची थंडी स्वेटरला न जुमानता पार हाडांपर्यंत बोचत होती. रस्त्यावर वावरणारी माणसं एकमेकांना रामराम म्हणून अंगावरील पांघरून आवळून गप्प बसत. रामराम म्हणताना त्यांच्या तोंडातून वाफ बाहेर पडत होती. उन्हातून बाहेर पडावं वाटत नव्हतं.

चारूदत्त पोलिसस्टेशनला पोहचला तेव्हा आवारात कचऱ्याची शेकोटी पेटवून काही पोलिस तिच्या भोवती गप्पा मारत होते. त्याला पहाताच त्यांनी उठून सलाम केला. मानेनेच त्याचा स्वीकार करून तो आंत गेला.

कदम दोन्ही हाताची घडी करून बसले होते. थंडीनं त्यांच नाक लालसर झालं होतं. श्वाशोच्छासानं त्यांच्या मिशीवर बर्फ जमला असा मिस्किल विचार चारूदत्तच्या मनांत येऊन त्याला हसू फुटलं. नारायणने गुडघ्यापर्यंत लांब खाकी पोलिसी कोट घातला होता. टोपीवरून मफलर गुंढाळून तो हातातील कागद नीट लावत होता. बहूदा कालच्या प्रकरणाची पेपर्स होते.

चारूदत्तला पहाताच कदमचा चेहरा उजळला. उभे राहून त्याचं स्वागत करीत ते म्हणाले, ‘मला वाटले, थंडीचे तुम्ही येणार नाही. बसा. ’

त्यांच्याशी हात मिळवताना चारूदत्तनं नारायणच्या अभिवादनाचा मानेनंच स्वीकार केला. टेबलावरील सिगारेटचं पाकिट त्याच्या समोर धरून कदम म्हणाले,

‘ आज फारच थंडी आहे. चहा घेणार ना? ’

सिगारेट पेटविल्यावर त्याने विचारले, ‘काही प्रगति झाली का? ’

‘फार काही सांगण्यासारखी प्रगति झाली नाही. त्या चौघांचे ठसे तपासणीसाठी पाठवले. ’

‘चौघांचे? मनजीतचे सुध्दा? ’

‘येस. काल मी बँकेत गेलो होतो. चौकशीसाठी. ’

‘कसली चौकशी? ’

‘मनजीतची. काय असतं, ओळखीच्या माणसाला आपण गृहीत धरतो. आपल्याला वाटतं त्याची आपल्याला सगळी माहीती आहे, पण जेव्हा तथ्य सांगण्याची वेळ येते तेव्हा आपल्याला समजतं की आपण एकमेकांना किती कमी ओळखतो. हा नारायण तर माझ्या आधीपासून इथं आहे. त्याला सुध्दा मनजीतची पुर्ण माहीती नाही. ’

‘तुम्ही त्याच्या बोटांचे ठसे मिळविले? ’

‘ते काही अवघड काम नाही. ऑफिसमध्ये माणूस कितीतरी वस्तू हाताळत असतो. ’

चारूदत्तने मान हालवून स्वीकार केला.

‘अजून काही माहीती मिळाली का? ’

‘विषेश काही नाही. मनजीत, पंजाबमधल्या तरनतारण जिल्ह्यातल्या पट्टी तालुक्यातल्या जयपुरीया खेड्यातून आला आहे. तो शेतकऱ्याचा मुलगा आहे. नोकरीला लागल्यावर आपल्या एम्पॉईजची पोलिस चौकशी करण्याची बँकेची आपली पध्दत आहे. बँक, त्यांच्या मुळ गावाच्या पोलिसस्टेशनला पत्र लिहून गुप्त चौकशी करते. त्याचा रेकॉर्ड एम्पॉईजच्या वैयक्तिक फाईलला उपलब्ध असतो. मनजीतची पर्सनल फाईल मला पहायला मिळाली. त्याचा मागचा रेकॉर्ड साफ आहे. गावच्या पोलिसस्टेशनमधून बँकेने तशी कागदपत्रं मागवले आहेत. त्याच्या भूतकाळाबद्दल शंका घ्यायला जागा नाही. तो रितसर परिक्षा पास करून नोकरीला लागला. त्याने परिक्षा महाराष्ट्रातून दिली म्हणून त्याची पोस्टींग महाराष्ट्रात झाली.

‘नशिब दुसरे काय? ’ चारूदत्त म्हणाला, ‘ बोटांच्या ठश्यांवरून मनजीत विरूद्ध काही सिद्ध होईल असं वाटत नाही. अरविंदा सांपडले त्या झोपडीत तो गेला नाही असं नंदूनं सांगितले, नाही का? ’

‘हो. ’ नारायण हातातल काम थांबवून म्हणाला, ‘त्या दोघांच्या जबानीतही ते आले आहे. ’ त्या दोघांनी त्याच्याकडे पाहलं, पण ते काही बोलले नाही.

‘रामेश्वरच्या म्हणण्याप्रमाणे, त्यानं साडेनऊच्या रात्री सुमारास मनजीतला झोपडीत जाताना दूरून पाहीलं’  कदम पुढे बोलले.

‘बाय द वे, डॉक्टारांच्या रिपोर्टप्रमाणे त्यांच्या मृत्युची वेळ काय होती? ’

‘रात्री नऊ ते साडे दहाच्या दरम्यान त्यांचा मृत्यु झाला. थंडीचे दिवस असल्याने त्यांना यापेक्षा अँक्युरेट वेळ सांगता येत नाही. त्यांना नऊ वाजता जिवंत पहाणारे दोन साक्षीदार तर आपल्याकडे आहेत. साडे नऊच्या सुमारास त्यांचा मृत्यु झाला असला पाहीजे. ’

‘कशावरून? ’

‘रात्री आठ वाजता टुरींग टॉकीजचा सिनेमा सुरू होतो. साडेनऊ दहाला क्लायमेंक्सला असतो. त्या रात्री भोंग्याच कनेक्शन काढायला ते विसरले होते. तुम्हाला तर माहीत आहे, हिंदी सिनेमात क्लायमेक्स म्हणजे बंदूकीचे आवाज आणि किंकाळ्या. म्हणून त्यांची किंकाळी कुणाला ऐकू आली नाही. ’

‘हं. अजून? ’

‘विळ्याचे टोक हृदयात घुसल्यानं त्यांचा लगेच मृत्यु झाला. त्यांचा खुनी पुरूषच असाला पाहीजे. असा घाव कुणी शक्तिशाली माणूसच घालू शकतो. ’

चारूदत्तला लाकूड फोडणारी सुमन आठवली. एका घावात तिची लाकडांत खोलवर रुतलेली कुऱ्हाड दिसली. त्यांच्याबद्दल तिच्या मनांत पुरेपुर व्देष भरलेला आहे.

‘शक्तीशाली स्त्रीही हे  करू शकेल. ’

‘स्त्री? ’ कदमनं चमकून पाहीलं. ‘स्त्रीचा संबंध कुठे आला? ’

नारायणचा काम करणारा हात थबकला.

चारूदत्तनं खांदे उडविले, ‘कुणास ठाऊक? अजून ह्या प्रकरणाची पुरेसी माहीती कुठं आहे आपल्याला? बाय द वे, त्यांच्या अंगावरील दागिन्यांचा व पैश्यांचा ब्रीफकेसचा काही तपास लागला? ’

‘चक्. त्या दिवशी कुणी अनोळखी माणूस गांवात आल्याची बातमी नाही. माझा अंदाज आहे, झोपडीचं दार उघडं पाहून रस्त्यानं जाणाऱ्या कुणीतरी आंत डोकावलं. अरविंदा दारूच्या नशेत बेभान होऊन पडलेला दिसला. ही संधी साधुन कुणीतरी त्यांच्या अंगावरील दागिने आणि पैशाची बॅग पळवायला गेला असणार. अचानक अरविंदाला जाग आल्याने चोराने त्यांच्या वर प्राणघातक हल्ला केला असेल. ’

‘ही थियरी आपण प्रतापसाठी वापरून पाहीली. त्या दृष्टीने तुम्ही काही तपास केला का?

‘होय. ठोस असं काही अजून तरी सांगता येणार नाही. ’

नेमका काही बोध होणार नाही असं उत्तर दिलं. चारूदत्त अजून आपल्या विचारात होता.

‘मला समजत नाही, इथं बार असताना, त्यांच स्वतःच शेत असताना, ते दुसऱ्याच्या मळ्यात का बसले? ’ चारूदत्तने अचानक विचारले.

‘तसं काही नाही. त्या मळ्याचा मालक मुंबईला नोकरीला आहे. विष्णू त्याच्या शेतात रहातो. तिथं, शेतीचा माल आणि सणंग ठेवायला जागा हवी म्हणून झोपडी बांधली आहे. जागा रिकामी आहे म्हणून अशा कामाला वापरली. इथ सर्रास असे चालते. ’

‘पण बार असताना... . . ’

‘तुम्ही विसरलात, अरविंदाला भेटायला कुणीतरी येणार होतं. ’

‘ती व्यक्ति कोण होती? त्यांची भेट झाली की नाही? हे समजलं तर बऱ्याच गोष्टींचा उलागडा होईल. ’

‘मनजीत! ’

आपल्या मनांतला विचार कदमला कसा कळाला?

‘मनजीत आला. ’बाहेर नजर टाकून ते म्हणाले, ’चला आपल्या जागेवर बसू. त्याची जबानी उरकुन घेऊ. बरीच रेंगाळली. ’

चारूदत्तला उरकून घेऊ शब्द खटकला पण तो काही बोलला नाही. कदमच्या शेजारी खुर्चीवर बसतांना अलिप्त भूमिकेतून पहायचं असं त्यानं स्वतःला बजावलं.

‘ तुमच नाव... पुर्णनाव काय? ’

वेळ वाया न घालवता कदमनं सुरवात केली.

मनजीतसिंग सुरजीतसिंग भुल्लर

‘त्या दिवशी, म्हणजे मंगळवारी रात्री नेमके काय झाले, सविस्तर सांगा. ’

‘नेहमी प्रमाणं मी संध्याकाळी फिरून आलो. एरव्ही मी घरी जाऊन वाचत, किंवा टी. व्ही वरील कार्यक्रम बघत बसलो असतो. पण  लोडशेडींग होती, नऊशिवाय काही वीज येण्याची शक्यता नव्हती. म्हणून मी बँकेच्या पायरीवर बसून येणाऱ्या जाणाऱ्याशी बोलत वेळ काढत होतो. साधारण आठच्या सुमारास मला नंदू, रामेश्वर आणि प्रताप जाताना दिसले. नंदू होता म्हणून मी त्याला आवाज दिला. त्याने मला सुमनमौसीकडे घडलेली हकीकत सांगितली. प्रताप होता म्हणून त्यांच्या सोबत जाण्याची माझी इच्छा नव्हती, पण नंदू होता म्हणून, मी गेलो. एव्हढं मोठं प्रकरण निर्माण होईल याची मला कल्पना असती तर मी गेलोच नसतो.

‘प्रतापची  तुम्हाला काय अडचण होती? ’

‘त्यानं माझ्याबद्दल अरविंदाभाऊला काहीबाही सांगितलं, म्हणून आमचं भांडण झालं होतं.

‘तुमचे आणि अरविंदाभाऊचे  संबंध कसे होते? ’

तो काय उत्तर देतो याची चारूदत्तला उत्सुकता वाटली. मनजीत जरा रेंगाळला. टेबलावर बोट नाचवली, ठामपणे आपटून थांबवली.

‘आमच्यात मनमुटाव होता. त्याचं कारण काही लपून राहीलेलं नाही. मला वाटते तो आमचा वैयक्तिक मामला आहे. त्याचा या प्रकरणाशी संबंध नाही. त्याबद्दल विचारलं तर मी उत्तर देणार नाही. ’

चारूदत्तच्या मुठी वळल्या.

‘तुमचे संबंध दुरावलेले होते हे तर तुम्ही मान्य करता? ’ कदमने शांतपणे विचारले.

‘ते तर मी आधीच सांगितले आमच्या संबंधात तणाव निर्माण झाला होता. ’

‘त्यांचा तुमच्या प्रेमाला विरोध होता. ’

‘तुम्ही जर खुनाचा हेतू शोधत असाल तर ती तुमची चूक आहे. त्यांना ठार मारल्याने काही आमचं लग्न होणार नाही. ’

त्याचं म्हणणं खरं होतं.

‘सोबतच्या तिघांनी तयारी दाखविल्यावरही, तुम्ही त्यांच्या बरोबर झोपडीत जाण्यास नकार दिला. खरं तर कुतुहल म्हणून कुणीही आंत जाईल. तुम्ही आंत न जाण्याचं काही विषेश कारण? की तुम्हाला आधीच माहीत होतं आंत काय बघायला मिळणार आहे? ’

त्याच्या चेहऱ्यावरील रंग उडाला. नाकपुडया थरारल्या. दीर्घ श्वास घेऊन बाहेर सोडला. रागावर ताबा मिळवून तो म्हणाला,

‘तुम्ही बायस माईंडने माझी जबानी घेत आहात. तुम्ही मला चौकशीसाठी बोलावले की जबानी घ्यायला. मी खोट सांगतो याला तुमच्याकडे काय पुरावा आहे? मी तुम्हाला कॉपरेट करतो तसं तुम्ही मला कॉपरेट करायला हवं. ही माझी विनंती आहे. ’

‘ठिक आहे. ’ कदम म्हणाले, ‘तर मग मला सांगा, तुम्ही त्यांच्या सोबत आंत जायला नकार का दिला. ’

‘भीती. सर, पोलिसांची भीती. मी पोलिसांच्या कुठल्याही भानगडीत पडायचं टाळतो. दोन दिवसांपासून गायब असलेला माणूस, त्या बंद घरात सांपडला तर चांगल्या अवस्थेत सांपडणार नाही हे कुणीही सांगु शकेल. ’

‘तुम्ही जर काही केलं नाही तर तुम्हाला पोलिसांची भीती वाटण्याचे काय कारण? ’

‘काही न केलेल्या आणि काही न करू शकणाऱ्या माणसांनाच पोलिसांची भीती वाटते. हे सत्य आहे. ऐनवेळी पोलिसांनी येऊन कुणाला वांचवलं, असं कधी ऐकायला मिळालं का? उलट

पोलिसांचा संबंध आला की मनस्तापच होतो. ' त्याचा सुर कडवट झाला. 'मला माफ करा सर पण नव्वद टक्के लोकांचा हाच अनुभव आहे. '

त्याच्या बोलण्याचा कदमवर काही परिणाम झाला नाही. पोलिसांबद्दल जनतेचे काय मत आहे ते इतक्या वर्षांच्या सर्व्हिसनंतर त्यांना चांगले माहीत होते.

'त्यानंतर तुम्ही काय केलं? '

'नंदू आणि मी गांवात आलो. तो पोलिस स्टेशनला आला. मी भाऊंना सांगण्यासाठी गेलो. तेथे यांची भेट झाली. '

चारूदत्तन मान हालवली.

'रामेश्वर आणि प्रतापला मागे ठेवण्याचं काय कारण? '

' मी काहीच सुचना केल्या नाही. त्यांनी सांगितले तसं केलं कारण मला कुठलीच जबाबदारी घ्यायची नव्हती. '

'त्यांनी मागं राहून काही पुरावे नष्ट केले असण्याची शक्यता आहे का? '

'ते मी कसं सांगू शकणार? त्यांना तसे करायचं काय कारण? त्यांना पुरावे नष्ट करायचे असते तर ते त्यांनी पुर्वीच केले असते. प्रेत पंधरा-अठरा तास तेथेच पडून होतं. '

त्याच्या बोलण्यात लॉजिक होतं.

'मिस्टर मनजीत, सुमनबाईला ह्या प्रकाराची पुर्व कल्पना होती की, तिला खरंच दैवी संकेत मिळाला होता? नाही म्हणजे तुमचा त्यांचा जवळचा संबंध म्हणून विचारतो. '

'ते मला काही माहीत नाही. त्यांच्याकडून मला जेवणाचा डबा येतो. त्या बदल्यात मी त्यांना पैसे देतो एव्हढांच आमचा संबंध आहे. ' त्याने तुसडेपणानं सांगितलं.

'आता आपण रवीवारच्या रात्रीवर येऊ. मला सांगा, तुम्ही रवीवारी रात्री आठ वाजेपासून ते साडेदहा पर्यत कुठं होता? सांगू शकाल? '

‘रवीवारी रात्री? म्हणजे अरविंदाभाऊचा खुन झाला त्या रात्री? हा. साहेब. रवीवारी मी बुलडाण्याला गेलो होतो. इथं दिवसभर काय करणार? मी सुटीच्या दिवशी बुलडाण्याला जातो. तिथल्या बँकेतली काही मंडळी माझी मित्र आहेत. दिवस आम्ही सोबत घालवतो, सिनेमा, शॉपिंगला जातो. संध्याकाळी शेवटच्या गाडीनं मी परत येतो. नेहमीप्रमाणे मी शेवटच्या गाडीनं परत येण्यास निघालो. पण वाटेत आमची गाडी बंद पडली. तुम्हाला तर माहीत आहे त्या रस्त्यावरून रात्री तुरळक ट्राफीक असतो. कंडक्टरने एका गाडीला हात देऊन जवळच्या पेट्रोल पंपावरुन डेपोला फोन केला. प्रवाश्यांच्या सोईसाठी जादा गाडी येणार असल्याचं त्याने परत आल्यावर सांगितलं. आधीच तर रस्ते खराब त्यातून नव्या गाडीचा बंदोबस्त करायला त्यांना वेळ लागला. रात्री मुक्कामी गाडी साधारण अकराच्या सुमारास धारपवाडीला पोहचली. परतलो तेव्हा मी इतका थकुन गेलो होतो की मी सरळ घरी जाऊन झोपून राहीलो. अर्थात एव्हढयां रात्री इथं जायला जागा कुठं आहे? ’

बोलणं संपल्यावर कदम पुढे काय विचारतात याचा अंदाज घेवू लागला.

‘नक्की तुम्ही त्या रात्री साडेनऊच्या सुमारास अरविंदाला भेटायला बामनाच्या मळ्यात गेला नव्हता? ’

‘कसं शक्य आहे. तेव्हा तर मी बिघडलेल्या गाडी जवळ उभं राहून नव्या गाडीची वाट पहात होतो. ’

‘तुम्हाला तिथे पहाणारा साक्षीदार आहे आमच्याकडे. ’ कदम त्याच्या चेहऱ्यावरील भाव न्याहळत म्हणाले.

त्याने उजवा कान चोळला. त्याची नजर नारायणकडे गेली. लिहीण्याचं काम थांबवून तो त्याच्या उत्तराची वाट पहात होता. नारायणने त्याला काही इशारा केला की आपल्याला तसा भास झाला ते चारूदत्त ठरवू शकला नाही.

‘तुमच्या साक्षीदाराचा काही गैरसमज झालेला दिसतो. डोक्यावर बुचडा बांधल्याचा भास तयार केला तर दूरून कुणालाही वाटेल मनजीत आहे. कुणीतरी माझी नक्कल केलेली दिसते. नाही साहेब, मी त्या रात्री बुलडाणा-धारपवाडी मुक्कामी गाडीत अडकलो होतो. माझ्या म्हणण्याला कंडक्टर

आणि माझे सहप्रवासी साक्ष देतील. तुम्ही मला हे विचारणार याची मला कल्पना होती. म्हणून मी एस टी चे तिकीट सोबत आणले. '

त्याने  एस टी चे तिकीट समोर धरले. चारूदत्तने नकळत त्याच्या हातून तिकीट घेतले.

कदम त्याला पुढचा प्रश्न विचारणार तोच बाहेरून कुणाचातरी जोराने बोलण्याचा  आवाज आला. सगळयांचे लक्ष दाराकडे गेले.

दारातून सावकार आंत आले. त्यांचे केस पिंजारलेले होते. ते अतिशय बेभान अवस्थेत होते. त्यांचा स्वताःवर ताबा नव्हता. त्यांच्यामागे त्यांचा ड्रायव्हर, आणि बाहेर बसलेले पोलिस आंत आले.

'काय झालं? ' कदमने कॉन्टेबलला विचारले.

कॉन्स्टेबल काही उत्तर देण्या आधीच जोरजोराने हातवारे करीत सावकार म्हणाले,

'तो काय सांगणार? मला विचारा. कदम... मला अटक करता. करा, अटक करा. मी... . मी अरविंदाचा खून केला... . . मी... . मला अटक करा. मी त्या नीच प्रतापचाही खून करणार आहे. करता मला अटक? मी कबुल करतो... . '

अरविंदाचा खून मी केला!

टेबलावर पंजा आपटत कदमला आव्हान देत सावकार म्हणाले.

'अरविंदाचा खून मी केला! काय करायचं ते करा. मला खुशाल अटक करा. पण आधी पुरावा द्या, मग माझ्या अंगाला हात लावा. ' ते खदाखदा हसले.

चौघं त्यांच्याकडे आश्चर्यानं पाहात राहीले. त्यांच्या बोलण्यावर कुणाचा विश्वास बसत नव्हता.

'असा कसा खुन केला? '  कदमने बावळटासारखं विचारलं.

नारायण नुसता त्यांच्याकडे आ वासून पहात होता. त्याच्या तोंडून शब्द फुटला नाही.

'देखा! ' मनजीत उडीमारून जागेवर उभा राहीला. 'तुमानो हैरना मैनु शक नु लै के सी.

तुम्ही विनाकारण माझा संशय घेता. '

'कमाल आहे! 'नारायणच्या तोंडून शब्द फुटला, 'कमाल आहे! सुमनबाईने सांगितलंच होतं. खुनी स्वताः होऊन चालत येऊन गुन्हा कबुल करील. '

'ये लो जी आ गया. ' मनजीत म्हणाला.

'तू खाली बैस. ' करड्या आवाजात चारूदत्त म्हणाला. तसा मनजीत पटकन खाली बसला. कदमकडे वळून तो म्हणाला, 'आपली चौकशी चालू ठेवा. सावकार, तुम्ही जरा बाहेर बसा. यांची जबानी झाली की तुमचा जबाब लिहून घ्यायला सांगतो. '

'तो गुन्हा कबुल करतो म्हटल्यावर या सगळयाला काय अर्थ आहे? '

'कोण म्हणत मी कबुली जबाब द्यायला आलो. मी तुम्हाला चॅलेंज द्यायला आलो. मी सांगतो मी अरविंदाचा खुन केला. आणि दुसरा खुन मी प्रतापचा करणार आहे. मला अडवता आल तर पहा. '

त्यांनी कोटाच्या खिश्यातून पिस्तूल काढून सगळयां समोर नाचवलं.

'तुम्ही मला खोटया गुन्ह्यात अडकवलं. खऱ्या गुन्ह्यात पकडू शकत नाही. मी तुम्हाला आव्हान द्यायला आलो. प्रतापला वांचवता आले तर वांचवा. '

कदम उभं राहून काही बोलणार एव्हढयात, दरवाजातून गोंधळ ऐकू आल्याने सगळयांच लक्ष तिकडं गेलं.

'काय गडबड आहे? ' दाराकडे पाहून कदम ओरडले.

एक हवालदार आंत आला.

'साहेब काही पत्रकार तुम्हाला भेटायला आले. त्यांना अडवलं म्हणून गोंधळ घालतात. '

'पत्रकारांना कसं अडवता साहेब? आम्हाला प्रश्न विचारायचे. ' एक पत्रकार आंत घुसून म्हणाला.

'बाहेर बसा मी आलोच. तो बाहेर गेल्यावर त्यांनी चारूदत्तला विचारले,

‘तुम्ही सोबत रहायला हरकत नाही. ’

ते बाहेर येताच वार्ताहरांनी प्रश्नांचा भडीमार केला.

‘अरविंदाच्या खुनाचा तपास कुठपर्यंत आला? ’

‘त्यांच्या खुनामागे राजकिय षड्यंत्र आहे का? ’

‘पोलिस तपास करायचं सोडून मांत्रिकाकडे गेली हे खरे काय? ’

‘मांत्रिकानं सांगितल्याप्रमाणे तिचा खुनी स्वताः होऊन चालत आला ना? ’

त्यांना शांत करून कदम म्हणाले, ‘आधी मला बोलू द्या नंतर कुणाचे काही प्रश्न असल्यास विचारा. ’

शांतता पसरल्यावर त्यांनी बोलायला सुरवात केली.

‘मित्रांनो, अरविंदाच्या दुर्दैवी मृत्युची आम्ही कसून चौकशी करत आहोत. मुंबईला सी. आय. डी. ऑफिसात काम करणारे माझे मित्र, चारूदत्त, ह्या प्रकरणी मला मदत करीत आहेत. काल आम्ही मांत्रिका कडे गेलो होतो हे खरं आहे. पोलिसांचा अशा गोष्टींवर विश्वास आहे की नाही हा मुद्दा नाही. तपासाचा तोही एक मार्ग असेल तर पडताळून पहायला पोलिसांना कुठली आडकाठी नाही. त्याने पोलिस काही अंधश्रध्द ठरत नाही, डोळसपणे आम्ही तो मार्ग स्वीकारला.

तुम्ही येण्या आधी  नुकतेच सावकार इथं आले आहेत. त्यांचे म्हणणे पोलिसांनी ऐकल्यावर त्यांतील तथ्य तपासून पाहीले जाईल. त्या आधी त्यावर काही भाष्य करता येणार नाही. ते अजून पोलिसाशी काही बोलले नाही. ’

‘त्यांच्या येण्यानं मांत्रिकाचं भविष्य खरं ठरलं असं तुम्ही म्हणाल काय? ’

‘सध्या पोलिस काहीच म्हणत नाही. आमचा तपास योग्य दिशेने चालला एव्हढे आश्वासन आम्ही तुम्हाला देतो. धन्यवाद. ’

त्यांनी पत्रकाराला हात जोडले. पत्रकार सोडायला तयार नव्हते.

‘आम्हाला सावकाराला भेटायचं आहे. ’

‘तुम्ही भेटू शकता. पोलिसांनी त्यांना काही अटक केलेली नाही. ते बाहेर आले की तुम्ही त्यांना भेटून त्यांचा इंटरव्यूह घेऊ शकता. पण पोलिसस्टेशनच्या बाहेर. त्याच्याशी आमचा काही संबंध नाही. ’

पत्रकारांना दारात सावकार येऊन उभे राहिलेले दिसले. कदमनां सोडून सगळे त्यांच्याकडे धांवले.

सावकाराच्या चेहऱ्यावर क्रुर हसू होते. सावकाश चालत ते पुढे आले. घडत असलेल्या प्रसंगाची त्यांना गम्मत वाटत होती. दोन्ही हात उंचावून ते पुढे येऊन नाटयपूर्ण म्हणाले,

‘मला जे सांगायचे ते मी पोलिसांना सांगितले आहे. त्यांना तुम्ही विचारा. अच्छा गुडबाय. ’

‘हा खुन तुम्ही केला का? तुम्ही प्रतापला धडा शिकविणार का? त्याने तुमच्यावर खरंच खोटे आरोप केले होते का? त्याच्या धक्याने तुमच्या पत्नीचे निधन झाले हे खरे का? ’

‘जे विचारायचे ते पोलिसांना विचारा. मी त्यांना सर्व सांगितले आहे. ’ ते निघाले.

‘तुम्ही... तुम्ही जाऊ शकत नाही. ’ कदम म्हणाले.

‘का? ’

‘तुम्ही... . . ’

‘बोला. मी काय? ’

पत्रकारा समोर कदमनां काही बोलता येईना. विनाकारण गोंधळ होण्याची शक्यता होती.

‘तुम्ही जाऊ शकता. ’ ते शांतपणे म्हणाले.

सावकाराच्या ओठांवर विजयी स्मितरेषा फुटली. विजयीमुद्रेनं ते पोलिसस्टेशनमधून बाहेर पडले. त्यांच्यामागे पत्रकार धावले. तमाशा पहाण्यासाठी जमलेला घोळका त्यांच्यामागे गेला.

कदम पोलिसस्टेशनांत परतले तेव्हा ते विमनस्क झाले होते. झालेला प्रकार इतका अनपेक्षीत होता की, त्याची सुसंगती लागत नव्हती. खरंच, सावकारानं अरविंदाचा खुन केला असेल का?

ते आंत आले तेव्हा मनजीत आणि नारायण आपसात बोलत होते. त्यांची चाहूल लागताच त्यांच बोलणं थांबलं.

‘शल वुई कंटीन्यू? ’ आपल्या जागेवर बसत चारूदत्तने विचारले.

‘अं? ’कदम तंद्रीतून बाहेर आले. तुम्हाला वाटतं, हा खुन सावकारानं केला असेल? ’

चारूदत्तने खांदे उडविले.

‘आय डोन्ट नो. त्याचा आत्ता विचार करण्याची गरज नाही. त्यांनी जी नौटंकी चालविली त्याचं काय कारण आहे ते त्यांनाच माहीत. पोलिसांनी त्यात वाहून जाण्याचं कारण नाही. आपण तथ्यावर आधारीत काम करतो. आपली दिशा बरोबर आहे कि चुकीची याचा निर्णय आपण करू. आपल्याला केसचा तपास करायचा, मिडीयासारखा लोकांना तमाशा दाखवायचा नाही. ’

‘सावकार काहीबाही बरळत सुटले. आपण त्यांना अडकवून ठेवण्या ऐवजी मोकळं सोडून दिलं. पत्रकारांना तर आयतं कोलित मिळालं. त्यातून आपण सुमनबाईंची मदत घेतली. फार बदनामी होईल. वरिष्ठांना मलाच उत्तर द्यावे लागणार. ’

‘कदम, किती काळजी करता? हे काय पोलिसांना नविन आहे का? मिडीयाची सनसनाटी एक दिवसाची. दुसऱ्या दिवशी लोकं विसरतात. वरिष्ठांना विश्वासात घ्या. तुम्ही सावकाराची काळजी करु नका. मी स्वताः त्यांच्याशी बोलेल. मग त्यांना अटक करू. बसा. ’

‘त्यांना कुठल्या गुन्ह्या खाली अटक करायची? त्यांनी खून केला म्हणून सांगितलं, पण अटक करायला पुरावा कुठे? त्यांच्या पहील्या अटकेनं लोकांची नाराजी ओढवून घेतली. त्याचा बदला ते असा तमाशा करून घेत आहेत. ’

‘त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपा खाली अटक करा. त्यांनी पोलिसस्टेशनला येऊन प्रतापला जीवे मारण्याची धमकी दिली. याला आम्ही दोघं साक्षीदार आहोत. होय की नाही मनजीत? ’

अचानक विचारलेल्या प्रश्नाने मनजीत गडबडला.

'देखो जी. तुमची गोष्ट खरी आहे. पण मला पोलिसांपासून दूर ठेवलं तर बरं. मला पोलिसांची फार भीती वाटते. '

'का? '

'फोबिया. पहील्यापासून मला पोलिसांना पाहीलं की टेंशन येतं. पता नही क्यो? मेरी रिक्वेस्ट है जी. '' त्याने हात जोडले.

'कमाल आहे. तुला पोलिसांची भीती वाटते. मग नारायणशी तुझी मैत्री कशी? '

'वो तो फ्रेण्ड है जी. ' तो सहजतेनं म्हणाला. नारायण गालांत हसला.

टेलिफोनची बेल वाजली. हवालदारानं फोन उचलला. जरावेळ तो ऐकत होता. त्याचे डोळे विस्फारले, त्याने कर्कश्य आवाजात विचाराले,

'कधी? ' तिघांनी त्याच्याकडे पाहीले.

'साहेब, ' त्याने कदम समोर धरलेला फोन थरथरत होता.

'काय झाले? ' उत्तराची वाट न पहाता त्याच्या हातून फोन घेऊन ते म्हणले, 'हॅल्लो... ...

पलिकडचं बोलणं ऐकतांना त्यांनी दात आवळले.

'ठीक आहे. कशाला हात लावू नका. आम्ही आलोच. '

त्यांनी फोन ठेवला. सर्वजण त्याच्याकडे उत्सुकतेने पहात होते. त्यांच्या नजरा टाळत ते निराशेनं म्हणाले,

'वाईट बातमी आहे. काल रात्री सुमनबाईने एण्ड्रीन पिऊन आत्महत्या केली!

काहीतरी वाईट बातमी आहे याची कल्पना त्यांना आधीच आली होती. पण सुमनबाईचं नाव ऐकून सगळ्यांना धक्का बसला.

' आपल्याला लगेच निघावे लागेल. ' त्यांना सांवरायला अवधी देऊन कदम पुढे म्हणाले, 'मिस्टर मनजीत, तुम्ही जाऊ शकता. पुन्हा गरज पडल्यास तुम्हाला पुन्हा बोलविण्यात येईल. '

‘सर, मी सोबत येणार आहे. चौकी सांभाळायला कुणाला तरी मागे ठेवा. ’ भावनावर नियंत्रण ठेवून टेबल आवरत नारायण म्हणाला.

कदमनी फोनवरून वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधला. मागे रहाणाऱ्या हवालदाराला सुचना देऊन ते बाहेर पडले.

पाणंदीच्या गाडीरस्त्यावरून मार्ग काढत ते नामदेवच्या शेतावर येऊन पोहचलें. त्याच्या घरी शोकाकूल वातावरण होतं. पोलिसांना पहाताच नामदेव रडत हात जोडून पुढं आला. नारायणशी नजरानजर होताच, ‘ नारायण. . ! ’ असा टाहो फोडून त्याला मिठी मारून मोठयानं गळा काढून रडू लागला.

‘काय झालं ? ’

‘सुमनची झोपडी दूर असली तरी समोरच हाय. तिची हालचाल इथून दिसते. आज पहाटपासून तिची हालचाल  दिसली न्हाई. गेली असंन इकडं तिकडं म्हून आमी आपलं आवरत राहीलो. दिस कासराभर वर आला तरी बीन तिची चाहूल लागली न्हाई तवा पोराला पिटाळलं. ‘जा.  आत्याबी काय करते पाहून ये. ’ पोट्टं गेलं आन आत्याबी वाटतंच झोपली म्हून तसंच ठो ठो बोंबलत परत आलं. ’

‘आमी धावतच गेलो लगी. पाहीलं, त सुमन... ... . ’ त्याला हुंदका आला. त्याची बायको गळा काढून रडू लागली. पोरांचा कालवा वाढला.

चारूदत्त आणि कदम सुमनबाईच्या झोपडीकडे निघाले. पत्रकार आधीच पोहचले होते.

‘गांवात खूनसत्र सुरू आहे. उघड खुनाच्या धमक्या दिल्या जातात. पोलिसखातं काय करतं? ’

‘कृपा करून पोलिसांना काम करू द्या’ त्यांनी जरबेच्या आवाजात लोकांना सांगितलं. पत्रकारांना सहकार्य करण्याची विनंती केली.

इन्पेक्टर कदम त्यांच्याशी बोलण्यात गुंतले असताना चारूदत्तनं पुढं होऊन निरिक्षण करायला सुरवात केली.

पहील्या भेटीत रणरागीणीसारखी हातात कुऱ्हाड घेतलेली सुमन त्याच्या डोळ्यापुढे उभी राहीली. मृत्युला शरण गेल्यासारखी जमीनीवर निपचित पालथी पडली होती. तिचा चेहरा काळा-निळा पडला

होता. तोंडातून येणारा फेस सुकून गेला होता. मरताना तिला खुप त्रास झाला असावा. तिचा चेहऱ्यावर वेदना साकाळली होती.

त्याचं लक्ष अर्धवट जळलेल्या सनकाडयांकडे गेलं. झोपडीकडे जाताना  वाटेत पडलेला कंदील दिसला. त्याचं झाकण बाजूलाच पडलं होतं.

त्याची नजर वाश्याकडे गेली. काल वाश्यांत अडकवलेला एण्ड्रीनचा रिकामा डबा तिथं ओटयावर पडला होता.

झोपडीत शिरण्यापुर्वी त्यानं वळून  पाहील. नामदेवचं सांत्वन करून नारायण येताना दिसला. त्याचं कुणाकडे लक्ष नव्हतं. तो सरळ सुमन जवळ गेला. तिच्या मृतदेहाकडे पहात उभा राहीला. मान झुकल्या मुळं त्याच्या चेहऱ्यावरील भाव दिसत नसले तरी त्याच्या मनांतला आक्रोश खांदे झुकवून उभा राहण्यातून जाणवत होता.

दुसऱ्या क्षणाला त्यानं खांदे झटकले. घसा खाकरत, रूमालाला नाक पुसत तो चारूदत्त जवळ आला, तेव्हा पुर्णतः सांवरलेला होता.

त्याच्यामागे कदम आले.  ते तिघं झोपडीत गेले.

कालची पुजा तशीच विखरुन पडली होती. जळालेल्या उदबत्तींची राख, विझलेली आरती. सांडलेलं हळदी कुंकू. जमीनीवर आडवा झालेला तांब्या.

‘काल आरती झाल्यावर ती ह्याच तांब्यातून पाणी प्यायली. ’ नारायणनं माहीती पुरवली.

कदमनं रुमाल टाकून तांब्या उचलला. आंत द्रव शिल्लक होतं. त्यांनी वास घेतला.

‘ह्यात एण्ड्रीन आहे. ’

‘आरती संपल्यावर तिला पाणी लागायचं. ती आरतीच्या आधीच पाण्याचा तांब्या भरून ठेवी. ’ नारायण म्हणाला.

‘ती स्वताः भरून ठेवी? ’

‘असं काही नाही. ती स्नान करून येईपर्यंत आलेले भक्त तयारी करीत. काल कुणी तांब्या भरून ठेवला याची चौकशी करावी लागेल. ’

‘तुम्हाला काही आठवतं? ‘

‘नाही. काल आम्ही आलो तेव्हाआरती सुरू झाली होती. ’

‘तांब्या ताब्यात घ्या. पुढील इन्व्हीस्टिगेशनसाठी पाठवून द्या. ठसे मिळातात का पहा. ’

‘खुप ठसे मिळतील. तांब्या जागेवरून उचलून तिला देईपर्यंत अनेकांचे हात लागले. ’

‘नारायण,  कसून झडती घ्या. पहा काही सांपडते का? नक्की तिचा खुन झाला. ’

‘होय. तिचा खुनच झाला. ’ नारायण म्हणाला. ‘मी तिला आधीच सावध केले होते. ’

त्यांनी झडती घ्यायला सुरवात केली. त्यांच्या तिक्ष्ण नजरेतून काही सुटत नव्हतं.  तिच्या झोपडीत एकटं राहणाऱ्या माणसाला लागतील तेव्हढयांच माफक वस्तू होत्या.

झडती संपल्यावर ते पुन्हा एकत्र आले. झाली.

‘कदम, मला वाटतं आपण देवीच्या तस्वीरी मागची बाजू, त्याच्या खालच्या चौरंगाचा ड्रावरही तपासावा. ’

कदमनी नारायणला दारात उभं राहण्याचा इशारा केला. पायातले शूज काढत त्यांनी विचारले, ‘काय सांपडेल असं तुम्हाला वाटतं? ’

‘अरविंदाचे दागिने, पैसे, मोबाईल अजून सांपडला नाही. ’ चारूदत्तने आठवण करून दिली.

‘कदमने देवीच्या फोटोला नमस्कार करून देवीची जडशीर तस्वीर उचलली. ’

‘मागं काहीही नाही. ’ ते निराशेनं हसले. कथा कादंबऱ्यात कसे दुवे पटापट सांपडतात. ’ बोलताना त्यांनी ड्रावर खेचला. झटक्याने आंतली जडवस्तू सरकून पुढे आली. ती पहाताच ते आश्चर्याने ओरडले,

‘मोबाईल! अरविंदाचा मोबाईल! ’

# प्रकरण १४

बार बंद व्हायची वेळ झाली तरी कोपऱ्यात बसलेल्या दुःखमग्न नारायणची तेथून उठण्याची चिन्हं दिसत नव्हती. बारमध्ये वाजणारं मंद सुरातलं गाणं केव्हाच बंद झालं होतं. वेटरने सुचना म्हणून त्याच्या टेबलाचा सोडून सगळे दिवे मालवले. तरी त्याचं लक्ष नव्हतं. तो आपल्या तंद्रीत होता. कुणाची तरी चाहूल लागली तशी त्याने नजर उचलली. बारचा मालक, रमेश, होता. त्याला पहातांच नारायणचं रिकाम्या पेगकडे लक्ष गेलं.

‘अजून एक पेग दे. ’

‘बार बंद व्हायची वेळ झाली. ’ त्यानं नम्रपणे उत्तर दिलं.

‘कुणाला सांगतोस? मला? तुला कोण विचारणार आहे? जा. एक पेग दे. शेवटचा. ’

‘नारायण, ’ तो आपुलकीने म्हणाला, ‘ बस झालं. खुप घेतलीस तू. ’

‘रम्या... रमेश... तू फिकीर करू नको. आज मी फुकट पिणार नाही. पैसे देईल. मायला... . . ’

‘पैशाचा मी कधी शब्द काढला का? ’ त्याच्या खांद्यावर हात ठेऊन रमेश म्हणाला. ‘जास्त झाली तुला. मित्र म्हणून सांगतो. आपण दोस्त नाही का?

‘आज काही सांगू नकोस. मला प्यायची आहे... बस्स. नरू... आज मी फार दुःखात आहे. तुला माहीत आहे... . माहीत आहे... माहीत आहे ना? ’

‘मला माहीत आहे सारं. तुला आज ओळखतो का? जे घडायचं ते घडतंच. तू दारू प्यायल्यानं त्याच्यात काही फरक पडणार आहे का? ज्याची वेळ आली त्याला जाणंच पडतं. तू रात्रभर जरी दारू पित बसला तरी ती परत येणार आहे का? ’

‘तिच्या मरण्याचं दुःख नाही रे रमेश... . साली... एखाद्या बेवारश्यासारखी एकटी पडून होती... . रात्रभर... जमीनीवर’

‘रडू नको. तू . . माझं ऐकतोस ना? आपण मित्र आहोत ना? ’

‘मी तिला बजावलं होतं. माझ्यापासून काही लपवू नकोस. पोलीस असून काय उपयोग रे आपला. साला, आपल्या समोर सुमनचा खून होतो... . . ’

‘खून! ’

‘हां. तो खूनच आहे. तिला अरविंदाच्या खुन्याची माहीती होती. तिला सावध केलं होतं. तिनं ऐकलं नाही. आपल्यावर भरोसा ठेवला नाही. आपल्यावर? त्याचं दुःख जास्त आहे रे... . ’

‘आता कितीही दुःख केलं तरी झाल्या गोष्टी काय पुन्हा येणार नाही. तिनं तुला सांगितलं नाही, कारण तिच्या मृत्युने तसं करू दिलं नाही. मौत आली की भल्याभल्याची मतिगुंग होते. तू आता घरी जाऊन झोप. आपण सकाळी बोलू. जाशील का तू एकटा? नाहीतर थांब तुझ्या सोबत देतो कुणाला... . अरे हरि... ’ त्याने बारमध्यल्या कामगाराला आवाज दिला.

‘मला कुणाची सोबत नको. सुमन गेली आता कुणाची सोबत पाहीजे? मी एकटा जाईन. मला कुणी नको. ’

‘तू दहा मिनिटं थांब. बार वाढवतो, आपण निघू. मी सोडतो तुला गाडीतून. ’

‘नको ... नको... मी जाईल. ’ तो जागेवरून उठला. तसा त्याचा तोल गेला.

अरे! असा उद्गार काढून रमेश त्याला धरायला गेला. त्याला बाजूला सारून नीट उभं राहण्याचा प्रयत्न करीत नारायण म्हणाला, ‘घाबरू नको... मला काही झालं नाही... एव्हढयानं काय होतं? ’

झोकांडया खात तो बारच्या बाहेर पडल्यावर रमेशने हरिला सांगितलं.

‘त्याच्या मागं जा. लांब रहा. तो घरी गेला कि मग तू तुझ्या घरी जा. काय? ’

मान डोलावून तो बाहेर पडला. पाच मिनीटांत पुन्हा परत आला.

'काय झालं? ' रमेशन विचारलं.

'मले पायल्यावर त्यो लई भडकला भो. माह्या मांग येशीन तर हाणीन म्हन्ला. परत हाकलून लावलं मले. '

'तुला एक काम धड करता येत नाही. ' रमेश नेहमीसारखा त्याच्यावर ओरडला. त्याने नेहमीसारखं ऐकून घेतलं.

'रमेशनं मागे पाठवलेल्या माणसाला हाकलल्यावर नारायणच्या लक्षांत आलं, बाहेर सगळं सुमसाम झालं. थंडीमुळं कुत्री सुध्दा भुंकायचं सोडून पायात नाक खुपसून निपचित पडली. बारच्या उबेतून बाहेर पडल्यावर थंडीची जाणिव झाली तसा त्यानं मफलर कानाभोवती नीट गुंढाळून घेतला.

त्याला एकटयाला रहायचं होतं. त्याचं दुःख रमेश सारख्या जुन्या दोस्तांना माहीत असलं तरी त्याचं कुणी उघड सांत्वन करू शकत नव्हतं. बायकोलाही सांगू शकत नव्हता. सुमनच्या मृत्युची बातमी कळाल्यापासून हृदयातला आक्रोश छातीत बांधुन ठेवला होता. दारू प्यायल्या मुळं त्याच्या भावना तरल झाल्या. रस्त्यानं झोकांडया खात, जाताना तो स्वताःशी सुमन ... सुमन... पुटपुटत पुन्हा-पुन्हा डोळे कोरडे करीत होता.

पुलावरून जातांना त्याचं लक्ष नदीत जळणाऱ्या चितेकडे गेलं. त्याची लडखडती पावलं थबकली. चिते जवळ कुणीतरी गुडघ्यात मान घालून बसलेलं होतं. त्यानं डोळे पुसून, नजर स्थीर करून पहाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याला वाटलं तो मनजीत असावा. हा इतक्या रात्री तिच्या चिते जवळ काय करतो? त्याला आश्चर्य वाटलं. पुला वरचा रस्ता सोडून तो नदीच्या पात्रात उतरला.

तो मनजीतच होता. गुडघ्यात मान खुपसून बसला होता. नारायणची चाहूल लागताच त्यानं मान उचलून पाहीलं.

'तू इथं काय करतोस? ' त्याच्या जवळ बसत नारायणने विचारलं.

'इसा एकटानू लगदा है. तो पंजाबीत म्हणाला. लक्षात येऊन हिंदीत म्हणाला, 'फार एकट वाटतं. जरा वेळ बसावं म्हटलं मौसी जवळ. ' नारायणने त्याच्या पाठीवर हात ठेवला. 'तिच्या जाण्याने मी फार अकेला झालो. इथं मला जीव लावणारं दुसरं कुणी नाही बघ. '

‘रडू नको. गेलेल्याला तर परत आणता येत नाही, तिच्या चितेसमोर तुला शब्द देतो, तिच्या खुन्याला मी पकडल्याशिवाय रहाणार नाही. तो पकडला गेल्यावर त्याची केस कोर्टात उभी रहाणार नाही, हेही सांगतो. त्याची कस्टडीतच मौत होईल. ’

चितेच्या नाचणाऱ्या पिवळ्या ज्वालांचा प्रकाश त्याच्या  दारूने लाल झालेल्या चेहऱ्यावर नाचला. त्याच्याकडे पहाणाऱ्या मनजीतला त्याच्या अवताराची भीती वाटली.

‘तुम्ही कुठून येता? ’ मनजीतने विचारलं.

‘बारमधून. घरीच चाललो होतो, तुला इथं पाहून आलो. ’

‘मी निघालोच. चला,  तुम्हाला घरी सोडतो. ’

‘नाही. नको. मनजीत, तुझं म्हणणं खरं आहे. आजची रात्रचं तिचा सहवास आहे. एकदा राख सावडली की संपलं. तू निघ. मी जरावेळ थांबतो. ’

‘बघा हं. अशा अवस्थेत इथंच झोप लागायची. नाहीतर मी थांबू का जरा वेळ? ’

‘नको. गडया मला एकटयाला तिच्या सोबत राहू दे. ’

मनजीत मागच्या झाडीत दिसेनासा झाल्यावर नारायण रसरसून जळणाऱ्या चितेकडे एकटक पहात बसला.

त्याच्या मनांत खुनांचे विचार चक्र सुरु झालं. दोन खुनांची सुसंगती लावण्याच्या विचारात तो इतका गढून गेला कि, जवळ येणाऱ्या दबल्या पावलांची त्याला चाहूलही लागली नाही. जेंव्हा चाहूल लागली  तेंव्हा त्याने मागे वळून पहाण्याचा प्रयत्न केला.

पण त्याला उशिर होता... .

**********

चारूदत्त नदीवर पोहचला तेव्हा कोंडाळं करून उभं असलेल्या लोकांनी त्याला सरकून जागा करून दिली. गांवातल्या स्त्रीयांनी घेरलेल्या नारायणच्या पत्नीचा आक्रोश काळजाला घरं पाडीत होता. पोलिस जमलेल्या गर्दीला नियंत्रीत करण्यात अडकले होते. कदम नारायणच्या प्रेतावर झुकून निरीक्षण करीत होते. त्याला पहाताच ते उठून त्याच्या जवळ आले. त्यांचा चेहरा उतरला होता.

‘बरे झाले तुम्ही आलात. तुम्हाला निरोप पाठवणारच होतो. हे सगळे इतके अचानक समोर आले की, तुम्हाला कळवायला वेळच मिळाला नाही.

‘नक्की काय घडलं? ’

‘सकाळी सुमनबाईची रक्षा सावडण्यासाठी लोक जमले तेव्हा त्यांना नारायणचं प्रेत दिसलं. काही लोकांनी येऊन पोलिसस्टेशनला वर्दी दिली. एक दोघे त्याच्या घरी बातमी सांगण्यासाठी गेले. बातमी कळतांच आम्ही ताबडतोब इथं आलो.

‘ नारायण इथं कसा आला? त्याने आत्महत्या तर केली नाही ना? ’

‘आत्महत्या? ’ कदमने अपेक्षेने विचारले. जणू ती आत्महत्या असावी असे त्यांना मनापासून वाटत होते. दुःखी सुरात ते म्हणाले, ‘नाही, ती शक्यता दिसत नाही. त्याचा खुनच झाला. ’

‘त्याचा खुन इथंच झाला की खुन करून इथं टाकण्यात आलं? ’

‘काही समजत नाही. माझ्या अंदाजाप्रमाणे, त्याचा मृत्यु रात्री दहा ते अकराच्या दरम्यान झाला असला पाहीजे. थंडीत रात्रभर उघड्यावर प्रेत राहील्याने नक्की अंदाज काढता येत नाही. पोस्टमार्टम रिपोर्टनंतर मृत्युची वेळ निश्चित सांगता येईल. ’

‘खून कसा झाला? ’

‘गळा आवळून. मफलरने गळा आवळून. ’

‘खुनी शक्तिमान असला पाहीजे. नारायणला अश्या रितीनं मारणं कठीण आहे. ’

‘तो बेसावध असावा. कुणीतरी मागून येऊन त्याचा गळा आवळला. तो काही फार प्रतिकार करू शकला नाही. पाय घासण्याच्या खुणा स्पष्ट आहेत. त्याच्या नखांत मफलरचे धागे आहेत. त्याने गळ्याचा फांस काढण्याचा प्रयत्न केला. पण गळा आवळणाऱ्याला तो काही करू शकला नाही.

त्यांनी हताश नजरेनं पाहीलं. दुःखी आवाजात ते म्हणाले,

‘खुनी माणसाला नारायणनं ओरखाडलं नाही. अर्धवट जळालेलं सिगारेटचं थोटूक नाही. झटापटीत खुनी माणसाच्या खिशातून एखादी वस्तू पडली नाही. कादंबरीत किवा सिनेमात घडतात तशी एखादीही गोष्ट घडत नाही. ’ त्याच्या आवाजात निराशा भरलेली होती. ‘अजून पहील्या खुनाचे काही धागेदोरे सांपडत नाही. एका पाठोपाठ एक खून पडत चालले. आणखी किती खून होणार आहेत? ’

‘तुम्ही निराश होऊ नका. ’ चारूदत्त त्यांना म्हणाला, पण त्याचा सूर फार आश्वासक नव्हता, ‘तुम्ही प्रयत्न करता आहात ना? ’

‘ते खरं आहे पण हेडक्वार्टरला कोण सांगणार? कमिशनरने माझी चांगली खरडपट्टी काढली तर त्यांना दोष देता येणार नाही. मला वाटले होते---‘

बोलतांना ते अचानक थांबले.

चारूदत्तने त्यांच्याकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहीलं. त्यांनी ओशाळून नकारार्थी मान हालवली.

‘येस. तुम्हाला काय वाटले? प्लिज संकोच न करता सांगा. खुनाची केस हाताळतांना निःसंदिग्ध वातावरण हवं. मला वाटतं नारायणला सुमनच्या खुन्याचा सुगावा लागला असावा. खात्री करून घेण्यासाठी त्यानं त्याला इथं भेटायला बोलावलं असलं पाहीजे. ’

‘इथं? कशावरून? ’

‘माफ करा कदम. तुमचं वाक्य पुर्ण करा. मनांत किंतू ठेऊन मी तुमच्या सोबत काम करू शकत नाही. ’

त्यांनी जरावेळ विचार केला.

‘तुम्हाला राग तर येणार नाही ना? ’

येस? ’

‘मला वाटलं मुंबईच्या सी आय डीत काम करणारा माणूस सोबत असल्यावर अरविंदाचा खुनी सांपडायला वेळ लागणार नाही. पण त्यानंतर दोन खुन झाले. बोलण्याच्या ओघात तोंडातून निघून गेलं. सॉरी. ’

‘मी समजू शकतो. ’ चारूदत्त सहज म्हणाला, ‘अश्या गोष्टी मी मनावर घेत नाही. अपेक्षाभंग झाला की माणूस असे विधानं करतो. नारायणला शेवटून जिवंत पहाणारा कोण आहे? ’

‘साहेब, मला काही बोलायचं. ’ बारमालक रमेश  त्यांच्या जवळ येऊन म्हणाले.

‘काय? ’

‘ साहेब, रात्री नारायण बारमध्ये बराच वेळ दारू पित बसला होता. बार बंद व्हायची वेळ झाली तरी तो आणखी दारू मागत होता. मी त्याला जास्त पिण्यापासून रोकलं. घरी जायला सांगितलं. त्याची हालत पाहून मी त्याला घरी सोडून देतो म्हणालो पण त्याने इन्कार केला. तो बाहेर पडल्यावर मी हरीला, माझ्याकडे काम करणाऱ्या मुलाला, त्याच्या मागून जायला सांगितलं. नारायणच्या लक्षात येताच त्याने हरीला शिव्या घालून परत पाठवून दिलं. पुढे काय झालं ते माहीत नाही. मी स्वताः त्याला घरी सोडलं असतं तर हा प्रसंग टळला असता. ’

रमेशनं आवंढा गिळला.

‘आम्ही बालमित्र, सोबत खेळलेलो’. कदमने त्याच्या खांद्यावर थोपटलं.

‘बारच्या बाहेर पडला तेव्हा त्याचा मुड कसा होता? आपण कुठे जातो त्यानं काही सांगितलं होतं का?

‘सुमनचा खुन झाल्यानं तो अतिशय दुःखी होता. आपण पोलिस असून तिला वाचवू शकलो नाही याचं त्याला दुःख वाटत होतं. तो म्हणाला, तिला खुनी माणसाची माहीती होती पण तिने  त्याला सांगितली नाही. तिने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. असंच काहीतरी बरळत होता. ’

‘तो अंदाज त्याने पोलिसांकडेही बोलून दाखवला होता. मी सुध्दा  विचारलं पण तिनं माझी गोष्ट टाळली. ’  चारूदत्त म्हणाला.

‘ खुनी कोण हे तिला  माहीत नसावं किंवा तो आपल्याला इजा करणार नाही याची तिला खात्री असावी. ’ चारूदत्तच्या मनांत विचार आला.

‘नारायण गेला तेव्हा रस्त्यावरून जाणारं कुणी दुसरं तुम्हाला दिसलं का? त्याला रस्त्यात कुणी भेटलं असण्याची शक्यता आहे. ’

‘नाही साहेब. रस्ता सुनसान होता. ’

‘हं. सध्यातरी त्याला शेवटून जिवंत पहाणारे तुम्हीच आहात. ठिक आहे रमेशशेठ. तुमच्या सहकार्य़ाबद्दल धन्यवाद. नंतरही तुम्हाला काही सुचलं अथवा आठवलं तर संकोच न करता भेटा. आम्हाला गरज पडली तर तुमचे सहकार्य मागू. ’

‘केव्हाही बोलवा साहेब. ’ एका हातानं नमस्कार करून ते वळले. चार पावलं गेल्यावर काहीतरी आठवण झाल्या प्रमाणं ते मागे फिरले.

‘एक गोष्ट सांगायची राहीली साहेब, मी बार बंद करून घरी निघालो तेव्हा गाडी वळवतांना माझ्या गाडीच्या फोकसमध्ये मला दूरवर पाठमोरा मनजीत जाताना दिसला. ’

चारूदत्तने कान टवकारले.

‘मनजीत? इतक्या रात्री? कुठे गेला होता? कदमने विचारले.

‘सांगता येणार नाही साहेब, आमचं बोलणं झालं नाही. तो घरी जात असावा. माझं घर उलट्या बाजूला असल्यानं  त्याच्याकडे लक्ष दिलं नाही. तुम्ही सांगितलं म्हणून आठवलं. ’

‘मनजीत! ठिक आहे. धन्यवाद. अजून काही आठवलं तर अवश्य सांगा. ’ कदम म्हणाले.

रमेशशेठ निघून गेले. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतिकडे पहात कदमने विचारलं,

‘ पुन्हा मनजीत! तुमचं काय मत आहे? ’ कदमने चारूदत्तला विचारलं.

‘त्यांच्या बोलण्यावर अविश्वास ठेवण्याचं काही कारण नाही. त्यांच्या बोलण्यातून एव्हढं समजलं, की नारायण  साडे दहापर्यंत जिवंत होता. त्यानं प्रमाणाबाहेर दारू प्राशन केली होती. त्याने प्रतिकार का केला नाही याचं उत्तर मिळतं. रात्री घरी निघालेला माणूस मध्येच चिते जवळ कशासाठी गेला? चिते जवळ त्याला कुणी दिसलं की, त्याला कुणी घेऊन गेलं?

चारूदत्तच्या मनांत मनजीतचा संशय होता. नारायण व तो मित्र असल्याचं मनजीतनं कबुल केलं होतं. पण त्याने मनजीतचा उल्लेख निग्रहाने टाळला.

‘इतक्या रात्री त्यांना मनजीत कसा दिसला? ’ त्याच्या मनांतला प्रश्न कदमने विचारला.

‘गाडी वळवतांना पडलेल्या फोकसमध्ये त्यांना तो पाठमोरा दिसला. त्याची सत्यता पडताळून पहावी लागेल. त्या संबंधी मनजीतशीच बोलू. एकदा सावकारालाही भेटावं लागेल. ’

‘त्यांना पुन्हा अटक करावी काय? ’ कदमने विचारले.

‘त्यांना अटक करावी लागेल. नारायणचा, एका पोलिसाचा, खून झाला. पोलिसाला डिवचून खुनी फार दिवस मोकळा फिरू शकणार नाही. ’ चारूदत्त सहज बोलला तरी त्याच्या आवाजात निश्चयाची धार होती.

‘अरविंदाचा खुन झाला त्या झोपडीत सांपडलेल्या फिंगरप्रिंटचे रिपोर्ट आले का? ’ त्याने विचारले.

‘काल संध्याकाळी आले. दिवसभराच्या धकाधकीने आम्ही थकून गेलो होतो. नारायण म्हणाला, ‘आता उद्या बघु. ’ सकाळी इकडे यावं लागलं. येता का पोलिसस्टेशनला आपण बघुया काय रिपोर्ट आले आहेत? ’

‘अरविंदाचा मोबाईल रिचार्ज केला? कॉल हिस्ट्रीवरून काही माहीती मिळेल. ’

बॅटरी डाऊन झाली होती. रात्री चार्ज करून ठेवालयला सांगितलं होतं हवालदाराला. गेल्यावर पहाता येईल. ’

‘तुमच इथलं काम आटोपलं असेल तर आपण पोलिसस्टेशनला जाऊ या. ’ चारूदत्त म्हणाला.

‘येस. ’ त्यांनी हवालदाराला बोलावलं. ‘आम्ही चौकीवर जातो. अँब्युलन्सला फोन करतो. तोपर्यंत इथेच थांबा. गावकऱ्यांशी बोलून काही माहीती मिळते का बघा. ’

त्याने सलाम ठोकला.

सफाईदार वळण घेऊन कदमने पोलिसचौकी समोर जीप उभी केली. ते खाली उतरत असतानाच त्यांना मनजीत येताना दिसला. तो त्यांचीच वाट पहात होता. त्याला पाहून दोघांना  आश्चर्य वाटले.

‘मला तुम्हाला काही सांगायचं. ’ तो म्हणाला.

आंत गेल्यावर कदमनी दोघांना बसायला सांगून नारायणच्या टेबलावरून काही कागद उलचलून आणले. ते आणताना त्यांचा चेहरा दुःखी झाला. त्यांना भावनेवर नियंत्रण ठेवणं कठीण जात होतं. जे काम कालपर्यंत नारायण करत होता, ते काम आज त्यांना करावं लागणार होतं. खुर्चीवर बसल्यावर त्यांनी रुमालाने डोळे पुसले, नाक शिंकरलं, घसा साफ केला , चष्मा डोळयांवर चढवून मनजीतकडे करड्या नजरेनं पहात म्हणाले,

‘येस, सांगा. तुम्हाला काय  सांगायचं आहे? ’

‘मला नारायणजीबद्दल सांगायचं आहे. ’

कदमची भुवई वर गेली. चारूदत्त आपल्या खुर्चीत सावरून बसला. हे अनपेक्षित होतं.

‘सांगा. ’ उत्सुकतेने कदम म्हणाले.

‘काल सुमनबाईंचा अंत्य संस्कार झाल्यावर मी घरी परतलो. मला खुप एकटं वाटत होतं. साहेब, तिच्याशिवाय ह्या गांवात मला जीव लावणार कुणी नाही. सगळयांच्या नजरेनं मी परका आहे. परक्या माणसाबद्दल विनाकारण आकस असतो. त्याला कुणी पटकन आपलं म्हणत नाही. पण सुमन मौसीने मला जीव लागला. जीव लावला तर रानचं पांखरू जवळ येतं साहेब. मलाही तिची माया वाटू लागली. इतकी की कधी-कधी ती मला घरातली मोठी व्यक्ति वाटायची. घरी बसून काय करावं ते कळत नव्हतं. पायात डोकं खुपसून मी किती वेळ बसून राहीलो. मन सतत सुमनमौसीकडे ओढ घेत होतं. सुमनमौसी पुन्हा कधीच दिसणार नव्हती. आज स्मशानात तिची चिता जळते आहे, उद्या तिची रक्षा गोळा करून गंगार्पण केली की संपलं. तिचं काही उरणार नाही. आपलं कुणी उरणार नाही.

सुमनमौसीशिवाय धारपवाडीत रहाण्याची कल्पना मला भयंकर वाटत होती. तिला भेटण्याची अनावर उर्मी मनांत निर्माण झाली. त्या ओढीनं मी रात्री पुन्हा स्मशानात गेलो.

तिची चिता धगधगुन पेटली होती. कवटी फुटल्यावर सगळे निघून गेले होते. मी तिच्या चिते जवळ जाऊन बसलो. थंडीत तिच्या चितेची उब मिळत होती. मला अनेक प्रसंग आठवत होते. मी गुडघ्यात मान घालून रडत होतो. माझं सांत्वन करायला कुणी नव्हतं. रक्ताची, नात्यातली नसलेल्या बाई करता मी शोक करत होतो. काय ऋणानूबंध होते आमच्यात ?

कितीवेळ गेला याच मला भान नव्हतं. अचानक कुणाचा तरी हात खांद्यावर पडला. मी दचकून पाहीलं. खांद्यावर हात ठेऊन नारायणजी उभे होते.

'नारायण? ' नारायणचं नावा ऐकताच कदम उत्तेजित झाले.

'हां नारायणजी. मला पण आश्चर्य वाटलं. घरी जाताना पुलावरून सुमनच्या चिते जवळ कुणीतरी दिसलं. कोण आहे ते पहाण्यासाठी ते आले होते. मी तिथं एव्हढया रात्री काय करतो याचं त्यांना नवल वाटलं. मी त्यांना माझी मन:स्थिती सांगितल्यावर माझ्या शेजारी बसून त्यांनी माझं सांत्वन केल. आम्ही गळयात पडून रडलो. '

जरा वेळानं, मन हलकं झाल्यावर, मी त्यांना तेथुन निघण्याची सुचना केली. त्यांनी खुप दारू प्यायली होती. नीट बसायला येत नव्हतं की चालायला होत नव्हतं. मी त्यांना घरी नेऊन सोडतो म्हणालो, पण त्यांनी ऐकले नाही. ते म्हणाले, तुझ म्हणणं मला पटलं. मी जरावेळ इथं, तिच्या सहवासात थांबतो. तू जा. त्यांना सोडून मी परतलो. '

'तेव्हा किती वाजले असतील? ' कदमने विचारले.

'अकरा वाजले असतील. मी घरी आलो तेव्हा पावणेबारा वाजत होते. '

'स्मशानातून घरी जायला तुम्हाला अर्धा तास लागला? सगळ्या गावाला पंधरा मिनिटांत फेरी मारून होते. '

'महत्वाचं तेच तर सांगायचं मला. त्यांना सोडून मी परत निघालो. स्मशानाच्या वाटेतून अंधार होता. मुख्य रस्त्यावरील दिवे जळत होते. त्याच्या परावर्तीत प्रकाशातून वाट काढत चालत होतो.

अचानक मला कुणाची तरी चाहूल लागली. एव्हढया रात्री कोण असावं याची मला उत्सुकता वाटली. मी अंधारात होतो. येणारा हमरस्त्यावर असल्याने आधी त्याची लांब सांवली दिसली. मग येणारा माणूस दिसला. इतक्या दूरुन मी त्याला ओळखलं. तो प्रताप होता. '

'काय प्रताप! ' कदमने विचारले. 'तुमची खात्री आहे? '

'होय. त्याने अंगावर शाल पांघरली होती. डोक्यावरून बरीच पुढे ओढलेली असल्याने त्याचा चेहरा दिसत नसला तरी त्याची चाल ओळखू येत होती, तो प्रतापच होता. '

'इतक्या रात्री? काय करत होता? '

'मलाही तेच आश्चर्य वाटलं. त्याच्या नजरेस न पडता मी गुपचूप त्याच्या मागून चालायला सुरवात केली. त्याच्या हातात ब्रीफकेस होती. मला खात्री आहे, ती अरविंदाचीच असली पाहीजे. '

'कशावरून ? '

'पुल ओलांडून तो नंदूच्या शेतात गेला. मी त्याच्या मागेच होतो. तिथं अंधार होता. त्याच्या हातात टॉर्च होता. टॉर्चच्या चोरटया प्रकाशात तो विहीरी जवळ गेला. एकवेळ सर्वत्र नजर फिरवून कुणी पहात नसल्याची खात्री करून त्यानं ती बॅग विहीरात फेकून दिली. जड वस्तू पाण्यात पडावी तसा ' ढुब्बूक'आवाज मला स्पष्ट ऐकू आला. त्यानं कानोसा घेतला. पाण्याचा आवाज कुणी ऐकला नाही, ह्याची खात्री होताच तो वळून झपाटयाने परतला. '

'तो गेला तरी मी जागेवरून हाललो नाही. त्याच्या दृष्टीस पडण्याचा धोका पत्करण्याची माझी तयारी नव्हती. तो दूर गेल्याची खात्री करून मी घरी परतलो. वाटेत तो मला पुन्हा दिसला नाही. '

'पुलावरून परतताना नारायणला पाहून तो सुमनच्या चितेकडे जाण्याची शक्यता आहे? '

'कुणास ठाऊक साहेब. पुलावरून मी दिसलो म्हणून नारायणजी तिकडे आले. प्रताप सुध्दा त्यांना पाहून तिकडे जाऊ शकतो. पण गेला नसेल. एव्हढया रात्री कुठे फिरतो विचारल्यावर त्याला काही उत्तर देता आलं नसतं. तरी पण  सांगता येत नाही साहेब. '

'तू पुलावरून नारायणकडे पाहीलं नाही? '

‘नाही. म्हणजे मी पाहीलं तेव्हा ते दिसले नाही. त्यांची हालत पाहून ते काही बसून राहू शकतील असं वाटत नव्हतं. मला वाटलं, ते झोपले असतील म्हणून मला दिसले नाही. ’

‘तुम्ही लपला होता तेथून पुलावर येईपर्यंत प्रतापला नारायणचा खून करून जाणे शक्य होते का? ’

मनजीत जरावेळ विचार करून बोलला,

‘नाही. पण तेव्हढया वेळांत तो तिथपर्यंत जाऊ शकतो. मला पुलावरुन जातांना पाहून जवळच्या झाडीत लपून राहू शकतो. हा माझा अंदाज आहे. तो नदीत उतरला की सरळ घरी गेला ते मला सांगता येणार नाही. ’

त्यानंतर तुम्ही सरळ घरी गेला?

‘हो. त्यानंतर मी सरळ घरी गेलो. मी रात्रीचं ठरवलं की सकाळी ही माहीती पोलिसांना द्यायची. नारायणजीवर काही संकट येईल याची मला अजिबात कल्पना नव्हती. नाहीतर मी त्यांना एकटं सोडलं नसतं. त्यांच्या मृत्युची खबर मला सकाळी मिळाली. ’

‘तुमच्या सहकार्याबद्दल धन्यवाद. गरज पडली तर तुम्हाला पुन्हा बोलावू. ’

तो निघून गेल्यावर कदमने चारूदत्तकडे पाहीले. ते अतिशय उत्तेजीत झाले होते.

‘तुम्हाला काय वाटतं? प्रताप खुन करू शकतो? ’

‘ संशय तर नक्की येतो. पण त्याला नारायणचा खून करायचं कारण काय? ’

ह्या प्रश्नावर दोघे विचार करू लागले. काहीतरी सुचल्याप्रमाणे चारूदत्त म्हणाला,

‘फिंगरप्रिंटचे रिपोर्ट बघा. ’

त्यांनी काल ड्रॉवरमध्ये ठेवलेले रिपोर्टचे पाकिट काढून फोडले. रिपोर्टवरून नजर फिरवताच उत्तेजीत होऊन त्यांनी टेबलावर पंजा आपटला.

‘आणखी काय पुरावा हवा? चारूदत्त समोर कागद फडकवित ते म्हणाले. त्यांचे डोळे चमकत होते. जोरात श्वास चालल्यानं, त्यांच्या मिशा थरथरत होत्या.

‘काय आहे? ’ चारूदत्तने त्यांच्या हातातून रिपोर्ट घेतला.

‘विळयाच्या मुठीवर प्रतापच्या बोटांचे ठसे आहेत. ’ ते म्हणाले.

‘त्याला चौकशीसाठी बोलावून घ्या. ’

‘चौकशी? अटक करणार आहे त्याला. झडती घेणार आहे त्याच्या घराची. त्याच्या जबानीच्या वेळी तुम्ही हजर राहा. त्याचे काय हाल करतो ते पहाच आता. ’

‘मी येणार नाही तुमच्या मधे. मला वाटतं तुम्हाला तुमचा खुनी भेटला. ’

# प्रकरण १५

गेल्या काही दिवसांपासून, साधारण अरविंदाच्या खुनानंतर, प्रताप विचित्र वागत होता. तसा तो उपद्व्यापी होताच. लग्न झाल्यापासून आशा त्याला ओळखत होती. त्यांचं लग्नच त्याच्या खोटया दिमाखाला भाळून झालं होतं. तो अरविंदाच्या शिक्षण संस्थेत चांगल्या पदावर काम करतो म्हणून त्याच्या घरच्यांनी तिच्या वडीलांना सांगितलं. तेव्हा तो संस्थेत काम करतही होता. पण त्याची पोस्ट काही फार मोठी नव्हती.

संस्थेत चौकशी केली तेव्हा तिथल्या लोकांनी प्रतापबद्दल सांगताना त्याची खालच्या पदाची नोकरी लपवून ठेवली. कुणाचा वेल मांडवावर चढत असेल तर खोटं बोललेलं चालतं म्हणे. कुणी काही म्हणोत तिनं आपल्या नशिबाला बोल लावला आणि समोर येईल ते स्वीकारत मुकाट संसाराला लागली.

लग्न होताच पहिल्या महीन्यात त्याने नोकरी सोडली. त्याने अनेक कारणं सांगितली तरी नोकरी करणे त्याच्या स्वभावात नाही हे तिला कळून आले. घरी शेती होती. शेती करतो या नावाखाली तो दिवसभर उठाठेवी करीत गावभर उंडारायचा. त्यानं एक गोष्ट चांगली केली, तिला अरविंदाच्या शिक्षण संस्थेत नोकरी लावून दिली. सुरवातीला तिला अरविंदाची भीती वाटायची. त्यांच्याबद्दल गांवात फार काही चांगलं बोललं जात नव्हतं. त्यानं सुमनबाईच्या जीवनाचं वाटोळं केलं हे तिला गांवातल्या बायकांकडून कळालं. संस्थेत नोकरी लागल्यावर अनेकजणींनी तिला त्यांच्यापासून सावध रहाण्याचा इशारा दिला. पण तिला समोर भविष्य दिसत असल्यानं, आर्थिक स्थैर्यासाठी तिनं जॉब स्वीकारला. त्यानं घरी बसून सुखानं खावं एव्हढी तिची माफक अपेक्षा होती, पण ती त्याने ती कधी पुर्ण केली नाही. उलट घराची फिकीर संपल्याने त्याच्या रिकाम्या उलाढाली वाढल्या.

खोटंनाटं सांगून लोकांकडून पैसे उकळणं हा त्याचा छंद होता. गळ्याशी आलं की तिला निस्तरावे लागत होते. अरविंदाच्या सहवासात आल्यापासून त्याला नवंबळ मिळालं. अरविंदाच्या राजकीय वजनाचा उपयोग करून घेणारा मदमस्त बगलबच्चा म्हणून तो ओळखला जाऊ लागला. अरविंदाही त्याचा आपल्या सोईप्रमाणे उपयोग करून घेई. तिला त्याची चिंता वाटे. उद्या तशी वेळ आली तर आपली कातडी वांचविण्यासाठी अरविंदा प्रतापला अडकवेल. पण प्रतापनं कधी तिचे ऐकले नाही.

त्याचे सगळे उपद्व्याप तिने सहन केले पण सावकारावर केलेली अँट्रासिटी केस तिला आवडली नाही. सावकाराने त्याला वेळेवर मदत केली नसती तर त्याच्या बहीणीचं लग्न मोडलं असतं. डोळ्यात पाणी आणून त्याने सावकाराचे पाय धरले होते. पाय धरूनही उपयोग झाला नसता जर सुवर्णाताईंनी, मध्यस्ती केली नसती. कृतघ्नपणे त्यानं अरविंदाच्या सांगण्यावरून सावकारां विरूध्द पोलिसांत खोटी तक्रार केली. सगळ्या गांवात त्याची नाचक्की झाली. तिनं तळतळून सांगितलं, त्या निष्पाप स्त्रीचा शाप घेऊ नका. तुम्हाला भोगावं लागेल. पण त्यानं तिच्या बोलण्याचा उपहास केला. शाप बाधल्याप्रमाणे त्या दिवसापासून तिच्या घरातलीच काय पण साऱ्या गांवातली शांती ढळली. अरविंदाचा खून झाला. सुमनबाईचा अचानक मृत्यु झाला. कुणी म्हणतं तिचा खुन झाला कुणी म्हणतं तिची करणी तिच्यावर उलटली. नक्की काय ते देवालाच माहीत. सकाळी दूधवाला आला होता तो सांगत होता. तिची चिता अजून विझली नाही तर नारायण हवालदाराचा खून करून त्याचे प्रेत सुमनच्या चिते जवळ टाकलं. त्याच्याही मृत्युबद्दल अशीच अफवा आहे. कामवाली आली तेव्हा काम सोडून घटकाभर तिच्याशी बोलली तेव्हा सांगत होती,

‘आपल्याला त कै समजत नै पर साईत्री म्हणत व्हती, ‘नारायणचं आणि सुमनचं जुनं काहीतरी लफडं होतं. मेल्यावर तिनचं त्याला बलावून घेतलं. ’

बनी बोल्ली, ‘न्हाई, ती गेल्यानं त्यानं दुःखी होऊन आत्महत्या केली. ’ भुताटकीपेक्षा प्रेम कथा तरूण कामवालीला खरी वाटली असं तिच्या स्वप्नाळू डोळ्यात दिसलं. ते काहीनाही. मी सांगते, ’ शेजारच्या कौशल्याबाई सडेतोड म्हणाल्या, ‘ हे सावकाराचं काम आहे. काल म्हणे त्यानं पोलिसस्टेशनला जाऊन गोंधळ घातला. अरविंदाचा खून त्यानंच केला म्हणे. आणि आता तो प्रतापलाही ठार मारणार म्हणाला. त्याचं बिच्चाऱ्याचं बरोबर आहे. प्रतापच्या वाह्यातपणामुळे त्याची सतीसाध्वीसारखी बायको गेली. (जिवंतपणे मात्र त्यांनी तिच्याबद्दल कधी चांगले उद्गार काढले नाही. ) सावकारानेच प्रताप समजून नारायणचा खून केला. नशिब प्रतापचं! आतातरी सांभाळ ग बाई तुझ्या नवऱ्याला. आहे कुठ तो?

‘घरीच आहे. अजून उठले नाही. ’

कौशल्याबाईच्या भुवयां उंचावल्या. नाक मुरडले. जातांना त्या म्हणाल्या,

‘किती दिवस तोंड लपवून बसणार? सावकाराला भेटून त्यांची माफी मागून सगळं मिटून टाक म्हणावं. ’

त्या गेल्या तशी आशा सरळ बेडरूममध्ये गेली. प्रताप अंगावर पांघरून घेऊन पडला होता.

‘तुम्हाला काय झालं आहे? ’ आशानं त्राग्यानं विचारलं.

‘काही नाही. ’ पत्नीकडे न पहाता उत्तर दिलं.

‘काल सावकार पोलिसस्टेशनला गेला होता म्हणे, कौशल्याबाई सांगत होत्या. ’

‘त्येचं काय? ’ आवाजता बेफिकीरी आणली तरी त्याची काळजी लपली नाही.

‘त्यांनी म्हणे अरविंदाचा खून केल्याची कबुली दिली. ’

‘हं. ’

तिला वाटलं, तो पुढे सांगेल की त्यांनी आपल्याला जीवे मारण्याची धमकी दिली. तिला त्याचा राग आला.

‘तुमच्याबद्दलही काही बाही बोलत होता, म्हणे... . . ’

त्याचा अंदाज घेण्यासाठी ती मुद्दाम थांबली. त्याचे तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते.

‘मी काय म्हणते... ’ त्याच्या पाठीवर हात ठेऊन ती म्हणाली, ‘तुमच्या मनांत काय आहे ते बोलल्या शिवाय कसं कळणार? मलाही सांगणार नाही का? माणसाच्या मनांतलं कळलं तर काही करता येतं. मनांत ठेवल्यावर कोण काय करणार? ’

तिने त्याची हनुवटी आपल्याकडे फिरवली. त्याने नजर झुकवली तेव्हाच तिने ओळखले, तो भंगला. तिनं त्याला छातीशी धरलं आणि इतके दिवस एकटयानं सहन केलेल्या दुःखाचा बांध फुटला. तिनं त्याला अडवलं नाही. ती फक्त त्याच्या केसातून हात फिरवत राहीली. दुःख कमी झाल्यावर तो तिच्यापासून दूर झाला.

‘काय झालं ते मला सांगा. ’ ती आग्रहाने म्हणाली. ‘त्याने मानेनं होकार दिला. तशी ती पुढे म्हणाली चहा घेऊन सांगणार का आत्ता? ’

‘थांब. ’ तिचा हात हातात घेऊन तो म्हणाला, ‘ऐकून घे. ’

त्याचा हात तिच्या हातांवरून फिरला. त्याला पहील्यांदा जाणिव झाली, तिचे हात किती बारीक आहेत. बांगडया मनगटापर्यंत मागं सरकतात. गालाची हाडं वर आली आहेत. मान लांब झाली. डोळ्यांत त्याची काळजी. ’

‘आशा, म्या तुला लई तरास देतो का गं? ’

‘ते आपण नंतर बोलू. आधी तुम्ही मला सांगा काय झाले? ’

त्याची नजर खिडकीतून येणाऱ्या उन्हाच्या कवडशा वर खिळली. तो बोलू लागलाः

‘त्या रोजी आमी दोघं तालुक्याला गेलो व्हतो. जाताना अरविंदाचा मुड नेहमी परमान  व्हता. दिसभर काम उरकली. त्येंना गोविंदजीनी पाच लाख रूपये दिल्हे. माह्या समोर त्येंनी ब्यागेत ठीवले, आन ब्याग माह्या कडं दिली. मंग आम्ही पोस्टा’फिसात गेलो. पोस्टब्याग उघडून त्येंनी आलेली पत्रं काढून घेतली. पत्रं माह्या कडं देताना ती कुठून आली ते पहात होते.

एक पत्र पाहून त्यांचा हात थांबला. त्येंनी ते फोडून लगेच वाचलं. पत्र वाचल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर विचित्र हसू पसरलं.  त्यांनी शांतपणे ते पत्र खिशात ठीवलं. बाकीचे पत्रं माह्या हातात कोंबले आन आमी बाहेर पल्डो.

दुपारी जवायला आमी बारमध्ये गेलो. त्येंनी मद्यपान केलं. पत्र वाचल्यानंतर त्येंचा मुड बदलला. ते बोलत नसले तरी मनातून खुश होते. एखादी गोष्ट मना साऱखी झाली की त्यांचा मुड तसा असतो. हे मला माहीत होतं. त्या पत्रातून त्यांना काहीतरी महत्वाची बातमी समजली. कुणालातरी कचाटयात पकडायला त्यांच्या कामास येणार होती.

‘मधेच त्यांना रामेशरचा फोन आला. रातचा काय कार्यक्रम हाये, ते इचारत होता. मला म्हाईत व्हतं, त्येला पाण्याची  टाकी बांधण्याचा ठेका पायजे. त्याच्यासाठी तो अरविंदाभाऊला  खुश करण्याचा प्रयत्न करीत होता. पान्याच्या टाकीचा ठेका तुला देईन असं आश्वासन देऊन अरविंदानेच

त्येला झुलवत ठीवलं होतं. त्यांची ती सवंयच होती. पर मला म्हाईत व्हतं, रामेशरला हा ठेका मिळणार नाही. टाकीच्या ठेक्यासाठी त्येंनी खुप लोकां कडून पैसे घेऊन ठीवले व्हते. राती बामनाच्या मळयात जवायचा कार्यक्रम ठरला. फोन बंद केल्यावर त्यांनी लगेच दुसरा फोन लावला. कुणाला तरी राती नऊला बामनाच्या मळयात भेटाया बलावल. मला त्यांचे बोलनं आठवतं. ते म्हन्ले, ‘ये आज सोक्षमोक्ष लाऊन टाकू. ’

तो शबुद मह्या चांगला ध्येनात राहीला. ‘सोक्षमोक्ष. ’ हा शबुद ते कवाच वापरत नाही. कोन्चाबी गोष्टीचा ते कधी सोक्षमोक्ष लावत नाही. घोंगडभीजत ठेवण्याची त्येंची आदत मला ठाव होती. म्हून मला सोक्षमोक्ष शब्दाचं आश्चर्य वाटलं. फोन ठेवताना त्यांनी दांत आवळून शिवा हासडली आणिं आणखी दारू मागवली.

जवल्यावर  ते म्हन्ले बंगल्यावर जाऊन आराम करून मग परत जाऊ. बंगल्यावर जाताच ते बेडरूममध्ये गेले. त्येंचा आराम होई पर्यत आपलं काम उरकून घ्यावं म्हून मी त्येंना सांगाया  गेलो.

दार उघडून आंत गेलो तव्हा ते पलंगावर मांडी घालून पत्र वाचत  होते. माह्या अचानक येण्यानं ते दचकले. त्येंनी पत्र लपवलं. इत्या दूरून काही  म्या पत्र वाचू शकत नव्हतो. पर ते त्येंच्याकडून आपसूक घडलं. तवा मह्या ध्येनात आलं, ते पत्र फार महत्वाच आन गुपित हाय. माह अस बेधडक जाणं त्येंना आवडलं न्हाई.

‘काय आहे? ’ ते खेकसले.

म्या त्येंना माहं काम सांगितल्या वर त्येंनी मला जाण्याची परवानगी दिली. लवकर परत येण्याची सुचना दिली.

परतीच्या वेळी, दारू पिल्यानं त्येंचे डोळे लागत होते, ते जास्त बोलत नव्हते पर त्येंचा मुड चांगला व्हता. आमी धारपवाडीला पोहचलो तव्हा सांजचे पाच वाजत आल्ते. रामेशर स्टॅडवर आमची वाट पहात व्हता. त्येनं दोन मोटर सायकलची व्यवस्था केली होती. आम्ही दोगं  सरळ बामनाच्या मळयात गेलो. रामेश्वर जेवण आणाया घरला  गेला.

अरविंदाभाऊ माह्या मोटरसायकल वर बसले व्हते . गाडी उभी करून आम्ही दोगं झोपडीत गेलो. झोपडीत अंधार होता. म्या दिवा लावण्याच्या आधी अरविंदभाऊ झुलत पुढं गेले. त्यांच्या पायानं

काहीतरी जड लोखंडी वस्तू ठोकरली गेली. जमिनीवर सरकल्याचा आवाज आला. ओय्!  करून त्येंनी हातांनी पाय धरला. मी पुढे जाऊन धरलं नसतं तर ते पडले असते.

'काय आहे बघ तर रे'  वेदना सोशित ते म्हणाले. त्यांना बाजेवर बसवून मी त्यांनी ठोकरलेली वस्तू उचलली. त्यो गवत कापायचा ईळा व्हता. त्याला नुकतीच धार लावलेली दिसत होती.

'बघा. ईळा हाय. नशिब चांगल, तुमचा पाय मुठीकडून लागला. पात्याकडून असतं तर पाय कापला असता. ' मी म्हन्लो.

'दाखव. ' त्यांनी हात पुढे केला. मी त्यांच्या हातात ईळा दिला. ईळ्याला निरखून पहात ते म्हन्ले, 'चांगला वजनदार आहे. गवतंच काय याने तर बोकडही अज्जात कापला जाईल. ' बोलतांना त्यांनी ईळ्याच्या धारेवरून बोट फिरवले.

'स्स् हाय... ! ' त्यानी हात झटकून बोट तोंडात घातले. दुसऱ्या हातानी ईळा दूर भिरकावून दिला. 'मायला, माझ्या का मागे लागलं? ' ते रागाने बोलले.

त्यांनी भिरकावलेला ईळा म्या  उचलला तसं ते ओरडले.

'पडू दे. '

'उचलून ठीवतो, पुन्हा पायाला लागन. ते काही बोलले नाही. म्या ईळा उचलून बाजूच्या टेबलावर ठ्युन दिला. टेबलावर दारूची बाटली, खाण्याचे पदार्थ वगैरे ठेवलेले व्हते.

'रामेशर येत राहील आपण सुरू करू'  त्यांनी सुचना केली. तसा मी त्यांना पेग भरून दिला.

'तू घेणार नाहीस का? '

'मी रामेशरची वाट पहातो. '

'कर सुरू. ' ते म्हणाले, 'आपल्याला नऊच्या आंत आटपायचं. नऊला मला भेटायला कुणीतरी येणार आहे. तेव्हा तुम्हा दोघं थांबू नका. '

'कोन येनार हाय? ' अंदाज घेयाला म्या  सहज इचारलं.

‘नस्त्या चौकश्या करीत जाऊ नको. तुला हजारदा सांगितलं. ’  ते मह्यावर डाफरले. त्यांच्या हातातला ग्लास हिंदकळला, दारू त्यांच्या अंगावर उडाली. म्या गप्प ऱ्हायलो.

रामेशर आल्यावर त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. त्यांच्या गप्पात मला रस नव्हता. टाकीचा ठेका मिळावा म्हणून रामेश्वर भाऊंना खुश करण्यासाठी काय बोलत होता. काय सेवा करत होता ते दूरून पहात होतो. रामेशर, मालकाला खुश करण्यासाठी शेपटी हालवणाऱ्या कुत्र्यासारखा वाटला.

बोल्ता बोल्ता त्येंच्यात वादावादी सुरू झाली. अरविंदाभाऊ ओरडू लागले. रामेश्वर उद्धटसारखा उत्तर देवू लागला. त्यानं भाऊंना पैसे दिले व्हते. कुणाला पैसे दिले की देणारा मग्रुर होतो. त्यातून तो दारू प्यायला व्हता. अरविंदाभाऊंना दारू जास्त झाली व्हती. सब कॉन्ट्रॅक्ट घेणाऱ्या दीडदमडीच्या मानसानं मग्रुरीनं बोलावं हे  त्यांना सहन झाल नाही. दोघं हमरातुमरी वर आले तव्हा म्या मधं पडलो. दोगांना बी शांत केलं.

दोग शांत झाल्यावर पार्टी पुढे सुरू झाली. पर मजा किरकिरा झाला. कसंबसं जेवन उरकून आमी, म्या आन रामेश्वर, निघालो. तव्हा भाऊंना दारू फार झाली होती. म्या त्येंना म्हन्लो, म्या  थांबतो भाऊ, तुम्हाला घरी सोडायला. पर ते माझ्यावरच भडकले म्हन्ले तुला माझ्या खाजगी गोष्टीत नाक खुपसायला थांबायचं ? चालता हो. ’

रामेशर तर त्यांना सोडवायला येऊ का म्हून पन म्हन्ला न्हाई. ठेका गेल्यानं तो गपगार व्हता. नवाच्या आधी त्येंना सोडून आम्ही निघून गेलो.

जरा पुढं गेल्यावर मह्या लक्षात आलं, भाऊंच्या अंगावर सोनं हाय. ब्यागीत पाच लाख रुपये हायेत. नशेत भाऊंनी दाराला कडी बी घातली आसंन का न्हाय? यकदा बघून यावं म्हून म्या मोटरसायकल वळवली आन परत गेलो.

माहा अंदाज खरा होता. झोपडीचं दार उघडंच व्हतं. म्या आंत गेलो तरी त्यांना पत्ता नव्हता. टेबलावर अर्धा भरेल गिल्लास व्हता. आमी गेल्यावर बी त्येंच पीनं चालूच व्हतं. म्या  टेबलावरील ब्याग उचलली. त्यांच्या अंगावरील सोन्या कडं नजर गेली. ते अंगावर ऱ्हाऊ देनं धोक्याचं वाटलं म्हून म्या ते काढून घेतले. नवल मंजी, त्येंना शुध नव्हती. म्या  दागिने ब्यागीत ठीऊन, ब्याग नेऊन मोटर सायकलला लावली.

दरोजा बंद कराया परत गेलो तव्हा त्येंची झोप चाळवली. माही चाहूल लागताच त्येंनी ओरडून इचारलं, ‘कोण आहे? ’

‘ म्याच हाय प्रताप. ’मी समोर जात म्हणालो.

‘तू परत कशाला आलास? माझ्यावर नजर ठेवतोस का? ते रागाने बोलले. ’ त्येंचा हात खिशात गेला. म्या पत्र काढलं की काय असा त्यांना संशय आला व्हता. पत्र हातला लागल्यावर त्येंना बरं वाटलं.

‘म्या त्येंना ब्याग आन दागिन्याबद्दल सांगितलं. तेंना ते पटलं पर उघड त्यें वरडले,

‘जातो का नाही रे हरामखोरा. ’ त्येंनी मह्या गालावर जोरदार थापड मारली.

मान खाली घालून, गाल चोळत म्या भाईर पडलो. इचार केला, आता वाद घातल्या परीस उद्या समदं सांगता ईल. जो कुनी भेटायला येनार हाय त्याच्या आधी निघून गेलेलं बरं. म्हणून म्या घाईनं निघून गेलो.

दुसऱ्या रोजी आपन लग्नाला निघून गेलो. परत आलो, त्यादिवशी संध्याकाळी समजलं, अरविंदाभाऊ तव्हापासून घरला गेलेच न्हाई. त्येंच्या घरचे प्रश्न इचारायला सुमनबाई कडं जाणार हायेत. त्येंच्या सोबत मी बीन सुमनबाईकडे गेलो. तिनं खाणाखुणा सांगतांच मह्या डोळ्या समोर बामनाची झोपडी उभी राहीली. एकट्याने जाऊन पहाण्याची मला हीम्मत झाली न्हाई.

भाऊंनी ग्रुप करून अरविंदाभाऊला शोधायला पाठवलं तव्हा मी नंदूला सोबत घेतलं. वाटेत रामेशरला फोन करून बोलावून घेतलं. ब्यांकेच्या जवळून जात व्हतो तर मनजीत आमच्या सोबत आला. त्येला घेऊन जायाचं मह्या मनांत नव्हतं. पर त्येला न्हाई म्हनाया काही कारन नव्हतं.

दोन दिवस माणूस एक्या ठिकानी ऱ्हात न्हाई. भाऊ न सांगता कुठतरी गेले असतील असं आमाला वाटत होतं. त्यांच प्रेत पाहून आमाला धक्का बसला. त्या धक्क्यातून सावरायला आन शांतपनं ईचार कराया येळ मिळावा म्हून नंदूला आणि मनजीतला गांवात पाठवून आमी तिठंच थांबलो.

‘म्या सोनं आणि ब्याग घेऊन गेलो हे  कुणालाच माहीत नव्हतं. यकदा वाटलं, पोलिसांना सांगुन टाकावं, पर पुन्ना इचार केला, त्येंना सांगितलं तर ते भरोसा ठीवणार नाही. उलटा आपल्यावरच संशय घेतील. म्हून मी  काही बोललो न्हाई. आन तुला खरं सांगायचं आशा, त मला वाटलं खुनी पकडला गेला त त्याच्या वर चोरीचा आळ जाईल. दागिन, पैसा आपसूक आपल्याला हडप करता यिल.

पर ब्यागीचं हमेशा नाव निघाल्यानं म्या बेचैन झालो. घराची झडती घेतली तर पोलिसांना ब्याग सापडायला नको म्हून कालराती मी ती नंदूच्या हीरीत फेकून दिली. मला वाटलं माहा संबंध संपला.

पर सकाळी तुला दुधवाल्यानं नारायनच्या खुनाची बातमी सांगीतली ती म्या ऐकली. तव्हा माह्या ध्येनात आलं, हे प्रकरण वाटतं तेव्हढं सोप न्हाई. खुनी, सावकार असूंदे  की अजून कुनी बी असुंदे. जो या तिघांना मारू शकतो तो मला बी ठार मारू शकतो. ’

ह्या ईचारांनी म्या बेचैन झालो आशा. मला समजंना  म्या  काय करू? पोलिसांत गेलो त आधी ते मला अटक करतील. न्हाई  गेलो त त्यो खुनी मला सोडणार नाही. काय करू?

हकीकत संपवून तो शांत बसला. तिला सगळं सांगून टाकल्यानं त्याच्या मनावरचं ओझ हलकं झाल्यासारखं वाटलं. त्याला वाटलं, आपण विचार करतो तितकी वाईट परिस्थिती नाही. आपण एकटे नाही, आशा पण सोबत आहे.

निर्णय घेतल्या सरसी ती  ताडकन् पलंगावरून उठली.

‘उठा ताबडतोब तयार व्हा. आपण एखाद्या वकिलाचा सल्ला घेऊ. तो सांगेल तसं करू.

‘त्येन पोलिसांत जाण्याचा सल्ला दिला त? ’

‘जायचं. तुमची बाजू खरी असेल तर घाबरायचं काय कारण? त्रास सहन करावा लागेल.  केलेल्या चुकीची शिक्षा पण भोगावी लागते ना? चला. ’

पांघरून फेकून तो  बाथरूमकडे निघाला तेव्हढयात दार ठोठावल्याचा आवाज आला. तो थिजून जागीच उभा राहीला. घाबरून त्यानं आशाकडे पाहीलं.

त्याला बाथरूमला जाण्याचा इशारा करून आशा दरवाजा उघडायला गेली.

दारात इन्पेक्टर कदम शिपायां सोबत उभे होते.

‘या साहेब, ’ ती हसून म्हणाली, ‘ कोण म्हणत पोलिस वेळेवर येत नाही म्हणून? ’

तिच्या स्वागतानं ते चकित झाले. दार उघडणारी व्यक्ति आपल्याला पाहून घाबरेल. अशी त्यांची अपेक्षा होती. पण ही तर पाहूण्यांच स्वागत करावं तसं हसून स्वागत करते आहे.

‘मि. प्रताप घरी आहेत का? आम्हाला त्यांच्याशी बोलायचं. ’ त्यांनी करडया आवाजात विचारले. तिकडे दुर्लक्ष करून ती सहज सुरात म्हणाली,

‘बाथरूम मधे आहेत. बसा. त्यांचा चहा व्हायचाय. त्यांच्या सोबत तुम्ही चहा घेणार का? ’

‘आम्ही त्यांना अटक करायला आलो. ’ कदम म्हणाले.

‘हरकत नाही. ’ ती म्हणाली. ‘पण चहा घेणार ना ? ’

‘आमच्याकडे झ़डतीच वारंट आहे. ’ त्यांनी शेवटचा बॉम्ब टाकला.

‘त्याची गरज नाही. अरविंदाचे दागिने आणि पैसे हे बाथरूममधून आल्यावर देतील. बॅग मात्र नंदूच्या विहीरीत फेकली. तेव्हढी काढण्याची तुम्हाला व्यवस्था करा. हे पहा आलेच हे. तुम्ही चहा तरी घ्यावा अशी माझी विनंती आहे. ’

आश्चर्याने पहाणाऱ्या कदमकडे लक्ष न देता ती स्वयंपाक घरात गेली.

# प्रकरण १६

दुःखी मनानं चारूदत्त घरी परतला.

तो घरी आला तेव्हा दिवाणखान्यात भाऊ, राजशेखर, आणि मावशी बसलेली होती. चारूदत्तला पहातांच त्यांची आपसातली चर्चा बंद पडली. ते नारायणच्या खुनाची चर्चा करीत होते. चारूदत्तचा पडलेलला चेहरा पाहून मावशीनं काळजीच्या सुरात विचारलं,

'काय झालं रे चारूदत्त, तुला बरं वाटत नाही का? '

'नाही, मी बरा आहे. ' सोफ्यावर अंग झोकून तो म्हणाला.

'चारूदत्त! अरे, होतास कुठं सकाळपासून तू? ' त्याचा आवाज ऐकून बाहेर आलेली रमा म्हणाली, 'एव्हढा थकल्यासारखा का वाटतो? सकाळपासून चहा सुध्दा घेतला नाहीस. थांब मी तुझ्यासाठी चहा बनवून आणते. '

तो काही उत्तर देण्याच्या पुर्वी ती आंत गेली.

'नारायणबद्दल कळालं. बिचारा! कशानं गेला कुणास ठाऊक? त्यानं आत्महत्या केली म्हणायची की त्याचाही खून झाला? ' भाऊंने विचारले.

'खून. त्याच्याच मफलरनं गळा आवळून कुणीतरी त्याचा खून केला. '

'अग आई गं... . बिचारा! ' मावशी कळवळली.

'अजून खुप काही घडले. ह्या सगळ्या खुनां मागे प्रतापचा हात आहे. एव्हाना कदमने त्याला अटक केलीही असेल. '

'काय सांगतो ! ' अविश्वासानं राजशेखर बोलला. 'तो तर काकांच्या जवळचा माणूस होता. '

‘शक्यच नाही. ’ भाऊ बोलले. ‘ह्यात सावकाराचा हात आहे. प्रतापवर दबाव आणून त्यानं गुन्हा कबुल करायला लावला असणार. त्याला आता अरविंदाचं पाठबळ नाही ना. पण काय रे, सावकाराने तर पोलिसस्टेशनला जाऊन गुन्हा कबुल केला होता ना? त्याला अटक करायची सोडून प्रतापच्या मागे लागले. आपलं पोलिसखातं भारी भ्रष्ट आहे. ’

‘भाऊ, राजकारण्याला प्रत्येक गोष्टीत विरोधकांचा हात दिसतो तसं तुम्हाला प्रत्येक गोष्टीत सावकाराचा हात दिसतो. ’ चारूदत्त हसून म्हणाला.

‘सावकारांनी कबुलीजबाब दिला तो दुःखाच्या अतिरेकानं त्यांचा मानसिक तोल सुटला म्हणून. त्यांचं बायकोवर अतिशय प्रेम होतं. तिच्या मृत्युच्या आघातानं त्यांचं मानसिक संतुलन बिघडलं. आपल्या पत्नीच्या मृत्युला कारण झालेल्या लोकांना आपण शिक्षा केली, त्यांना ठार मारलं असं त्यांना वाटलं. अरविंदाभाऊचा खुन आपण केला. तिच्या अपमानाचा बदला घेतला. असं ते तिला सांगणार होते. ते ऐकून तिच्या मनाला समाधान लाभेल असं त्यांना वाटलं. पण ही बातमी पत्नीला सांगण्या आधी तिचा अंत झाला. ‘ती’ बातमी त्यांच्या मनांत दबुन राहीली. त्या भावनेवर पत्नीच्या मृत्युचा आघात झाला. तेव्हा त्यांना आपण खरंच अरविंदाचा खुन केला असं वाटू लागले. याला मानसशास्त्रात थिअरी ऑफ डिल्युशन म्हणतात. त्या थिअरीप्रमाणे आपण न केलेले कृत्य आपल्या हातून घडले असं त्या पेशन्टला वाटत असतं. एक खून तर घडलाच पण ह्या सगळ्याला कारणीभूत असलेल्या प्रताप विषयीचा राग उफाळून आल्याने त्यांनी पोलिसस्टेशनला येऊन गुन्हा तर कबुल केलाच, पण प्रतापचा खून करणार म्हणून पोलिसांना आव्हान दिलं. आपल्याला छळणाऱ्या पोलिसांची तारांबळ पाहून त्यांना आनंद होत होता. ही तात्पुरती अवस्था असते. मानसोपचार ट्रिटमेंटनंतर त्यांचा हा गैरसमज दूर होईल. हळू- हळू ते पुर्ववत होतील. पण त्यांनी अकस्मात गोंधळ निर्माण केल्यानं मनजीतची जबानी मात्र पुर्ण होऊ शकली नाही... ... ’

‘माय गॉड! खरंच की. मनजीतची जबानी अर्धवट राहीली! ’ तो उद्गारला.

‘मनजीत? त्याचा काय संबंध? ’ मावशीनं विचारलं.

रमाने दिलेला चहा घेत तो म्हणाला, ‘कुणास ठाऊक? इतकं सगळं कंफ्युजन आहे. प्रत्येकजण त्यात भरच घालतो. नक्की कुणावर संशय घ्यावा काही कळत नाही. ’

‘पण पोलिसांना प्रतापला का अटक केली? ’ मावशीनं विचारलं.

‘प्रतापला? ’ रमाने आश्चर्यानं विचारलं.

‘कारण त्याच्या विरूध्द भक्कम पुरावा आहे. काकांच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि पैशाची ब्रीफकेस त्याच्याकडे सांपडली. काल रात्री जेव्हा नारायणचा खून झाला त्या सुमारास तो पुलाकडील भागात आढळला. सुमनबाई गेली त्या संध्याकाळी तो तिच्या घरी  हजर होता. काकांचा खून झाला तेव्हा तर तो तिथंच होता. ’

दीर्घ उसासा टाकून मावशी म्हणाली, ‘अशा रितीने एक प्रकरण संपलं. बिचारे भावजी. एव्हढा करोडपती माणूस, पण काही लाखांसाठी प्राण गमवावा लागला. ’

‘असंगाशी संग प्राणाशी गाठ. ’ भाऊ दुःखाने उद्गारले.

त्यांच्या दुःखाचा आवेग कमी झाल्यावर चारूदत्त म्हणाला, ‘मावशी, माझं काम संपलं. रजाही संपत आली. आज मुंबईला परत जावं  म्हणतो. ’

‘आजच? अरे असं कसं? सुतकामुळे तुझ्यासाठी पाहूणचारही करता येत नाही. ’मावशी म्हणाली.

‘ त्याचं काही नाही ग मावशी. मी समजू शकतो. तू  काही वाईट वाटून घेऊ नकोस. ’

‘अजून वैशालीचा निरोप घेतला नाही. ती तक्रार करीत होती, तू तिला पुन्हा भेटलाच नाही. ’ रमा त्याची प्रतिक्रिया आजमावत बोलली.

‘गडबडीत जमलंच नाही. माझ्या तर्फे तू तिची माफी माग. मावशी मी बुलडाण्याहून शेगांवला जाईल. तेथुन मुंबईला डायरेक्ट ट्रेन आहे. ’

‘उद्या जा. एव्हढया घाईनं जाऊ नको. ’ भाऊ म्हणाले.

‘तुमचा शब्द मी पाळला. आता आग्रह करू नका. ’

तो माडीवर निघून गेला. तिघांची नजरा नजर झाली.

‘त्याचं काहीतरी बिनसलेलं दिसतं. ’ राजशेखर म्हणाला.

'वैशाली सोबत बाहेर गेला तेव्हापासून त्याच्यात फरक पडला. कार्तीने त्याला  काय भरवले देव जाणे. ' मावशी वैतागाने म्हणाली. 'मी त्याला आधी कल्पना देणारच होते, पण तो आला आणि नेमकं त्याच वेळी भावजीची दुर्घटना घडली. बोलायला वेळ मिळाला नाही. '

' त्याला गांवातल्या कुणीतरी सांगितले. वैशालीताई आणि मनजीतबद्दल. तेव्हापासूनच तो नाराज होता. ' रमा म्हणाली.

'तुला काय माहीत? ' राजशेखरने विचारले.

'दीर वहीनींशी मोकळेपणानं बोलतात. ' तिने त्याला ठसक्यात उत्तर दिलं. मग गंभीर होत ती म्हणाली, 'आपण त्याला बोलावलं म्हणून तर तो दुखावला गेला नाही ना? '

'मी बोलते त्याच्याशी. '  मावशी उठत  म्हणाली.

चारूदत्त आपल्या खोलीत गेला तसा सरळ बिछान्यावर जाऊन पडला. तो मनातून अतिशय उदास झाला होता. विचारात सुसंगती नव्हती. कधी वैशालीचे विचार मनांत येत तर कधी अरविंदाच्या खुनाचे.

अरविंदाच्या खुनाच्या आरोपात प्रतापला अटक झाली असली तरी त्याचं समाधान झालं नव्हतं. काहीतरी चुकत होतं, कुठला एक दुवा सुटत होता.  पण काय ते समजत नव्हतं. सगळ्या घटना इतक्या वेगात घडल्या की, सुसंगत विचार करायला त्याला वेळ मिळाला नाही. त्याला वैशालीबद्दलचे विचारही कारणीभूत होते. किती प्रयत्न केला तरी खुनाचा विचार मागे सारून तिचा विचार कधी सुरू होई ते कळत नव्हतं.

वैशाली सोबत संसाराचं त्याचं स्वप्न भंगलं होतं. आपण धारपवाडीला आलोच नसतो तर बरं झालं असतं. वैशालीनं तर निराशा केलीच, अरविंदाकाकांचा खुनी शोधण्यात आलेल अपयशही त्याला डाचत होतं.

" मला वाटलं मुंबईच्या सी आय डीत काम करणारा माणूस सोबत असल्यावर अरविंदाचा खुनी सांपडायला वेळ लागणार नाही. त्यानंतर दोन खुन झाले म्हणून तोंडातून निघून गेलं. तुम्ही मला क्षमा कराल. "

कदमचे शब्द त्याच्या कानात घुमले. त्याला अपराधी वाटू लागलं.

चटका बसावा तसा तो बिछान्यातून उठला, शक्य तितक्या लवकर येथून निघून जावं असं त्याला वाटलं. तेव्हढया दार उघडून मावशी आंत आली. त्याच्या केसांतून हात फिरवत ती म्हणाली,

‘तुला काय झालं, मला सांगणार नाही का? ’

‘काही नाही गं मावशी. ’

‘ खोटं बोलू नको. तुझी मावशी आहे मी. लहानपणापासून ओळखते तुला. सांग. ’

‘मावशी! ’

‘रागावलास  माझ्यावर? मी तुला बोलावून घेतल्याबद्दल? ’

‘नाही गं मावशी, खरं तर, मला वैशाली आवडत होती. कसं बोलावं ते  कळत नव्हतं. जेव्हा तुझा फोन आला तेव्हा मला मनापासून आनंद झाला. मोठ्या अपेक्षेनं मी इथं आलो. मावशी मला सांग, तुला तिच्याबद्दल माहीत असतांना तू मला कां बोलावून घेतलंस? कशासाठी माझ्या भावनांशी खेळ केला? मनांतली गोष्ट मनांत जीरून गेली असती. ’

‘मला तिच्याबद्दल माहीत होतं म्हणूनच मी तुला बोलावून घेतलं. बावळटासारखा पाहू नको. मी तिला पहिल्या दिवसापासून ओळखते. ह्या वयात असं होतं. म्हणून पोरांना वाऱ्यावर सोडता येत नाही. तू आल्यावर तुला सगळी कल्पना देऊनच,  मी पुढचं पाऊल टाकणार होते. पण त्याच संध्याकाळी अरविंदाभावजींची धक्कादायक बातमी समजली. घरात मृत्यु झाल्याने मला तुझ्याशी बोलायला वेळ मिळाला नाही. तू गैरसमज करून घेऊ नको. ती माझी आहे तितकाच तू पण माझा आहे. मी तुमचं वाईट करील का? ’

‘तिला मनजीतशी लग्न करायचं. ’

‘ती खुप म्हणेल. आम्ही मान्य करायला हवं ना. ’

‘पहिल्यासारखे  दिवस राहीले नाही. मुलींना स्वताःच मत आहे. प्रगत विचारांची पिढी आहे, जातपात सारख्या गोष्टी मानत नाही. ’

‘तुम्हा तरूणांचे प्रगत विचार फक्त लग्ना पुरते मर्यादित असतात. विजातीय लग्न करून आपण फारमोठी क्रांती केली असं तुम्हाला वाटतं. मी म्हणते, जातीचं जाऊ दे. किमान धर्माचा तर विचार कराल की नाही. तो काय गणपतीत नाचणार आहे का? जाऊ दे. हा वाद मी तिच्याशी घालेल. मला तुला एव्हढंच सांगायचं होतं की, मी काही फसवून तुझ्या गळयात माझी मुलगी मारणार नव्हते. ’

थोडं थांबून ती म्हणाली,

‘लग्न ही परमेश्वराची अटकळ आहे. जे व्हायचे ते होईल. आधी तुझ्या मनांतला गैरसमज दूर कर एव्हढं माझं सांगणं आहे. काय? ’

‘होय ग मावशी, मी तुझा राग धरील का कधी? ’

‘मग मला सांग, तिची जर तयारी असेल तर तू तिच्याशी लग्न करशील का? तुम्ही एकमेकांना पाहीलं आहे. मी तिला तिचं मत विचारू की नको? ’

चारूदत्तला काय उत्तर द्यावे ते सुचेना. तो शांत बसून राहीला.

‘ठिक आहे. ’ जरा वेळ वाट पाहून मावशी म्हणाली, ‘विचार करून सांग. मुंबईला गेल्यावर फोन केला तरी चालेल. ’

त्याला सुटल्यासारखे वाटले. त्याने मान डोलावली.

‘स्नान करून लवकर खाली ये. तुझ्यासाठी जेवायला थांबलेत. ’

‘जेवण करून मी निघावं म्हणतो. ’

उद्या राजशेखर बुलडाण्याला जाणार आहे. तुला शेगाव गाडीत बसवून देईल.

*****

दुसरें दिवशी  बुलडाणा बसस्थानकावर चारूदत्तला शेगावच्या गाडीत बसवून राजशेखर त्याच्या कामासाठी निघून गेला. अजून ड्रायव्हरचा पत्ता नव्हता. कंडक्टर तिकीट वाटत त्याच्या दिशेनं सरकत होता. त्यानं खिडकीतून बाहेर पाहीलं. लोक घोळक्यानं इतस्ततः पसरले होते. वचावचा बोलत होते. पचापचा थुंकत होते. खाद्य पदार्थ विकणारे खिडकी जवळ येऊन बसवर थाप मारून लक्ष वेधुन घेत होते. काही विक्रेते गाडीत येऊन ओरडत होते.

चारूदत्तनं थकुन, मान सीटवर टेकवून, डोळे मिटून घेतले.

वैशालीला कायमचं विसरायला हवं. सरळ आयुष्यात उगाच हे वादळवळण आलं. सुखी आयुष्याला गालबोट लागलं. धारपवाडीला विसरायला हवं. छे! धारपवाडीला कसं विसरता येईल? अरविंदाकाकाचा खुनी अजून पकडला गेला नाही. तो पकडण्याची त्याची जबाबदारी नाही. राजशेखर किंवा सावकार खुनी नाहीत याची खात्री पटवून त्यानं भाऊंना व वैशालीला दिलासा दिला. तेव्हढचं त्याचं कर्तव्य होतं.

त्याने मनाची समजुत घालण्याचा प्रयत्न केला पण त्याची अस्वस्थता कमी झाली नाही.

‘तिकीट. ’  कंडक्टरच्या आवाज ऐकुन त्यानं डोळे उघडले. ड्रायव्हर सीट येऊन बसला होता. इंजिन गरम करण्यासाठी गाडी स्टार्ट करून डबलबेलची वाट पहात होता.

अजून वेळ गेली नाही. त्याला उतरून जावंस वाटलं. मनाच्या ओढीकडे दुर्लक्ष करून ? त्यानं खिशातून पाकिट काढलं.

‘एक शेगाव. किती  होतात? पैसे काढत त्याने विचारलं.

पैसे काढताना त्याच्या पाकीटातून कागद पडल्याचे कंडक्टरला दिसले. बोटानं त्याचे लक्ष तिकडे वेधत त्याने सांगितले,  ‘तुमचे कागद पडलेत. ’

त्यानी खाली पडलेले कागदाचे चिटोरे उचलले.

ती बसची तिकीट होती.

बसची तिकीटे? आपल्या पाकिटात कशी आली? अचानक त्याला आठवले,

ती तिकीटे मनजीतने दाखवलेली होती.

‘खुन झाला तेव्हा मी बुलडाणा- धारपवाडी  बिघडलेल्या मुक्कामी गाडीत अडकून पडलो होतो. ’ त्याला मनजीतची जबानी आठवली.

बुलडाणा! तो इथुनंच बसला होता धारपवाडीला जाण्यासाठी.

त्याने मनजीतच्या तिकीटाकडे निरखुन पाहीले.

हा पॅसेंजर वेडा तर नाही. कंडक्टरच्या मनांत विचार आला.

‘ तिकीट? ’ कंडक्टर तुसड्या सुरात म्हणाला.

‘सॉरी कंडक्टर साहेब, मी तुमच्या बस मधे येऊ शकत नाही. ’ गडबडीने बॅग घेऊन तो खाली उतरला.

त्याच्या विक्षिप्त वागण्याकडे कंडक्टर चकित होऊन पाहत राहीला.

# प्रकरण १७

चारूदत्तने तिथं जमलेल्या माणसांवर उडती नजर फिरवली. भाऊ, मावशी, रमा, राजशेखर, रणजीत, मनजीत, आशा. रामेश्वर, नंदू सगळयांचे डोळे त्याच्या वर खिळले होते. आपल्याला इथं कशासाठी बोलावलं? हा त्यांना पडलेला प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. वैशालीच्या चेहऱ्यावर क्षणकाल स्थीरावलेली नजर त्याने निग्रहाने वळवली.

‘त्याच्या नजरेत विषाद आहे. ’ वैशाली मनांत म्हणाली. ’ मला त्याच्याबद्दल खुप वाईट वाटतं, पण मी त्याच्यासाठी काहीच करू शकत नाही. ’

खिडकीतून येणाऱ्या सूर्यकिरणांनी दिवाणखाना उजळून निघाला होता. नाटक सुरू होण्याची वाट पहाणांऱ्या प्रेक्षकांसारखी त्यांची चुळबुळ सुरू होती. सकाळी मुंबईला जाण्यासाठी गेलेला चारूदत्त अचानक परतला याचं त्यांना नवल वाटत होतं. कदमने फोनवर आश्चर्याने विचारल्यावर त्याने हसून उत्तर दिले,

‘एक केस पुरता का होईना मी तुमच्या पोलिसस्टेशनला तुमच्या हाताखाली काम केले. तुम्ही मला रिलिव्हींग लेटर आणि सेंडऑफ द्यायला हवा. मी येई पर्येत तुम्ही तयारी करून ठेवा. सेंडऑफला खास लोकांची उपस्थिती हवी. भाषण मात्र मी एकटाच करणार. ’

त्यानं कदमला सांगितलेली सगळी माणसं हजर होती.

भिंती वरील घड्याळानं पाच वाजल्याची, टोल देऊन, सुचना दिली. त्याच वेळी दारावर थाप पडली.

‘ या इन्पेक्टर कदम! वेळेचे अगदी पक्के आहात. ’ दरवाजा उघडीत चारूदत्त म्हणाला. प्रतापला सोबत आणलं हे बरं केलं. आशाबाई, आपण जागेवर बसा. त्यांची काळजी करू नका ते बरें आहेत. बसा कदम. ’ रिकाम्या जागेकडे बोट दाखवून चारूदत्त म्हणाला. ‘प्रतापची काळजी करू नका. आशाबाईंसमोर ते काही वेडेपणा करणार नाही. ’

दरवाजा नीट बंद करून तो आपल्या जागेवर आला.

'मंडळी, जास्त ताणून न धरता आपण मुळ विषयाकडे वळू या. ' त्याने पुन्हा सर्वांकडे नजर फिरविली. यावेळी त्याच्या नजर कठोर झाली होती. 'तुम्हाला आश्चर्य वाटत असेल, सकाळी मुंबईला जातो म्हणून गेलेला चारूदत्त परत का आला? मिटींग कशासाठी बोलावली? त्याची उत्तरं देण्यापुर्वी मी तुम्हाला या सगळया प्रकाराची पार्श्वभूमि सांगतोः

'अरविंदाच्या खुनाच्या तपासकामात कदमसाहेबांनी मला मदत करू दिल्याबद्दल त्यांचे आभार मानण्याचं राहून गेलं होतं. त्यांनी प्रतापला अटक केली. त्यांच्या चौकशीतून, पुराव्यातून सत्य बाहेर येईल. पण मला एकाएकी सत्याचा साक्षात्कार झाला. माझ्या सर्व शंकांच निरसन झालं. तुमच्या मनांतल्या शंका दूर करण्यासाठी मी परत आलो.

ही एक विचित्र केस आहे. या केसमध्ये उत्तर न मिळालेली अनेक प्रश्न आहेत. उदाहरणार्थ, काका संकटात असून ते बामनाच्या मळयात पडलेले आहे हे सुमनबाईंना कसं दिसलं? लोकांचा विश्वास आहे, तिच्या अंगात देवी येते. ती सांगते. सांगणं वेगळं आणि दिसणं वेगळं. सुमनबाई म्हणाली होती, मला ते एका झोपडीत पडलेले दिसतात. *दिसतात.* पुर्वेकडे तोंड असलेली झोपडी. दारासमोर पिंपळ सळसळतो. हेच शब्द होते ना सुमनबाईचे?

त्या दिवशी आरतीला हजर असणाऱ्यांच्या माना नकळत हालल्या.

तिनं स्वतःतरी पाहीलं असावं. नाहीतर प्रत्यक्ष पाहणाऱ्या कुणीतरी तिला ते सांगितलं असावं. प्रत्यक्ष खुनीशिवाय कोण पाहू शकेल?

ही केस विचित्र आहे असं मी म्हणालो त्याचं दुसरं कारण असं , या केसचा तपास सुरवातीपासूनच भरकटला. मी अरविंदाकाकांच्या घरी समाचाराला गेलो तेव्हा वैशालीने मनांतली भीती बोलून दाखविली. तिला भीती वाटत होती की त्यांच्या खुनात राजशेखरचा हात आहे.

राजशेखरनं वैशालीकडे पाहीलं. ती ओशाळून खाली पहात होती.

तू रागावू नकोस. तिला तुझी काळजी वाटत होती. तू निवडणूकीच्या तिकीटावरून त्यांच्याशी भांडला तेव्हा तू अरविंदाला दिलेली धमकी तिनं ऐकली होती. तिनं मला या प्रकारणात तुझा हात

नाही याची खात्री करून घेण्यास सांगितलं. जर तुझा हात असता तर तुला वाचविण्यासाठी ती काय करणार होती, ते तू  तिलाच विचार.

चारूदत्तचं बोलणं ऐकून तिच्या गालावर लाली पसरली. तिकडे दुर्लक्ष करून तो म्हणाला,

मी ह्या केसमध्ये लक्ष घातलं ते वैशालीच्या सांगण्यावरून. तेही राजशेखर यात अडकला नाही, ह्याची खात्री करण्या पुरतं. घरी आल्यावर भाऊंनी मला सावकाराबद्दल सांगून  तपासाची दिशा बदलली. अरविंदाचा खुन करण्यासाठी सावकारला सबळ कारण होतं. प्रतापने केलेल्या खोट्या तक्रारीमुळे त्यांच्या पत्नीचा जो मानसिक छळ झाला, तिची जी मानहानी झाली त्याचा तिच्या मनाला धक्का बसला. तिची मानसिक स्थिती बिघडली. त्या नैराश्यांतून तिनं आत्महत्या केली. तिला आत्महत्या म्हणावं लागतं. खरंतर तो खुन आहे. प्रतापच्या खोटया तक्रारीचा बळी आहे. ’

प्रताप उभा राहीला. हात जोडून मुक माफी मागून खाली बसला.

प्रतापने जबानी देतांना बऱ्याच गोष्टी लपवून ठेवल्या. त्याने मुद्दाम रामेश्वर आणि अरविंदाभाऊचे भांडण पोलिसांना सांगितले. पोलिसांना काय सांगायचं ते दोघांनी आधीच ठरवलं होतं. तेव्हा रामेश्वरला माहीत नव्हतं की अरविंदाच्या अंगावरील दागिने व पैश्याची बॅग प्रतापकडे आहे.

प्रताप खाली बस. तुला बोलायला संधी दिली तेव्हा तू बोलला नाहीस, आता बोलून उगाच संभ्रम वाढवू नकोस. बस. मला बोलू दे.

आपली बाजू मांडण्यासाठी उभं राहणारा प्रताप खाली बसला.  चारूदत्त पुढे बोलू लागला.

सुरवातीला प्रतापनं खून केला असा मला संशय  आला. त्याच्याकडे हेतू होता. संधी होती. पांचलक्ष रुपये आणि सोन्याचे दागिने . कुणालाही खून करायला प्रवृत्त करील, हजार रुपयां करता खुन होतात.  आम्ही फिंगरप्रिंट रिपोर्टची वाट पहात होतो.

रामेश्वरची जबानी बरीच प्रामाणिक होती. त्याची  जबानी मनजीत आणि प्रताप कडे बोट दाखवत होती. पण प्रताप इतकीच रामेश्वरला अरविंदाचा खून करण्याची संधी होती. सबळ कारण होतं. अनेक वर्ष सब कॉन्ट्रॅक्टरशिप केल्यानंतर त्याला मुख्य कंत्राट मिळण्याची संधी होती. ती  हातची गेल्याने रामेश्वरला फस्ट्रेशन येणं सहाजिक होतं. त्याचे पैसेही अरविंदाकडे अडकले होते.

पाण्याच्या टाकीचा कॉन्ट्रॅक्ट मिळावा म्हणून रामेश्वरनी अरविंदाला बरेच पैसे दिले होते. ते परत मिळण्याची शक्यता नाही हे त्याला कळून चुकलं. कारण कुणाचा पैसा परत करण्याची अरविंदाला सवंय नव्हती. अरविंदाकरीता ही रक्कम छोटी असली तरी रामेश्वर करता ती मोठी होती. अरविंदाचा निरोप घेऊन रामेश्वर आणि प्रताप निघून गेले, तेव्हा वाटेत रामेश्वरच्या लक्षांत ह्या गोष्टी आल्या. अरविंदाला दिलेले पैसे परत कसे मिळवावे याचा विचार करतांना त्याला आठवलं, तिथ पाच लक्ष रूपयांची बॅग पडलेली आहे. तिथुन निघताना त्याने अरविंदाची बेधुंद अवस्था पाहीली होती. पैसे वसुल करण्याची हीच संधी आहे. त्याच्या दृष्टीने ही चोरी नसून आपले पैसे परत मिळविणं होतं. ही संधी दवडली तर पुन्हा पैसे मिळणार नाही. असा विचार करून तो माघारी फिरला.

पण तो आंत जाऊ शकला नाही. लांबूनच त्यानं झोपडीतून प्रतापला बाहेर पडतांना पाहीलं. प्रताप गेल्यावर आंत जाऊ असा विचार करून तो प्रतापच्या नजरेला पडू नये म्हणून लपून राहीला. प्रताप गेल्यावर झोपडीत जाण्यासाठी तो लपलेल्या जागेवरून बाहेर पडणार तेव्हढयांत त्याला कुणाच्या येण्याची चाहूल लागली. अंधारात त्याचा चेहरा दिसला नाही, तरी त्याच्या चालण्यावरून, आकृतिवरून तो मनजीत आहे हे त्यानं ओळखलं.

अरविंदाचे आणि मनजीतचे, वैशाली प्रेम प्रकरणापासून, मतभेद झालेत हे त्याला माहीत असल्यानं त्याला त्यांच्या भेटीत काही वावगं वाटलं नाही. अरविंदानं त्याला एकांतस्थळी भेटायला बोलवणं सहाजिक होतं. त्यांच संभाषण किती वेळ चालेल याची त्याला कल्पना नव्हती. संभाषण संपल्यावर अरविंदा तिथं थांबण्याची शक्यता नव्हती. रामेश्वर वैतागून तिथुन निघून गेला. असं त्याचं म्हणणं आहे. '

शेवटच्या वाक्यातील प्रत्येक शब्दावर जोर देत चारूदत्त म्हणाला.

त्याच्या शब्दांशिवाय याला दुसरे प्रमाण नाही. त्या रात्री मनजीत मळयांत गेलाच नाही, तेव्हा तो धारपवाडीत नव्हता. रस्त्यात बिघडलेल्या बसमध्ये अडकला होता.

रामेश्वर खोटं बोलतो अस गृहीत धरलं तर तो झोपडीत गेला होता असं म्हणावं लागेल. जर प्रतापने खून केला असता तर अरविंदाचं प्रेत रामेश्वरला दिसलं असतं आणि त्यानं तेव्हाच आरडा ओरड केली असती. ज्या अर्थी तो गप्प बसला त्या अर्थी अरविंदाचा खून त्याच्या हातून झाला असला पाहीजे. अन्यथा त्याच्या गप्प राहण्याला दुसरें काही कारण असावे.

‘नाही हो भाऊ, म्या कह्याला खून करीन? पैसे तर प्रतापने चोरले, ’

‘पैसे प्रतापनं चोरले. पण त्यानं खुन केला असता तर तू आंत जाताच  अरविंदाचे प्रेत दिसलं असतं. तू लगेच पोलिसांना का सांगितले नाही? गप्प का बसला?

‘पर म्या आंत गेलोच नाही ना. मला मनजीत येताना दिसला. ’

‘तू खोटं बोलतोस. मनजीत तेव्हा गांवात नव्हताच. काय मनजीत? ’ त्याने अचानक मनजीतला विचारले. बेसावध मनजीत गडबडला.

‘हां हां बिल्कुल. मी धारपवाडीला आलोच नव्हतो. ’

‘ऐकलंस? आता सांग तुझ्या बोलण्याला काय पुरावा आहे? ’

‘ते मला काही  सांगता येनार न्हाई. मह्या बोलन्या वर इश्वास ठेवा. अंधारात मला त्यो मनजीत वानी वाटला आसंन, पर कुनीतरी आल्तं. ’ त्याला मी मनजीत समजलो. ’

‘तुझ्या या बोलण्यावर मी विश्वास ठेवतो. कुणीतरी आलं होतं त्याला तू मनजीत समजलास. मनजीतला संशयाचा फायदा देऊन वगळलं तर प्रश्न निर्माण होतो की ती व्यक्ति कोण होती? अंधारात मनजीतसारखी दिसली म्हणजे डोक्यावर बुचडा बांधलेली व्यक्ति असली पाहीजे’

ती व्यक्ति स्त्री असावी असाही विचार माझ्या  मनांत येऊन गेला. पण विळयासारखं हत्यार ह्रदयापर्यंत मारणे शक्तिचं काम आहे. एखादी स्त्री ते करू शकेल अस वाटत नव्हतं. जेव्हा मी सुमनला भेटायला गेलो तेव्हा तिला लाकूड फोडतांना पाहून मला वाटलं, सुमनसारखी एखादी  काटक स्त्री हे काम करू शकेल. मला तिचा संशय आला. अरविंदाचा खून करावा इतका त्यांच्याबद्दल तिच्या मनांत व्देष होता. पण तिचाच खून झाल्याने तो प्रश्न आपोआपच निकालात लागला. प्रकरणातलं गूढ वाढलं.

सुमनचा खून झाला त्या संध्याकाळी तिच्या झोपडीवर सगळेजणं हजर होते. प्रताप, रामेश्वर, रणजीत, राजशेखर आणि मनजीत सुध्दा. एन्ड्रीनचा डबा मी तिच्या झोपडीच्या वाशांत अडकवलेला पाहीला होता. तो कुणीही सहज काढून तिच्या पिण्याच्या पाण्यात मिसळू शकतो.  ज्याने ते केलं त्याला देवीचासंचार गेल्यावर सुमनची पाणी पिण्याची सवंय माहीत होती.

पुन्हा खुनाची संधी: प्रत्येकाला होती, खुनाचा हेतूः माहीत नाही. पोलिस तपास; गरगरला.

एन्ड्रीनच्या डब्यावर कुणा एकाचे ठसे सांपडणार नव्हते. पाण्याचा तांब्या इतक्या लोकांनी हातळला होता की त्या वरील ठश्यातून काही निष्पण्णं झाले नसते. सुमनने अरविंदाचा खून करून आत्महत्या केली असावी असाही एक विचार येऊन गेला. पण कंदीलाचं उघडं झाकण, जळलेल्या सनकांडया, सांडलेलं रॉकेल, तिच्या जगण्याची धडपड दाखवत होतं.

आणि पोलिसांची खिल्ली उडवावी तशी खुनीने नारायणची हत्या केली.

नारायण स्वताः पायाने चालत जाऊन आपसूक खुनी व्यक्तिच्या जाळयात अडकला. तो बारमधून सरळ घरी गेला असता तर त्याचा जीव वाचला असता. पुलावरून जातांना त्याला सुमनच्या चिते जवळ बसलेला मनजीत दिसला, आश्चर्य वाटून तो तिकडे गेला. सुमनच्या चितेच्या का होईना सहवासात रहाण्याची कल्पना दारूच्या नशेत नारायणला पोएटीक वाटली. तिच्याबद्दलची जुनी प्रित जागी झाली. मनजीतने आग्रह करूनही त्याच्या सोबत घरी जाण्यास त्याने नकार दिला आणि मृत्युला सामोरा गेला.

आम्ही पोलिसस्टेशनला गेलो, तेव्हा पोलिसांना घाबरणारा मनजीत आमची वाट पहात हजर होता. त्यानं आम्हाला रात्री घडलेली हकीकत सांगितली. प्रतापनं पैशाची ब्रीफकेस नंदूच्या शेतातल्या विहीरीत टाकल्याचं त्यानंच आम्हाला सांगितलं.

अरविंदाचा खुन झाला त्या झोपडीत मिळालेल्या फिंगरप्रिंटचा रिपोर्ट आला होता. त्यांच्या छातीत घुसलेल्या विळयाच्या मुठीवर प्रतापच्या बोटांचे ठसे मिळाले. कदम उत्तेजीत होऊन त्याला अटक करायला निघाले. तेव्हढया गडबडीत मी त्यांना अरविंदाच्या मोबाईल वरील कॉल रेकॉर्ड चेक करायला सांगितलं. त्यात मनजीत आणि अरविंदाने परस्परांना केलेल्या कॉल्सचा डाटा मिळाला. तो आम्हाला संशयास्पद वाटला नाही. वैशालीच्या संदर्भात ते एकमेकांशी बोलत असणार.

कदमला त्यांचा खुनी मिळाला. त्याला अटक करण्याची त्यांना घाई झाल्यानं बाकी विचार करण्याची त्यांची तयारी नव्हती.

माझी रजा संपत आल्यानं मला जाण्याची ओढ लागली होती. ह्या प्रकरणांत मला वैशाली आणि भाऊंचा संशय दूर करण्या इतपतच रस होता. पुढचं सगळं कदमवर सोपवून मी मुंबईला परतण्याचा निर्णय घेतला.

परतीचा निर्णय घेतला तरी मनांत अस्वस्थता होती. अरविंदाचा खुनी कोण? या प्रश्नाचं प्रताप हे उत्तर चुकीचं आहे याची मला खात्री होती. ते उत्तर चुकीचं ठरवायचं असेल तर बरोबर उत्तर काय हे सांगण्याची जबाबदारी माझ्यावरच येत होती.

नदीत नारायणच्या प्रेता जवळ कदमने माझ्याबद्दल काढलेले उद्गार आठवले. त्यांनी सभ्यता पाळून मला उत्तर दिले होते तरी त्याचा अर्थ काही फार चांगला निघत नव्हता.

आणि सगळयांत भयानक गोष्ट म्हणजे खुनी अजून मोकळा होता!

राजशेखर गाडी चालवत होता तेव्हा मी शांतपणे या केसचा सुरवातीपासूनच्या घटनांचा संगतवार विचार करीत होतो.

अरविंदा बामनाच्या मळ्यात सांपडेल हे सुमनला कसं कळल?

तालुक्याला गेल्यावर अरविंदाला कोणतं महत्वाचं टपाल मिळालं? त्याचं पुढे काय झालं? मोबाईल सांपडला, पैश्याची ब्रीफकेस सांपडली, दागिने सांपडले पण खिशात जपुन ठेवलेलं पत्र कां सापडलं नाही?

सुमन आणि अरविंदात इतकी कडवी दुष्मनी होती की ते एकमेकांकडे जाणेच शक्य नव्हते. मग अरविंदाचा मोबाईल सुमनच्या घरात कसा गेला?

सायकॉलॉजिकली विचार केला तर प्रताप भुरटा आहे. लोकांना अडचणीत पकडून त्यांच्याकडून पैसे वसूल करू शकतो. त्याने अरविंदाच्या नावाखाली अनेकदा तसं केलेलं पण आहे. पण खून करण्याची त्याची मानसिकता नाही. अरविंदाचा खून करून स्वताःडोक्यवरच छत्र गमवण्या इतका मुर्ख नाही.

रामेश्वर, त्याने तलाठयाच्या अंगावर वाळून भरलेला ट्रॅक्टर घातला होता. पण त्याला अरविंदाचा सपोर्ट होता, म्हणून. रागाच्या भरात काहीही बोलला तरी त्याला माहीत होतं, अरविंदाच्या सांगण्यावरून त्याला छोटी मोठी कामं मिळतात. आक्रस्ताळेपणा करून कार्यभाग साधण्याची त्याची हातोटी आहे. स्वार्थ साधण्याची त्याची ती पध्दत आहे.

मग कोण?

अचानक माझ्या डोळया समोर त्याचं नाव तरळून गेलं. त्याला नजरे समोर ठेऊन मी सगळया प्रकरणाची पुनर्मांडणी केली. चित्राचे विखुरलेले ठोकळे योग्य जागी बसले आणि खुनी माणसाचे चित्र माझ्या डोळयां समोर उभे राहीलं.

गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन गोष्टीं लागतात. गुन्ह्याचा हेतू आणि त्याच्या निवेदनातली विसंगती.

लक फेवर द ब्रेव्ह! बुलडाण्याला गेल्यावर मला दोन्ही गोष्टी मिळाल्या. मी धारपवाडीला परत आलो.

त्याने उत्सुकता वाढविण्यासाठी नाटयमय पॉज घेतला.

‘पण खुन केला कुणी? ’ भाऊ उताविळपणे, खर्जातल्याआवाजात बोलले.

खुनी इथं उपस्थित आहे. माझी विनंती आहे की त्याने समोर येऊन आपला गुन्हा कबुल करावा. तस केल्यानं सुमनचे शेवटचे शब्द खरे ठरतील. रमा अंधारलं, दिवा लावशील?

‘मैनु है ना सी. मैंने कुछ नहीं किया. ’

दरवाजाकडे जात मनजीत म्हणाला. पण तो दरवाजापर्यंत पोहचू शकला नाही. सावध बसलेल्या कदमने त्याला कवेत पकडून चपळाईने त्याच्या हातात बेडी अडकली.

‘शाब्बास कदम! तुमची चपळाई वाखाणण्याजोगी आहे’.

दिवाणखान्यात जमलेले लोक त्याच्याकडे अचंबित होऊन पहात राहीले.

‘घेऊन जा तुमच्या गुन्हेगाराला. त्याच्याकडून कबुलीजबाब कसा वदवून घ्यायचा हे तुम्हाला चांगले माहीत आहे. आता मला रिलिव्हिंग लेटर द्या. उद्या सकाळच्या गाडीने मी समाधानाने मुंबईला परत जाईल.

‘थांबा इन्पेक्टर, सोडा त्याला. ’ वैशाली उभं रहात म्हणाली.

सगळे तिच्याकडे आश्चर्याने पाहू लागले.

# प्रकरण १८

‘थांबा इन्पेक्टर, सोडा त्याला. ’ वैशाली पुन्हा म्हणाली.

तिचा थंड आवाज करारी होता. दिवाणखान्यातल्या नजरा श्वास रोखुन तिच्या वर खिळल्या. निश्चयानं दमदार पावलं टाकत ती कदम जवळ गेली.

‘हा तुमच्या आधी माझा अपराधी आहे. मला जाब दिल्याशिवाय तुम्ही त्याला इथून घेऊन जाऊ शकत नाही. ’ तिने मनजीतला कदमच्या मिठीतून सोडवलं. त्याच्या हाताला हिसका देऊन तिनं त्याला रिकाम्या खुर्चीत नेऊन बसवलं.

‘मनजीत सर्वां समक्ष तू  सगळ्या गोष्टींचा खुलासा करायला हवा. हे सगळं काय आहे? चारूदत्त म्हणतो ते बरोबर आहे का? तू पळून का जात होतास? उत्तर दे. गप्प बसू नको. दे. . उत्तर. .

बेभान होऊन ती त्याचे खांदै घरून हालवू लागली.

‘वैशाली... . वैशाली... . प्लिज... . ’ खांद्याला धरून चारूदत्तनं तिला त्याच्यापासून अलग केलं. तिचं अंग थरथरत होतं. डोळ्यातलं पाणी गालांवर ओघळत होतं. चारूदत्तच्या हातापासून अंगचोरून ती म्हणाली,

‘इटस् ऑल राईट चारू. डोन्ट वरी. ’ मनजीतकडे तर्जनी रोखून ती म्हणाली, ‘यु हॅव टू एक्सप्लेन एव्हरीथिंग टू मी. इट इज माय राईट. ’

ती आपल्या जागेवर जाऊन बसली.

मनजीत गलीतगात्र होऊन बसला. त्याने दोन्ही हातांनी चेहरा झाकून घेतला. वैशालीच्या प्रत्येक प्रश्नानं त्याला तिक्ष्णबाण घुसल्या सारख्या वेदना झाल्या.

तो स्वताःशी पुटपुटला. ‘हुणा कोई इलाजा. सब कुछ भाजा. ’ वाहे गुरू दा मर्जी. जैसी करणी वैसी भरणी. कोई गल नही जी. ’ (होणाऱ्या गोष्टींना काय इलाज, सगळं संपल. देवाची मर्जी. जशी करणी तशी भरणी. काही हरकत नाही. )

त्याच्या मनाचा निश्चय झाला. मनोमन त्याने देवाची प्रार्थना केली.

‘प्यायला पाणी मिळेल? ’ त्याने चौकशी केली.

राजशेखरनं त्याला पाणी आणून दिलं. पाणी प्यायल्यावर “परमेश्वर धाणा है” म्हणून ग्लास खाली ठेवला. नजर जमिनीवर खिळवून त्याने बोलायला सुरवात केलीः

‘माझं नाव मनजीतसिंग सुरजीतसिंग भुल्लर. माझे वडील दिल्ली पोलिस कमिशनरपदावरून मागच्या वर्षी रिटायर झाले. बाप कमिशनर असल्याची हवा माझ्या डोक्यात होती. खिशात भरपूर पैसा खेळायचा. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला. माझ्या भोवती कुकर्मी मित्रांचं कोंडाळ जमा झालं. पोलिसांचा धाक नव्हता. बेताल वागावं. गुंडगिरी करावी. पोलिसांनी अडवलं तर बापाच्या नावाचा वापर करून सुटावं.

आमच्या लक्षांत आलं, माझ्या वडीलांच नाव सांगताच आम्हाला अटक करणारा मग्रुर पोलिस दुसऱ्या क्षणाला गयावया करायचा. तेव्हा आम्हाला आनंद वाटायचा पण आता वाटतं त्यांनी तसं करायला नको होतं. ते काही माझ्या बापाचं खात नव्हते.

आम्ही इतके वहावत गेलो की एका रात्री आम्ही मद्यधुंद अवस्थेत असताना रस्त्यावरून जाणाऱ्या मुलीला उचलून गाडीत कोंबले. तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. आमच्या क्रुरतेची परिसिमा म्हणजे नंतर आम्ही तिला, उष्टी पेपरप्लेट डस्टबीनमध्ये फेकावी तितक्या सहजतेन, रस्त्यावर फेकून दिलं. ’

हे सांगत असतांना कुणाच्या चेहऱ्याकडे पहाण्याची त्याची हिम्मत झाली नाही.

‘हे प्रकरण भारी पडलं. वडीलांनी आम्हाला वाचविण्याचा खुप प्रयत्न केला, पण जनप्रक्षोभां पुढे राजकिय संरक्षण देणाऱ्या मंत्र्यांनी पिताजींची साथ सोडली. आम्हाला अटक झाली. फास्टट्रॅक कोर्टानं आम्हाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

आमचं करिअरच काय आयुष्य संपलं. मॉंजी काही बोलत नव्हती फक्त “पुत्तर हैंजी गल्ती हो जाती” म्हणून रडत होती. तिची हालत पिताजीना पाहवली नाही. त्यांनाही माझ्याबद्दल प्रेम वाटतच असणार. आपल्या मुलाची अशी अधोगती कुणाला पाहवेल? जगा करीता मी गुन्हेगार असलो तरी माँ-बाप करीता तर मुलगाच होतो. मुलें चुकतच असतात. त्यांना आपण सांभाळून घ्यायचं नाही तर कुणी?

पिताजींनी भरपूर पैसा वाटला. आम्हाला जेलमध्ये घेऊन जात असतांना वाटेत पोलिसांनी मला पळून जाण्याची संधी दिली. चार मित्रांचा सोडून मी एकटा पळून गेलो.

नव्यानं आयुष्याची सुरवात करण्यासाठी मी दिल्लीवरून महाराष्ट्रात एका नातेवाईकाकडे येऊन राहीलो. साधे जीवन जगायला सुरवात केली. एकदा बँकेची जाहीरात पाहीली. संगतीमुळे बिघडलो नाहीतर तसा मी हुषार होतो. बारावीला मला चांगले मार्क्स होते. पिताजी पोलिसात अधिकारी नसते तर मी चांगला शिकलो असतो.  बारावीच्या बेसवर मी बँकेत अर्ज केला. मला बँकेची नोकरी मिळाली.

आम्ही दिल्लीला रहात असलो तरी आमचं मुळ गाव जयपुरीया आहे. तिथं माझे दादा- दादी रहातात. नोकरीसाठी अर्ज करतांना माझा पत्ता मुळ गावचा दिला. बँकेनं तिथल्या पोलिसठाण्यात माझी चौकशी केली. दादाजींच्या अशिर्वादामुळे माझे पोलिस रिपोर्ट समाधानकारक आले. मला बँकेत जॉब मिळाला आणि धारपवाडीला पोस्टींग मिळाली.

ह्यापैकी एकही गोष्ट झाली नसती तर फार बरे झाले असते. तुरूंगवास भोगून एक साधे सरळ आयुष्य सुरू करता आले असते. ’ त्याच्या आवाजात अतिव दुःख होते.

त्याने तळहाताने कपाळ बडवलं.

‘सादगीमध्ये किती सुकून असतो ते मला पहिल्यांदा कळलं. धारपवाडीच शांत जीवन मला आवडलं. पण मनांत भीती मात्र कायम घर करून होती. सतत भास व्हायचा मागून कुणीतरी येतं. कुणी हांक मारली की धस्स व्हायचं. पाठीमागून कुणी खांद्यावर हात ठेवला की काळजाचं पाणी व्हायचं. चला... .  एक डर तर संपला. ’

त्यानं थकून मान खुर्चीवर टेकवून डोळे मिटून घेतले. जणू इतक्या वर्षांनी मनाला लाभलेली शांती महसूस करीत होता.

‘धारपवाडीला आल्यावर मी या छोटया निरागस गांवात रमलो. पोलिसांची भीती वाटायची, पण नारायण माझा मित्र झाला. सुमनमौसीने माझी नुसती जेवणाची सोय केली नाही, तर तिने सग्या मौसीसारखा जीव लावला. ’

सुमनच्या आठवणीने त्याचा आवाज गहींवरून आला.

‘एक दिवस बॅंकेत, वैशालीची भेट झाली. तिच्यांत असं काहीतरी आहे की, पहिल्या भेटीतच तिने मला आकर्षित करून घेतलं. आम्ही कधी एकमेकांच्या जवळ आलो ते कळलंच नाही. तिच्याशी लग्न केलं तर मला तिच्या  प्रेमा बरोबर अरविंदाच्या राजकिय संरक्षणाची ढाल मिळणार होती. मी तिच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

तो संघर्षही कठीण होता. धर्म, जात, प्रांत, भाषा, अनंत अडचणी. पण मी जिद्द सोडली नाही. अरविंदा आपल्या भूमिके वर ठाम होते. ते फार धुर्त होते. त्यांच्या शब्दात सांगायचे तर ते गनिमी काव्याने हेतू साध्य करीत. माझ्या संबंधी  सखोल माहीती मिळविण्या करता त्यांनी मुंबईच्या एका नामांकीत डिटेक्टीव्ह एजन्सीची मदत घेतली. हे मला रिपोर्ट पाहील्यावर कळालं.

हां. त्या दिवशी टपालाने त्यांना तोच रिपोर्ट मिळाला होता.

तो रिपोर्ट त्यांच्या हातात आल्यावर बाजी त्यांच्या हातात गेली. तो त्यांनी पोलिसांना दिला असता तरी बरं झालं असतं. पण मला अंकित ठेवण्यासाठी, ब्लॅकमेल करण्यासाठी तो वापरण्याचा त्यांचा इरादा होता. त्या दिवशी त्यांनी मला फोन करून रात्री नऊ वाजता मळ्यात भेटायला बोलावलं. तुझ्याशी वैशालीबद्दल बोलायचं म्हणून सांगितले. “ तुला चतुर्भुज करतो” म्हणाले. त्याच्या अर्थ कळावा इतकं मला  मराठी येत नाही. माझ्या सोबत असलेल्या मित्रांला विचारल्यावर तो म्हणाला, मराठीत चतुर्भुज होणे म्हणजे’ लग्न करणे’  मला वाटलं त्यांचं ह्यदय परिवर्तन झालं. मला त्यांच्या बोलण्याचा गर्भितार्थ समजला नाही. मी आनंदात होतो.

रवीवारी, नेहमीप्रमाणे, मी बुलडाण्याला होतो. मला धारपवाडीला जाण्याची ओढ लागली. नेमकी रस्त्यात एस टी बंद पडली. तेव्हा अंधारलं होतं. कंडक्टरनं डेपोला फोन करून दुसरी गाडी मागवली पण तिला यायला उशीर होता. अस्वस्थ होऊन रस्त्यावर भटकत मी एस टीपासून दूर चालत गेलो.

तेव्हढयांत मला मोटरसायकलवरून येणारा नारायण दिसला. मला पाहून त्यानं गाडी थांबवली. माझी गाडी बंद पडली म्हटल्यावर त्यानं मला मोटरसायकलवर बसवून घेतलं, गाडी स्टार्ट करताना तो म्हणाला, गाडीत पेट्रोल टाकावं लागेल.

त्याचा खाबू स्वभाव मला माहीत होता. तो टाकी फुल करून घेणार याची मला कल्पना होती. मीही त्याला नेहमी खुश ठेवत असे. त्याच्याकडून मला पोलिसस्टेशन मधल्या बातम्या कळत असत.

एव्हढी नगदी कॅश नसल्याने, पेट्रोल पंपावर मी क्रेटीडकार्डने पेमेंट केले.

आम्ही धारपवाडीला आलो तेव्हा नऊ वाजून गेले होते. सिनेमाचा आवाज मोठ्यानं ऐकू येत होता. नेहमीप्रमाणे तो लाऊडस्पिकरचं कनेक्शन काढायला विसरला होता.

उत्साहात मी त्यांना भेटायला मळ्यात गेलो. पण तिथं गेल्यावर वेगळयाच गोष्टींना तोंड द्याव लागलं. त्यांनी खिशात ठेवलेलं पत्र काढून मला दाखवलं. जर मी वैशालीचा नाद सोडला नाही तर ते पत्र पोलिसात देण्याची धमकी दिली. शब्दानशब्द कसा वाढत गेला कळलंच नाही. माझा राग अनवार झाला. गतायुष्यातला रॉडीनेस जागा झाला. माझी नजर टेबलावर ठेवलेल्या विळयावर पडली. त्या क्षणी काय झाल ते मला कळलं नाही. खिशातला रूमाल टाकून मी विळा उचलला आणि ते सावध होण्या आधी गर्रकन वळून शक्तिनीशी त्यांच्या छातीत मारला. त्यांनी किंकाळी फोडली. त्यांचा आवाज ऐकून कुणी धांवून येईल असं मला वाटलं. पण सिनेमाच्या आवाजात त्यांचा आवाज मिळून गेला.

त्याच्या हातातलं पत्र काढून मी खिशात ठेवलं. तिथुन निघणार एव्हढयात मोबाईलची बेल वाजली. उजळलेल्या स्क्रिनवर वैशालीचा हसरा चेहरा दिसला. मोबाईल तसाच ठेवला तर त्याच्या आवाजानं कुणीतरी येईल अशी भीती वाटली. मला विचार करायला वेळ हवा होता. मी मोबाईल उचलून खिशात घातला. दरवाजा ओढून बाहेरच्या अंधारात निघून गेलो.

बाहेर पडल्यावर काय करावं मला समजेना. इथं माझं सुमनमौसीशिवाय कुणीच नव्हतं. मी तिच्या झोपडीवर गेलो. इतक्या रात्री मला बघून तिला आश्चर्य वाटलं. माझ्या हातून अरविंदाचा खून झाल्याचं तिला सांगितलं.

अरविंदाचा खून झाल्याचं ऐकून तिला आनंद झाला. तो असाच मरणार होता. तुझ्या हातून मेला एव्हढंच. घाबरू नको. तू धारपवाडीला परत आलास हे  कुणाला माहीत नाही. नारायणची फिकीर करू नको. मी त्याला सांगेल कुणाकडे बोलू नको. माझं बोलणं तो टाळणार नाही. तिनं माझ्या जवळचा मोबाईल काढून घेतला. काळजी करू नको मी हे शेतात कुठ गाडून टाकीन कुणाला कधी कळणार  नाही.

जेव्हा अरविंदाच्या घरचे लोक तिच्याकडे विचारायला गेले तेव्हा तिनं त्यांना अरविंदा कुठं सांपडेल ते सांगितलं. मी विचारल्यावर  म्हणाली,

वास सुटल्यावर तरी समजंन की. म्या सांगून सापडला त मह्यावर ईश्वास बसन. भिऊ नको. तुह्या वर काही येऊ देत नाही. तिचं बोलणं पटून मी तिच्याकडे दुर्लेक्ष केल. पण दुसऱ्यांदा जेव्हा पोलिस विचारायला आले आणि तिने:

“खुनी गांवातच आहे. तो स्वताः येऊन कबुली देईन” असं सांगितलं, तेव्हा माझं टेंशन वाढलं. एकतर मला पोलिसांची मनातून भीती वाटत होती. दुसरे म्हणजे सुमनमौसीला त्या सगळयां गोष्टींत मजा येऊ लागली होती. तिला, मिळणारी प्रसिध्दी हवीशी वाटत होती. आपलं म्हणणं खरं ठरावं ह्यासाठी ती माझा बळी देईल अशी मला भीती वाटली.

अपराधी मन माणसाला भेडसावतं. स्वताःच्या सांवलीला माणूस घाबरतो. सुमनमौसीकडून माझ्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो अशी भीती माझ्या मनानं घेतली. मला झोपडीच्या वाश्यांत अडकलेला एन्ड्रीनचा डबा आठवला. थोडीसी काळजी घेतली तर सोपं काम होतं. माझा अपराध माहीत असलेली सुमनमौसी एकमेव आहे. ती नसली तर ... .

तिला मारतांना मला खुप वाईट वाटलं. त्या रात्री मी ढसाढसा रडलो. पण काय करणार माझ्या जिवीताचा प्रश्न होता. ते काम काळजावर दगड ठेऊन केलं.

माझं मन मला खात होतं. मौसीची क्षमा मागण्यासाठी रात्री कुणी नसताना तिच्या चिते जवळ जाऊन बसलो. किती रडलो. किती माफी मागितली. किती वेळ गेला कळलं नाही. नारायणनं माझ्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा मला जाणिव झाली.

नारायणने अति मद्यपान केलं होतं. एकेकाळी त्यांच एकमेकांवर प्रेम होतं पण  ते लग्न करू शकले नव्हते. तिच्या आयुष्याची फरपट सांगतांना तो सारखा रडत होता.

मीही त्याच्या सोबत रडत होतो. पण त्याने जेव्हा सांगितलं,

"आपण पोलिस असून सुमनला वाचवू शकलो नाही. पण शपथ घेऊन सांगतो, खुनी  कुणीही असो, तिच्या खुन्याला मी सोडणार नाही. तो पकडला गेला तरी त्याचा खटला कोर्टात जाणार नाही. त्याची मौत पोलिस कस्टडीतच होईल. "

धगधगत्या चितेच्या लालसरप्रकाश त्याच्या दारूनं लालबुंद झालेला चेहरा भयानक दिसत होता.

नारायण भ्रष्ट असला तरी हुषार होता. त्यानेच मला धारपवाडीला येण्यासाठी लिफ्ट दिली होती. दोन आणि दोन चार समजायला त्याला वेळ लागणार नाही. तेव्हा आपली धडगत नाही याचा मला पुरेपुर अंदाज आला. त्या क्षणी मला उमगलं. नारायणचा खुन केल्याशिवाय पर्याय नाही.

हा शेवटचा.

मी निघून गेलो असं त्याला भासवून दबल्या पावलांनी परत गेलो. माझ्या अंदाजा प्रमाणं तो दुःखाने विव्हल होऊन वाळूत पडला होता. दारूच्या अंमलामुळे त्याचे डोळे मिटले होते. मी जवळ जाईपर्यंत त्याला चाहूल लागली नाही.

तो फार प्रतिकार करू शकला नाही.

अंधारातून मुख्य रस्त्यावर येणारच होतो तर माझे लक्ष  रस्त्यावरील दिव्याच्या प्रकाशातून येणाऱ्या लांब सावलीकडे गेले. मी पुन्हा अंधारात दडलो.

प्रतापला पाहून मला आश्चर्य वाटलं. त्याच्या  हातात अरविंदाची ब्रीफकेस होती. नंदूच्या शेतात जाऊन त्यानी ती विहीरीत फेकलेली मी पाहीली आणि माझ्या डोक्यात योजना तयार झाली.

दुसऱ्या दिवशी मी पोलिसांना रात्रीचा किस्सा सांगितला. योगायोगानं विळयावर प्रतापच्या बोटांचे ठसे होते. पोलिसांनी त्याला अटक केली. मुंबईचा सी. आय. डी. ऑफिसर पाहूणा निघून गेल्यावर मी बिनधास्त झालो होतो. पण... ... . .

असहाय्यतेनं त्यानं खांदे उडविले.

त्यानं हात जोडले. वैशालीकडे पाहून तो म्हणाला,

'मला क्षमाकर वैशाली. मी तुझ्या वडीलांचा खून केला. '

बांध सुटून त्याने रडायला सुरवात केली.

'रडू नको मनजीत. ' वैशाली यंत्राप्रमाणे चालत त्याच्या जवळ गेली. सगळे तिच्याकडे कुतुहलाने पहात होते. 'तू जे काही केलंस त्याची शिक्षा तुला भोगावी लागणार. '

रडणं विसरून तो सुध्दा आश्चर्याने तिच्याकडे पाहू लागला.

'तू माझ्या वडीलांचा खून केलास, निष्पाप सुमनबाईला विष दिलं, निरपराध नारायणला जीवे मारलं. कारण तुला जगायचं होतं. कोंडीत पकडले तर मांजर देखील नरडीचा घोट घेतं. तू तर माणूस आहेस. तुला सगळे गुन्हे माफ आहे रे मनजीत. माझ्या बापाचा खून, निष्पाप जीवाची हत्या. मी तुला माफ करील... . मात्र... . मात्र तू केलेल्या बलत्काराच्या गुन्ह्याला माफी नाही. खून गुन्हा आहे. पण बलात्कार पाप आहे. मनजीत त्याची तुला शिक्षा भोगावीच लागेल. मनजीत, त्याची शिक्षा तुला भोगावीच लागेल. '

तिचा आवाज टिपेला गेला. तिने खाड्कन त्याच्या मुस्काटात मारली.

'आय हेट यू मनजीत. मी तुझ्यावर जीवापाड प्रेम केले. तुझ्यामुळे माझ्या स्वप्नाची दुनिया उध्वस्त झाली. माझं जीवन विखुरलं पण तुझ्यासाठी मी एक टिपूस अश्रूही खर्च करणार नाही. '

कदमसाहेब, याला माझ्या नजरे समोरून घेऊन जा. आमच्या निष्कलंक आयुष्यात त्याला काही स्थान नाही.

# प्रकरण १९

दरवाजा धाड्कन बंद झाला.

पोलिस मनजीतला घेऊन गेले. तसे वैशालीचे अवसान गळाले.

काकूंच्या कुशीत शिरून ती रडू लागली. रमा तिच्या पाठीवरून हात फिरवू लागली. रणजीत, राजशेखर तिच्या जवळ गेले.

‘वैशाली, झाले ते चांगले झाले. तू मनस्ताप करून घेऊ नको. ’ रणजीत म्हणाला.

‘माझ्या मुर्खपणामुळे तुम्हा सगळयांना केव्हढं सहन करावं लागलं. ’ वैशाली म्हणाली, ‘मी त्याच्या नादी लागले नसते तर बाबा आज जिवंत असते. ’

‘काहीतरी बोलू नको. मृत्यु काय कुणाच्या हातात नसतो. तारणारा, मारणारा तोच आहे. उगी. शांत हो बघु, रडू नको. ’ काकू तिला कुरवाळत म्हणाली.

‘खरं तर आपण खुश व्हायला हवं. ’ राजशेखर म्हणाला, ‘जर लग्न झाल्यावर हे घडलं असतं तर काय केलं असतं? तुझ्या करता त्याला पाठीशी घालावं लागलं असतं ना? आधीच झालं तें छान झालं. ’

‘हे... ! ’ त्याच्या विचार झटकत वैशाली म्हणाली. ‘हे कधीही घडलं असतं तरी त्याला मी फासावर चढवलं असतं. बलत्कारी माणसाला क्षमा नाही. मला वाईट वाटतं, ते याचं की नेमकं हे माझ्या बाबतीच घडावं? मी असं काय केलं होतं? ’

‘हे विधीलिखीत असतं बेटा. ’भाऊ धीम्या सुरात बोलले, ‘नाहीतर कुठे पंजाब कुठे धारपवाडी. संकट टळलं. देवाचे आभार माना. गेलेला माणूस एकदा दुःख देतो. जीवंत माणूस रोज दुःख देतो. आपल्याला वाईट दिवस पहावा लागला नाही यातच सगळं आलं. ’

‘वैशाली, त्याच्यासाठी रडण्यांत काही अर्थ नाही. या क्षणापासून त्याला विसरून तू नवं आयुष्य सुरू कर. चल, वर जाऊन पड. मी आपल्यासाठी चहा करते. चहा घेतल्यावर तुला बरं वाटेल. चहा प्यायचा आणि परत पहील्यासारखं वागायचं सगळयांनी. ’ रमा तिच्या हात धरून उठवत म्हणाली.

‘मी ठीक आहे. मी इथंच थांबणार. इथं काय घडतं ते ऐकायचं आहे. मी सगळ्या गोष्टींना धीराने सामोरी जाईल. तुम्ही कुणी माझी काळजी करू नका. ’

‘ आता इथं काय घडणार आहे? ’ रमाने विचारलं.

‘काही गोष्टींचा खुलासा व्हायला हवा. चारूदत्त, खुलासेवार सांग. तुला मनजीतचा संशय कसा आला? कधी आला? त्याची हकीकत खोटी आहे ते तुला कसं कळलं? चारूदत्त आम्हाला सगळं ऐकायचं आहे. ’ वैशाली म्हणाली.

चारूदत्त दूर सोफ्यावर बसून हे कौटूंबिक जिव्हाळयाचं नाटय पहात होता. त्याच्या मनांत विचार आला, किती जीव लावतात हे एकमेकांना. इतकी एकमेकांत गुंतलेली माणसं क्वचितच आढळतात. मुंबईच्या धकाधकीच्या जीवनांत हे चित्र दुर्मिळ आहे. अशा लोकांच्या प्रेमाची उब आपल्याला मिळाली तर... ...

त्याचे विचार वैशालीच्या बोलण्यानं भंगले. तिच्या धीराचं त्याला कौतुक वाटलं.

‘आर यु ऑल राईट, वैशाली? त्यानं विचारलं.

‘ऑब्सल्युटली. आता उरले काय, सांग? ’

‘गुड! दॅट इज द स्पिरिट. ’

‘सांग ना. ’ तिनं पुन्हा विचारले.

शब्दांची जुळवणी करण्यासाठी तो थांबला. सोफ्याला पाठ टेकवून, डावा पाय, उजव्या पायावर ठेवून आरामात बसला. एखादी हकीकत सांगावी तश्या सुरात त्यानं बोलायला सुरवात केली.

‘खरंतर मला तो पहील्या भेटीतच आवडला नव्हता. याचं कारण मी इथं आल्यावर त्यानं पहील्या भेटीतच अरविंदकाकांच्या मृत्युची खबर सांगितली. पण आपण परप्रांतिय, परधर्मिय, यांच्याबद्दल

फार अलवार राहतो. त्यांना काही वाटायच्या आधी त्यांना काय वाटेल याचा विचार करतो. त्यांनी अपेक्षा नसताना आपण त्यांना विशेष वागणूक देण्याचा प्रयत्न करतो. याच मानसिकतेतून मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. जेव्हा मला त्याच्या आणि वैशालीच्या संबंधातबद्दल कळालं, तेव्हा मला त्याचा मत्सर वाटला. तो माझ्या रस्त्यातला कांटा वाटू लागला. त्याच्याबद्दल राग निर्माण झाला. तो खुनी, व्हिलन निघावा म्हणजे मी आपोआप हिरो होईल असा फिल्मी विचार माझ्या मनांत येऊन गेला. जेव्हा वैशालीनेच त्याच्याबद्दल मला ठामपणे सांगितलं तेव्हा मी हताश झालो. तिच्या मनांतून मी त्याला दूर सारू शकणार नाही याची मला जाणिव झाली. माझ्या निराश मानसिकतेचा त्याच्यावर कुठलाही अन्याय होऊ नये याची दक्षता घेण्याचा मी निर्णय घेतल्याने आपोआपच त्याला झुकते माप मिळले. '

काहीतरी आठवून तो विषादाने हसला, पुढे बोलू लागला.

'त्याचं नशिबही जोरावर होतं. त्याची जबानी घ्यायची त्या दिवशी बँकेत गर्दी होती. तो दुपारी येतो म्हणाला. पण त्या संध्याकाळी सुमनकडे जाण्याचा बेत ठरला. त्याची जबानी पुढे ढकलण्यात आली. दुसरे दिवशी त्याची जबानी घेतली. बोलण्याच्या ओघात मोठया आत्मविश्वासानं आणि जोशात त्यानं एस. टी. ची तिकीट काढून माझ्या समोर धरली. त्याचवेळी मला ती निरखुन पाहता आली असती तर त्याची लबाडी उघड झाली असती. पण ऐन वेळी सावकाराने येऊन गोंधळ घातला. नकळत तिकिटं मी पाकिटात ठेऊन दिली. सावकाराच्या गडबडीतून रिकामा होत नाही तर सुमनच्या मृत्युची खबर आली. पाठोपाठ दुसऱ्या दिवशी नारायणच्या खुनानं सगळी केस होपलेस करून टाकली.

या सगळयांवर कडी म्हणजे मनजीतनं प्रतापला ब्रीफकेस नष्ट करतांना पाहीले. ते त्यानं पोलिसांना येऊन सांगितलं. कदम त्याला अटक करायला गेले तेव्हा तिथं त्यांना अरविंदाच्या अंगावरील दागिने आणि कॅश सांपडली.

खुनाच्या हेतू सह खुनी पकडला. त्यांचे समाधान झाले. पण माझ्या मनांतली शंका मिटली नाही. कारण पैशा करीता  कुणाचा खुन करावा असा प्रतापच्या स्वभाव नव्हता. त्याला पाठबळ असेल तर तो जे सांगेल ते करील. एकटयाने काही करण्याची त्याच्यात हिम्मत नाही. अरविंदाचा खून तो कुणाच्या पाठबळावर करणार होता?

तो खुनी नाही असं कदमला सांगितलं तर खरा खुनी सावध होण्याची शक्यता होती. म्हणून मी काही बोललो नाही. उलट मी मुंबईला जातो म्हणून गवगवा केला. खुनी मनांतून खुश झाला. प्रताप खुनी आहे की नाही हे सिध्द व्हायला कित्येक वर्ष निघून जातील. तो दोषी ठरेल अथवा नाही याच्याशी खुन्याला  काही कर्तव्य नव्हतं. आपण निर्दोष सुटलो याची त्याला खात्री पटली.

त्यानी माझ्याकडे दिलेली तिकीटं मी विसरून गेलो होतो. बुलडाण्याला शेगाव गाडीत  बसलो तेव्हा तिकीट काढतांना मला ते दिसले. त्याच्याकडे पहाता क्षणी मला काहीतरी खटकलं. मी गाडीतून खाली उतरलो. खाली उतरल्यावर मी पुन्हा तिकीटांच निरिक्षण केलं तेव्हा माझ्या लक्षांत आलं, मला काय खटकत होतं:

‘‘फेल झालेल्या एस टी च्या पॅसेंजरला, दुसऱ्या एस टीत चढवतांना पहीला कंडक्टर तिकीटावर पेनानं काही खुणा करून देतो. ह्या तिकीटावर तसली कुठलीही खुण मला दिसली नाही. याचाच अर्थ त्याने दुसऱ्या एस टीने प्रवास केला नव्हता. रस्त्यात थांबण्याची कुठे सोय नाही. मग तो धारपवाडीला परतला कसा? ’’

नारायण त्या दिवशी बुलडाण्याला गेला होता हे मला समजले होते. माझ्या डोळ्यांसमोर सर्व चित्र स्पष्ट झालं. नारायणचा फुकटया स्वभाव मला माहीत होता. त्याने नक्कीच वाटेत मनजीतकडून पेट्रोल टाकून घेतलं असणार. माझा हाही अंदाज खरा ठरला. फुकट मिळते म्हणून त्याने टाकी फुल करून घेतली. तेव्हढे पैसे मनजीतकडे नसल्यानं त्यानं क्रेडीट कार्ड वापरलं. तो त्याच्या विरूध्द ढळढळीत पुरावा.

मी बुलडाणा पोलिसस्टेशनातून त्याच्या गावच्या पोलिसस्टेशनशी संपर्क केला. त्याची साद्यंत माहीती मिळवली. तिथल्या पोलिसस्टेशनच्या  इंचार्जने  सांगितले, ते त्याचे जन्मगाव असले तरी मनजीत दिल्लीत जन्मला. तिथंच वाढला. त्याचे आजी- आजोबा गांवात रहातात. त्याचे वडील दिल्लीला पोलिसांत मोठ्या हुद्दावर होते. त्याच्या दबावा खाली आमच्या पोलिसस्टेशनने मनजीतचा रिपोर्ट दिला. तो खेडेगांवातल्या शेतकऱ्याचा मुलगा नसून दिल्लीच्या पोलिसअधिकाऱ्याचा मुलगा आहे. सुरजीतसिंग भुल्लर.

दिल्लीचा पोलीस अधिकारी. सुरजीतसिंग भुल्लर! नाव ऐकल्यासारखे वाटले. इंटरनेटच्या क्रांतीमुळे मला बुलडाणा पोलिसस्टेशनमध्ये बसून सुरजीतसिंग भुल्लरच्या वाया गेलेल्या मुलाची साद्यंत केस समजली.

माझी खात्री पटल्यावर मी कदमला फोन करून आजची मिटींग आयोजीत केली. पुढे काय झालं ते तुम्हाला माहीत आहे. '

******

दुसरे दिवशी तो जेव्हा मुंबईला जाण्यासाठी निघाला तेव्हा त्याला बुलडाण्याला सोडविण्यासाठी राजशेखर येणार असे ठरले होते. पण सकाळी चारूदत्त निघाला, तरी त्याचे तयार होण्याचे लक्षण दिसत नव्हते. शेवटी चारूदत्त त्याला म्हणाला

'अरे बाबा तू कधी तयार होणार? मला पुढे मुंबईला जायचंय. गाडी गेली तर परेशानी व्हायची. '

'मला अचानक शेतावर काम निघाल्याने मी काही येऊ शकणार नाही. ' तो म्हणाला. 'पण तू काही काळजी करू नको. तुला कुणीतरी नेऊन सोडील. '

'कोण रणजीत? '

'नाही. रणजीत बाहेरगावी जाणार आहे. '

'मग? '

'वैशाली. 'चारूदत्त त्याच्याकडे पहातच राहीला. त्याच्या चेहऱ्यावरील भाव पाहून राजशेखरला हसू आल. 'माझ्याकडे बघत बसू नको. ती केव्हाची बाहेर कारमध्ये बसून तुझी वाट पहाते आहे. '

निरोप देताना मावशी म्हणाली,

'सुतकात असताना घरी मंगलकार्याची गोष्ट बोलता येत नाही. वेशीच्या बाहेर गेल्यावर काही बंधन नसत. '

चारूदत्त लाजून हसत हो म्हणाला.

त्याने चोरटया नजरेनं वैशालीकडे पाहीले. ऐकू न आल्याप्रमाणे ती गंभीरमुद्रेने दूरवर कुठे तरी पहात होती. त्याने चल म्हटल्यावर तिने गाडी स्टार्ट केली.

गाडी वेशीच्या बाहेर गेल्यावर चारूदत्तने तिला विचारले,

'वैशाली... ?

'हूं... ? ' तिन  खड्डयाच्या रस्त्यावरील नजर हाटविली नाही.

' तू फक्त बुलडाण्यापर्यंत सोबत करणार? '

मोठा खड्डा सफाईदारपणे चुकवल्यावर तिने त्याच्याकडे पाहीले.

तिच्या नजरेने जे सांगितले त्याला शब्दाची गरज नव्हती.

समाप्त

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. नव्याने लेखन करणाऱ्यांना एक मोठा वाचकवर्ग सहजासहजी उपलब्ध व्हावा ही आमची इच्छा. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. वर्षाला चाळीस लाख डाऊनलोड्स जगभरातून होतात.

पण आम्ही अजिबात समाधानी नाही. जगभरातल्या १२ कोटी मराठी लोकांपैकी किमान सहा कोटी तरी वाचक व्हायला हवेत. एक मोठ्ठी चळवळ उभी रहायला हवी. चांगल्या लेखकांना कोटीभर वाचक मिळायला हवेत.

हे अशक्य नाही. आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!